Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

MARATHI READING SERIES



FIFTH BOOK

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

66 म ह०
ओ३म् ।
सा० संख्या
23
पंजिका संख्या

पुस्तकों पर सर्वप्रकार की निशानियां लगाना अनुचित है।

कोई विद्यार्थी पन्द्रह दिन से अधिक पुस्तक नहीं रख सकता।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

7651

66

2 5

7651
1/9/71

CHECKED 1973
Initial G .....

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

66 म ४० ओ३म् ।
सा० संख्या 23 पंजिका संख्या ——

पुस्तकों पर सर्वप्रकार की निशानियां लगाना अनुचित है ।

कोई विद्यार्थी पन्द्रह दिन से अधिक पुस्तक नहीं रख सकता ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

7651

2 5 7651
1/9/71

CHECKED 1973
Initial G .....

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Department of Public Instruction, Bombay.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

मराठी पांचवें पुस्तक.

व्हर्न्याक्युलर टेक्स्ट बुक्स रिव्हिजन कमिटीनें तयार केलें.

MARATHI FIFTH BOOK.

Prepared

BY

The Vernacular Text Books Revision Committee.

संख्या १०४८८७

PUBLISHED BY

MACMILLAN AND Co., LIMITED,

LONDON, BOMBAY AND CALCUTTA.

All Rights Reserved.

Price { *8 As. cloth.* / *6 As. paper board.* किंमत { ८ आणे कापडी. / ६ आणे कागदी.

1913.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

(REDUCED IN PRICE.)

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

PRINTED BY B. MILLER, SUPERINTENDENT.
BRITISH INDIA PRESS, BOMBAY.

मुंबई.

बी. मिलर, सुपरिंटेंडेंट यांनीं
" ब्रिटिश इंडिया " छापखान्यांत छापिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी पांचव्या पुस्तकांतील धड्यांची अनुक्रमणिका.

धड्याचें नांव.	पृष्ठ.
भाग पहिला.	
सामान्य विषय.	
१. नईपणा.	१
२. प्रसंगावधान.	३
३. दूषित हवेचे वाईट परिणाम व स्वच्छ हवेचा पुरवठा.	६
४. जान काक्रन.	८
५. गुरु सांदीपनि आणि त्याचे शिष्य.	१०
६. आत्मसंयमन.	१२
७. देवाविषयीं (कविता) ...	१५
८. नेमस्तपणा.	१७
९. हिंदुस्तानांतील लोक व त्यांचे धर्म.	१९
१०. हिंदुस्तानच्या लोकांविषयीं मेग्यास्थिनीस ह्याचें मत.	२३
११. प्राचीन हिंदू लोकांचीं समुद्रपर्यटनें.	२५
१२. विद्याप्रशंसा. (कविता) ...	२८
१३. थडेखोर विनायकराव. ...	३०
१४. दिरंगाईचा परिणाम. ...	३२
१५. हातिम ताई.	३५
१६. उधळेपणा.	३७
१७. बाजीराव बल्लाळ ह्यांचा पुत्रास उपदेश. ...	४०
१८. हिंदूंच्या जुन्या व नव्या चालीरिती.	४२
१९. अभिमन्यूचा पराक्रम. (कविता)	४५
२०. कार्ले एथील लेणीं. ...	४६
२१. हिंदुस्तानांतील कालवे. ...	४९
२२. तुकाराम.	५२
२३. हलकटपणा व दगलबाजी.	५५
२४. जीवित-महिमा. (कविता)..	५७
२५. खोड्यांत पडल्यानें क्लेश ते कसले?	५९
२६. अश्वहरण.	६१
२७. कोलंबस व अमेरिका खंड.	६४
२८. राजा हरिश्चंद्र.	६७
२९. गोकाकचा धबधबा. ...	७०
३०. कर्ण व शल्य यांचें संभाषण. (कविता)	७३
३१. कांचनमृग.	७४
३२. एका कृपणाची गोष्ट. ...	७७
३३. डोळ्यांची रचना. ...	८०
३४. विपन्नावस्थेस पावलेल्या चारुदत्ताचे उद्गार. (कविता)	८२
३५. स्वावलंबनाविषयीं गोष्ट....	८३
३६. वास्को-ड-गामा ह्याची हिंदुस्तानाची पहिली सफर.	८६
३७. वाफेचें यंत्र व त्याचा शोध.	८९
३८. नीतिशतकांतील वेंचे. (कविता)	९१
३९. वामनपंडित.	९३
४०. हारून रशीद.	९६
४१. देशपर्यटनापासून लाभ. ...	९८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धड्याचें नांव.	पृष्ठ.
५२. द्वेष.	१००
५३. धारिष्टाविषयीं एक गोष्ट.	१०२
५४. गोपिकाबाईचा पुत्र-शोक. (कविता)	१०४
५५. एक स्वप्न व त्याचा उलगडा.	१०७
५६. रामायण आणि महाभारत.	१०९
५७. व्यायाम आणि विश्रांति.	१११
५८. कर्णाची प्रार्थना आणि कृष्णाचें प्रत्युत्तर. (कविता)	११३
५९. परोपकार.	११५
६०. दुःशासनाच्या वधाचा सूड घेण्याला दुर्योधन निघतो.	११७
६१. हिंदुस्तानांत चालणारे मुख्य शक.	१२०
६२. परमताविषयीं सहिष्णुता	१२२
६३. मोरोपंत.	१२४
६४. चंद्रोदय. (कविता) ...	१२७
६५. एक मौजेची गोष्ट. ...	१२८

भाग दुसरा.

इतिहास.

६६. पैगंबर महंमद.	१३१
६७. गिझनीचा सुलतान महमूद व लाहोरचे राजे. ..	१३३
६८. शहाबुद्दीन घोरी आणि पृथ्वीराज चव्हाण. ...	१३६
६९. चितोडचा वेढा. ...	१३९
७०. फिरोजशाह तघलख. ...	१४२
७१. अकबराचा स्वभाव आणि त्याची राज्यपद्धति. ...	१४५
७२. मलिकंबर (इ० स० १५४६-१६२६).	१४७
७३. जहांगीर बादशाह व सर टामस रो.	१४९
७४. औरंगजेबाची दक्षिणेंतील मोहीम.	१५२
७५. कुरुक्षेत्र किंवा पानपतची समरभूमि.	१५४

भाग तिसरा.

भूगोल—वर्णन.

७६. सूर्यमाला.	१५७
७७. तारे आणि त्यांचे पुंज.	१६०
७८. अक्षांश आणि रेखांश. ...	१६३
७९. वारे.	१६६
८०. जमिनीचें झिजणें व धुपणें.	१६९
८१. हिंदुस्तान देशाचें स्थान व त्याची भूतलरचना ह्यांचा तेथील हवामान व लोकस्थिति ह्यांवर परिणाम.	१७२
८२. हिंदुस्तानांतील दळणवळणाचे मार्ग.	१७५
८३. हिंदुस्तानाच्या किनाऱ्यानें सफर. (कराचीपासून कोलंबोपर्यंत.) ...	१७७
८४. हिंदुस्तानाच्या किनाऱ्यानें सफर. (कोलंबोपासून रंगूनपर्यंत.)	१८१
८५. हिंदुस्तानाची राज्यव्यवस्था.	१८४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धड्याचें नांव.	पृष्ठ.	धड्याचें नांव.	पृष्ठ.
भाग चौथा.			
सृष्टिज्ञान आणि पदार्थवर्णन.			
७६. हवा, वायु आणि वाफ.	१८७	८५. अपुष्प वनस्पति व त्यांची पुनरुत्पत्ति. (नेचे, शेवाळ, वगैरे.)	२११
७७. प्रतिध्वनि.	१९०	८६. नारळ व बाभूळ. ...	२१४
७८. दगडी कोळसा व त्याचा धूर.	१९२	८७. साग आणि वड. ...	२१७
७९. कारंजें.	१९६	८८. शाळेंतील बाग व तिचा उपयोग.	२२०
८०. पारा व उष्णता-मापक यंत्र.	१०८	८९. रेशमाचा किडा. ...	२२२
८१. हवेचा दाब व पाण्याचा बंब.	२०१	९०. कोंबडीचें अंडें.	२२५
८२. हवेचा दाब व वायुभार-मापक यंत्र.	२०३	९१. मनुष्याचें भाऊबंद. ...	२२७
८३. सपुष्प वनस्पतींचे दोन वर्ग.	२०६	९२. मानवी प्राण्याची उन्नति.	२३०
८४. सपुष्प वनस्पतींची पुनरुत्पत्ति.	२०९	९३. मेंदू व मज्जातंतु. ...	२३३
		९४. यकृत्, प्लीहा आणि मूत्रपिंड.	२३६
		९५. रंगारी-काम.	२३९
		९६. कुंभार-काम.	२४२
		९७. तरफ.	२४४
		९८. कप्पी आणि चाक व कणा.	२४७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग पहिला.

सामान्य विषय.

१. मर्दपणा.

आपण शरिरानें चांगलें बळकट व्हावें असें कोणास वाटत नाहीं ? सर्वांस वाटतें. पण नुसतें शरिरानेंच बळकट होऊन भागणार नाहीं. तर आंगीं निश्चयाचेंही बळ असलें पाहिजे; व त्याप्रमाणेंच आपल्या बुद्धीचा दिवसेंदिवस विकास व्हावा, हेंही फार इष्ट आहे. आपण सर्व उपजतच हुशार किंवा शरिरानें सुदृढ असणें शक्य नाहीं. तरी आपली शरीरशक्ति व आपली निश्चयशक्ति वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणें आपणां सर्वांच्या हातीं आहे. शरीर व मन हीं दोन्ही शिक्षणानें कमाविलीं पाहिजेत. शरिराची सुदृढता नियमितपणा आणि योग्य व्यायाम ह्यांच्या योगानें साध्य होते, आणि निश्चयशक्ति वाढविण्यास मनोनिग्रह करावा लागतो. व्यायाम व नियमितपणा ह्यांनीं शरिरास शिक्षण मिळतें, व मनोनिग्रहानें चित्तवृत्तींस वळण लागतें. आतां हें दोन्ही प्रकारचें शिक्षण चालू ठेविलें असतां आपण सर्वच मोठे विद्वान् किंवा हुशार होऊं असें नाहीं; तथापि त्याच्या योगानें आपणां सर्वांस चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें नीट समजूं लागेल, आणि चांगल्याची गोडी जास्त लागून वाईट आवडेनासें होईल. तशीच ह्या द्विविध शिक्षणानें सहजगत्या आपली बुद्धिमत्ताही वाढेल.

पहिल्यानें शरीर सुदृढ करण्यास काय केलें पाहिजे तें पाहूं. शरीर बळकट व काटक व्हावें म्हणून आपण रोज कांहींतरी चांगला व्यायाम केला पाहिजे. शेतकाम करणें, तालीम करणें, धावणें, पोहणें, कुस्ती करणें त्याचप्रमाणें आट्यापाट्या, खोखो, क्रिकेट इत्यादि खेळ खेळणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्यांनीं शारीरिक श्रम होतात. ह्यांपैकीं जें आपणांस सोईचें पडेल, तें करीत जावें. पण कोणत्यातरी प्रकारें शरिरास व्यायाम घडावा. शिवाय, जे पदार्थ खाल्ल्यानें मेदोवृद्धि होऊन आळस उत्पन्न होतो, ते पदार्थ व विशेषतः गोड पदार्थ आपण खाऊं नयेत. मद्यसेवन व गांजा, तंबाखू वगैरे ओढणें ह्यांपासून तर अगदीं दूर राहिलें पाहिजे. ज्यांपासून शरीरशक्तीचा ऱ्हास होतो अशा संवयी अगदीं लागूं देतां कामा नयेत. तरुणपणीं ब्रह्मचर्य-व्रत पाळण्याची वेदकाळची जुनी वहिवाट चांगली होती, व आंगीं मर्दपणा येण्यास तिची फार मदत होत असे.

चांगला व्यायाम व चांगल्या संवयी ह्यांच्या योगानें सहजासहजीं आंगीं मनोनिग्रह येतो. मनोनिग्रहावांचून आळस, सुखोपभोग इत्यादिकांचा मोह आपणांस जिंकतां येणार नाहीं, आणि आपल्या हातून कोणतेंही कठीण अथवा कष्टसाध्य काम तडीस जाणार नाहीं. मनोनिग्रहानेंच कोणतेंही दुःख आपणांस कुरकुर न करतां सोसतां येऊं लागून आपण सहनशील व दीर्घोद्योगी होतों. शारीर क्लेश सोसतां येऊं लागले व इंद्रिय-सुखाचा मोह टाळतां येऊं लागला, म्हणजे आपली निश्चयशक्ति वृद्धिंगत होते, व इतर मोहांचाही प्रतिकार करतां येतो.

ह्याप्रमाणें ज्यानें आपलें शरीर व मन हीं कमाविलीं आहेत, त्यास राग सहज गिळतां येतो. तो दुःखानें विव्हळ होत नाहीं व संकटानें घाबरून जात नाहीं. तो खोटें बोलण्याचें नीच काम कधींही करीत नाहीं; तसेंच आकसाचीं कृत्यें, हलकटपणा व लुच्चेगिरी ह्या गोष्टींचा आपणास विटाळही होऊं देत नाहीं. जो सुखोपभोग किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वार्थ साधल्यानें आपल्या शरीरशक्तींत अथवा निश्चयशक्तींत कमीपणा येईल, तो सुखोपभोग किंवा स्वार्थ न साधलेला बरा, हें त्यास सहज समजतें. तो दुर्बलांच्या कुचेष्टा करीत नाहीं व त्यांस छळीत नाहीं; उलट तो त्यांचा उत्तम साह्यकर्ता व त्राता बनतो; व अशा मनुष्यासच मर्द म्हणतात. तर मग खऱ्या मर्दपणाचें बीज मनोनिग्रहांत आहे, व त्यानेंच मनुष्याच्या आंगीं खरें सामर्थ्य येतें. मुलांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, वयानें मोठ्या अशा मनुष्यांच्या दुर्गुणांचें किंवा मूर्खपणाच्या कृत्यांचें अनुकरण केल्यानें आंगीं मर्दपणा येत नाहीं. जे मुलगे तंबाखू व इतर मादक पदार्थ ह्यांचें सेवन करितात व दुसरीं कुकर्मे करितात, ते अत्यंत मूर्ख होत. त्यांची बुद्धि आणि निश्चयशक्ति ह्या कमी होतात; तशीच त्यांच्या शरिराचीही खराबी होऊन ते अल्पायुषी होतात; व त्यामुळें त्यांची संततीही त्यांच्यासारखीच, किंबहुना अधिक, निःसत्त्व आणि अल्पायुषी होते.

मुलांनो, जर तुम्हांस मर्दपणा म्हणजे शरिराची व मनाची खरी बळकटी आंगीं यावी असें वाटत असेल, तर योग्य व्यायाम करा आणि मनोनिग्रह करण्यास शिका.

---

२. प्रसंगावधान.

मुलांनो, गणपतरावाच्या घरास आग लागली असतां कृष्णरावानें सावधगिरी ठेवून त्याच्या घराचा व माणसांचा बचाव कसा केला, तें तुम्हीं चौथ्या पुस्तकांत वाचिलें आहे. अशा प्रकारें कोणतेंही संकट प्राप्त झालें असतां त्या वेळीं न घाबरतां, न भितां, संथपणें त्यांतून पार पडण्याची तजवीज काढतां यावी, अशी जी मनाची स्थिति, तिला प्रसंगावधान म्हणतात. आंगीं प्रसंगावधान असल्यानें आलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकटांतून कसें पार पडतां येतें, ह्याविषयीं तुम्हांस आणखी एक दोन गोष्टी सांगतों.

एका शहरांत एक किराण्याचा व्यापारी होता. तो किराण्या जिन-सांशिवाय तऱ्हेतऱ्हेचें बींही विकीत असे. एके दिवशीं त्यानें आपल्या मुलाला तळघरांतून टोपलीभर जिरें आणावयास सांगितलें. त्याप्रमाणें मुलगा एक कांकडा पेटवून घेऊन तळघरांत गेला. जिऱ्याची टोपली घेऊन बाहेर येतांना मुलाच्या हातांत कांकडा नाहीं असें पाहून बापानें, "कांकडा कोठें ठेविलास ?" म्हणून त्यास विचारिलें. मुलगा म्हणाला, "जिऱ्याच्या पोत्याजवळ जें एक काळ्या बियाचें पोतें आहे, त्यांत तो खोचून ठेविला आहे." हें ऐकतांच बापाच्या पोटांत धस्स झालें. तो मनांत म्हणाला, "तें काळें बीं कसलें ! ती बंदुकीची दारू आहे ! जर का कांकड्याची ठिणगी तींत पडली, किंवा तो दारूपर्यंत जळत गेला, तर सर्व घराचा आणि माणसांचा एकदम फडशा उडेल ! असो; खालीं जाऊन कांकडा वरतीं आणावा, मग काय होईल तें होवो !" असा मनाचा धडा एका क्षणांत करून तसाच तो तळघरांत उतरला. कांकड्याला वारा लागून दारूत ठिणगी पडेल म्हणून तो अगदीं हळू हळू कांकड्याजवळ गेला; आणि ठिणगी पडली तरी हातावरच पडावी, म्हणून ओंजळ करून, तीमध्यें हळूच कांकडा धरून त्यानें तो बाहेर काढिला. ईश्वरकृपेनें ठिणगी कोठेंच पडली नाहीं, व कशाचाही नाश झाला नाहीं. पाहा, त्या व्यापाऱ्याचें केवढें प्रसंगावधान ! त्या प्रसंगीं जर तो गडबडून गेला असता, तर त्याच्या घरादाराचा सर्वस्वीं नाश झाला असता; परंतु त्यानें अशा प्रसंगीं आपलें चित्त स्थिर ठेवून मोठ्या धैर्यानें आलेलें अरिष्ट टाळिलें.

दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, एका खेडेगांवांत एकदां कांहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसें रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर आंगणांत चांदण्यामध्यें बोलत बसलीं होतीं. इतक्यांत जवळच्या झाडींतून एक वाघ निघाला व क्षणार्धांत त्यांच्याजवळ येऊन ठेपला. तो आतां त्यांच्या आंगावर उडी घालणार, तोंच त्यांतील एका बाईनें प्रसंगीं अवधान राखून मोठ्या शिताबीनें जवळच एक छत्री पडली होती ती घेतली, व वाघाच्या आंगावर धावत जाऊन त्याच्या तोंडापुढें एकदम उघडली. त्यासरसा वाघ बुजला व ताडकन उडी मारून झाडींत निघून गेला. अशा युक्तीनें त्या बाईनें वाघापासून सर्वांचा बचाव केला.

आतां प्रसंगीं अवधान न राहिल्यानें नुकसान कसें होतें ह्याविषयींही एक गोष्ट सांगतों. एकदां एक लहान मूल रांगत रांगत विहिरीच्या कांठाशीं गेलें व वांकून विहिरींत पाहूं लागलें. तें त्याच्या आईनें पाहिल्याबरोबर, अगदीं घाबरून जाऊन, तिनें जी मोठ्यानें किंकाळी फोडिली, त्या किंकाळीसरसें मूल दचकून विहिरींत पडलें. बरें, पुढें तरी तिनें चटकन कोणाला बोलावून मुलाला वरतीं काढावयाची व्यवस्था करावी, तीही न करतां ती तशीच रडत बसली. कांहीं वेळानें लोक जमून त्यांनी मुलाला वर काढिलें, परंतु मध्यें बराच वेळ गेल्यामुळें तें मूल गुदमरून मरून गेलें होतें. पाहा, ती बाई बावरून गेल्यामुळें केवढा हा अनर्थ ओढवला! जर ती न घाबरतां हलकेच मागून जाऊन मुलाला झपदिशीं उचलून घेती, तर मूल सुरक्षित राहिलें असतें; परंतु तिच्या आंगीं प्रसंगावधान नसल्यामुळें बिचारें मूल मरून गेलें!

प्रसंगावधान आंगीं असणें हा मोठा गुण आहे. तो नसेल तर संकटांतून पार पडतां येणें मुष्कील आहे. संकट केव्हां येईल ह्याचा मुळींच नेम नसतो. ह्याकरितां प्रत्येकानें आंगीं प्रसंगावधान आणण्याचा प्रयत्न करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. दूषित हवेचे वाईट परिणाम व स्वच्छ हवेचा पुरवठा.

आपण दर मिनिटास सुमारें सतराअठरा वेळां बाहेरील हवा आपल्या फुप्फुसांत घेतों व फुप्फुसांत घेतलेली हवा बाहेर सोडितों. ह्या क्रियांस श्वासोच्छ्वास म्हणतात. श्वासोच्छ्वासाच्या योगानें आपलें रक्त शुद्ध होतें. फुप्फुसांत घेतलेली हवा ताजी व स्वच्छ नसेल, तर आपलें रक्त लवकरच नासून जाईल, व शरिराचे व्यापार नीट चालणार नाहींत. ह्यास्तव जी हवा आपण फुप्फुसांत घेतों, ती स्वच्छ असणें फार महत्त्वाचें आहे.

हवेंत मुख्य दोन वायु आहेत. त्यांपैकीं ज्या वायूवर प्राण्यांचें जीवन मुख्यत्वें अवलंबून असतें, त्यास आक्सिजन म्हणतात. हा वायु फार तीव्र आहे. त्याची तीव्रता कमी करण्याकरितां त्यांत नैट्रोजन नामें दुसरा एक वायु मिसळला आहे. ह्या दोन वायूंशिवाय हवेंत तिसरा एक विषारी वायु आहे, त्यास कार्बानिकआसिड वायु म्हणतात. हा वायु शुद्ध हवेंत सुमारें शेंकडा $\frac{१}{२५}$ ह्या प्रमाणानें असतो. हवेंत ह्याचें प्रमाण जास्त झालें म्हणजे ती दूषित होते.

कार्बानिकआसिड वायु इतका विषारी आहे कीं, तो जर हवेंत शेंकडा पांचांहून जास्त होईल तर सर्व प्राणी लवकरच मरतील. आपण जी हवा उच्छ्वासाबरोबर बाहेर सोडितों, तिजमध्यें हा वायु शेंकडा साडे-चार भाग असतो. ह्यावरून आपण फुप्फुसांतून बाहेर सोडिलेली हवा किती दूषित असते, हें सहज ध्यानांत येईल. आपण प्रत्येक तासांत चारशें घन फूट हवा फुप्फुसांत घेतों व बाहेर सोडितों. ह्यामुळें एकाद्या लहानशा खोलींत आपण निजलों, तर तिजमधील हवा लवकरच विषयुक्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन जाईल, हें उघड आहे. कलकत्ता एथील अंधारकोठडींत जीं माणसें एका रात्रींत मरण पावलीं, त्यांच्या मरणाचें कारण खोलींत सांचलेली दूषित हवाच होय.

तर मग अशा प्रकारची दूषित हवा श्वासाबरोबर फुप्फुसांत जाऊं नये, म्हणून प्रत्येकानें जपलें पाहिजे. मोकळ्या प्रदेशांत पुष्कळ स्वच्छ हवा असते; पण गांवांत मनुष्यवस्ती असल्यामुळें त्यांतील हवा असावी तितकी स्वच्छ असत नाहीं. घरांत मनुष्यें जितकीं जास्त असतील, तितकी त्यांतील हवा जास्त दूषित होते. ह्यामुळें ज्या गांवांत दाट वस्ती आहे, तेथील हवा फार दूषित होत असली पाहिजे, हें सहज लक्षांत येईल. म्हणून, घरांत श्वासोच्छ्वासानें दूषित झालेल्या हवेस बाहेर कसें घालवावें, व बाहेरील ताज्या व स्वच्छ हवेचा पुरवठा घरांत कसा करून घ्यावा, ह्याविषयीं आपणांस विचार केला पाहिजे.

घरांतील अस्वच्छ हवा बाहेर घालविण्याकरितां व बाहेरील स्वच्छ हवा घरांत येण्याकरितां घरास दारें व खिडक्या असणें जरूर आहे. साधारण मानाच्या खोलीस दोन दारें व दोन खिडक्या तरी असाव्या. तसेंच विस्तव व दिवे ह्यांपासून उत्पन्न होणारे दुष्ट वायु घरांतून लवकर निघून जावे, म्हणून छपरास एक दोन लहान भोकें किंवा धुराडीं असावीं. हवा जाण्यायेण्यास अशा प्रकारें द्वारें ठेविलीं, म्हणजे घरांत राहाणाऱ्या मनुष्यांस पुरे इतकी स्वच्छ हवा नेहमीं मिळेल.

परंतु एवढेंच करून पुरे झालें, असें समजूं नये; तर दारें व खिडक्या ह्यांचा योग्य रितीनें उपयोगही केला पाहिजे. दारें व खिडक्या दिवसां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोकळ्या ठेवतां येतात. रात्रीं दारें जरी बंद करावीं लागलीं, तरी खिडक्या उघड्या ठेवाव्या व स्वच्छ हवेचा प्रवाह घरांत खेळूं द्यावा. खिडक्यांस लोखंडी गज बसविले, म्हणजे त्या उघड्या ठेविल्या तरी चोरांचिरटांचा उपद्रव होण्याचें भय राहाणार नाहीं.

निजण्याच्या खोलींत माणसांची फाजील दाटी नसावी. दरमाणशीं निदान पन्नास चौरस फूट ह्या मानानें जागा असावी. दाटी असली म्हणजे तेथें निजलेल्या मनुष्यांस हवी तेवढी ताजी हवा मिळणार नाहीं. खोलीच्या खिडक्या उघड्या असतां आंगावर वाऱ्याची झुळूक न येईल अशा ठिकाणीं निजावें, म्हणजे वाऱ्यापासून कांहीं इजा होणार नाहीं.

---

४. जान काक्रन.

प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्य करणें हें अत्यंत श्रेयस्कर आहे. कर्तव्यदक्ष मनुष्य इतरांस मार्गदर्शक होतो. असे कर्तव्यदक्ष पुरुष, अर्थातच तात्कालिक स्वार्थावर दृष्टि न देतां चिरकालचा खरा स्वार्थ साधणारे पुरुष, ज्या देशांत अधिक निपजतात, तोच देश उन्नतीस येतो, आणि जोंपर्यंत अशा ज्योति पाजळत राहातील, तोंपर्यंतच ही उन्नति टिकते. अशा थोर पुरुषांपैकीं जान काक्रन हा एक होता.

जान काक्रन हा विलायतेंत उतारूंच्या एका लहानशा आगबोटीवर सुकाणदार होता. एके दिवशीं संध्याकाळीं ती आगबोट नित्याप्रमाणें उतारू घेऊन निघाली. ती बंदर सोडून फार लांब गेली नाहीं, तोंच एकाएकीं कांहीं जळाल्याची घाण आली; व काय जळालें म्हणून तपास करतात, तों आगबोटीच्या चाकावरील ओंगण ठेवण्याच्या पेटींतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धूर व जाळ येत आहेत असें दिसलें. तेव्हां सर्व आगबोट पेटणार हें काकन ह्याच्या तावडतोब लक्षांत आलें. मग होतां होईल तों, जवळपास एकाद्या सुरक्षित स्थळीं आगबोटीवरील माणसांस उतरणें हें आपलें कर्तव्य असें जाणून, तें कसें साधतां येईल इकडे त्याचें सर्व लक्ष लागलें. सुकाणूचें चाक धरून तो ज्या ठिकाणीं उभा होता, त्याच्याखालींच आग फार भडकल्यामुळें, तेथें चाक धरून राहाणें फार धोक्याचें झालें होतें; तरी काकन आपल्या कर्तव्यास पराङ्मुख झाला नाहीं. जिवावरचा प्रसंग ओळखून त्यानें परमेश्वराची मनोभावानें प्रार्थना केली कीं, "हे परमेश्वरा, इतक्या लोकांचा जीव वांचविण्याचा यत्न करणें हा माझा धर्म, तो माझ्याहातून नीटपणें घडावा ह्यासाठीं मला धीर आणि सामर्थ्य दे." ह्याप्रमाणें सन्मार्गानें चालणाऱ्यांचा साह्यकारी आणि अत्यंत दयाळू जो परमेश्वर त्याची करुणा भाकून, सुरक्षित स्थळ कोणीकडे लवकर सांपडेल तें काकन पाहूं लागला.

काकनाच्या पायांखालील लोखंडी पत्रे व लाकडी तक्ते अगदीं तापून गेल्यामुळें त्याचे पाय भाजत होते. पण तो किंचितही ढळला नाहीं, व त्यानें सुकाणूवरील आपला हात काढिला नाहीं. आगबोटीवरच्या आगीनें सर्व खाडीभर चक्क उजेड पडला होता, त्यामुळें रात्र अंधाराची होती तरी आसपासच्या खडकांवरील खुणा सर्व स्पष्ट दिसत होत्या. थोड्याशा अंतरावर एका खडकावर बरेच लोक जमले आहेत, व चुडी पेटवून आपणांस तिकडे येण्याबद्दल इशारत करीत आहेत, असें काकनाच्या नजरेस आलें. तेव्हां सुकाणू फिरवून तिकडे तो सारखा टक लावून पाहूं लागला; व ज्वाळा आड येत होत्या तरी त्यानें मार्गावरील आपलें लक्ष चळूं दिलें नाहीं. सर्व आगबोट आगीनें व्यापून जाऊन आतां जळून खाक होणार, किंवा फुटून बुडणार, तोंच ती त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खडकाजवळ जाऊन पोहोंचली, व सर्व उतारू तेथें सुखरूप उतरले. तें पाहून काक्रनास पराकाष्ठेचा आनंद वाटला.

ह्या सर्व कृत्यामुळें त्याच्या शरिराचें मात्र फार नुकसान झालें. ऐन तारुण्यांत असतांही, एका चार घटकेंत काळजीनें व श्रमानें त्याचें रूप अगदीं पालटलें. त्याचे सर्व केस पिकले, व त्याचें पहिलवानासारखें शरीर होतें तें शुष्क व रोड होऊन, तो अगदीं म्हाताऱ्यासारखा दिसूं लागला! त्यानें सर्वांचे प्राण वांचविले खरे, पण त्याचे हातपाय पोळून जाऊन निरुपयोगी झाले. ही एवढी शरीर-हानि त्यानें केवळ आपलें कर्तव्य बजाविण्याकरितां सोशिली. शाबास त्याची! अशीं कर्तव्यदक्ष माणसें ज्या देशांत निपजतात, तो देश भरभराटीस आल्यावांचून कसा राहील?

---

५. गुरु सांदीपनि आणि त्याचे शिष्य.

अवंती नगरीजवळ सांदीपनि नांवाचा एक ऋषि राहात असे. उत्तम गुरु असा त्याचा लौकिक सर्वत्र पसरला होता. म्हणून वसुदेवानें आपले पुत्र बलराम व कृष्ण ह्यांस सांदीपनीकडे विद्याभ्यासासाठीं पाठविलें. त्यांच्याबरोबर त्यांचा स्नेही, ब्राह्मणपुत्र सुदामा, हाही गेला.

गुरूच्याठायीं जे गुण असावे ते सर्व सांदीपनीच्या आंगीं होते. तो ऋषि वेदांमध्यें प्रवीण असून धर्माचरणांत नेहमीं दक्ष असे. सर्व विद्या आणि कला त्यास पूर्ण अवगत होत्या, तरी त्याच्याठायीं गर्व, दंभ इत्यादि कोणतेही अवगुण नव्हते. सर्व शिष्यांवर त्याची समदृष्टि असे. त्याच्या मनाची समता आणि प्रसन्नता त्याच्या आचरणांत सतत दिसून येत असल्यामुळें त्याचे शिष्य अत्यंत संतुष्ट राहात, व त्यावर त्यांची फार भक्ति बसे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बलराम, कृष्ण व सुदामा हे तिघे सांदीपनीच्या आश्रमीं आले. पुढें त्यानें त्यांचे गुण व भावी उदय जाणून त्यांस मोठ्या आदरानें आपल्या घरीं ठेवून घेतलें. त्यांचा विनय, आज्ञापालनाविषयीं तत्परता, कुशाग्रबुद्धि आणि ज्ञानार्जनाची हौस हीं पाहून तो त्यांजवर नेहमीं संतुष्ट असे. त्यांचेंही गुरूवर अत्यंत प्रेम व निस्सीम भक्ति बसली. गुरूचें कसलेंही काम असलें, तरी ते हौसेनें करीत.

एकदां, "घरांतील सरपण अगदीं संपलें, आतां कसें करावें?" असें गुरुपत्नीनें सहज म्हटलें. तें ऐकतांच, पाऊस पडत होता तरी, बलराम व सुदामा ह्यांसह कृष्ण लाकडें आणण्यासाठीं रानांत गेला. सांदीपनि घरीं नव्हता; तो परत आल्यावर त्यास हें वर्तमान समजलें, तेव्हां त्यास तें बरें वाटलें नाहीं. खांद्यांवर मोळ्या घेऊन कृष्णादिक आल्यावरोबर पुढें होऊन, त्यानें त्यांच्या खांद्यांवरील मोळ्या उतरून घेतल्या; व त्यांस असलें काम सांगितल्याबद्दल मोठा खेद दर्शविला. पण कृष्ण म्हणाला, "गुरुवर्य, ह्यांत कांहींच अनुचित घडलें नाहीं. गुरुगृहीं कसलेंही काम केलें तरी तें अपमानकारक होत नाहीं, उलट, पुण्यप्राप्तीस कारण होतें. अशी सेवा करण्याची संधि आज आम्हांस गुरुपत्नीनें आणून दिली, हें आम्ही आमचें मोठें भाग्य समजतों."

असो. ह्याप्रमाणें भक्तिपूर्वक गुरुसेवा करून व पूर्ण लक्ष लावून तिघांनीं सर्व विद्या संपादन केल्या. नंतर कृष्णादिकांनीं घरीं परत जावें असें गुरूनें ठरविलें. घरीं जाण्यास निघण्याची वेळ येऊन ठेपली. शिष्यांनीं वंदन केलें व गुरूनें शिष्यांस आलिंगन दिलें. पण शिष्यांचें व गुरूचें परस्पर प्रेम इतकें बसलें होतें कीं, 'आम्ही जातों' असें शिष्यांच्या मुखावाटे, किंवा 'तुम्ही जा' असें गुरूच्या मुखावाटे निघेना! त्यांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंठ दाटून येऊन शब्द फुटेनासा झाला! शेवटीं सांदीपनि आपलें दुःख आवरून घोगऱ्या स्वरानें म्हणाला, "कृष्णा, उगा; रामा, दामा, रडूं नका. थोडें सांगतों तें ध्यानांत ठेवा. आपल्या कर्तव्यास जागृत राहा. अध्ययन सोडूं नका. खऱ्या हिताचा मार्ग चुकूं नका. सत्यानें वागा. माता, पिता आदिकरून वडील माणसांचा मान ठेवीत जा. लोकांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून त्यांचे गुण तेवढे घेत जा. दुसऱ्यांस दुःख न देतां, त्यांजवर होतील तितके उपकारच करा."

असा सांदीपनीनें त्यांस निरोप देतांना थोडक्यांत उपदेश केला. तेही तो उपदेश चित्तीं धरून, स्फुंदत स्फुंदत गुरूच्या पायांवर डोई ठेवून व गुरुपत्नीस वंदन करून निघाले. घरीं परत आल्यावर कृष्णानें विपुल संपत्ति गुरुजीकडे पाठविली. ह्यापूर्वी, गुरुगृहीं असतांना, गुरुदक्षिणा म्हणून कृष्णानें गुरूचा मृत पुत्र जिवंत करून परत आणून दिला, असेंही पुराणांत सांगितलें आहे.

---

६. आत्मसंयमन.

सदू व हरी असे दोघे विद्यार्थी शेजारींशेजारीं राहात असत. ते नेहमीं बरोबरच शाळेस जात. सदूवर गुरुजींचा फार लोभ असे, पण त्यांना हरीला दिवसांतून एक वेळतरी रागें भरण्याची पाळी येई. दोघेही सारखेच बुद्धिमान् होते, पण हरी शिकण्यांत थोडासा मागें पडे. हें असें कां होतें म्हणून हरीनें एके दिवशीं सदूस विचारिलें. तेव्हां सदू म्हणाला, तें आज संध्याकाळीं सांगेन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेवण झाल्यावर दुपारीं दोन वाजतां ते दोघे शाळेंत जावयास निघाले. शाळेच्या जवळच रस्त्यावर गारुड्याचा खेळ चालला होता, तो पाहाण्यास ते उभे राहिले. खेळ ऐन रंगांत येतो, तों शाळेची घंटा वाजली. त्याबरोबर सदू हरीचा हात धरून म्हणाला, "चल, वेळ झाली." हरी म्हणाला, "जरा थांब. एवढा गमतीचा खेळ गारुडी कसा करतो तें पाहून जाऊं." सदूनें त्याचा हात सोडला व तो शाळेंत जाऊन आपल्या जागेवर बसला. वर्ग सुरू झाले. मग सुमारें पंधरा मिनिटांनीं हरी आला. अर्थात् त्यास गुरुजी रागें भरले.

दुसरा तास गणिताचा होता. त्यावेळीं सदू व हरी जवळ जवळ बसले होते. गुरुजींनीं एक उदाहरण घातलें, व पुस्तक तेथेंच ठेवून ते शेजारच्या खोलींत गेले. सदू व हरी ह्या दोघांसही तें उदाहरण सोडवितां येईना. तेव्हां हरी म्हणतो, "अरे सदू, तें पुस्तक जरा इकडे घे. उत्तर पाहून ठेवून देऊं." सदूनें तिकडे लक्ष दिलें नाहीं, पण हरीनें पुस्तक घेऊन उत्तर पाहिलें. तें गुरुजींच्या लक्षांत येऊन, त्यांनीं हरीस शिक्षा केली.

नंतर सुटी झाल्यावर सर्व मुलगे खेळावयास गेले. त्या वेळीं एका मुलाला चेंडू लागून तो पडला. त्याबरोबर कांहीं मुलगे हसले; त्यांच्याबरोबर हरीही मोठ्यानें हसला, व हुर्यो करून ओरडला. पण सदूनें मन आवरून धरिलें; व तो त्या मुलास उठवून त्याचे कपडे साफ करूं लागला. तें दुरून गुरुजींनीं पाहिलें, तेव्हां त्यांनीं सदूस शाबासकी दिली.

संध्याकाळीं घरीं येऊन जेवणखाण आटोपल्यावर, दोघेही सोबती सकाळचा अभ्यास करून ठेवून, शेजारच्या देवळांत कथा होती ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐकण्यास गेले. हरिदास चांगला वक्ता असून गाणाराही होता. कथेचा पूर्वरंग संपून अनुसंधान लागतें, तों दहांचा ठोका पडला. त्याबरोबर सदू हरीस म्हणाला, "चल, आपण निजावयास जाऊं. सकाळीं शाळेस जावयाचें आहे." हरीनें उत्तर केलें, "म्हणून काय झालें? काय मौजेची कथा आहे! आणखी थोडीशी ऐकून जाऊं. झोप थोडी कमी घेऊं." सदू म्हणाला, "तें जुळणार नाहीं. उशिरां निजलों तर आपण लवकर जागे होणार नाहीं, व मग शाळेस जाण्याची धांदल होईल. अशा वेळीं आपण आपलें मन आवरलें पाहिजे." हरी म्हणतो, "पण, अरे, असली मौज टाकून जाववत नाहीं!" सदू म्हणाला, "गेलेंच पाहिजे. मनास मोह पडला म्हणजेच तो आवरावयाचा असतो. मी तुला संध्याकाळीं सांगेन असें म्हणालों होतों, तें हेंच." हरीस दुपारची आठवण होऊन तो म्हणाला, "सांग काय तें." सदू म्हणाला, "दुपारीं शाळेंत जातांना जर तूं गारुड्याचा खेळ पाहाण्याची इच्छा दाबिली असतीस, तर तुला गुरुजी रागें भरले नसते. परवानगी-वांचून पुस्तकांत पाहून उदाहरण करणें, म्हणजे गुरुजींना फसवून चोरी करण्यासारखें होय. तसें करण्याचा मोह टाळण्याइतका मनोनिग्रह तूं केला नाहींस. खेळतांना गोविंदा पडला, त्यास तूं विनाकारण हसलास; आपलें मन आवरून धरिलें नाहींस. तेव्हां तुझें बिघडतें तें हेंच. तूं आत्मसंयमन करीत नाहींस."

ह्याप्रमाणें कांहीं वेळ बोलणें होऊन हरीस आत्मसंयमनाची किंमत व जरुरी समजली, व तो सदूबरोबर निजावयास गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. देवाविषयीं. (अभंग.)

१

कां रे नाठवीसी कृपाळू देवासी ? । पोषितो जगासी एकलाची ॥ १ ॥
फुटे तरुवर उष्ण-काळ-मासीं । जीवन तयासी कोण घाली ? ॥ २ ॥
कोणें केली बाळा दुग्धाची उत्पत्ती ? । वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥ ३ ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता ? । राहें त्या अनंता आठवूनी ॥ ४ ॥
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर । करा निरंतर ध्यान त्याचें ॥ ५ ॥

२

आलीया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनीयां ॥ १ ॥
तोचि कृपानिधी वारील सांकडें । येर तें बापूडें काय रंक ? ॥ २ ॥
भवाचिया पाठी दुःखाचिया राशी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥
तुका म्हणे जया शरण गेलीया । उपेक्षीना तया दीनबंधू ॥ ४ ॥

३

जेणें निर्मियेली काया । कां रे नाठवीसी तया ? ॥ १ ॥
अंतीं मृत्यूची जाचणी । तेव्हां सोडवीना कोणी ॥ २ ॥
गृह सुत धन दारा । ह्यांतें भुलतोसी पामरा ! ॥ ३ ॥
तुका म्हणे सावध होई । धरीं ईश्वर हृदयीं ॥ ४ ॥

४

तरिच जन्मा यावें । दास ईश्वराचें व्हावें ॥ १ ॥
नाहीं तरी काय थोडीं । श्वानसूकरें बापुडीं ॥ २ ॥
जन्मा आलियाचें फळ । आंगीं न लागावा मळ ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि भलो । ज्यानें देव ओळखिला ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा भगवान कृपा करो ॥ १ ॥
ऐशी माझी वाणी मज उपदेशी[११] । आणिकां लोकांसी हेंची सांगे ॥ २ ॥
विटंबो[१२] शरीर होऊ का विपत्ती । परी राहो चित्तीं भगवान ॥ ३ ॥
तुका म्हणे नाशवंत देह साचा । करा धावा त्याचा[१३] तेंची हित ॥ ४ ॥

६

भगवंतीं घडे जेणें अंतराय[१४] । हो का बापमाय त्यजावी ते ॥ १ ॥
येरी[१५] प्रिया पुत्रा असे कोण लेखी[१६] ? । करिती ते दुःखा पात्र शत्रु ॥ २ ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधू । तैशी माता निंद्यु भरतें केली ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व धर्म देव-पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ४ ॥

७

नलगे मायेसी बाळ निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥ १ ॥
मज कां लागला करणें विचार । ज्याचा कारभार त्याचे माथां ॥ २ ॥
गोडधड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ ३ ॥
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥ ४ ॥
त्याच्या दुःखें पीडे आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ॥ ५ ॥
तुका म्हणे देह विसरे आपला । आघात ती त्याला लागों नेदी ॥ ६ ॥

८

उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥ १ ॥
कां रे न घालिसी धाव । तुझें उच्चारितां नांव ? ॥ २ ॥
काय बळ युक्ती । नाहीं तुझे अंगीं शक्ती ? ॥ ३ ॥
तुका म्हणे तूं विश्वंभर । ओस माझें कां अंतर ? ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं । आमचें त्या काई असे ओझें ? ॥ १ ॥
पाषाणाचे पोटीं बैसला दर्दूर । तया मुखीं चारा कोण घाली ? ॥ २ ॥
पक्षी, अजगर न करी संचिंत । तयासि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥
तुका म्हणे तया भार घातलिया । उपेक्षीना दयासिंधु माझा ॥ ४ ॥

१०

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो, नारायणा ॥ १ ॥
आतां मज ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ २ ॥
उपजला भावो । तुझे कृपें सिद्धी जावो ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं या परता ॥ ४ ॥

तुकाराम.

---

८. नेमस्तपणा.

ईश्वरानें अनेकविध पदार्थ ह्या पृथ्वीच्या पाठीवर निर्माण करून ठेविले आहेत, व त्यांची परिपाठी तो एकसारखी चालू ठेवितो. ह्यांत त्याचा उद्देश असा दिसतो कीं, सर्व सृष्टीमध्यें श्रेष्ठ जो मानव, त्यास त्यांपासून सुख व्हावें. ह्या उद्देशाप्रमाणें मनुष्यानें पदार्थांचें सेवन करावें; न केलें तर तो कदाचित् ईश्वराचा एक प्रकारें अपराधीच होईल. पण एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मनुष्यानें सर्व वस्तूंचें सेवन करणें तें यथायोग्य केलें पाहिजे; अर्थात् त्यांचा उपभोग घेण्यांत नेमस्तपणा ठेविला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याचें शरीर नेमस्तपणामुळें निकोप असतें, अशा मनुष्याचें मनही बहुधा निकोप म्हणजे विकाररहित असतें. तो शांत व गंभीर असतो, लवकर संतापत नाहीं; व त्याच्यांत उतावीळपणा, हेवा, मत्सर, हे अवगुण सहसा वास करीत नाहींत. तो महत्त्वाकांक्षी असला, तरी त्याच्याठायीं क्षुद्रपणा असत नाहीं. शिवाय मनुष्याचें मन असें निकोप असलें, म्हणजे तो पाहिजे त्या विषयाचें ग्रहण करण्यास समर्थ असतो. सारांश, नेमस्तपणानें चालणाऱ्या मनुष्याचें आयुष्य बहुधा सुखांत जातें.

जेवढें पचेल त्यापेक्षां किंचित् कमी, व तें नेमानें आणि वेळींच खाल्लें पाहिजे. लोहभस्म घेतल्यानें शक्ति येते, असें वैद्यक सांगतें. म्हणून रोज तोळा तोळा भस्म सेवन केलें, तर उपयोग न होतां उलटा अपायच होईल. प्रत्येक गोष्टींत नेमस्तपणा ठेवणारा मनुष्य व्यवस्थित असतो; कारण, त्याच्या मनास नियमबाह्य वर्तन आवडत नाहींसें होतें. त्यामुळें त्याचा शेजाऱ्यापाजाऱ्यांस फार उपयोग होतो, व त्याजविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. आपणास जेवढें अन्न जरूर लागतें, तेवढेंच मनुष्यानें खाल्लें पाहिजे. गोड लागतें म्हणून जास्त खाल्लें तर तें उपद्रव करण्यास चुकत नाहीं. ज्यानें शरीरपोषणास उत्तम साह्य होतें असें जें गाईचें दूध, तें देखील कोणी अतिशय प्याला, तर बाधाच करतें. खाण्यापिण्यासंबंधानें एक गोष्ट ध्यानांत ठेवावी, ती ही कीं, खाणें साधें असून पौष्टिक असावें; त्यांत मसाला वगैरे घालून तें फार स्वादिष्ट करूं नये. निदान नेहमीं तरी स्वादिष्ट अन्न खाऊं नये. पेय पदार्थांत उत्तम पेय दूध, व तहान भागविण्याचें उत्तम साधन शुद्ध पाणी, असें आतां बहुतेक विद्वानांचें मत ठाम होत चाललें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाण्यापिण्याचा निर्बंध न ठेवणारीं, मादक द्रव्यें सेवन करणारीं, अतिशय जागणारीं किंवा अतिशय निजणारीं, व्यायामाशीं ज्यांचें पूर्ण वांकडें अशीं, किंवा व्यायामाचें अतिशय वेड असणारीं अशीं माणसें अनियमितपणामुळें दुःख पावतात. नेमस्तपणा नसला म्हणजे मनुष्य निस्तेज, व्याधिग्रस्त, आणि उद्योग करण्यास असमर्थ असा होतो.

आजपर्यंत प्रत्येक राष्ट्रांत जे मोठमोठे नामांकित पहिलवान व योद्धे होऊन गेले, ते सर्व मिताहारी आणि मितविहारी म्हणजे बेताचा आहार व विहार करणारे होते, असें त्यांच्या चरित्रांवरून कळून येईल. तसेंच मानसिक श्रमानें प्रसिद्धीस आलेले, व आपल्या बुद्धिबलानें सर्व जगास ज्यांनीं थक्क करून सोडिलें, असे जे भास्कराचार्य, ग्यालिलिओ, ह्यांसारखे महापंडित; अकबर, शिवाजी, ह्यांसारखे उदार व प्रजेचें कल्याण करणारे पराक्रमी राजे; गौतम, तुकाराम, रामदास, नानक, ह्यांसारखे थोर थोर साधु, ह्यांचाही वर्तनक्रम फारच नेमस्तपणाचा असे.

खाणें, पिणें, निजणें, खेळणें, बोलणें इत्यादि कोणत्याही गोष्टींत आपण अत्याचार न करतां नेमस्तपणा ठेवावा. त्यांत आपलें हित आहे.

---

९. हिंदुस्तानांतील लोक व त्यांचे धर्म.

हिंदुस्तानांत पुष्कळ वंशांचे व धर्माचे लोक राहातात. त्यांत मोठा भरणा हिंदू लोकांचा आहे. हिंदू लोक मुख्यत्वेंकरून द्रविड, आर्य आणि शक म्हणजे सिथियन, ह्या तीन वंशांपासून झाले आहेत. ह्या तिहींपैकीं द्रविड लोक हिंदुस्तानाच्या वायव्य दिशेकडून प्रथम ह्या देशांत आले. त्यांच्या मागून त्याच मार्गानें आर्य लोक आले, व नंतर वायव्येकडून व उत्तरेकडून शक लोक आले. उत्तर हिंदुस्तानांतील बहुतेक लोक आर्य आणि शक ह्या वंशांच्या मिश्रणापासून झालेले आहेत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि मुंबई इलाखा व इतर दक्षिण हिंदुस्तान ह्यांतील बहुतेक लोक द्रविड आणि शक ह्या वंशांच्या मिश्रणापासून झालेले आहेत. शुद्ध आर्य किंवा शुद्ध द्रविड ह्यांची संख्या फारच थोडी आहे.

वैदिक अथवा हिंदू, बौद्ध, जैन, मुसलमानी, शीक, ख्रिस्ती, यहुदी, पारशी हे धर्म ह्या देशांत मुख्यतः प्रचलित आहेत. पुन्हा त्या प्रत्येकाचे मतभेदावरून व आचारभेदावरून पोटभाग झालेले आहेत. हिंदू लोकांत जातिभेद मानितात. बाकीच्या लोकांत धर्मदृष्ट्या तो मानीत नाहींत; परंतु त्यांच्यांतही निरनिराळ्या कारणांनीं जातिभेदांप्रमाणेंच कांहीं पोटविभाग रूढ होऊन बसले आहेत. हिंदूंच्या जातिभेदांत व इतरांच्या ह्या पोटविभागांत अंतर इतकेंच कीं, हिंदूंमध्यें एका जातीचा मनुष्य कोणत्याही रितीनें दुसऱ्या जातींत जाऊं शकत नाहीं; परंतु इतर धर्मांतील मनुष्य एका पोटविभागांतून दुसऱ्या पोटविभागांत जाऊं शकतो.

वैदिक धर्माचे लोक वेद, स्मृति, पुराणें इत्यादि धर्मग्रंथांस प्रमाण मानितात; ह्यांसच सामान्यतः हिंदू म्हणण्याचा प्रघात आहे. देवाच्या अनेक विभूति अथवा अवतार वेळोवेळीं प्रगट झाले आहेत, असें ते समजतात, व त्यामुळें त्यांच्यामध्यें शैव, वैष्णव इत्यादि अनेक पंथ झाले आहेत. तथापि सृष्टि उत्पन्न करणारा परमेश्वर एकच आहे असा सर्वांचा पूर्ण भरवसा असतो. नद्या कोठूनही निघोत, शेवटीं त्यांचें उदक समुद्रासच

ब्राह्मण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊन मिळावयाचें; तद्वत्, कोणत्याही पंथाप्रमाणें मनुष्य देवाची आराधना करो, शेवटीं तिचें पर्यवसान एका परमेश्वराच्या ठायींच व्हावयाचें, असें ते मानितात.

बौद्ध व जैन हे लोक अनुक्रमें गौतम बुद्ध व महावीर ह्यांचे अनुयायी होत. अहिंसा हें त्यांचें मुख्य तत्त्व होय. हिंदुस्तानांत बौद्धधर्मी लोक सांप्रत फारच थोडे आहेत. जैनधर्मी हे बौद्धांच्यापेक्षां जास्त आहेत. तथापि ब्रह्मदेश हिंदुस्तानांत सामील झाल्यामुळें बौद्धांची संख्या बरीच वाढली आहे.

जैन.

मुसलमानी धर्म पहिल्यानें इसवी सनाच्या आठव्या शतकांत अरब लोकांनीं इकडे आणिला. त्याचा संस्थापक महंमद पैगंबर असून, धर्मपुस्तक कुराण हें होय. ईश्वर एकच आहे व महंमद हा त्याचा पैगंबर आहे, हें ह्या धर्माचें मुख्य तत्त्व. मुसलमानांत जातिभेद नाहीं, त्यामुळें सर्वांचा रोटी-व्यवहार होऊं शकतो; पण बेटी-व्यवहारासंबंधें अनेक कारणांनीं भेद रूढ झाले आहेत. त्यांमध्यें शिया व सुनी हे दोन मुख्य पंथ आहेत.

मुसलमान.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शीक धर्म नानकशाहानें पंजाबांत पंधराव्या शतकांत स्थापिला. जातिभेद खरा नाहीं, ईश्वर एकच आहे, सदाचरणानें वागणें हेंच खरें मोक्षसाधन आहे, असें शीक लोक मानितात. त्यांचें धर्मपुस्तक नानकशाहाचा ग्रंथ हें होय.



शीक.

ख्रिस्ती धर्म येशू ख्रिस्तानें प्रथम पालेस्टाईन प्रांतांत स्थापित केला. पुढें तो सर्व युरोपखंडभर पसरला. हिंदुस्तानांत ह्या धर्माचा फैलाव पहिल्यानें पोर्तुगीज लोकांनीं केला. त्यांनीं पश्चिम किनाऱ्यावर पुष्कळ लोक जबरीनें ख्रिस्ती केले. ख्रिस्ती धर्माच्या ग्रीक, क्याथोलिक व प्राटेस्टंट अशा तीन मुख्य शाखा आहेत; व त्या प्रत्येकींत निरनिराळे बरेच पंथही आहेत. ईश्वर एक आहे व येशू ख्रिस्त हा त्याचा मुलगा असून तो मनुष्यांस पापापासून मुक्त करण्याकरितां अवतीर्ण झाला; असें त्या धर्मांत सांगितलें आहे. ख्रिस्ती लोकांच्या धर्मग्रंथांस बायबल असें म्हणतात. त्याचे जुना करार व नवा करार असे दोन भाग आहेत.

यहुदी धर्माचे लोक हे फार पूर्वीं सीरियामधून ह्या देशांत आले. बायबलांतील जुन्या करारास ते प्रमाण मानितात.

पारशी अथवा झोरोआस्ट्रियन धर्म जवळ जवळ वैदिक धर्माइतका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुना आहे. पारशी लोक मूळचे पारसीक ऊर्फ इराण देशांतील राहाणारे.

पारशी.

तेथून ते मुसलमानांच्या छळामुळें ठाणें जिल्ह्यांतील संजाण बंदरीं आले. त्यांचा धर्मग्रंथ वंदीदाद हा झेंद भाषेंत लिहिलेला आहे.

हिंदुस्तानचे अगदीं मूळचे रहिवासी जे भिल्ल, कोळी, गोंड वगैरे अनार्य लोक ते हल्लीं जंगली प्रदेशांत राहातात, व पिशाचादिकांना भजतात. त्यांची गणना हिंदूंमध्यें करावी कीं नाहीं, ह्याचा निर्णय अजून झाला नाहीं.

---

१०. हिंदुस्तानच्या लोकांविषयीं मेग्यास्थिनीस ह्याचें मत.

सेल्यूकस नांवाच्या ग्रीक राजानें मेग्यास्थिनीस ह्याला आपला वकील म्हणून मगध देशाच्या चंद्रगुप्त राजाकडे पाठविलें होतें. तो इसवी सनापूर्वी ३१७ पासून ३१२ वर्षापर्यंत हिंदुस्तानांत होता. त्यानें, पाटलीपुत्र—म्हणजे हल्लींचें पाटणा शहर, ह्या नगराचा विस्तार जवळ जवळ नऊ चौरस मैल होता, असें लिहिलें आहे. त्यानें केलेल्या वर्णनावरून असें दिसतें कीं, त्यावेळचीं राज्यव्यवस्थेचीं खातीं हल्लीं आहेत तशींच बहुतेक होतीं.

मेग्यास्थिनीस लिहितो, "इतर सर्व राष्ट्रें लढूं लागलीं म्हणजे एकमेकांचे प्रांत लुटून जाळून फस्त करितात; पण हिंदू लोक लढत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतां, प्रत्यक्ष युद्धास उभे राहिले असतील त्यांशिवाय इतर नागरिकांस किंवा शेतकऱ्यांस बिलकूल उपद्रव देत नाहींत. शेतकरी हा उपजीविकेचें मुख्य साधन जें अन्न, तें उत्पन्न करितो, म्हणून तो पवित्र आहे, असें ते मानितात. शत्रूंचीं उभीं असलेलीं शेतें हिंदू लोक कधीं कापीत नाहींत, कुरणें पेटवीत नाहींत, किंवा झाडें कारणावांचून तोडीत नाहींत. "

" त्यांची राहणी साधी व काटकसरीची असल्यामुळें ते बहुधा सुखी असतात. यज्ञाखेरीज ते कधींही दारूस शिवत नाहींत. इतर धान्यांपासून ते दारू काढीत नाहींत, फक्त तांदुळापासून काढितात. त्यांचें मुख्य खाणें तांदुळाचे निरनिराळे पदार्थ होत. त्यांना न्यायाधीशापुढें क्वचितच जावें लागतें ; ह्यावरून त्यांचे कायदे व देवघेवीचे वगैरे करार किती साधे व सरळ आहेत, ह्याची सहज कल्पना होईल. गाहाणाबद्दल व ठेवीबद्दल त्यांच्या कधींही फिर्यादी होत नाहींत. त्यांना देवघेवीबद्दल सह्या व साक्षी घालून कागद करावे लागत नाहींत. ते आपल्या ठेवी एकमेकांच्या स्वाधीन खुशाल करितात. बाहेर जातांना घरांदारांस त्यांस कुलपें लावावीं लागत नाहींत. ह्यावरून ते अत्यंत नीतिमान् आहेत असें दिसतें. सत्य आणि सद्गुण ह्या दोहोंसही त्यांजमध्यें पूर्ण मान मिळतो. म्हणूनच वृद्ध लोकांस विशेष ज्ञान अथवा शाहाणपंणा असल्याखेरीज ते त्यांस जास्त मान देत नाहींत. ते परकीयांससुद्धां गुलाम करीत नाहींत, मग स्वकीयांची तर गोष्टच नको. "

मेग्यास्थिनीसनें त्यावेळीं एथें सात प्रकारचे लोक नांदत होते असें लिहिलें आहे. ते, गुरु किंवा तत्त्ववेत्ते, राजाचे मंत्री, शेतकरी, धनगर, कारागीर, योद्धे व हेर हे होत. परंतु वास्तविक ह्यांपैकीं पहिले दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्राह्मण, पुढले तीन वैश्य किंवा शूद्र, व योद्धे हे क्षत्रिय असले पाहिजेत. हेर हे बहुधा राजास राज्यांतील वस्तुस्थिति कळविणारे कामगार असावे. तो लिहितो, "गुरूंचे दोन प्रकार आहेत. एक गृहस्थाश्रमी ब्राह्मण व दुसरे श्रमण अथवा संन्यासी. गृहस्थाश्रमी असतात ते गांवाजवळच एकाद्या राईत अगदीं साधेपणानें राहातात; ते मांसभक्षण करीत नाहींत, व इतर विषयांवरही आसक्ति ठेवीत नाहींत. तृणावर अथवा मृगाजिनावर निजतात. ते आपला सर्व काळ अध्यापनांत अथवा धर्मविवेचनांत घालवितात. श्रमण किंवा संन्यासी आहेत ते रानांत राहातात. कंद, मुळें व फळें हें त्यांचें भक्ष्य, व वल्कलें हींच त्यांचीं वस्त्रें."

हिंदूंच्या कारागिरीविषयीं मेग्यास्थिनीस म्हणतो, "हे कुशल कारागीर आहेत, व हें साहजिकच आहे; कारण, ते अतिस्वच्छ हवेंत राहातात व अतिशय उत्तम पाणी पितात. त्यांच्या देशांत सोनें, रुपें, तांबें इत्यादि अनेक धातु सांपडतात व त्यांच्या ते उपयोगी व शोभेच्या वस्तु तयार करितात. जरी हे लोक एकंदरीनें अगदीं साध्या रितीनें राहातात, तरी त्यांस छानछोकपणा व भूषणें ह्यांची आवड आहे. त्यांचे कपडे भरजरीचे उंची असून रत्नजडीत असतात, व ते फारच तलम सुताच्या मलमलीचीं व रेशमाचा कशिदा काढलेलीं वस्त्रें वापरतात. त्यांच्यामागून सेवक लोक त्यांजवर छत्र्या धरून चालतात. त्यांना सुरेखपणाची फार आवड आहे, व तो जेणेंकरून साध्य होईल असे उपाय करण्यास ते चुकत नाहींत."

---

११. प्राचीन हिंदू लोकांचीं समुद्रपर्यटनें.

पहिल्या ब्रह्मी युद्धाच्या वेळीं बंगाल्यांतील कांहीं शिपायांनीं जलमार्गानें जाण्याचें नाकारिलें, व अद्यापही कांहीं लोक समुद्रावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परदेशीं जाणें हें निषिद्ध मानितात. परंतु प्राचीन काळीं हिंदू लोक इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत व्यापाराकरितां समुद्रांतून सफरी करीत असत, असें इतिहासावरून दिसून येतें.

ऋग्वेदांत वरुण-देवता हवेंतील व समुद्रांतील मार्ग जाणते, असें जागोजागीं वर्णिलें आहे. प्रत्येक मनुष्य समुद्रावर पर्यटन करण्यास जातांना त्या देवतेचें स्तवन करी, असें चौथ्या मंडलांत सांगितलें आहे. वशिष्ठ ऋषि एकदां वरुणाबरोबर नावेंत बसून गेले असतां तेथें मोठ्या आनंदानें डुलत होते, असें वर्णन सातव्या मंडलांत आढळतें.

मनुस्मृतीमध्यें समुद्रपर्यटनें करणाऱ्या व्यापाऱ्यांस व्याजाचे दर, देशांतल्या देशांतच देवघेव करणाऱ्या व्यापाऱ्यांहून निराळे सांगितले आहेत. अर्थातच त्यावेळीं समुद्रपर्यटन निषिद्ध मानीत नसत, असें दिसतें.

बौद्धांच्या काळांत एथील नाविक लोक दर्यावर सफरी करीत व त्यांस कित्येक दिवसपर्यंत जमीन दिसत नसे.

चंद्रगुप्त राजाचे पदरीं आरमार होतें, व त्याचे लोक सिंधुनदांतून जहाजें घेऊन समुद्रांत व्यापाराकरितां जात, असें ग्रीक ग्रंथकार लिहितात.

दशकुमारचरित हा ग्रंथ दंडीनें सहाव्या शतकांत रचिला; त्यांतही त्या कुमारांनीं समुद्रांत लांब लांब सफरी केल्याविषयीं लिहिलें आहे. श्रीहर्षाच्या वेळच्या रत्नावली नाटकांतही जलपर्यटनासंबंधें स्पष्ट उल्लेख आहे.

इसवी सनाच्या चौथ्या शतकांत फा हैंग हा चिनी बौद्ध यात्रेकरू बंगाल्यांतील ताम्रलिप्ती बंदरांतून एका हिंदू व्यापाऱ्याच्या जहाजांत बसून सिंहलद्वीपास गेला; व तेथून सुमारें २०० उतारू नेणाऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदूंच्याच जहाजांतून तो जावा बेटास गेला. पुढें तो जावा एथून चीन देशास गेला, तोही हिंदू व्यापाऱ्यांबरोबर जलमार्गानेंच गेला. फा हैंग ह्याच्यामागून ह्यू हेंग च्यांग म्हणून दुसरा एक चिनी यात्रेकरू सातव्या शतकांत आला. त्यानेंही लिहून ठेविलें आहे कीं, ह्या देशाच्या पूर्व किनाऱ्यावर गंगेच्या मुखाशीं ताम्रलिप्ती व ओढिया प्रांतांत जगन्नाथाच्या दक्षिणेस चरित्र इत्यादि मोठमोठीं बंदरें होतीं, आणि तेथें समुद्रांत सफरी करून आणलेल्या हरतऱ्हेच्या मालाचा व्यापार चाले.

सातव्या शतकांत पश्चिम हिंदुस्तानांतील हिंदूंनीं जावा व सुमात्रा ह्या बेटांत जाऊन आपलें राज्य स्थापिलें, व बंगाल्यांतील हिंदूंनीं सियाम देशांतील कांबोजा प्रांतांत वसाहती केल्या; आणि तेथें डच लोकांचा प्रवेश होईपर्यंत हिंदू धर्म चालू होता, असे लेख आहेत. त्या वेळीं जावा व सुमात्रा ह्या बेटांत हिंदूंचीं देवळें होतीं.

खिवा एथील राहाणारा शोधक विद्वान् अल्बिरूणी ह्याच्या वेळीं, म्हणजे अकराव्या शतकांत, देशाबाहेर जाण्याचा हिंदूंचा प्रघात पुष्कळ मोडत आला होता असें दिसतें. तो म्हणतो, "जर हिंदू लोक प्रवास करतील व इतर राष्ट्रांशीं दळणवळण ठेवितील, तर त्यांचीं मतें ताबडतोब बदलतील. कारण, त्यांच्या पूर्वजांचीं मतें त्यांच्या हल्लींच्या मतांइतकीं कोतीं नव्हतीं."

ख्रिस्ती शकाच्या सातव्या व आठव्या शतकांत अरबस्तानांतून मुसलमान लोक हिंदुस्तानांत व्यापाराकरितां व धर्मप्रसाराकरितां येऊं लागले, तेव्हांपासून हिंदू लोकांच्या समुद्रपर्यटनाची पिछेहाट झाली असावी. तिचें कारण व्यापारास व पर्यटनास लागणाऱ्या धैर्याचा अभाव नव्हे, तर परकीयांच्या संघट्टनानें धर्महानि होण्याची भीति हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावें. हिंदुस्तानाच्या कांठाकांठानें दर्यांतून सफरी करणें अजूनही चालू आहे खरें; तथापि समुद्रांतून दूरदेशीं जाणें हें, निदान उच्च वर्णांत तरी, सांप्रत निषिद्ध मानितात.

वर सांगितलेल्या ग्रंथांतील आधारांवरून हें स्पष्ट होतें कीं, प्राचीन काळीं हिंदू लोक समुद्रयानास मुळींच भीत नसत, व दूर दूरच्या देशांपर्यंत जलपर्यटनें करून व्यापार करीत. फा हैंगच्या काळीं हिंदूलोकांस नौकागमनशास्त्र चांगलें अवगत होतें, पण पुढें त्या शास्त्राचा लोप झाल्यामुळें त्यांच्या संपत्तीची वाढ होण्याचा एक मोठाच मार्ग बंद झाला. अलीकडे विद्यार्जनासाठीं अगर व्यापारासाठीं हिंदू लोक इंग्लंड वगैरे देशांस थोडथोडे जाऊं लागले आहेत, हें त्यांच्या भावी उन्नतीचें सुचिन्ह होय.

---

१२. विद्याप्रशंसा.

विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व ह्या जगामाजी ;
न दिसे एकहि वस्तू विद्येनेंही असाध्य आहे जी. ॥ १ ॥
व्यासादिक आद्य मुनी, कवि अर्वाचीन सर्व थोर तसे,
म्हणती एकमतें कीं, धन विद्यासम नरास अन्य नसे. ॥ २ ॥
देउनि किंवा भोगुनि उणें न होतां सदैव वाढतसे,
ऐसें एकच विद्या-धन, अद्भुत गुण न हा दुज्यांत वसे. ॥ ३ ॥
न बलात्कारें राजा, न चोर कपटें, जया हरायास
होई समर्थ, ज्याच्या अल्पहि संरक्षणीं न आयास. ॥ ४ ॥
नानाविध रत्नांचीं कनकाचीं असति भूषणें फार ;
परि विद्यासम एकहि शोभादायक नसे अलंकार. ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या साऱ्या भुवनीं हित-कर विद्येसारखा सखा नाहीं,
अनुकूळ ती जयाला नित्य, तयाला उणें नसे कांहीं. ॥ ६ ॥
गुरुपरि उपदेश करी, संकट-समयीं उपायही सुचवी,
चिंतित फळ देउनियां, कल्पतरूपरि मनोरथां पुरवी. ॥ ७ ॥
विद्याबलसम अढळे न दुजें बल कोणतेंहि या लोकीं;
तीनें निजप्रभावें वश केलें सकल विश्व, अवलोकीं ! ॥ ८ ॥
क्षुद्रां पशुपक्ष्यांची काय कथा ? पांचही महाभूतें,
ज्ञानबळें आकळुनी, केलें मनुजें स्वदाससम त्यांतें. ॥ ९ ॥
विसरुनि परस्परांचा विरोध जलं वन्हिं सेविती त्यांतें,
दासांपरि वश होउनि करिती त्याच्या समस्त कृत्यांतें. ॥१०॥
त्याचीं वस्त्रें विणिती, रथ ओढिति, लोटितीहि नौकांतें;
बहु सांगणें कशाला ? करिती तो सांगतो तयां तें तें ! ॥११॥
मोठे मोठे तरुवर मोडी, फोडीहि जी शिलाराशी,
विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी ! ॥१२॥
विद्येच्या सामर्थ्यें केला रवि चित्रकार मनुजानें ;
होउनि अंकित वायुहि तुष्ट करी त्यास सुस्वरें गानें ! ॥१३॥
यापरि सकल सुखें जी देई, दुःखें समस्त जी वारी,
त्या विद्यादेवीतें अनन्यभावें सदा भजा भारी. ॥१४॥
नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन,
सत्य असे तरि, विद्या-दानाशीं तुल्य पुण्य आणिक न. ॥१५॥
ऐश्वर्यबलधनादिक सौख्यें प्रसवे समस्त जीं कांहीं,
ती विद्या जो देई, तेणें वद काय तें दिलें नाहीं ? ॥१६॥

कृष्णशास्त्री चिपळूणकर–पद्यरत्नावलि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. थट्टेखोर विनायकराव.

उज्जनी शहरांत विनायकराव म्हणून एक शौकी सावकार राहात असे. त्याचा स्वभाव दिलदार, मायाळू व मोठा विनोदीही होता. एके दिवशीं त्यानें आपल्या मित्रमंडळीस मेजवानी दिली. भोजनोत्तर मंडळी इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलत आहे, खेळत आहे, तों दाराशीं एक पांथस्थ ब्राह्मण आला आहे, म्हणून चाकरानें वर्दी दिली. "बरें आहे, आंत येऊं दे," म्हणून विनायकरावांनीं सांगितलें.

पांथस्थ ब्राह्मण आंत येऊन सर्वांस नमस्कार करून म्हणाला, "महाराज, मी एक गरीब गवई आहें. परवां माझ्या मंडळीची व माझी चुकामूक पडली व मला मार्गांत चोरांनीं लुटून घेतलें. पण शेजारच्या गांवीं एका उदार गृहस्थानें मला उघडा पाहून एवढें धोतर व उपरणें घेऊन दिलें. मी आज उपाशीं आहें. आज मला जेवायाला घालाल, तर मी घटकाभर आपली करमणूक करीन."

विनायकरावांनीं आपल्या मित्रांस व चाकरांस खुणावून पांथस्थाची थट्टा करण्यास आरंभ केला. ते म्हणाले, "बरें, बसा. रामा, हे चालून आले आहेत, ह्यांना ऊन पाणी पाय धुण्यास दे, आणि चटकन पान वाढ. त्यांना सर्व पक्कान्नें घाल. मनुष्यावर कसा प्रसंग येतो तें सांगतां येत नाहीं. जा, तुम्ही स्वस्थ जेवा बरें. अरे, त्यांना साखरभात नको असला, तर जिलबीच वाढ! खीर, पुरी, शिरा, त्यांना आवडेल तें वाढ!" असें म्हणून बुदबळांचा डाव चालला होता, तिकडे विनायकराव लक्ष लावून बघूं लागले. गवई तेथें उभाचा उभाच! त्यास कोणीं पाणी दिलें नाहीं, कीं कांहीं वाढिलें नाहीं!

कांहीं वेळानें विनायकरावांनीं डोकें वर केलें व गवईबोवांकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून म्हटलें, "आलांत ? ठीक ! पोटभर झालें ना ? आपलें उगीच विचारतों. तुम्ही म्हणणारच, एथें काय कमी आहे म्हणून ! पण हीं चाकरमाणसें लबाड असतात; आम्ही सांगतों, पण तीं ऐकत नाहींत ! असो. आतां थोडीं फळें घेतांना ? साखरलिंबें, संत्रीं, तुम्हांला काय आवडतें ? पण नको; तीं आंबट, आवाज बिघडवितील ! अरे, हो ! गोपाळ, तीं मस्कती डाळिंबें व द्राक्षें आण पाहूं ! हो, तींच दे त्यांना. ह्या मंडळीनें मघाशीं घेतलींच आहेत. कां कशी आहे लजत ?"

ही सगळी निवळ थट्टा आहे अशी गवयाची खातरी होऊन चुकली. तोही कांहींसा गमत्याच होता; पण उपाशीं असल्यामुळें त्याला राग आला, आणि ह्या थट्टेबाज मंडळीची खोड कशी मोडावी, ह्याचा तो विचार करूं लागला.

इतक्यांत विनायकराव मंडळीस म्हणाले, "अहो ! आतां ह्यांस थोडा घोटा दिला पाहिजे, नाहीं बरें ? आपल्या एथें त्यावांचून आदरातिथ्य अपुरें राहील, व तें अशा लोकांस तर अत्यंत अवश्य !"

ही संधि बरी आहे असें समजून गवई म्हणाला, "नको नको ! मला कोणतेच मादक पदार्थ सोसत नाहींत." पण यजमानांनीं फारच आग्रह केला, तेव्हां फळांप्रमाणें त्यानें भांगही घेतली ! नंतर थोड्याच वेळांत ती आंगावर आली असें दाखवून, गवई मोठ्यानें बरळूं लागला. "काय हो ! किती तरी दिवे हे !! वाहवा ! आरास तर खूप नामी झाली ! हं ! हें देउळ आहे ! जय देव जय देव !!" असें म्हणून एक आरती गात, स्वारी विनायकरावांच्या शेजारींच एक लठ्ठ गृहस्थ बसला होता त्याच्या पायांवर लोळली. संध्याकाळ झाल्यामुळें समया नुकत्याच लाविल्या होत्या. त्यांतून एक दोन समया धुंदींत म्हणून गवयानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाडिल्या, व बुदबळांचा पट उडवून दिला ! मंडळी ओरडली तेव्हां सावध झालोंसें दाखवून गवई उठून जाऊं लागला.

विनायकरावांनीं हा शेरास सवाशेर भेटला असें पाहून, त्याची समजूत करून, त्यास बसविलें व मग त्याचें खरेंच आतिथ्य केलें. जेवणखाण यथास्थित झाल्यानंतर त्यानेंही गाऊन मंडळीस खूश केलें.

---

१४. दिरंगाईचा परिणाम.

पुणें शहरांत कसब्यामध्यें गोपाळराव म्हणून एक गृहस्थ राहात असत. त्यांच्या घरांत ते, त्यांचें कुटुंब राधाबाई, मुलगी गोदू व मुलगा मोरू अशीं चार मनुष्यें होतीं.

एके दिवशीं गोपाळरावांचें डोकें दुखूं लागलें, व त्यांना थोडा तापही आला. त्यांचे स्नेही डाक्टर नारायणराव ह्यांनीं येऊन त्यांची प्रकृति पाहिली, व औषध पाठवून देतों म्हणून सांगितलें. मग डाक्टर घरांत राधाबाईकडे गेले व म्हणाले, " वहिनी, बघा. मी गोपाळरावांना नेहमीं सांगत असतों कीं, तुम्ही हें पाणी बाहेर लावून द्या. पण ते कांहीं मनावर घेत नाहींत. तुमच्या घरांत ओल दिवसेंदिवस जास्त येत चाललें आहे, ह्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. "

राधाबाई—पण काय करावें ? तिकडे कोणी लक्ष देईल तेव्हां ना ? माझे पाय तरी ह्या ओलानेंच वळत असतील, नाहीं बरें ?

नारायणराव—तर काय ? म्हणूनच सांगतों कीं, ह्याचा परिणाम नीट होणार नाहीं. असो, मी जातों आतां.

राधाबाई—ऐकिलें ना ? ओलानेंच इकडे आज दुखणें आलें ! परवां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महिनाभर फुरसत होती, तरी, 'करतां येईल पुढें,' म्हणून ओल काढणें तसेंच राहिलें. ह्या कामीं असा चेंगटपणा काय उपयोगी ?

गोपाळ०—हो ! तुझी घाई नाहीं कशाची ? कोणीं कांहीं म्हटलें, कीं तें तुला आपलें खरेंच वाटतें. आतां येत्या वैशाखांत हें काम करावयाचेंच. आपल्या घरांत वारा पुष्कळ खेळतो, म्हणून त्याचें मोठेंसें भय नाहीं.

राधाबाई—नेहमीं तर आंग मोडून येणें, डोकें दुखणें चाललेंच आहे. माझे पाय तर अलीकडे सारखे वळत असतात. डाक्टर म्हणतात, त्याचें कारण हें ओलच. पण ऐकतें कोण ?

गोपाळ०—हो ! डाक्टरांना दुसरें कांहीं कारण सांपडतच नाहीं. एकदां त्यांच्या डोक्यांत आलें, म्हणजे तेंच नेहमीं पुढें आणितात. ओल काढलें पाहिजे खरें. पण सगळें आजच कसें होणार ? सोईनें घेतलें पाहिजे.

थोडे दिवसांनीं **गो**पाळराव बरे होऊन आपल्या कामावर जाऊं लागले. पुढें वैशाख महिना आला. तेव्हां **रा**धाबाईनें त्यांस आठवण दिली. पण **गो**पाळरावांनीं नेहमीं प्रमाणें आळस केलाच ! आज उद्यां करतां करतां ज्येष्ठ महिना उगवला, व शेवटीं मृग लागून पर्जन्यास प्रारंभही झाला ! मग ते म्हणाले, " आतां दसऱ्याचे सुमारास पाहूं. "

वटपौर्णिमेच्या दिवशीं **गो**पाळराव संध्याकाळीं घरीं येतात, तों त्यांस **रा**धाबाई म्हणते, " पाहिलें का ! आज आपल्या **गो**दूला व **मो**रूला बळकट ताप भरला आहे. **गो**दूच्या आंगाला तर हात लाववत नाहीं; पोरगी अगदीं गळून गेली आहे. तिला ओलांत वागणेंच बाधलें. **मो**रूला घाम येऊन तो आतांच उठला आहे. डाक्टरांना बोलाविलें पाहिजे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोपाळ०—गोदीला आतां थंडी वाजत नाहीं ना? मी सकाळीं नारायणरावांकडे जातों.

रात्र तशीच गेली. सकाळीं राधाबाईनींच डाक्टरांस बोलावून आणिलें. त्यांनीं औषधें देऊन सांगितलें कीं, "एथें ओलांत राहून हीं मुलें बिलकूल बरीं होणार नाहींत." हें ऐकून गोपाळराव घाबरले व लगेच बिनओलाच्या चांगल्या हवाशीर घरांत राहावयास गेले.

गोदू हिंडूं फिरूं लागल्यावर एके दिवशीं डाक्टर नारायणराव राधाबाईस म्हणाले, "वहिनी, गोदू उठली ही ईश्वराची कृपाच! त्या तुमच्या घरांतील ओलानें तिच्या आंगांत इतकी विकृति जडली होती कीं, त्यांतून ती निभावेल असें एक महिनाभर तरी मला वाटलें नव्हतें. तुमच्या पायांच्या कळा अलीकडे बंद आहेत, तोही ह्या कोरड्या जागेंत राहाण्याचाच परिणाम. असो. हे आले आमचे गोपाळराव! कां गोपाळराव, आतां घरीं जायचें ना? ओल निघालें असेलच! नाहीं तर येईल आपलें पुढें काढतां! यंदां नाहीं तर पेस्तर!"

गोपाळ०—छे! नारायणराव, ह्या तीन महिन्यांत मी चांगला शाहाणा झालों. माझ्या दिरंगाईमुळें किती तरी माझें नुकसान झालें. पैशापरी पैसा खर्च झाला आणि आम्हांस दुखणीं काढावीं लागलीं तीं निराळींच! आजच माणसें कामावर लाविलीं आहेत. पाणी बाहेर लावून देऊन ओल निघालें, म्हणजेच आम्ही परत घरीं राहावयास जाऊं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. हातिम ताई.

ख्रिस्ती सनाच्या सहाव्या शतकांत अरबस्तानांत हातिम नांवाचा

ताई कुळीच्या अरबांचा शेख म्हणजे सरदार होता. दया व दातृत्व ह्या गुणांबद्दल त्याची फार प्रसिद्धि होती. एकदां दुसऱ्या एका अरब सरदाराला हातिमाची कीर्ति असह्य होऊन, त्यानें त्याच्यावर स्वारी केली. हातिम हा जातीनें शूर होता, व त्याच्या आंगीं शत्रूशीं लढण्याची हिंमतही होती. तथापि लढाई-मध्यें शेंकडों मनुष्यांच्या आहुति पडतात, व त्यामुळें हजारों बायकामुलें निराश्रित होतात, हें चांगलें नाहीं, असा विचार त्याच्या मनांत आला. तेव्हां शत्रूशीं सामना करणें त्यास प्रशस्त न वाटून, आपली सर्व जिनगी व परिवार सोडून तो एकटाच रानांत निघून गेला. हातिमाच्या शत्रूच्या कानावर ही गोष्ट गेली, तेव्हां त्यानें त्यास धरून आणणारास मोठें बक्षीस देऊं केलें.

इकडे असें झालें कीं, ज्या रानांत हातिम भटकत होता, त्याच रानांत एक मोळक्या व त्याची बायको अशीं दोघें लाकडें तोडावयास गेलीं होतीं. श्रम करून थकल्यामुळें दोन प्रहरीं तीं दोघें एका झाडा-खालीं विसांवा घेण्याकरितां बसलीं. गरिबीनें फारच गांजला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यामुळें नवरा बायकोस म्हणतो, "ईश्वरकृपेनें अशा वेळेस हातिम जर आपल्या हातीं लागला, तर किती चांगलें होईल बरें! आपणांस मोठें बक्षीस मिळेल, व त्याच्या योगानें आपल्या कपाळची ही कर्म-कटकट एकदांची टळेल!" कर्मधर्मसंयोगानें हातिम त्यावेळीं जवळच दुसऱ्या एका झाडाच्या आड बसला होता. मोळक्याचें भाषण ऐकून हातिमास त्याची फार कींव आली. तो मनांत म्हणाला, "जो जन्मास आला त्याच्या मागें मरण लागलेंच आहे. मलाही एक दिवस मरणें आहेच. मग आजच मरण्यास तयार होऊन, मरतां मरतां ह्या गरिबाचें कल्याण तरी कां करूं नये?" हा विचार मनांत येण्याचाच अवकाश, तों तो चटकन उठून त्या मोळक्यासमोर उभा राहिला; व त्यास म्हणाला, "ज्याच्या शोधार्थ लोक फिरत आहेत तो हातिम ताई मीच. मला माझ्या शत्रूकडे ने, म्हणजे तो तुला चांगलें बक्षीस देईल."

हातिमास पाहून मोळक्याच्या तोंडास पाणी सुटलें. तो त्याला त्याच्या शत्रूकडे घेऊन जाण्यास तयार झाला; परंतु मोळक्याची बायको आपल्या नवऱ्याचा निषेध करून त्यास म्हणाली, "दुसऱ्याचा अशा प्रकारें घात करून आपलें पोट जाळणें हें फार वाईट आहे, म्हणून तूं असें करूं नकोस." नवराबायकोचें असें हो ना चाललें आहे, इतक्यांत हातिमाच्या शोधाकरितां फिरत असलेले शत्रूचे कांहीं शिपायी तेथें येऊन पोहोंचले. हातिमास पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं लागल्याच त्याच्या मुसक्या बांधिल्या, व त्यास घेऊन ते आपल्या सरदाराकडे जाऊं लागले. मोळक्याही त्यांच्या मागोमाग गेला. नेमलेल्या ठिकाणीं पोहोंचल्यावर, हातिमास आम्हीं धरिलें अशी फुशारकी आपल्या सरदारासमोर मारून, त्याजवळ देऊं केलेलें बक्षीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते शिपायी मागूं लागले. मोळक्या जवळ होताच. तो म्हणूं लागला, "हातिमास मीं पकडलें, व मीच बक्षिसास पात्र आहें." हातिमाच्या शत्रूस त्यांच्यापैकीं खरें कोणाचें व खोटें कोणाचें ह्याचा निर्णय करतां येईना. तेव्हां त्यानें हातिमासच खरा प्रकार काय आहे तो निवेदन करण्यास सांगितलें. हातिमानें झालेली सर्व हकिकत घडली होती तशी सांगितली. ती ऐकून त्या सरदारास हातिमाच्या औदार्याचें फारच आश्चर्य वाटलें. त्यानें लागलेंच हातिमास बंधमुक्त करून आपल्या आगळिकीबद्दल त्याची माफी मागितली, व त्याचें सर्वस्व त्याच्या स्वाधीन करून आल्या मार्गानें तो चालता झाला. नंतर हातिमानें त्या मोळक्याच्या बायकोस तिच्या न्यायी वर्तणुकीबद्दल मोठें बक्षीस दिलें; आणि तिच्या नवऱ्यालाही खूश केलें.

---

१६. उधळेपणा.

ह्या जगांतील बहुतेक सर्व व्यवहार पैशानें चालतात. कोणत्याही स्थितींत अगर धंद्यांत मनुष्य असो, पैशावांचून त्याचें चालत नाहीं. बैरागी, संन्यासी, फकीर, पुंगी, अथवा असेच दुसरे लोक आम्ही परमार्थाच्याच मार्गें लागलों आहों असें म्हणतात खरें; पण त्यांचाही निर्वाह नीट चालण्यास पैसा पाहिजेच. मग इतरांची ती कथा काय?

पैशाचा योग्य व्यय करणें हें कांहीं अगदीं सोपें काम नाहीं. तें बरेंच कठीण आहे. व्यय करण्याचे तीन प्रकार आहेत. आद्यापेक्षां कमी खर्च करणें, आद्याइतका खर्च करणें व आद्याहून जास्त खर्च करणें. पहिल्या प्रकारच्या व्ययास मितव्यय म्हणतात, दुसऱ्यास आत्तव्यय व तिसऱ्यास अतिव्यय अथवा उधळेपणा असें नांव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा अतिव्यय अथवा उधळेपणा दोन प्रकारांनीं घडतो. ज्या वस्तूंची आपणांस जरूर नाहीं अशा वस्तु, किंवा ज्यांवांचून आपणांस सुखानें राहातां येतें असले चैनीचे पदार्थ, ह्यांमध्यें द्रव्याचा व्यय करणें, हा एक प्रकार. दुसरा प्रकार असा कीं, अविचारानें भलत्या वेळीं व भलत्या स्थळीं एकाद्या वस्तूचा अभिलाष धरून, ती वाजवीपेक्षां जास्त किंमत देऊन घेणें. पुष्कळ धार्मिक म्हणविणारे लोक धर्म म्हणून जो खर्च करितात, तोही आणखी एक प्रकारचा उधळेपणाच होय.

ज्याची प्राप्ति केवळ रोज एक रुपया असून ज्याच्या पदरीं चार माणसें आहेत, अशा मनुष्यानें सुंदर दिसतें म्हणून एक साठ रुपयांचें तावदानी झडपांचें कपाट विकत घेणें, व मग तें रिकामें राहिलें तर विशोभित दिसेल, म्हणून त्यांत ठेवण्याकरितां गोकाकचीं सुंदर रंगीत फळें वगैरे सामान आणविणें, हें पहिल्या प्रकारच्या उधळेपणाचें उदाहरण होय. दिवाळीच्या दिवसांत मधांत घालून ठेवलेले अस्सल उंची आंबे आणून आंबरसाची हौस फेडणें, हें दुसऱ्या प्रकारच्या उधळेपणाचें उदाहरण होय. वरतीं उधळेपणाचा आणखी जो एक प्रकार सांगितला त्याचें उदाहरण म्हणजे, भिक्षा मागणें हाच आपला धंदा असें मानणारे गलेलठ्ठ भिकारी व खोटीं सोंगें आणणारे, अशांस द्रव्य, वस्त्रें इत्यादिकांचें दान करणें, हें होय. पहिल्या दोन प्रकारचे उधळे लोक कांहींच संपादन करीत नाहींत. शेवटल्या प्रकारचे लोक मात्र धार्मिक म्हणून नांव मिळवितात. तथापि ते ज्यांवर उपकार करितात, त्यांवर त्यांच्या हातून खरोखर उपकृति न घडतां, उलट मूर्खपणास, आळसास, अथवा ढोंगास उत्तेजन मात्र मिळतें.

अतिव्यय केल्यानें थोड्याशा लोकांत तात्कालिक भलीभलायकीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय ती प्राप्त होते; तिच्याव्यतिरिक्त दुसरा कोणताही लाभ होत नाहीं. पण एकदां ही उधळेपणाची चट लागली, म्हणजे जवळचें सर्व द्रव्य संपल्यावर कर्ज करणें जरूर पडतें. जवळचें संपल्यावर, कर्ज होऊन पत नाहींशी झाली, म्हणजे फिर्यादी होतात; आणि सर्व चीजवस्त जाऊन लोकांच्या दारोदार देशीं किंवा विदेशीं भीक मागण्यास जावें लागतें. अशा वेळीं त्यांस मदत न करतां, उलट ते मूर्ख आहेत असें म्हणून लोक त्यांचा तिरस्कार करितात. सारांश, उधळ्या लोकांस अपमान आणि हाल सोसावे लागतात व मग त्यांना कोणतेंही काम करण्यास हुरूप राहात नाहीं.

अतिव्यय करणाऱ्या मनुष्याची आपमतलबी आणि दुर्व्यसनी लोकांशीं गांठ पडली म्हणजे आटपलेंच ! त्यांच्या सहवासानें त्याला अनेक प्रकारच्या चैनीच्या पदार्थांचा मोह उत्पन्न होतो, आणि प्रसंगानुसार कारागृहांत जाण्याचीही पाळी येते.

मितव्ययी मनुष्याचें ह्याच्या उलट असतें. त्यास कधींही सावकाराचें घर पाहावें लागत नाहीं; त्यास कोणी उलटून बोलूं शकत नाहीं; व त्याचा कोणी व्यर्थ उपहास करूं शकत नाहीं; कारण, तो कोणाचा मिंधा नसतो. तो नेहमीं आंथरूण पाहून पाय पसरणारा असल्यामुळें त्याचे पाय कोणास लागत नाहींत. आत्तव्ययी म्हणजे मिळेल तितकेंच खर्च करणारा मनुष्य मितव्ययी माणसाचें सुख पावत नाहीं, हें खरें; पण उधळ्या माणसाचे हाल तरी त्याला भोगावे लागत नाहींत.

मनुष्यानें उधळेपणा टाकून आपला खर्च आपल्या प्राप्तीच्या आंत ठेवावा हें चांगलें. असें केल्यानें त्यास पुष्कळ सुख होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. बाजीराव बल्लाळ ह्यांचा पुत्रास उपदेश.

"जे लोक आपणांस आपल्या देशांतच कोंडून घेतात, कधीं बाहेर पडत नाहींत, ते सर्वदा जंगली, दरिद्री, अज्ञानी, दुःखी आणि अभागी राहातात, हें पक्कें समजावें. प्रवास करण्यांत पातकाचा लेश नाहीं. असत्य भाषण, असत्याचरण अथवा दुसऱ्यास विनाकारण दुःख देणें, असलीं कर्में मात्र वर्जावीं.

बाळाजी बाजीराव पेशवे.

"उद्योगानें सर्व कांहीं साध्य होतें. नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसूं नये. वेळ आणिल्याखेरीज येत नाहीं. साखर ही कधीं कडू लागली आहे काय ? अमक्या मुहूर्तावर खाल्ली असतां ती गोड व अमक्यावर खाल्ली तर ती कडू, असें कधीं घडत नाहीं. तसाच दृढनिश्चयपूर्वक चांगला उद्योग केव्हांही करावा. त्यापासून सुफळ प्राप्त झाल्याविना राहावयाचें नाहीं, हें निःसंशय समजावें.

"ज्या मनुष्याला स्वदेशाभिमान नाहीं, तो जिवंत आणि मेला सारखाच समजावा. माझ्या एकट्याच्या हातून काय होणार आहे असें रें रें करीत बसूं नये. 'दसकी लकडी एकका बोजा' हा न्याय लक्षांत ठेवावा. जोंधळ्याच्या एका कणसांत फार तर पसाभर धान्य असतें; पण अशा पसा पसा धान्याची जमवाजमव केली, तर राशींच्या राशी पडतात. तसेंच एक एक जुळतां जुळतां हजारों स्वदेशाभिमानी होतात, आणि त्यांपासून उत्तम फळ निष्पन्न होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" जो ज्या कामांत वाकब असतो, त्याला तें काम राबत्यामुळें चांगलें करतां येतें. गुराख्याच्या हवालीं मोठी फौज केली, तर तो लढाईचें काम करील का? नाहीं. ज्याला ज्या गोष्टीची वाकबगारी त्यालाच तिचीं कारणें, तिचे उपयोग, ती सिद्धीस नेण्यासाठीं तिचे भाग कसे पाडावे, आरंभ कोठें करावा, साधनें कोणतीं योजावीं, व मधलीं विघ्नें कशीं टाळावीं, हें सर्व कळतें. ह्यासाठीं कोणता मनुष्य कोणत्या कामास योग्य आहे, ह्याचा आधीं विचार करावा.

" बुद्धि चांगली असली, तरी तिचा विनियोग यथार्थ झाला पाहिजे. अग्नि हा पदार्थ अति उपयोगी आहे. त्यापासून पाकनिष्पत्ति, दीपन इत्यादि सुखावह कार्यें बहूत होतात. तीं करून घेण्याचें टाकून कोणी एकादा दुष्ट त्यानें लोकांचीं घरें जाळीत सुटला, तर तेथें अग्नीनें काय करावें? हा दोष अग्नीचा कीं आगलाव्याचा? ज्याच्यासन्निध जावें त्याला जाळावें, एवढेंमात्र अग्नि जाणतो. तसें बुद्धीला सुमार्ग किंवा कुमार्ग लावणें हें तुमच्या हातीं आहे. 'योजकस्तत्र दुर्लभः' हा महाजनांचा सुबोध लक्षांत ठेवून बुद्धीची योजना नीट करीत जावी.

" अमुक एक संकट पडलें असतां अमुक युक्ति योजावी, अथवा अमुक एक उद्योग केला असतां अमुक लाभ होतात, असें आपण पुष्कळांच्या तोंडून ऐकतों, व अनेक ग्रंथांत अनेक वेळां वाचितों, व त्या युक्ति आपल्या आठवणींतही असतात; परंतु त्यांचा उपयोग कोठें, कोणत्या प्रकारें करावा ह्याचें व्यवहारज्ञान नसतें, ह्यामुळें कित्येक शाहाणे असून अडाणी लोकांपेक्षांही अधिक विपत्ति भोगितात. वैद्य खासा चांगला पढीक आहे, त्याला सर्व रोगांचीं लक्षणें व निदानें मुखोद्गत आहेत, जवळ रसायनांचे बटवेचे बटवे भरले आहेत; तरी त्याच्यो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातून रोगी बरे होत नाहींत, हें पुष्कळांस ठाऊक आहे. तात्पर्य, नुसती पुस्तकी विद्या उपयोगी नाहीं. तिला व्यवहारज्ञानाची जोड पाहिजे.

"दूरदृष्टि, समयस्फूर्ति, पाताळयंत्रीपणा, रसिकता, कुशाग्रता, धूर्तता इत्यादि गुण प्राप्त होण्यास इतिहास, बखरी, काव्यें, गणित, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र हीं अवलोकन करीत जावीं किंवा श्रवण करावीं."

ना० वि० वापट–बाजीराव.

---

१८. हिंदूंच्या जुन्या व नव्या चालीरिती.

हिंदू लोकांच्या पूर्वीच्या व हल्लींच्या चालीरितींची तुलना केली, तर त्यांत पुष्कळ फरक पडत चालला आहे असें दिसून येईल. प्रत्येक हिंदूस अवश्य म्हणून सांगितलेले जे सोळा संस्कार ते सांप्रत केव्हांतरी उरकून घेतात. एक दोन मात्र योग्य वेळीं घडतात. ह्या बहुतेक संस्कारांत हल्लीं तंत्रच शिल्लक राहिलें आहे. ब्रह्मचर्यादि व्रतांचा पूर्ण अर्थही पुष्कळांस माहीत नसतो. विवाहादि संस्कारांत हौस किंवा पोकळ डौलाची इच्छा असल्यामुळें हुंडापांडा, रुसणेंफुगणें वगैरे कांहीं चाली विनाकारण वाढल्या आहेत. शास्त्रांत त्या सांगितलेल्या नाहींत; तेव्हां पूर्वीच्या काळीं त्या प्रचारांत नसाव्या असें उघड दिसतें. त्यांच्यामुळें व्यर्थ खर्च व भांडणें मात्र होतात.

अध्ययन आणि अध्यापन ह्यांसंबंधेंही पुष्कळ फरक झाला आहे. पूर्वी शिकणारांची संख्या थोडी असे, व ते गुरुगृहीं राहात आणि इच्छित विषय गुरुमुखांतून पाठ घेऊन शिकत. त्यामुळें अध्ययन संपेपर्यंत ते पूर्णपणें गुरूच्या देखरेखीखालीं असत. हल्लीं शिक्षण सार्वजनिक झाल्यामुळें विद्यार्थ्यांची संख्या झपाट्यानें वाढत आहे, व शाळांमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलें नियमित तासच शिकत असल्यामुळें त्यांच्यावर गुरूंस सर्व काळ देखरेख ठेवतां येत नाहीं. पण आतां शिकविण्याचे विषय नुसते घोकवून न घेतां समजतील अशा तऱ्हेनें शिकविण्याकडे अधिक लक्ष द्यावें लागतें; व त्यामुळें पुस्तकें, नकाशे वगैरे साहित्यही फार लागतें. पूर्वी ब्राह्मणादि उच्च वर्णांतील मुलांस मात्र विद्या शिकवीत, इतर बहुतेक सर्व अशिक्षित राहात. हल्लींची समजूत अशी आहे कीं, प्रत्येक मनुष्यास लिहितां वाचतां आलेंच पाहिजे. नंतर ज्या प्रकारचा धंदा करण्यास तो लायक किंवा उत्सुक असेल, तो धंदा त्यानें शिकावा. ह्यामुळें वडिलोपार्जित धंदा अयोग्य वाटल्यास, त्यांत मनुष्य हल्लीं अडकून राहात नाहीं.

प्राचीन काळीं स्त्रियांस विद्या शिकवीत असत. त्यांस समाजांत बोलण्याचालण्याचीही मोकळीक असे, व त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस मानही मिळे. परंतु मध्यंतरीं देशस्थिति पालटल्यानें स्त्रियांस विद्या शिकविणें अप्रशस्त असें वाटूं लागलें, व कांहीं प्रांतांत तर गोषाची चाल सुरू झाली. हल्लीं स्त्रीशिक्षणाकडे सरकारचें विशेष लक्ष असल्यामुळें स्त्रियांची स्थिति पुन्हा पहिल्या वळणावर येईल, असा रंग दिसूं लागला आहे.

नौकायान व परदेशगमन हीं हिंदू लोक निषिद्ध मानितात, पण तीं हळू हळू प्रचारांत येऊं लागलीं आहेत. त्यांपासून किती तरी लाभ होण्याचा संभव आहे! देशांतल्या देशांतही आगगाड्या व आगबोटी झाल्यामुळें त्यांत बसून गेल्यास प्रथम प्रथम जो विटाळ मानीत, तो आतां पुष्कळ कमी झाला आहे. आगगाडींत एकाच बांकावर उच्च वर्णाच्या मनुष्यास नीच मानिलेल्या जातीच्या माणसाशेजारीं बसावें लागलें, तरी त्याबद्दल त्यास हल्लीं फारसें कांहीं वाटत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोशाकांत तर पुष्कळच फरक झाला आहे. पहिला साधा व एकाच ठिकाणीं बसून व्यवसाय करण्यास योग्य असा पोशाक जाऊन सांप्रत निरनिराळ्या धंद्यांस सोईचे असे पोशाक वापरण्यांत येत आहेत. प्रत्येकाची आवड निराळी, अर्थात् तिजमुळेंही हल्लीं पेहरावांत फरक होत चालला आहे. वेदांच्या व स्मृतींच्या वेळच्या जटावल्कलधारी ब्राह्मणांच्या चित्रांजवळ पायमोजे, बूट, कोट व टोपी घातलेल्या हल्लींच्या इंग्रजी शिकलेल्या विद्वान् ब्राह्मणाचें चित्र ठेविलें, तर हा त्यांचाच वंशज किंवा सजातीय तरी आहे, असें कोणास वाटेल काय? पण एवढें लांब कशाला जा? पेशवाईतील किंवा अव्वल इंग्रजींतील पोशाकांत आणि हल्लींच्या पोशाकांत किती तफावत पडली आहे?

दळणवळणाचीं साधनें व व्यापार वाढल्यामुळें निरनिराळ्या देशांतील व प्रांतांतील भिन्नभिन्न धर्मांचे व जातींचे लोक सामाजिक व्यवहारांत निःशंकपणें व स्नेहभावानें एकमेकांत मिसळूं लागले आहेत, हें ह्या देशाच्या भावी उन्नतीचें चिन्ह आहे. ह्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे लोक पूर्वी इतके मिळून मिसळून वागत नसत.

हे व असेच दुसरे फरक आपल्या चालीरितींत पडत चालले आहेत. ह्यांचीं मुख्य कारणें पाहूं गेलें असतां सर्व देशभर एकछत्री राज्य, भेदाभेद न मानितां सर्वत्र एकाच प्रकारच्या कायद्यांची अमलबजावणी, विद्येचा सर्वत्र प्रसार व एकसारखें वाढत जाणारें दळणवळण, हीं होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. अभिमन्यूचा पराक्रम.

युद्धास गुंतला अर्जुन । इकडे काय झालें वर्तमान ॥
चक्र-व्यूह गुरु द्रोण । रचिता झाला अद्भुत ॥ १ ॥
नकुळ सहदेव पांचाळ । अवघे युद्ध करिती सबळ ॥
परी चक्र-व्यूह भेदावया बळ । कोणासही दिसेना ॥ २ ॥
धर्म म्हणे असता पार्थ । तरी हां व्यूह भेदिता निश्चित ॥
तों पुढें येऊन सुभद्रासुत । धर्मरायासी विनवीतसे ॥ ३ ॥
" तुम्ही मज आज्ञा द्याल जरी । तरी हा व्यूह भेदीन निर्धारीं " ॥
धर्म म्हणे त्या अवसरीं । " तूं बाळक कीं सुकुमार " ॥ ४ ॥
मग बोले पार्थनंदन । " आम्हां क्षत्रियां रण तेंचि धन ॥
ताता, तुमच्या दयेंकरून । व्यूह भेदून जाईन मी " ॥ ५ ॥
श्याम-वर्ण राजीवनयन । आजानु-बाहु सुहास्यवदन ॥
जो पांडवांसी प्राणांहून । आवडता पांचांसही ॥ ६ ॥
ऐसा तो उत्तरावर । रथावरी चढला सत्वर ॥
उदयाद्रीवरी दिनकर । तैसा तेजाळ दिसतसे ॥ ७ ॥
केला धर्मासी नमस्कार । युद्धा निघाला पार्थ-कुमार ॥
तों सहस्रावधी राजे वीर । व्यूहाप्रती रक्षिती ॥ ८ ॥
व्यूह भेदीत जाय सौभद्र । दहा सहस्र मारिले कुंजर ॥
एक अयुत महावीर । अश्वांसहित पाडिले ॥ ९ ॥
दळासहित राजकुमार । एकल्यावरी सोडिती शर ॥
परि तो आनकदुंदुभि-कन्या-कुमार । तितुके तोडी क्षणमात्रें ॥१०॥
तितुक्यांचें बाणजाळ । एकसरें भेदी सुभद्राबाळ ॥
जैसें उगवतां सूर्यमंडळ । भ्रमगणें सर्व लोपवी ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक उठतां पक्षिनायक । असंख्य संहारितो दंदशूक ॥
कीं सुटतां चंडवात देख । जळदें-जाळें वितुळवितो ॥ १२ ॥
कीं मूढाचें वाग्जाळ समस्त । एक्या शब्दें उडवी पंडित ॥
कीं एक सिंह नाग बहुत । पडती गतप्राण होऊनी ॥ १३ ॥
तैसा एकलाचि धनंजय-कुमार । परि सैन्यें केलीं अवघीं जर्जर ॥
कोणी उचलितां आपुला कर । शस्त्रासहित छेदी पैं ॥ १४ ॥
दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण । त्याशीं युद्ध करी निर्वाण ॥
घेतला तात्काळ त्याचा प्राण । शिर उडवूनी पाडिलें ॥ १५ ॥
बाण सोडीत धावला कर्ण । दों बाणीं विंधिले त्याचे कर्ण ॥
आंग काढूनि भानु-नंदनें । पळता झाला एकीकडे ॥ १६ ॥
दशबाणीं सुयोधन खिळिला । द्रोण पांच बाणीं विंधिला ॥
जयद्रथ दूर पळविला । एकाच बाणेंकरोनी ॥ १७ ॥
अश्वत्थामा कृपाचार्य । हेही पळती गतवीर्य ॥
देखूनि अभिमन्यूचें शौर्य । द्रोण मस्तक डोलवी ॥ १८ ॥

श्रीधर–पांडवप्रताप, ४५.

---

२०. कार्ले एथील लेणीं.

इमारती बांधणें व खोदकाम करणें ह्या कला हिंदुस्तानांत दोन हजार वर्षांपूर्वीच चांगल्या दशेस आल्या होत्या, ह्याची साक्ष कोरींव लेणीं वगैरे कामें अद्यापि देत आहेत. प्राचीन हिंदूंनीं बांधकाम व खोदकाम ह्या कलांत चांगलीच प्रवीणता मिळविली होती, असा, शिल्पकलाभिज्ञ व जुन्या वस्तूंचा शोध करणारे जे डाक्टर फर्ग्यूसन साहेब, त्यांचा अभिप्राय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धांनीं सह्यपर्वतांत ठिकठिकाणीं खोदलेल्या खोल्या, स्तूप व चैत्य हे जुन्या खोदकामाचे उत्कृष्ट नमुने होत. श्रीगौतम बुद्धाचा कांहीं अवशिष्ट अंश अथवा चिन्ह पुरून त्यावर एक वाटोळा भरींव टोप रचीत, त्यास स्तूप म्हणतात. चैत्य म्हणजे बौद्धांच्या उपासनेच्या जागा होत. हे चैत्य बहुतेक मुंबई इलाख्यांतच आहेत. त्यांपैकीं जो बांधणींत सर्वांमध्यें उत्तम तो कालें एथील लेण्यांत आहे. हीं लेणीं लोणावळ्यापासून सुमारें पांच मैलांवर आग्नेयी दिशेस आहेत. लोणावळें व पुणें ह्यांच्यामध्यें कालें म्हणून जी. आय. पी. रेलवेचें स्टेशन आहे, तेथून ह्या लेण्यांस जाण्याला चांगला रस्ता आहे. त्या स्टेशनापासून सुमारें दोन मैलांवर थोडीशी चढण लागते. ती चढून गेल्यावर मुख्य चैत्याच्या पुढें एक स्तंभ आहे तो दृष्टीस पडतो. त्यावर सिंहाचे चार पुतळे आहेत. पुढें चैत्याकडे जातांना उजव्या बाजूस एक जुनें देऊळ आहे, तें पहिल्यानें बौद्धांनीं ध्यानस्थ बसण्याकरितां बांधलेलें एक स्थळ असावें; पण अलीकडे कितीएक वर्षांपासून त्यांत एका देवीची स्थापना केली आहे. तिचें नांव एकवीरा. तिला दर्याकिनाऱ्याचे कोळी लोक फार भजतात. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील पुष्कळ कोळी दरसाल एथें दर्शनास व नवस फेडण्यास येतात.

बौद्धांचे चैत्य व हिंदूंचीं देवालयें ह्यांच्यांत रचनेसंबंधीं मुख्य भेद हा कीं, हिंदूंचीं देवळें बाहेरूनही सुशोभित केलेलीं असतात; पण चैत्य हे डोंगरांत बऱ्याच उंचीवर पोखरलेले असून त्यांतील सर्व करामत काय ती आंतल्या बाजूस असते; बाहेर कांहींच दिसत नाहीं. कालें एथील लेण्यांतील चैत्य आजवर सांपडलेल्या सर्व चैत्यांमध्यें अतिशय विस्तीर्ण आणि सुंदर आहे. दरवाजापासून मागच्या भिंतीपर्यंत त्याची लांबी सुमारें १२५ फूट व रुंदी सुमारें ४५½ फूट आहे. त्याचीं तीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दालनें केलीं आहेत. मधलें दालन २५½ फूट रुंद असून, बाजूचीं फक्त १०।१० फूट रुंद आहेत. मधल्या दालनांत दारासमोर स्तूप आहे, त्याचा व्यास अदमासें २० फूट होईल. ह्यास लोक 'धर्मराजाचा



डेरा' असें म्हणतात. मधल्या दालनाच्या दोन्ही बाजूंस व स्तूपाच्या मागूनही अष्टपैलू खांबांच्या ओळी आहेत. स्तूपाच्या मागचे खांब सोडून बाकी ३० खांबांखालीं उंच उंच उथळीं असून वरतीं मथाळ्यावर दोन दोन गुडघे टेकलेले असे हत्ती कोरिले आहेत. प्रत्येक हत्तीवर एक पुरुषाची व एक स्त्रीची, व कोठें दोन्ही स्त्रियांच्या अशा सुबक मूर्ति कोरिल्या आहेत. ह्या सर्व मूर्ति इतर ठिकाणच्या लेण्यांतल्यापेक्षां जास्त सुरेख दिसतात, पण त्या बहुतेक सर्व विच्छिन्न केलेल्या आहेत. दालनाची वरली बाजू म्हणजे छावणी अर्धवर्तुलाकार असून खांबांचे व भिंतींचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जवळ थोडी उभंटी आहे. आंतील देखावा फारच रम्य व भव्य आहे, एकांतवासांतील शांततेचें चित्र एथें मनावर चांगलें उमटतें. उजेड दाराच्या वरच्या बाजूनें एकाच विवरांतून घेतला आहे; पण किरण असें सुरेख साधलें आहे कीं, उजेड थेट स्तूपावर पडून आंतील सर्व भाग प्रकाशित होतो.

ह्या चैत्याशिवाय ह्या लेण्यांमध्यें पाहाण्यासारखें दुसरें फारसें कांहीं नाहीं. ह्या मुख्य गुहेच्या उजव्या बाजूस थोडें उतरलें असतां सात दुमजली खोल्यांची एक रांग लागते. तेथें जाण्याचा जिना पडूं लागला असल्यामुळें बराच अवघड झाला आहे. ह्या खोल्या बौद्ध जोग्यांच्या राहाण्याच्या जागा होत. मुख्य गुहेच्या डाव्या बाजूस सुमारें ६०० कदमांवर डोंगराच्या एका वांवभर कपारींत एक हातभर खडकावर कांहीं टेंगळें आलेलीं दिसतात; त्यांस लोक डोंगरास आलेल्या देवी म्हणतात, व भाविकपणें त्यांची पूजा करितात !

---

२१. हिंदुस्तानांतील कालचे.

एकंदर हिंदुस्तानांत दरसाल जो पाऊस पडतो तो सर्व ठिकाणीं एकसारखाच पडता, तर सर्व देशभर सुमारें ४२ इंच पाण्याचा थर झाला असता. परंतु असा सर्व ठिकाणीं सारखा पाऊस कोणत्याच देशांत पडत नाहीं. हिंदुस्तानांत मोठमोठे पर्वत, नद्या, खोरीं, अरण्यें व वाळूचीं मैदानें असल्यामुळें तर, ह्या देशाच्या निरनिराळ्या भागांत पाऊस पडण्याचें प्रमाण निरनिराळें असण्यास विशेषच कारण आहे.

जमिनींतून धान्यादिकांचीं पिकें काढण्यास पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. पण जेथें पावसाच्या पाण्याचा पुरवठा पुरेसा होत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं, अशी जमीन ह्या देशांत सुमारें दहा लक्ष चौरसमैल आहे. अशा जमिनींत वर-पाण्यानें म्हणजे विंहिरी, पाट इत्यादिकांचें पाणी पुरवून उत्पन्न काढण्याची वहिवाट हिंदुस्तानांत प्राचीन काळापासून आहे. मद्रास इलाख्यांत फार जुनाट अशीं तळीं अजूनही ह्या कामीं उपयोगीं पडतात. चिंगलपट जिल्ह्यांत दोन मोठे तलाव आहेत, त्यांचें वर्णन सातव्या व आठव्या शतकांतील ताम्रपटांत केलेलें आढळतें. सिंधुनदाच्या पुराचें पाणी आसपासच्या प्रदेशांत खेळविण्याचा प्रघात फार वर्षें चालू असावा असें दिसतें. उत्तर हिंदुस्तानांत डोंगरपायथ्याच्या प्रदेशांत खणतांना जुनाट कालव्यांचे अवशेष अद्यापि कोठें कोठें आढळून येतात.



कृष्णेचे बेझवाडा एथील कालवे.

मोठमोठ्या नद्यांचें पाणी प्राचीन काळीं पाटानें वळवून नेलेलें पुष्कळ ठिकाणीं आढळतें. त्यांपैकीं विशेष महत्वाचीं अशीं कांहीं सांगतों.

१. मद्रास इलाख्यांत कालेरून नदीचा कालवा. ह्यास हल्लीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'ग्यांड अनिकट' असें नांव आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत तो बांधला असावा असा अजमास आहे. इसवी सन १८३७ पर्यंत तो थोडाबहूत चालू होता. परंतु नदीचें पात्र बदलल्यामुळें ह्या कालव्यांतील पाणी कमी झालें व त्यामुळें त्या प्रांताचा सुपीकपणा पुष्कळ कमी झाला.

२. मुलतान, मुझफरजंग व डेरा गाझीखान ह्या जिल्ह्यांतील जुने कालवे. हे बहुतेक मुसलमानांच्या व शिकांच्या अमदानींतले आहेत.

३. हासळी नांवाचा पाट. हा रावी नदीचें पाणी लाहोर शहरीं नेण्याकरितां बांधिला होता. ह्याची बांधणी चांगली होती, पण मांडणी फारच चुकल्यामुळें तो बहुतेक निरुपयोगी झाला.

४. यमुना नदीपासून दिल्ली शहरापर्यंत फिरूझ तघलघ ह्यानें एक कालवा बांधिला होता. तो अलीमर्दानखान ह्यानें दुरुस्त केला. परंतु मोंगल बादशाहीचे अखेरीस तो पुन्हा होरून गेला.

ह्या कालव्यांचा लोकांना कधीं खरा उपयोग झाला होता किंवा नव्हता, ह्याची अलीकडील शिल्पशास्त्रज्ञांना शंकाच आहे. तथापि एवढें कोणासही कबूल करणें भाग आहे कीं, 'ग्यांड अनिकट' आणि सिंधु व यमुना ह्या नद्यांचे कालवे पाहूनच, तशा रितीनें जमिनीस पाणी पुरविण्याची कल्पना हल्लींच्या राज्यांत निघाली. ह्या कल्पनेस अनुसरूनच हल्लीं चालू असणारे मोठमोठे कालवे सरकारी खर्चानें बांधिले आहेत व नवीन बांधिले जात आहेत.

अर्वाचीन काळच्या ज्या पाटांचा खरोखर उपयोग झाला, असे पाट अद्यापि दक्षिण हिंदुस्तानांत आहेत. ते फार लहान होते तरी नवीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारी कालव्यांनीं जितकी जमीन हल्लीं भिजत आहे, तितकीच बहुतेक ह्या जुन्या पाटांनींही भिजत आहे.

हल्लींचे नवे कालवे बांधण्याची कल्पना सर आर्थर काटन व सर मोबी काटले ह्यांनीं काढिली. काटन साहेबांनीं 'ग्र्यांड अनिकट' दुरुस्त केला व 'अपर अनिकट' हा कालवा बांधिला. काटले साहेबांनीं यमुनेच्या कालव्याचें काम लक्षपूर्वक पाहून त्यांतील चुक्या दुरुस्त करविल्या, व नवीन कालवे बांधून त्या नदीचें पाणी आणखी ठिकठिकाणीं खेळविलें. तसेंच, सरकारानें सिंध प्रांतांतील जुने कालवे नव्या रितीनें सुधारून व वाढवून तो प्रांत सुपीक करून सोडिला आहे. महाराष्ट्रांतही मुठा व नीरा ह्या दोन नद्या अडवून त्यांचें पाणी कालव्यांनीं हजारों एकर जमिनीस पुरविलें आहे. ह्या कालव्यांस अनुक्रमें मुठा-कनाल व नीरा-कनाल असें म्हणतात.

प्रस्तुत हिंदुस्तानांत एकंदर लागवड जमीन साडेबावीस कोट एकरांहून थोडीशी जास्त आहे. ह्यांपैकीं सुमारें $\frac{1}{5}$ जमिनींतील पिकें पाटाच्या पाण्यावर काढितात. सांप्रतकाळीं पाटबंधारे बांधण्याकडे सरकारचें लक्ष अधिकच लागलें आहे.

---

२२. तुकाराम.

तुकारामाचा जन्म पुण्याजवळ देहू गांवीं शके १५३४ मध्यें झाला. त्याच्या घराण्याचें, पुष्कळ पिढ्या, विठोबा हेंच आराध्य दैवत होतें. तुकारामाच्या बापाचें नांव बोल्होबा मोरे. बोल्होबा जातीचा कुणबी असून किराण्याचा व्यापार करीत असे. सावजी वडील, कान्होबा धाकटा व तुकाराम मधला, मिळून हे तिघे भाऊ. पैकीं सावजी लहानपणा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पासून विरक्त होता, म्हणून शके १५५१ चे सुमारास मातापितरें निवर्तल्यामुळें संसाराचें सर्व ओझें तुकारामावरच पडलें. तितक्यांत एक भयंकर दुष्काळ पडून शेराची धारण झाली, व त्याचें मन संसारांतून उठलें. ह्याबद्दल तो म्हणतोः—

दुष्काळें आटिलें द्रव्य, नेला मान। स्त्री एकी अन्नान्न करितां मेली ॥
बरें जालें देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥
बरें जालें जगीं पावलों अपमान। बरें गेलें धन ढोरें गुरें ॥
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज। बरा आलों तुज शरण देवा ॥

ह्याप्रमाणें अंतःकरणांत पूर्ण विरक्ति होऊन तुकाराम सर्वथैव ईश्वरभजनीं लागला.

पोटाकरितां त्याला शेताचें कांहीं उत्पन्न येत असे, व परोपकाराकरितां जरूरच तर तेवढ्यापुरतें कांहीं कामही तो करीत असे, असें दिसतें. कारण—

भिक्षापात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें ॥
जगा घालावें सांकडें। हेंचि अभाग्य रोकडें ॥

अशी त्याची निर्धाराची वाणी आहे. शिवाय तो शेत राखण्यास राहिला असल्याची कथाही प्रसिद्ध आहे.

त्याची निस्पृहता त्यानें शिवाजीस पाठविलेल्या—

तुम्हांपाशीं आम्हां येउनीयां काय। वृथा शीण आहे चालण्याचा ॥

इत्यादि पत्रिकेवरून स्पष्ट होते. तुकारामाचा स्वभाव फारच प्रेमळ व परोपकारी होता. ऐहिक स्वार्थावर त्याची मुळींच दृष्टि नसे. परमेश्वराच्या ठिकाणीं त्याचें खरें खरें प्रेम असे, व तेंच कायम राहावें म्हणून तो नेहमीं ईश्वरास म्हणेः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥

केशव चैतन्याचा शिष्य बाबा चैतन्य, हा तुकारामाचा गुरु होय. तुकारामास असें अलौकिक ईश्वरी ज्ञान प्राप्त झालें होतें कीं, त्या वेळच्या पंडितांतही कोणी त्याचें खंडन करण्यास समर्थ नव्हता. आपण कविता कां केली ह्याविषयीं तुकारामानें म्हटलें आहेः—

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥

त्यानें आपल्या अभंगांत वेदांतील व गीतेंतील बहुतेक भाग सांगितला आहे. त्याचा उद्देश अमुक एका विषयाचें प्रतिपादन करण्याचा नसून, लोकांस उपदेशून त्यांस भक्तिमार्गास लावावें व सदाचरणी करावें, हाच होता. तो म्हणतोः—

ऐका ऐका भाविक जन । कोण कोण व्हाल ते ॥
तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥
नका शोधूं मतांतरें । तुमचें खरें, बुडाल ॥

ह्याच कार्याकरितां तो कीर्तनही करीत असे.

त्याची कविता केवळ प्रासादिक आहे. तींत विचारसरणी व भाषासरणी ह्यांकडे विशेष लक्ष नसून, प्रसंगास उचित असा उपदेश करण्यास जरूर तें, सुचेल त्या भाषेनें, पण मोठ्या कळवळ्यानें व प्रेमानें सांगितलें आहे. त्यामुळें त्याच्या कवनांत सरळपणा असून, अर्थगांभीर्यही फार आहे. चांगल्या शिक्षकाप्रमाणें त्यानें जेथें तेथें आपला अर्थ दृष्टांत देऊन स्पष्ट करून सोडिला आहे. ईश्वरप्राप्ती-विषयीं तळमळ कशी असते, ती सांगताना तो देवास उद्देशून म्हणतोः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवनावांचूनि तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥
न संपडे जालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥
मातेचा वियोग जालिया हो बाळा । तो कळवळा जाणा देवा ॥

तुकारामाचे उपलब्ध अभंग सुमारें ४६०० आहेत.

शके १५७१ त फाल्गुन वद्य २, रोज सोमवार, ते दिवशीं सकाळीं देहू एथेंच तुकारामाचा काळ झाला. त्या दिवशीं देहूस दरसाल मोठा उत्सव होतो. तुकारामासारखा निस्पृह, नीतिमान् व उपदेश करण्यास उत्सुक असा भगवद्भक्त विरळाच निपजतो.

---

२३. हलकटपणा व दगलबाजी.

अली हसन नामें एक मोठा श्रीमान् व्यापारी मुंबईस राहात होता. तो फार दयाळू व धार्मिक असे. त्याच्याकडे एके दिवशीं एक म्होतारा मनुष्य एका मुलास घेऊन आला व म्हणाला, "शेटसाहेब, हा माझ्या शेजाऱ्याचा मुलगा, अमीर, आईबाप मेल्यामुळे पोरका झाला आहे. ह्याला लिहितां वाचतां येतें. आपण ह्यास पदरीं ठेवून कांहीं काम सांगून शाहाणा कराल, तर ह्या गरिबावर मोठे उपकार होतील."

शेटजीस दया येऊन त्यानें त्या मुलास ठेवून घेतलें.

अलीसाहेबांनीं अमिरास आपल्या दुकानांत ठेवून मालाच्या खरेदीविक्रीचें, हिशेब ठेवण्याचें वगैरे सर्व काम शिकविलें, व फुरसतीच्या वेळीं त्याजकडून आणखी अभ्यासही करविला. कांहीं वर्षांनीं अमीर व्यापाराच्या कामांत वाकब होऊन त्याला पांचचार भाषाही चांगल्या येऊं लागल्या. अशी त्याची हुशारी पाहून अलीसाहेबांचा त्याजवर पोटच्या मुलापेक्षांही जास्त लोभ जडला. तो सुमारें बावीस वर्षांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला तेव्हां त्याचें लग्न करून देऊन अलीसाहेबांनीं त्यास वेगळें बिऱ्हाड करून दिलें, आणि त्यास दरमहा शंभर रुपये पगार ठरवून आपल्या खजिन्यावर नेमिलें. अमीर निराळा राहूं लागल्यावर त्याचें वर्तन लौकरच पालटलें. त्यास द्रव्याचा लोभ सुटून वाईट बुद्धि उत्पन्न झाली. तो मालकाच्या तिजोरींतील पैशाचा अपहार करूं लागला. पहिल्यानें जमाखर्चांत कांहीं लबाडी करून तो पैसे काढी. पण पुढें तेवढ्यानेंच त्याची तृप्ति होईनाशी झाली. तेव्हां त्यानें एक नवीनच युक्ति काढिली. त्याची एका कसबी सोनाराशीं दोस्ती झाली होती. तो सोनार खोटीं नाणीं करण्यांत फार वाकब होता. अमिरानें त्याजकडून खोटे रुपये करवून व ते धन्याच्या देवघेवींत चालवून त्यांच्याऐवजीं तिजोरींतील खरे रुपये काढून घेण्याची सुरवात केली.

अलीसाहेब मधून मधून अवचित केव्हांतरी खजिना तपाशीत असत. तशा प्रकारें एके दिवशीं खजिना तपाशीत असतां, एक हजार रुपयांची तूट पडली. पण अमिरावर भरवसा असल्यामुळें अलीसाहेबांनीं जमाखर्च पुन्हा तपासण्यास सांगितलें व तीन दिवसांनीं पुन्हा खजिना मोजण्याचें ठरविलें. अमिरानें ताबडतोब आपल्या स्नेह्याकडून बनावट रुपये करून आणिले व शिल्लक बरोबर करून ठेविली. पण अमिराच्या दुर्दैवानें अलीसाहेबांनीं एक थैली उचलून खर्चाकरितां म्हणून नेली, तींतच पुष्कळ खोटे रुपये होते.

त्यांतून कांहीं रुपये बाजारांत अलीसाहेब देऊं लागले असतां ते खोटे आहेत असें त्यांस कळून आलें. तेव्हां त्यांनीं अमिरास, "तुला हें कोणीं केलें असें वाटतें?" म्हणून विचारिलें. त्यानें थोडी आठवण केल्यासारखें करून म्हटलें, "हो! ती पिशवी ना? परवां परळच्या दुकानांतून आपले चिरंजीव, गफूरसाहेब, ह्यांजकडून आली. त्यांची म्हणून मीं तपासली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं." गफूर हा थोडा व्यसनी आहे हें माहीत असल्यामुळें व अमिरावर पूर्ण विश्वास असल्यामुळें अलीसाहेबांनीं मुलासच दूषण लाविलें.

परंतु पापाचा घडा केव्हांतरी भरतोच ! लवकरच तो सोनार खोटें नाणें पाडण्याच्या गुन्ह्यांत सांपडला असतां त्यानें अमिरासही आपण अमुक अमुक वेळीं खोटे रुपये करून दिल्याचें सांगितलें. त्यावरून अमिराचा अपराध उघडकीस आला, व दगलबाजी करून खालुद्या घरचे वासे मोजल्याच्या अधमपणाबद्दल त्यास योग्य शासन मिळालें.

उपकारी, थोर मनाचे व दयाळू असे शेट अली हसन कोणीकडे, आणि हलक्या मनाचा, दगलबाज व कृतघ्न असा अमीर कोणीकडे !

---

२४. जीवित-महिमा.

१.

'असारें जीवित ! केवळ मायाँ !' रडगाणें हें गाउं नका ॥
घेई झोंपा तो नर मेला, संशय त्याचा धरूं नका ॥ ध्रु० ॥
वस्तुस्थिति ही असार भासे, परि अंतरिं बहु सार असे ॥
जाणुनियां हें निजकर्तव्यें मन लावुनियां करा कसे ॥
मेलों म्हणजे मिळविलि, झालें सार्थक, न धरा मनीं असें ॥
'माती अससी मातींत मिळसी' आत्म्याला हें लागु नसे ॥
सुखदुःखाचे भोग भोगणें हा मुळिं जीवितँ-हेतु नसे ॥
उद्यां आजच्यापेक्षां कांहीं पुढेंचि जाऊं करा असें ॥
अपार विद्या काळ अल्प हा झरझर कैसा धावतसे ॥
शूर छातिचे किती असांना, हळुहळु मृत्यू गांठितसे ॥
अफाट ऐशा विश्वरणांगणिं जीवितँ-युद्धचि चालतसे ॥
त्यांत लढोनी बहु धीरानें नांव गाजवा शूर असें ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(चाल) मुकी बिचारीं कुणी हका ।
अशीं मेंढरें बनूं नका ।
गेल्या गोष्टी स्मरूं नका ।
गत काळाचा शोक फुका ।
पुढचा भासो कितिहि सुखाचा काळ, भरवसा धरूं नका ॥
असार जीवित केवळ० ॥

२.

जाते घडि ही अपुली साधा, करा काय तें अतां करा ॥
चित्तामध्यें धैर्य धरा रे, हरिवरी ठेवा भाव पुरा ॥
थोर महात्मे होऊनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा ॥
आपण त्यांच्यासमान व्हावें हाच सांपडे बोध खरा ॥
जग हें त्यजितां भवसागरिंच्या वाळवंटिवर तरी जरा ॥
चार पाउलें उमटवुं अपुलीं, ठेवुं खुणेचा मार्ग बरा ॥
जीवित-सागर दुस्तर मोठा त्यांतुनि जाण्या पैल तिरा ॥
खटपट करितो, गोते खातो, निराश होउनि जाय पुरा ॥
अशा नरांच्या दृष्टिस पडतां तींच पाउलें जराजरा ॥
कोणिं म्हणावें नाहीं म्हणुनी ? येइल त्याला धीर बरा ॥
(चाल) उठा उठा, तर, निजूं नका ।
'होइल कैसें' म्हणूं नका ।
कशाहि विघ्नां भिऊं नका ।
दीर्घोद्योग सोडुं नका ।
'धीर धरी तो गंभीर' असें शिका शिका रे विसरूं नका ॥
असार जीवित केवळ० ॥

हरी ना० आपटे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९. खोड्यांत पडल्यानें क्लेश ते कसले ?

फार वर्षांमागें काजी बहिलोलखान म्हणून दिल्लीस सर-न्यायाधीश होते. ते एकदां मिरझा जीरक नांवाच्या आपल्या मित्राच्या गांवीं गेले असतां एक खोडा त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां ते म्हणाले, "काय हो ? खोड्यांत घातलेल्या मनुष्याला खरोखरी क्लेश होतात काय ? मला वाटतें जाणारायेणारांनीं हसावें, चेष्टा कराव्या, उणें बोलावें व तें सर्व त्यास निमूटपणें ऐकून घ्यावें लागावें, हीच शिक्षा घडत असली पाहिजे. खोड्याची शिक्षा शरिरास न होतां मनासच विशेष होते, असा माझा तर्क आहे. खोड्यांत घातल्यानें शरिराला क्लेश ते कसले होणार ?"

मिरझा जीरक म्हणाले, "आपण म्हणतां तसें असेल ; पण थोडावेळ त्या खोड्यांत हातपाय अडकवून अनुभव घेतला तर कसें बरें होईल ?"

काजीसाहेब म्हणाले, "हो, हो, मी पाहातों तो अनुभव प्रत्यक्ष घेऊन !" तेव्हां त्यांस खोड्यांत अडकवून व लवकरच येतों असें सांगून मिरझासाहेब गेले. पण ते स्वभावानें फार विसराळू असल्यामुळें लवकर परत येण्याचें त्यांस स्मरणच राहिलें नाहीं !

इकडे काजीसाहेबांस खोड्यानें काय काय यातना होतात त्या हळू हळू एकामागून एक समजून येऊं लागल्या. पायांस तीव्र वेदना होऊं लागल्या, पावलें ठणकूं लागलीं, बोटांतील शिरा चमकूं लागल्या, पोटऱ्यांत व मांड्यांत विलक्षण कळा मारण्यास सुरवात झाली, शरिराचा जो भाग त्या थंडगार जमिनीवर टेकला होता, त्या भागीं मुंग्या येऊन वांब उठूं लागले, व सर्व आंगभर सुया टोचल्यासारखें होऊं लागलें. नंतर लवकरच त्यांस घेरी आली, ताप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरला, मूर्च्छा वरचेवर येऊं लागली व तृषा फार वाढली. असे अनेक प्रकारचे क्लेश त्यांस होऊं लागले.

तेव्हां रस्त्यानें जाणाऱ्यायेणाऱ्या माणसांची काजीसाहेब विनवणी करूं लागले. एक कुणबी जात होता त्यास त्यांनीं हाक मारून, "माझा एवढा खोडा काढ व मला मोकळा कर," म्हणून सांगितलें. तेव्हां तो मोठ्यानें हसला व पुढें चालता झाला. मागून एक मौलवी आला. त्यास हाक मारून ते म्हणाले, "अहो! इकडे या, मला सोडवा. मी गुन्हेगार नाहीं; काजी बहिलोल आहें, व एथें मिरझा जीरक ह्यांचा पाहुणा म्हणून आलों आहें." मौलवीनें उत्तरच दिलें नाहीं; पण हा कोणी दारूबाज शिक्षा भोगीत आहे असें वाटून तो आपणाशीं म्हणाला, "हां! समजलों! स्वारी तयार आहे! म्हणून तारेंत बडबड चालली आहे! प्रत्यक्ष खोड्यांत पडला असतांही आपण सर-न्यायाधीश आहों असें ह्या झिंग्यास वाटतें!!" मागून एक माळीण ओझ्याच्या घोड्यावर बसून ढकलत ढकलत जात होती. ती पाहाते, तों बिचारा व्यसनांत पडलेला काजी, "बाबांनो, बायांनो, अरे, मला कोणी थोडें पाणी पाजा रे! अरे, तहानेनें मरतों आहें रे!" असा मोठ्यानें आक्रोश करीत आहे. तेव्हां हा कोणी तरी हतभागी, दुर्व्यसनी, खराब चालीचा मनुष्य आपल्या कर्माचें फळ भोगीत आहे असें समजून तिला काजीची दया आली, व तिनें त्याजकडे दोन चांगलीं रसाळ नारिंगें फेकून दिलीं. ती मनांत म्हणाली, "देवा, ह्या यातनांनीं तरी ह्यास अद्दल घडून हा सन्मार्गास लागो!" असें बोलून तिनें आपलें घोडें पुढें हाकिलें.

न्यायासनावर बसून, "दोन तास खोड्यांत ठेवा, दिवसांतून तीन वेळ खोडा द्या," अशा शिक्षा सांगतांना त्यांत शरीरक्लेश नाहींत, असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनांत वागविणारे ते काजीसाहेब ह्याप्रमाणें खोड्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत भले आठ दहा तास पडले होते ! नंतर विसराळू मिरझा साहेबांस स्मरण झालें, तेव्हां घाईघाईनें येऊन त्यांनीं काजीसाहेबांस सोडविलें. पण काजीसाहेबांस उभें राहातां येईना कीं बसतां येईना, ह्याकरितां त्यांस डोलींत घालून घरीं न्यावें लागलें! म्हणून म्हणतात कीं, "मेल्याविना स्वर्ग दिसत नाहीं व भोगल्याविना दुःख समजत नाहीं."

---

२६. अश्वहरण.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(स्थळः—वाल्मीकीचें आश्रमवन. लव आणि ऋषिकुमार प्रवेश करितात.)

ऋषिकुमार—(घाईघाईनें) अरे कुमारा, लवा, घोडा घोडा म्हणून म्हणतात तो,—तो आज आम्ही आंतां प्रत्यक्ष पाहिला!

लव—घोडा घोडा हा शब्द कोशामध्यें पशुवर्गांत आणि युद्ध-प्रकरणांत आढळतो. बरें तो कसा कसा आहे रे?

ऋषिकुमार—कसा आहे तें सांगूं?

(शार्दूल०) मागें पुच्छ विशाल त्यास असुनी, तें सारखें हालतें,
आहे मान सकेश लांब, खुरही चारी पदीं चार ते,

पण तें सांगावें किती बुवा? चल, धाव. आपण जाऊनच पाहूं.

(लवाच्या आंगावरचें कृष्णाजिन व त्याचे हात धरून त्यास नेतात.)

ऋषिकुमार—(श्यामकर्ण वारू फिरत आहे त्याकडे बोटें दाखवून) कुमारा, तो पाहा कसा छान दिसतो तो!

लव—पाहिला, आणि समजलोंही. अरे, हा अश्वमेधाचा घोडा!

ऋषिकुमार—तें रे तुला कसें समजलें?

लव—अरे मूर्खानो, तुम्ही त्या कांडामध्यें नाहीं का शिकलां? तुम्हांला दिसत नाहीं? त्याला सांभाळण्याकरितां कवचें घातलेले, भाले धरलेले आणि भाते बांधलेले शंभर शंभर वीर आहेत ते? मी म्हणतों हें खरें वाटत नसेल, तर जाऊन त्यांस विचारा.

ऋषिकुमार—अहो योधहो, हा घोडा असा मोकळा कां सोडिला आहे? आणि तुम्ही त्याच्याभोंवतीं कां?

लव—(ईर्ष्येनें—आपणाशींच) हां! अश्वमेध म्हणजे सर्व पृथ्वी जिंकणाऱ्या कोणी क्षत्रियानें बाकीच्या क्षत्रियांस जिंकिल्याचें चिन्ह होय.

(पडद्यांत) हा घोडा, वा पताका ही, शौर्याची साक्ष देतसे;
रावणारी असा वीर सातीं लोकीं दुजा नसे!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लव—(त्रासून) हे शब्द किती चीड आणणारे आहेत! काय हो! तर मग पृथ्वीतील सगळेच क्षत्रिय मेले काय, म्हणून असा हा घोष करतां?

(पडद्यांत) अरे ए! आमच्या महाराजांच्या पुढें इतर क्षत्रियांचा काय पाड?

लव—अरे जा रे क्षुद्रांनो!

(गीति) असती सत्यचि क्षत्रिय, दाखवितां धाक काय हो मजला?
अथवा वाद कशाला? हरितों तुमच्या पहा पताकेला?
अरे ऋषिकुमारांनो, घाला ह्या घोड्याला गराडा, आणि त्याला ढेकळांनीं मारीत मारीत आपल्या आश्रमाकडे घेऊन जा! रोहित मृगांमध्यें चरूं द्या त्या भिकारड्याला!

एक पुरुष—(पुढें येऊन गर्वानें व क्रोधानें) अरे, हे अडदांड, बळकट, हत्यारबंद शिपायी मुलांची म्हणून ही अशी गर्वोक्ति सहन करणार नाहींत हो! राजपुत्र चंद्रकेतु तर शत्रूंचा काळ आहे! तर जोंवर ह्या नवीन अरण्यांची शोभा पाहाण्याच्या इच्छेनें तो इकडे आला नाहीं, तोंच तुम्ही पळून त्या दाट झाडींत दडून राहा कसे!

ऋषिकुमार—कुमारा लवा, पुरे बाबा हा घोडा! आपलीं लखलखीत शस्त्रें दाखवून हे शिपायी पाहा कसे दरडावीत आहेत! एथून आश्रमही फार लांब आहे. तर चल, हरणासारखे उड्या टाकीत पळून जाऊं आपले!

लव—(हसून) कांय म्हणतां? लखलखीत शस्त्रांनीं दरडावतात? (आपलें धनुष्य सज्ज करावयास लागून)—

(शार्दूल०) दोरी जींभचि, तीक्ष्ण कोटि नमिले ज्याचे तिनें प्रांत हे ॥
गंभीरा करितेंही घर्घर-नदा भीतिप्रदा चाप हें ॥
मृत्यूचें मुख शोभतें उघडलें ग्रासा त्वरें घ्यावया ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें खलाशांस पाहावयास सांगितलें, व तो जमिनीवर पेटविलेला जाळ असावा असें ठरलें. मग सर्वांस जो आनंद झाला तो काय वर्णावा?

दिवस उजाडण्यापूर्वीच गलबतें जमिनीजवळ जाऊन पोहोंचलीं. चांगलें उजाडल्यावर कोलंबस जमिनीवर उतरला, आणि देवाचे उपकार मानून त्यानें स्पेनच्या राजाचें निशाण रोविलें व त्याच्या नांवाचा जयजयकार केला.

ही जमीन म्हणजे एक लहानसें बेट होतें. तेथले लोक रानटी होते. ते ह्या कपडे घातलेल्या व बंदुकी घेतलेल्या लोकांस भिऊन झाडींत शिरून दडून राहिले. पण हळू हळू कोलंबसानें त्यांस घंटा, काचेचे मणी वगैरे देणग्या देऊन त्यांशीं ओळख केली. त्यांच्या माहितीनें कोलंबस जवळ जवळच्या आणखी कांहीं बेटांत गेला. त्या बेटांतून कांहीं सोनें, नव्या नव्या वनस्पति व पक्षी बरोबर घेऊन तो स्पेन देशास परत आला. त्या वेळीं राजानें त्याचा बहुमान केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं नवीन बेटें हिंदुस्तानच्या नजीकचीं असावींत, अशा समजुतीनें कोलंबसानें त्यांस 'इंडीज' असें नांव दिलें. पण त्याची ती केवळ भ्रांति होती. हिंदुस्तान त्यास सांपडलें नाहींच; पण तिसऱ्या सफरीस ह्या बेटांपलीकडे त्यास एक विस्तीर्ण खंड सांपडलें; तेंच अमेरिका खंड होय. कोलंबसानें शोधून काढिलें म्हणून त्यास काव्यग्रंथांत 'कोलंबिया' असेंही म्हणतात.

---

२८. राजा हरिश्चंद्र.

एकदां इंद्राच्या सभेंत नारदानें म्हटलें कीं, पृथ्वीतलावर अयोध्येच्या हरिश्चंद्रासारखा सर्वगुणसंपन्न आणि सत्त्वशील असा दुसरा राजा नाहीं. तेव्हां हरिश्चंद्राचा गुरु वशिष्ठ तेथें होता, त्यानेंही त्याच्या सत्त्वशीलतेची वाखाणणी केली. ती वशिष्ठाचा प्रतिस्पर्धी जो विश्वामित्र, त्यास सहन न होऊन, त्यानें हरिश्चंद्राचें सत्त्व हरण करण्याची प्रतिज्ञा केली.

मग त्यानें प्रथम हरिश्चंद्रास एक स्वप्न पाडिलें. स्वप्नांत एका ब्राह्मणाला आपण आपल्या सर्व राज्याचें व संपत्तीचें दान केलें, असें हरिश्चंद्रानें पाहिलें. दुसरे दिवशीं, तें स्वप्न तो आपली स्त्री तारामती व पुत्र रोहिदास ह्यांसमक्ष सर्वांस सांगत असतां, स्वप्नांतील ब्राह्मण तेथें आला, आणि केलेल्या दानावर दक्षिणा म्हणून औटभार सुवर्ण मागूं लागला. हरिश्चंद्र दक्षिणा देऊं लागला, तेव्हां ब्राह्मण म्हणाला, "सर्व राज्याचें दान मला केलें असल्यामुळें कोशांतील व नगरांतील द्रव्य माझें झालें; तें माझेंच मला काय देतोस? आपणास विकून माझी दक्षिणा मला दे. नाहींतर दान पुरें करवत नाहीं असें म्हण, म्हणजे मी आपला जातों." तें ऐकून हरिश्चंद्रानें राज्याच्या बाहेर काशींत जाऊन आपणास विकून दक्षिणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्याचें कबूल केलें, व मुलगा व बायको ह्यांस बरोबर घेऊन त्या ब्राह्मणा-बरोबर तो काशीस जाण्यास निघाला. हा ब्राह्मण विश्वामित्रच होता.

वाटेंत विश्वामित्रानें हरिश्चंद्रास अधर्म आचरण्याचा मोह पाडून त्याचें सत्त्व हरण करण्याचा पुष्कळ यत्न केला, पण तो व्यर्थ गेला. काशीस पोहोंचल्यावर तेथें कालकौशिक ऋषीनें एकभार सोनें देऊन राणीस, व अर्धभार सोनें देऊन मुलास, विकत घेतलें ; आणि डोंबानें दोनभार सोनें देऊन राजास खरीद केलें. ह्याप्रमाणें राजानें औटभार सोनें मिळवून ब्राह्मणाची दक्षिणा पुरी केली. तरी विश्वामित्र त्याचा आणखी छळ करण्यासाठीं गुप्तपणें तेथेंच राहिला.

डोंबाच्या घरीं राजा पाणी भरीत असतां रांजणाच्या तळीं भोक पाडून, आंतील पाणी विश्वामित्रानें नाहींसें करून डोंबाकडून त्यास मार देवविला, व इतर कारणांनींही डोंबाच्या बायकोस तो नकोसा होईल असें केलें. तसेंच, राजानें स्नान करून शिधा शिजवून तयार केला, म्हणजे ऋषि अतिथीच्या रूपानें येऊन तें अन्न त्याजपासून घेई, व त्यामुळें राजास उपास पडे. ह्याप्रमाणें उपास काढून राजा एक वर्ष डोंबाच्या घरीं चाकरी करीत होता !

इकडे रोहिदास एके दिवशीं कालकौशिकासाठीं कमळें आणावयास गेला असतां त्यास सर्पदंश होऊन तो मरण पावला. तेव्हां त्या प्रेतास तेथें मांडीवर घेऊन बिचारी राणी रडत बसली असतां, विश्वामित्र तिला म्हणाला, " रडत बसूं नको. अंधार आहे तोंच ह्यास जाळून टाक, नाहीं तर डोंब पैसे मागेल. " असें सांगून, काटक्या गोळा करून त्यानें चिता पेटविली. तो उजेड पाहातांच डोंबाचा इमानी रखवालदार हरिश्चंद्र धावत आला, व राणीस लाथ मारून आणि चिता विझवून, " कर दिल्यावांचून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाळणारी तूं कोण?" असें विचारूं लागला. "मी तारामती दुर्दैवानें दास्य पावून मेलेल्या पुत्राची व्यवस्था करण्यास आलें आहें; मला माफ



करा," असें ती विनवूं लागली. तेव्हां ओळख पटून आपल्या मुलाचें प्रेत जाळण्याची परवानगी मागण्यास हरिश्चंद्र डोंबाकडे गेला !

इतक्यांत ऋषीनें, एथें भिशील, असें राणीस सांगून तिला देवळांत नेऊन बसविलें. तेथें निराळेंच रूप घेऊन, तें प्रेत फाडून, विश्वामित्रानें तिच्या तोंडास, आंगास व हातांस रक्त फासलें; आणि गांवांत पुकारा केला कीं, बाहेरील देवळांत कोणी लांब पोरें खात बसली आहे ! तें ऐकून लोक धावून आले, व राणीची स्थिति पाहून, ती खरीच लांब आहे असें वाटून, त्यांनीं तिला बांधून ओढीत राजाकडे नेलें. राजानें तिचें डोकें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उडविण्याकरितां तिला डोंबाकडे न्यावयाचा हुकूम दिला. डोंबानें तिला मारण्याकरितां हरिश्चंद्राच्या स्वाधीन केलें !

हरिश्चंद्रानें धन्याची आज्ञा म्हणून शस्त्र उचलिलें, पण तो घाव घालणार, इतक्यांत विश्वामित्रानें त्याचा हात वरच्यावर धरिला आणि म्हटलें, " राजा, तूं आपलें वचन उत्तम प्रकारें पाळिलेंस; तुमची सर्वांची सत्त्वशीलता पाहून मी प्रसन्न झालों. हा तुमचा मुलगा आला ! त्याच्या-सह तुम्ही खुशाल राज्य करा. तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील." असा वर देऊन विश्वामित्र गुप्त झाला.

२९. गोकाकचा धबधबा.



गोकाक हा बेळगांव जिल्ह्याच्या सरासरी मध्यभागीं अजमासें दहा-हजार वस्तीचा तालुक्याचा गांव आहे. त्याच्या पश्चिमेस साडेतीन मैलांवर घटप्रभा नदीचें पाणी १८० फूट उंचीच्या कड्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डोंगराच्या एका खडबडीत पण सुंदर अशा खोऱ्यांत झपाट्यानें एकदम उडी घेतें. त्यामुळें तेथें धबधबा झाला आहे. त्याच्यावरच्या बाजूस नदीचा प्रवाह फुटून त्याचे ओघ खडकांच्या निरनिराळ्या घळींतून वाहात येऊन कड्याच्यापुढल्या भागावर एकत्र होतात. तेथें नदीचें पात्र सुमारें २०० यार्ड रुंद असून खालीं पडण्याच्या जागीं फक्त ८० यार्डच तें रुंद राहातें. ज्यावरून पाणी कोसळतें तो कडा साधारण गोमुखासारखा आहे. म्हणूनच ह्या धबधब्यास गोकाक (गो=गाय, कक्कू=पाण्याचा धोधाटा) असें नांव पडलें असावें. एथें पाण्याचा वेग सेकंदास दहा फूट असतो. पावसाळ्यांत पाणी गढूळ असल्यामुळें धबधब्याची खरी मौज त्यावेळीं दृष्टीस पडत नाहीं. आक्टोबरपासून डिसेंबरपर्यंत त्याची शोभा फारच खुलते. जुलै महिन्यांत ह्या धबधब्यांतून जितकें पाणी पडतें, तितकें इतर कोणत्याही धबधब्यांतून बहुधा पडत नसेल, असें म्हणतात.

खालीं पडतांना पाण्याचे निरनिराळे प्रवाह होतात. त्यांपैकीं एक प्रवाह मात्र एकदम खालच्या डोहांत कोसळतो. बाकीचे, पडल्यावर, एकत्र जमत जमत, एकाखालीं एक असणाऱ्या डोंगराच्या खडपांवरून आदळत जातात. पाणी पुष्कळ उंचीवरून पडून आपटत आपटत जातें, त्यामुळें एवढी मोठी गर्जना होते कीं ती पांच मैलपर्यंत ऐकूं जाते. तुषारांचे धोत एकसारखे शेंकडों फूट वर उडत असतात, व धबधब्याच्या कड्याच्यावरही पुष्कळ उंच जाऊन पावसाप्रमाणें वर्षत राहातात. त्यावेळीं त्यांच्या फार शोभिवंत अशा कमानी होतात. ह्या कमानींस सूर्यकिरणांनीं विशेष शोभा येते. त्यांचे रंग, तेज व आकार सकाळपासून संध्याकाळपर्यंत बदलत असतात, त्यामुळें तर अतिशयच मौज दिसते. पाणी स्वच्छ असलें म्हणजे उडी घेणारे प्रवाह व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुषारांचे धोत हे बर्फाप्रमाणें चमकतात, व त्यांजकडे पाहिलें तर डोळे दिपून जातात.

धबधब्याचें पाणी जेथें जेथें आदळतें तेथें तेथें लहान मोठे खळगे करीत जातें, व शेवटीं एका ठिकाणीं एका मोठ्या थोरल्या खळग्यांत आपटतें. तेथें एक मोठा डोहच बनला आहे. ह्या डोहाचा व्यास कधीं कधीं ६०० फूटपर्यंत वाढतो, व त्याची खोली नेहमीं ४५ फूट व पुराच्या वेळीं ६५ फूट असते. त्यांतील पाण्यावर पाचेप्रमाणें हिरव्या रंगाची झाक मारते; व जेथें धोधाटा सरळ पडतो, तेथें हिरव्या रंगाचीं झाडेंच डोहांतून वर उठलीं आहेत असें भासतें !

धबधब्याच्यावर, नदीच्या दक्षिण तीरीं, श्रीमहालिंगेश्वराचें मोठें देऊळ आहे. तेथपासून सुमारें ४०० कदमांवर, खडकाला एक मोठी भेग पडलेली आहे, ती लागते. तींत एकदम पांचसहा फूट खालीं उतरल्यावर एका विवरांतून रांगत जावें लागतें. मग दोहों बाजूंनीं उंच उंच कड्यांमधून जाणारी, आणि वर वेळूंच्या व करंजांच्या हिरव्यागार पालवीचें आच्छादन असलेली, अशी एक अरुंद वाट थेट धबधब्याच्या कड्याच्या पायथ्याजवळ जाऊन पोहोंचते. ह्या ठिकाणाहून धबधब्याचा देखावा फारच मनोवेधक दिसतो. संध्याकाळीं धबधब्याच्या बाजूस उभें राहून पाहिलें असतां सृष्टिसौंदर्याचें मोठें भव्य आणि रमणीय चित्र डोळ्यांपुढें उभें ठाकतें, व पाहाणारा कोणीही असो, त्याच्या मनांत सृष्टिकर्त्या परमेश्वराविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहात नाहीं.

अलीकडे सदर्न मराठा रेलवेच्या धूपदाल स्टेशनापासून हा धबधबा पाहाण्याची उत्तम सोय झाली आहे. त्या स्टेशनापासून श्रीमहालिंगेश्वराच्या देवळापर्यंत तीन मैल चांगली सडक बांधिली आहे. देवळाजवळच धबधब्याच्या जलौघास वळण देऊन त्याच्या प्रचंड शक्तीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक मोठी सूत काढण्याची गिरणी चालू केली आहे. गोकाकाकडून गिरणीकडे जाण्यासाठीं नदीच्या पात्रावर तारांचा झुलता पूल बांधिला आहे, तोही पाहाण्यासारखा आहे.

---

३०. कर्ण व शल्य यांचें संभाषण.

गीति.

"या दृढ मदभिप्राया-पासुनि वारूं शके न शक्र मला
मर्त्याची काय कथा ? प्राकृतसा काय कर्ण हा गमला ?" ॥ १ ॥
शल्य म्हणे, " राधेया, जेव्हां तुझिया स्मरोनि कर्मांतें ;
अर्जुन तीव्र शरांनीं समरीं भेदील सर्व मर्मांतें, ॥ २ ॥
तेव्हां पश्चात्तापा, बापा, तूं पावशील पापानें ;
सापानें धरिला प्लव न जगे ; बडबडसि तूं जसा पोनें. ॥ ३ ॥
तूं विजयासि वधाया वांच्छिसि हें कोण जाणता साहे ?
अंबांकस्थित शिशु शशि-मंडळ कवळावया जसा पाहे. ॥ ४ ॥
श्वान स्व-पोषकाच्या सदनाच्या आश्रयें उभा राहे,
जिकडे वनांत गर्जे शार्दूल तया दिशेकडे पाहे, ॥ ५ ॥
भुंके बळें यथेष्ट, व्यथित करी निकटवर्ति-जन-कर्णा ;
अर्जुन दृष्टि न पडला, तोंचि तसा भुंकतोसि तूं कर्णा ! ॥ ६ ॥
शश-मंडळांत कोल्हा म्हणतो, मी सिंह, वल्गना करितो ;
जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळ-कवळ-भक्षिता हरि तो." ॥ ७ ॥
कर्ण म्हणे, "रे भ्याडा, संगर-पांडित्य काय तुज ठावें ?
शल्या, कल्याण-गुणा पात्र जगीं पुण्य-संग्रहें व्हावें. ॥ ८ ॥
भ्यालासि मूढ-बुद्धे, बडबडसी फार, वानिसी अरिला ;
भाव तुझा मज कळला, धीर तुझा मृत्युच्या भयें हरिला. ॥ ९ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते मारितील मज, कीं त्यांला मारीन, मी स्वबळ जाणें.
कृष्णांला कर्ण न भी; तनु टाकुनि एकदां असे जाणें. ॥ १० ॥
दोघांची काय कथा ? जरि कृष्णार्जुन सहस्र येतील,
तरि माझे शर त्यांच्या प्राण-धनातें हिरोनि घेतील ! ॥ ११ ॥
तुज भेदिलें परांनीं स्पष्ट, म्हणुनि बोलसी असें खोटें ;
सर्वां पापांमध्यें हें मित्र-द्रोह-पाप मज मोठें. ॥ १२ ॥
मज युद्धाभिप्रायापासुनि मागें बळेंचि फिरवील,
ऐसें भूत नसेचि त्रिजगीं, जें ह्या यशास मिरवील. ॥ १३ ॥
भ्याडासि भेडसावीं, मी भ्याया उपजलों नसें कांहीं !
विक्रम-यश साधाया झालोंसें. चाल, पथ पुढें पाहीं." ॥ १४ ॥
शल्य म्हणे, "रे सूता ! बडबड करितोसि फार मद्यपंसा.
गुरु-सागर बहु गर्जे, परि मुनिचा एकही भरे न पसा !" ॥ १५ ॥

मोरोपंत—कर्णपर्व.

---

३१. कांचनमृग.

सीता आणि लक्ष्मण ह्यांसह रामचंद्र पंचवटीस राहात असतां एकदां एक सुंदर मृग सीतेच्या दृष्टीस पडला. त्या मृगाची कातडी सुवर्णमय दिसत होती व तिजवर रुप्याच्या वर्णाचे ठिपके होते. मान किंचित् लांब व उभी असून कानांचा रंग इंद्रनील मण्यासारखा होता, आणि त्याच मण्याची कांति पोटाखालींही चमकत होती. तोंडावर काळे पांढरे पट्टे असून नाकपुड्या व ओठ ह्यांवर रक्तवर्ण शोभत होता. तसेच पायांचे खूर केवळ वैदूर्याचे बनले असावे, असें वाटत होतें. शिंगें सुशोभित, वळलेलीं व नानारत्नांनीं खचित अशीं होतीं. शेपूट तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्यक्ष इंद्रधनुष्याप्रमाणें चित्रविचित्र रंगांनीं शोभायमान असून पाठीवर कमानदार वळलेलें होतें. त्या मृगाकडे सीतेचें लक्ष वेधलें. हा कोणी नवीनच अदृष्टपूर्व आणि अश्रुतपूर्व हरिणाचा प्रकार आहे, हा आपणाजवळ असावा, जिवंत नच मिळाला तर ह्याचें कातडें तरी सशृंग मिळवून संग्रहीं ठेवावें, असें तिच्या मनांत आलें. तो आपला



हेतु पूर्ण करण्याकरितां ती रामचंद्रास हाक मारून म्हणाली, " नाथ, मला हा मृग पाहिजे ; कसेंही करून त्यास धरून आणा. "

तें ऐकून लक्ष्मणानें त्या मृगाकडे नीट न्याहाळून पाहिलें व तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणाला, " रामचंद्रा, हा मायावी राक्षस असून कांहींतरी दुष्ट हेतूनें एथें आला आहे. ह्याच्या नादीं लागणें इष्ट नाहीं." त्यावर सीतेनें पुन्हा विनंती केली कीं, " हा मृग मला फारच आवडतो. मला हा अवश्य पाहिजे." तिचा आग्रह पाहून रामचंद्र म्हणाला, " लक्ष्मणा, मृग धरणें, व वेळ पडल्यास तो मारणें, हें आपणां क्षत्रियांचें कर्तव्य आहे. चांगलीशी शिकार दृष्टीस पडून ती आपण हातची सोडिली, तर स्वधर्मास चुकलों असें होईल. बरें, तुझ्या तर्काप्रमाणें हा राक्षस मृगरूपानें फिरत असेल, तर त्यास ठार मारणें हेंही आपलें कर्तव्यच आहे. त्यापासून जगाला होणारी पीडा नाहींशी करणें हें आपणांस अत्यंत उचित." अशी लक्ष्मणाची समजूत घालून त्यानें धनुष्य व बाणांचे दोन भाते घेतले व सीतेजवळ त्यास ठेवून तो त्या मृगामागें लागला. आपलें प्रिय करण्यास पति निघाल्यामुळें सीतेस आनंद झाला.

इकडे मृगानें क्षणांत दिसावें, क्षणांत दूर जावें, असें चाळवीत चाळवीत रामास फार दूर नेलें. शेवटीं त्रासून हा जिवंत हातीं लागत नाहीं तर त्यास मारावें, असा निश्चय करून रामानें एक देदीप्यमान बाण काढिला व तो त्या मृगावर सोडिला. तो बाण आपणावर सुटला, आतां आपला प्राण वांचत नाहीं, असें पाहून त्या मृगानें मनुष्यवाणीनें, " हा सीते, हा लक्ष्मणा, धाव!" असा रामाच्या सारखा स्वर काढून हाक मारिली. इतक्यांत बाणानें आपलें काम उरकलें. तो मृग खरोखरीचा हरिण नसून मारीच राक्षस होता, व सीतेचें हरण करण्यास संधि सांपडावी, म्हणून रावणानें त्यास त्या रूपानें रामलक्ष्मणांस दूर नेण्यासाठीं पाठविलें होतें.

'हा सीते! हा लक्ष्मणा!' ही आरोळी ऐकून सीता घाबरली, व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामास कांहींतरी अपाय झाला असें वाटून, ती लक्ष्मणास त्याच्या साह्यास जाण्यास सांगूं लागली. पण लक्ष्मण जाईना. "तुला एकटीला ठेवून जाणें उचित नाहीं," असें तो म्हणाला. तेव्हां तुला रामाची काळजी नाहीं, इत्यादि सीतेनें निष्ठुर भाषण केल्यामुळें तो ज्या दिशेनें तो शब्द आला होता त्या दिशेनें भावाच्या शोधार्थ निघून गेला. इतक्यांत रावण लपून राहिला होता, तो संन्याशाच्या रूपानें पुढें येऊन सीतेला उचलून घेऊन गेला. रामाची व लक्ष्मणाची गांठ पडून ते परत येतात, तों सीता पर्णकुटींत नाहीं ! तें पाहून दोघेही दुःखानें विव्हळ झाले व तिचा शोध करण्याकरितां हिंडूं लागले.

---

३२. एका कृपणाची गोष्ट.

एका शहरामध्यें अंबाराम म्हणून सावकार राहात असे. त्याच्या कुटुंबांत बायको, मुलगा व मुलगी इतकींच माणसें होतीं. त्याची एकंदर जिंदगी किती आहे, ह्याचा लोकांना कधींही अजमास लागला नाहीं. त्याची राहणी इतकी कंजुषपणाची होती कीं, साधारण मानानें दर माणसीं पांच रुपये खर्च लागत असला, तर त्याच्या घरीं सर्व कुटुंबाचा खर्च बारा रुपयांतच भागे.

अंबारामाचा नेहमींचा पोशाक म्हणजे एक अरुंद धोतर, एक बंडी, एक पागोटें व आंगावर घेण्यास एक जुनें धोतर, असा असे. तो कपडे परटाकडे कधीं देत नसे; कारण तो म्हणे, वरचेवर भट्टींत घातल्यानें वस्त्र फाटून जातें ! पागोटें त्यानें एकदां मुलाच्या मुंजींत बांधविलें होतें, त्यास दहा वर्षें झालीं होतीं, व तें पुन्हा मुलीच्या लग्नांतू, म्हणजे आणखी पांचसहा वर्षांनीं, बांधवावयाचा त्याचा बेत होता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकदां त्याच्या लहानपणच्या स्नेह्यांनीं पाठीस लागून त्याजकडून एक लोंकरीच्या कापडाची बंडी करविली. पण ती तो नेहमीं खुंटीवर ठेवीत असे, कितीही गारठा पडला तरी घालीत नसे. कोणीं त्यास विचारिलें तर तो म्हणे, "अहो, बंडी फाटेल म्हणून मी घालीत नाहीं असें का तुम्हांला वाटतें ? वा ! एक फाटली तर दुसरी करतां येईल ! पण मी पाहातों कीं, तुम्ही ज्या थंडीस इतके भितां, तिचा पराक्रम तरी किती आहे ! मनुष्याच्या आंगीं काटकपणा पाहिजे. तुमच्या सारखें पोशागी होऊन काय उपयोग ?"

त्याच्या मुलीला एकदां ताप आला. त्या वेळीं मुलानें शेजाऱ्यांच्या सांगण्यावरून वैद्यास आणिलें. त्यानें कांहीं काढा सांगून चूर्ण दिलें, व पावशेर दुधांत साळीच्या लाह्या टाकून ठेवून तें तिला प्यावयास देण्यास सांगितलें. घरीं आल्यावर अंबारामानें मुलास रागें भरून म्हटलें, "अरे ! हे दैवाचे भोग आहेत ! मूर्खासारखें त्या वैद्यास कशाला आणिलेंस ? लोकांना काय होतें ? पावशेर दूध म्हणजे चटकन अर्धा आणा गेला, समजलास ? त्या पोरीला त्या देवळांतून सांबाचें तीर्थ आणून दे, म्हणजे झालें ! अरे वेड्या, ईश्वरी सत्तेपुढें हे वैद्य काय करणार ?"

कोणी एकाद्या धर्मकृत्याकरितां वर्गणीची यादी घेऊन आले, तर तो म्हणे, "ह्या लोकांस ही उठाठेव कां ? आम्हांला धर्म करावयाचा तो आम्ही असा लोकांना दाखवून करीत नसतों." खरेंच ! त्यास धर्म करतांना कोणींच पाहिलें नव्हतें !

एके दिवशीं बाहेरून येत असतां त्यांस ठेच लागली, व तो तेथेंच घेरी येऊन पडला. अमळशानें सावध होऊन पाहातो, तों मंडळी जमून त्यास घोड्याच्या गाडींतून घरीं पोहोंचविण्याच्या विचारांत आहे. तें पाहून तो म्हणाला, "अहो ! हें काय ? गाडी कशाला ? गाडी फुकाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हे! पावली, निदान चवली तरी गाडीवाला खास घेणार! मी आपला हळू हळू जाईन." मग वाटेंत दोन तीन मुक्काम करून स्वारी घरीं पोहोंचली!

त्याच्या निजण्याच्या खोलींतील एक बहाल जुनें होऊन अगदीं किडून गेलें होतें. तें काढून नवें घालण्याविषयीं बायकोनें त्यास पुष्कळ वेळां आग्रहानें सांगितलें. पण पेटींतून पैसे काढून खर्चणें त्याच्या हातून व्हावें कसें? ह्यामुळें तें बहाल नीट करावयाचें तसेंच राहिलें. शेवटीं एका रात्रीं तें एकाएकीं मोडून पडलें व त्याबरोबर आणखी कांहीं पटईचीं लाकडें वगैरेही खालीं आलीं. तीं अंबाराम ह्याच्या आंगावर पडल्यामुळें त्यास बरीच दुखापत झाली. मुलानें वैद्य, डाक्टर वगैरे आणून पुष्कळ उपाय केले, पण उपयोग झाला नाहीं. त्याच दुखण्यांत अंबारामाचा अंत झाला. मात्र मुलानें इतके पैसे औषधोपचारांत खर्च केले, ह्याबद्दल मरते समयीं त्यास अत्यंत दुःख झालें!

गरीब बिचारा अंबाराम! त्याजवळ इतका पैसा असून काय उपयोग? त्यानें स्वतां त्याचा उपभोग घेतला नाहीं, बायकामुलांसही घेऊं दिला नाहीं किंवा त्याचा कोणत्याही सत्कृत्यांत व्यय केला नाहीं!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३३. डोळ्याची रचना.



१. पातळ मज्जापटल (रेटिना).
२. लेन्स.
३. भिंगासारखा पडदा (कार्निआ).
४. कनीनिका-पटल (ऐरिस).
५. काचरससदृश बिलबिलीत पदार्थ.
६. दर्शन–ज्ञानाचा मज्जारज्जु.

सर्व इंद्रियांत डोळा हें अत्यंत महत्त्वाचें इंद्रिय आहे; कारण, सृष्ट-पदार्थांचें बरेंच ज्ञान आपणांस चक्षुरिंद्रियानें होतें. कर्णेंद्रियाशिवाय इतर इंद्रियांपासून पदार्थांचें ज्ञान होण्यास त्यांचा त्या त्या इंद्रियांशीं निकट संबंध होणें अवश्य असतें. कर्णेंद्रियालातरी फार दूर आवाज झाला, तर त्याचें आकलन करवत नाहीं. पण चक्षुरिंद्रियाला कितीतरी दूरदूरचे पदार्थ दिसतात! कोट्यवधि कोसांवरील तारे आपणांस दिसतात. व्यवहारांत आपणांला डोळ्याची किती मदत होते? सृष्टींतील तऱ्हेतऱ्हेचे प्राणी, वनस्पति आणि मनोरम देखावे डोळ्यांनीं पाहून आपणांस किती आनंद होतो? अशा ह्या डोळ्याची रचना समजणें अवश्य आहे.

डोळा हें फार नाजूक इंद्रिय आहे, म्हणून तें हाडांच्या खोबणींत मांद्यांत बसविलेलें आहे. मान न हालवितां थोडेंसें वर, खालीं व बाजूंला आपणांस बघतां यावें, म्हणून डोळ्यांतील स्नायूंनीं बुबूळ फिरवितां येतें. घराला जसें छप्पर, तसें डोळ्याला भिंवई हें छप्परच आहे; म्हणून कपाळा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील घाम अगर पाणी डोळ्यांत जात नाहीं. पापण्या तर भिंवईपेक्षांही डोळ्याचें अधिक रक्षण करितात. झोपेच्या वेळीं अगर डोळ्याला दुखापत होईल असें वाटल्यास त्याला त्या झांकून ठेवितात. पापण्यांची उघडझांप सारखी चाललेली असते, म्हणून डोळ्यांत केर वगैरे कांहीं सहसा जात नाहीं. पापणीचे केस, डोळ्यावर केर आला कीं, तो तेव्हांच उडवून टाकितात; अगर त्या केसांत तो अडकून राहातो. डोळा चकचकीत व स्वच्छ राहावा, म्हणून आंखाकडील डोळ्याच्या कोपऱ्या-शेजारींच एक पिंड असतो, त्यांत रक्तापासून पाणी तयार होतें व त्या पाण्यानें डोळा स्वच्छ राहातो. ह्याप्रमाणें कामीं आलेलें पाणी खालच्या पापणीला नाकाकडल्या आंगाला एक बारीक भोक असतें त्या वाटे नाकांत जातें.

डोळा गोलाकार आहे. त्याचा व्यास सुमारें एक इंच असतो. डोळ्याच्या पुढल्या आंगाला अगदीं मधोमध एक वाटोळा बाह्यगोल भिंगासारखा पडदा असतो, त्यांतून प्रकाशाचे किरण आंत शिरतात. ह्या भिंगासारख्या पडद्याच्या आंतल्या आंगास दुसरा एक वाटोळा पडदा असतो; ह्या पडद्याचा रंग व्यक्तिपरत्वें काळा, घारा, भुरका, निळा, हिरवा असा निरनिराळा असतो, व ह्या रंगावरूनच अमक्याचे डोळे काळे, अमक्याचे घारे, वगैरे आपण म्हणतों. ह्या रंगीत पडद्याच्यामधोमध एक भोक असतें, त्याला बाहुली म्हणतात. भिंगासारख्या पडद्यांतून आलेला प्रकाश ह्या बाहुलींतून आंत जातो. रंगीत पडद्याची रचना अशी असते कीं, त्यांतील स्नायूंच्या आकुंचनप्रसरणांनें बाहुली लहानमोठी जरुरीप्रमाणें होते. आपण उजेडांत असलों म्हणजे बाहुली लहान असते. आपण अंधेरांत गेलों कीं आपणांस प्रथम कांहीं दिसत नाहीं, पण बाहुली मोठी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन प्रकाशाचे किरण डोळ्यांत जास्त गेल्यानें अमळशानें दिसूं लागतें. मेंदूपासून मज्जारज्जु येऊन ती डोळ्याच्या मागच्या आंगानें डोळ्यांत शिरून डोळ्याच्या आंतल्या आंगावर पसरलेली आहे. ह्या पातळ मज्जापटलावर पदार्थाचें प्रतिबिंब उमटून तें मज्जारज्जूच्याद्वारें मेंदूकडे जातें, व तेथें पदार्थ पाहिल्याचा बोध होतो.

भिंगासारख्या पडद्याच्या आंत व रंगीत पडद्याच्या दोन्ही आंगांस पाण्यासारखा पातळ पदार्थ असतो. ह्याच्या पलीकडल्या आंगास बाह्यगोल भिंगाप्रमाणें एक स्फटिकरूप घट्ट पदार्थ असतो. ह्याच्या व मज्जापटलाच्या मध्यें एक बिलबिलीत पदार्थ असतो. हे तिन्ही पारदर्शक असतात. त्यामुळें, व विशेषतः त्या स्फटिकरूप पदार्थामुळें, पदार्थापासून आलेल्या प्रकाशाचें वक्रीभवन होऊन मज्जापटलावर पदार्थाचें बिंब बरोबर उमटतें. शिवाय ह्या पदार्थामुळें डोळ्याचा गोलाकार कायम राहातो.

---

३४. विपन्नावस्थेस पावलेल्या चारुदत्ताचे उद्गार.

गीति—दारिद्र्य मरण यांतुनि मरण बरें, बा, दरिद्रता खोटी;
मरणांत दुःख थोडें, दारिद्र्यांत व्यथा असे मोठी. ॥ १ ॥

वंशस्थ—भोगूनि दुःखें सुख शोभतें जनीं,
घनांधकारांत दिवा जसा वनीं. ॥
सुखापुढें होय दरिद्रता नरा,
असोनि देहीं मृततुल्य तो खरा ! ॥ २ ॥

वसंततिo—माझें मलाच घर तापद फार झालें,
क्षीणार्थ जाणुनि जनीं गृह वर्ज्य केलें. ॥
गेला सुकोनि मद काल-वशेंचि ज्याचा,
जातात भृंग कटं सोडुनि त्या गजाचा. ॥ ३ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं खरें विभवनाशज दुःखें मातें ;
दैवानुसार मिळतें धन, आणि जातें. ॥
हें दुःख फार, मज नष्ट-धनास सारे
झालेच मित्रपण सोडुनि पाठमोरे ! ॥ ४ ॥

शार्दूलवि०—चिंतेचें घर हेंच वैर दुसरें लोकांत होतें सदा,
निंदा मित्र-जनांत, कारण निज-द्वेषास हें सर्वदा, ॥
जाया बुद्धि वनास देइ सहसा, जायाँ सदा लाजवी,
शोकाग्नी हृदयस्थ हा, परि तनू जाळी न, संतापवी ! ॥ ५ ॥

निर्द्रव्या पुरुषा न बंधुजनही संबोधिले मानिती,
त्याचे जे प्रिय-मित्र तेहि फिरती, आपत्तिही वाढती, ॥
जातें सत्त्व लयास, शीलविधुची कांति क्षया पावती,
जें केलें बहु पापकर्म इतरीं, तें त्याकडे लाविती ! ॥ ६ ॥
त्याची संगत कोणिही न करिती, त्या मान कोठें नसे,
जातां तो धनिच्या घरा सुवचनें त्याला न कोणी पुसे ; ॥
थोरांपासुनि दूर दूर फिरतो लाजून वस्त्राविणें—
वाटे निर्धनता महा नरक हा, हा धिक् तयाचें जिणें ! ॥ ७ ॥

परशुराम ब० गोडबोले—मृच्छकटिक.

---

३५. स्वावलंबनाविषयीं गोष्ट.

तळेगांव एथें कृष्णराव म्हणून एक सुखवस्तू गृहस्थ राहात असे. तो एकाएकीं निवर्तल्यामुळें संसाराचा सर्व भार त्याचे मुलगे रामराव व शामराव ह्यांजवर पडला. त्यांच्या मामानें येऊन त्यांच्या वांटण्या करून दिल्या, व तो आपल्या गांवीं गेला. प्रत्येकाच्या वांट्यास पंचवीस बिघे जमीन व पांच हजारांचे रोखे आले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामराव हा त्यावेळीं बावीस वर्षांचा होता. त्यानें वडिलांच्या सर्व स्नेह्यांकडे जाऊन आपणास मदत करण्याविषयीं विनंती केली. ती सर्वांनीं मान्य केली. मग शेताची व्यवस्था व पैशाचा वसूल हीं कामें त्या मंडळीच्या फुरसतीनें रामराव करून घेऊं लागला. अर्थात् तीं वेळच्या वेळीं होत नसत; कारण, ते लोक आपलीं कामें संभाळून फावल्यावेळीं त्यास मदत करीत. बरीचशी जमीन नदीकांठची असल्यामुळें बांधदुरुस्तीचीं वगैरे कामें करणें जरूर असे, पण तीं रामराव स्वतां करीत नसे; कोणाच्यातरी मदतीची वाट पाही. ह्यामुळें दुरुस्ती नीट न होऊन शेतांचें उत्पन्नही बरेंच कमी येऊं लागलें. व्याजाची मागणी करणें, जुने कागद नवे करून घेणें, हीं कामें तर त्यानें आपल्या एका स्नेह्याकडे सोंपविलीं. त्यामुळें कांहीं रोखे मुदतीबाहेर गेले, व पुष्कळ बाक्या थकल्या. पांच हजारांच्याऐवजीं एक दोन वर्षांत एक हजार रुपयेच कायते तरते राहिले. असें त्या रामरावाचें फार नुकसान झालें.

शामराव दोन वर्षांनीं लहान होता. तोही जरूर तेव्हां वडिलांच्या मित्रांकडे सल्ला विचारण्यास जाई; पण त्यांच्यावरच सर्व भिस्त ठेवीत नसे. मामा गेल्यावर त्यानें लागलेंच आपल्या सर्व शेतकऱ्यांस बोलावून सांगितलें कीं, तुमच्याकडे पूर्वीप्रमाणेंच जमिनी राहातील; मात्र तुमच्यापैकीं जो इमानानें जमिनीची मेहनत न करितां तिची खराबी होऊं देईल, त्याजकडून ती मी काढून घेईन. त्याचप्रमाणें सर्व रिणकोंस भेटून व पत्रें पाठवून त्यांजकडून त्यानें नवीन कागद करून घेतले; मागील व्याज वसूल केलें, व वसूल झालें नाहीं, तें कुळांची समजूत घालून व कांहीं सूटही देऊन रोख्यांत चढवून घेतलें. कोणी मला मदत करील तेव्हां मी कामें करीन, असें म्हणून तो कधीं बसला नाहीं. अडेल तेथें मित्रांस विचारी, पण ते येत तोंपावेतों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अडून राहात नसे. तो शेतांत वरचेवर जाई व कोठें कांहीं कमीजास्त करावयाचें असलें, तर शेतकऱ्यांस मदतीस घेऊन लागलेंच करून टाकी. रामरावाप्रमाणें, "बरें, आतां अमक्या अमक्याला घेऊन येतों, व मग करून देतों," असें म्हणत नसे. ह्या तऱ्हेनें काम करीत गेल्यामुळें शामराव सर्वांस प्रिय झाला. त्याची स्वतांची देखरेख असल्यामुळें शेतकऱ्यांस त्याचा धाक असे, व त्यांची हरएक अडचण तो ताबडतोब दूर करी, म्हणून उत्पन्न कमी झालें अशी सबब त्यांस कधींही सांगतां येत नसे. शेतांची सुधारणा होऊन शामरावाचें उत्पन्न सालोसाल वाढतच गेलें.

घरांत देखील टापटीप राखणें, सामान साफसूफ ठेवणें, ह्यांकडे शामराव स्वतां लक्ष ठेवी. त्यामुळें चाकरमाणसें कधीं आळस करीत नसत. रामरावाचें कोणतेंही काम दुसरें कोणी पुढें झाल्यावांचून होत नसे. त्यामुळें त्याच्या घराची वर्षांतून एक वेळही झाडझूड होण्याची मारामार पडे.

पांचसहा वर्षांनीं रामरावाचें भांडवल अगदीं संपलें, व शेतें गाहाण पडलीं. तेव्हां तो एके दिवशीं भावास म्हणाला, "शामराव, तुझा भरभराट पाहून मला आनंद होतो. पण माझें कां जुळत नाहीं कोण जाणे ! मी चांगल्या लोकांच्या सल्ल्यावांचून कांहीं करीत नाहीं." शामराव म्हणाला "दादा, त्याचें कारण एवढेंच कीं, माझा सर्व व्यवहार मी स्वतां पाहातों; तुमच्यासारखा दुसऱ्यावर विसंबत नाहीं. आपण मेल्याविना स्वर्ग दिसत नाहीं. आपलें काम आपणच केलें पाहिजे, दुसऱ्यावर तें सर्वस्वीं सोंपवून उपयोग नाहीं. आंगीं कांहीं तरी स्वावलंबन पाहिजे. म्हणतात ना ? ' आंगीं करील तें काम'."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६. वास्को-ड-गामा ह्याची हिंदुस्तानाची पहिली सफर.



वास्को-ड-गामा हा जामोरीन ह्याची भेट घेतो.

कोलंबसानें नवीन जमीन शोधून काढिल्यामुळें स्पेन देशाचा पुष्कळ फायदा झाला. तें पाहून पोर्तुगीज लोकही आफ्रिका खंडास वळसा घालून हिंदुस्तानास जाण्याला जलमार्ग शोधून काढण्याचा यत्न जारीनें करूं लागले. पोर्तुगालच्या राजानें वास्को-ड-गामा ह्या हुशार नावाड्याची त्या कामावर इ० स० १४९७ मध्यें नेमणूक केली; आणि तो ज्या ज्या नवीन देशांत जावयाचा होता, तेथील राजांस देण्याकरितां त्याजवळ पत्रें दिलीं. पत्रांत, गामा हा पोर्तुगालचा वकील म्हणून येत आहे, असें नमूद केलें होतें.

गामा जुलै महिन्यांत नेहमींच्या मार्गानेंच निघाला. तो आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यानें चालला असतां केप-आफ-गुडहोपजवळ एकसारखीं तुफानें होऊं लागलीं. त्यांतून पुष्कळ हाल सोसून मोठ्या संकटानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यार्ची गलबतें नोव्हेंबरच्या १६ व्या तारखेस टेबल-बे नांवाच्या उपसागरांत जाऊन पोहोंचलीं. तेथें विसांव्याकरितां तीन दिवस वरवा करून गामा ता० १९ रोजीं पुढें निघाला. पुन्हा त्याच्या मार्गांत पुष्कळ वादळें झालीं; व खलाशांनीं, आम्ही पुढें येत नाहीं, असें म्हणून बंड केलें. पण गामा पक्का निश्चयी व बाणेदार पुरुष असल्यामुळें त्यानें त्यांस जुमानिलें नाहीं. परत फिरणें त्यास मुळींच कबूल नव्हतें. तेव्हां त्यानें बंडवाल्यांच्या कांहीं पुढाऱ्यांस कडक शिक्षा करून तें बंड मोडिलें, व पुढें उत्तर दिशेनें किनाऱ्या किनाऱ्यानें जात जात कांहीं दिवसांनीं तो मिलिंदा बंदरीं गेला. त्या बाजूस जाण्याचें एक कारण असें होतें कीं, आफ्रिकेच्या पूर्वभागांत कोणी प्रेस्टर जान ह्या नांवाचा ख्रिस्ती राजा राज्य करीत आहे, असा त्यावेळीं युरोपांतील कित्येक राष्ट्रांचा समज होता. वास्तविक त्यावेळीं तेथें अरबी मुसलमानांचेंच राज्य होतें. असो. मिलिंदा बंदरांत गेल्यावर गामास सुदैवानें हिंदुस्तानांतील एक खलाशी वाटाड्या मिळाला. तो बहुधा कोणी कच्छी अथवा खारवी जातीचा तांडेल असावा. हा वाटाड्या बराच सुशिक्षीत होता व त्यास होकायंत्र व ज्योतिर्यंत्र ह्या दोहोंचा उपयोग चांगला कळत होता. त्याच्या मदतीनें गामा थेट पूर्वेकडे नाळ लावून सुरक्षितपणें हिंदुस्तानास पोहोंचला, व ता० २० माहे मे इ० स० १४९८ ह्या दिवशीं त्यानें कालिकोट बंदरीं आपलीं गलबतें नांगरिलीं.

गामानें कालिकोट एथील राजा, जामोरीन, ह्यास आपल्या राजाचीं पत्रें दिलीं, व हिंदुस्तानाशीं जलमार्गानें व्यापार सुरू करण्याचा आपला उद्देश आहे असेंही दर्शविलें. जामोरिनानें त्याचा चांगला सन्मान करून, त्याचें म्हणणें कबूल केलें. पण त्यावेळीं ह्या देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर मूर नांवाच्या मुसलमानी धर्माच्या लोकांचा व्यापार चांगला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालत असे ; त्यांनीं गामा व त्याचे लोक ह्यांची तेथें डाळ शिजूं देऊं नये असा घाट घातला, व त्यांत त्यांना ह्या वेळीं बरेंच यशही आलें.

कांहीं दिवस कालिकोट एथें राहिल्यावर आपण हिंदुस्तानाला जाण्याचा मार्ग शोधून काढण्याचें महत् कृत्य सिद्धीस नेलें व दुसऱ्या कांहीं स्थलांचाही शोध लाविला, तेव्हां आतां देशीं परत जावें, असें मनांत आणून गामा निघाला. त्याचे लोकही घरीं जाण्यास अत्यंत उत्सुक झाले होते. निघण्याच्या वेळीं मूर लोकांनीं त्याच्या टोळीचा नायनाट करून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु गामा हा त्यांच्या जहाजांशीं निकरानें लढून त्या बंदरांतून बाहेर पडला, व आल्या वाटेनें स्वदेशीं परत गेला. इ० स० १४९९ च्या सप्टेंबर महिन्यांत तो लिस्बन एथें जाऊन पोहोंचला. तेव्हां राजानें गामाचा मोठा सन्मान केला, व पुष्कळांस दुर्मिळ असें डाम हें पद आपल्या नांवामागें जोडण्याचा हक्क त्याला दिला. ह्यामुळें पोर्तुगाल देशच्या वरिष्ठ प्रतीच्या उमरावांत त्याची गणना होऊं लागली. शिवाय त्यास श्रम व खर्च पुष्कळ झाला होता, म्हणून त्यास मोठें बक्षीस देण्यांत आलें.

अशा प्रकारें पोर्तुगीज लोकांचा प्रवेश हिंदुस्तानांत झाला, व त्यांचा व्यापार वाढून ते लवकरच मोठ्या भरभराटीस आले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३७. वाफेचें यंत्र व त्याचा शोध.

(दृष्या खालीं गेला आहे.) (दृष्या वरतीं गेला आहे.)



अ— नळकांडें. ग— वाष्पजनक (बायलर.) न— वरचें भोक.
ब— दृष्या. ह— पेटी. प र— वाटी.
कफ —दांडा. ल— खालचें भोक. र स— सळई.
ड— चाकाचा मध्य. म— मधलें भोक. फ ट स— तरफ.

ट— तरफेचा टेकू.

पूर्वी मनुष्यांस कोणतेंही काम करण्यास मजूर व जनावरें लावावीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागत. फार झालें तर वाहतें पाणी व हवा ह्यांना गुलाम करून त्यांजकडून पाणचक्क्या व पवनचक्क्या चालवीत असत. पण वाफेच्या शक्तीचा उपयोग यंत्र चालविण्याकडे कधीं केलेला नव्हता. सतराव्या शतकाच्या अखेर अखेर फ्रान्सांतील भौतिकशास्त्रज्ञ ग्रेपिन साहेब ह्यानें एक वाफेचें यंत्र तयार केलें, व ष्युकोमेन साहेबानें त्याची थोडी सुधारणा केली. पण ह्या यंत्रांत, पाणी वर काढण्याच्या बंबांतील दट्ट्या वरखालीं करण्यापलीकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग झाला नव्हता, व त्यांत पुष्कळ दोषही होते. ते दोष दूर करून वाफेनें चाकें व यंत्रें चालू करण्याचें श्रेय दीर्घोद्योगानें जेम्स वाट साहेबानें संपादिलें. वाट साहेबानें जें प्रथम यंत्र केलें, तेंच आजमितीस जीं गिरण्यांतून वाफेचीं यंत्रें चालू आहेत, त्यांचें मूळरूप होय. त्या यंत्राची रचना अशी आहे :—

ह्या यंत्रांत एक नळकांडें असतें, व त्या नळकांड्यांत खालींवर सरणारा एक दट्ट्या असतो. एक बाष्प-जनक भांडें असतें, त्यांत पाण्याची वाफ झाली कीं, ती नळीनें एका लहान पेटींत येते. ह्या पेटीच्या एका आंगाला एकाखालीं एक अशीं तीन भोकें असतात. खालच्या भोकापासून एक नळी काढून ती नळकांड्याच्या खालच्या आंगास, व वरल्या भोकापासून एक नळी वरल्या आंगास, नेलेली असते. दट्ट्या वर-खालीं होऊं लागला म्हणजे त्याला जोडलेली एक सळई पेटींत खालींवर होऊं लागते. सळईच्या पेटींतल्या शेवटास एक वाटीसारखा खोलगट तुकडा बसविलेला असतो. दट्ट्या खालीं असला म्हणजे पेटींतलें खालचें भोक तेवढें मोकळें असतें. त्यावाटे बाष्पजनक पात्रांतून पेटींत आलेली वाफ नळकांड्याच्या खालच्या भागांत जाऊन तिच्या जोरानें दट्ट्या वर जातो. दट्ट्या वरतीं गेला कीं, पेटींतली सळई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खालीं सरून वाटीनें खालचें भोक बंद होतें, पण वरचें उघडतें. मग वरल्या भोकावाटे वाफ शिरून ती नळकांड्याच्या वरल्या भागांत जाऊन दट्ट्याला खालीं दाबते. प्रथम खालीं शिरलेली वाफ आतां निरुपयोगी झालेली असते. ती, दट्ट्या खालीं येऊं लागला कीं, त्याच्या जोरानें खालच्या नळीवाटे खालच्या भोकांत परत येते. पण ह्या वेळीं खालचें व मधलें हीं भोकें वाटीनें झांकलेलीं असतात, म्हणून ही वाफ पेटींत न शिरतां मधल्या भोकांतून एका नळीवाटे दुसऱ्या एका भांड्यांत थंड होण्याकरितां जाते. ह्याचप्रमाणें दट्ट्या वर चढूं लागला कीं, वरली निरुपयोगी वाफ वरल्या भोकांत परत येऊन, तेथून मधल्या भोकांतून वर सांगितलेल्या भांड्यांत जाते. ह्याप्रमाणें सर्व काम आपोआप चालतें. दट्ट्याच्या दांड्याचें वरलें टोंक एका चाकाच्या मध्याच्या जरा खालीं खिळलेलें असतें. दट्ट्या वरखालीं होऊं लागला कीं हें चाक फिरतें. एक चाक फिरूं लागलें कीं, अनेक चाकें व यंत्रें फिरूं लागतात.

वाफेनें गाडी चालवितां येईल ही कल्पना वाट साहेबास सुचली होती; पण ती पूर्णत्वास नेऊन गाडी चालू करण्याचें काम स्टीफन्सन साहेबानें सिद्धीस नेलें. आगगाडींत दोन्ही बाजूंस दोन नळकांडीं असतात. त्यांत वाफ येऊन त्यांतील दट्टे पुढेंमागें होत असतात, व त्यांचा संबंध चाकांशीं केलेला असतो. दट्टे पुढेंमागें होऊं लागले कीं, चाकें फिरूं लागतात व गाडी चालू होते.

---

३८. नीतिशतकांतील वेंचे.

भुजं०—करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें, धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें;
न जाणे न नेणे अशा पामराला, बुझावूं शकेना विधाता तयाला. ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिखरिणी—प्रयत्नें वालूचे कण रगडितां तेलहि गळे,
तृषार्तांची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे, ॥
सशाचेंही लाधे विपिनिं फिरतां शृंगहि जरी;
परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी. ॥ २ ॥
सर्पातें बिसतंतुनें सुदृढ तो बांधावया इच्छितो,
किंवा वज्रमणी शिरीषकुसुमें छेदावया पाहतो, ॥
किंवा तो मधुबिंदुनें मधुरता क्षाराब्धिला आणितो,
जो मूर्खास सुभाषितें वश करूं, ऐसें झणी बोलतो. ॥ ३ ॥

उप०—निंदोत वानोत सुनीतिमंत, चळो असो वा कमला गृहांत, ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं; सन्मार्ग टाकूनि भले न जाती. ॥४॥

शिखरिणी—विपत्काळीं धैर्य, प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें,
सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे, ॥
सुकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति, विद्या-व्यसन जें,
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा, सत्पुरुष जे. ॥ ५ ॥
न चोराला लाधे, प्रकट न दिसे, दे सुख सदा,
दुणावे कीं देतां, किमपि न सरे लेशहि कदा, ॥
न कल्पांतीं पावे निधन धन विद्याभिध असें,
असे ज्याचें, त्याशीं प्रतिभटति ते पामर पिसे. ॥ ६ ॥

शालिनी—जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा, संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा?
पद्माचा जो तंतु, तो वारणाला वारायाला पैं म्हणे सिद्ध झाला! ॥७॥
संपत्काळीं कोंवळें सज्जनाचें होतें चित्त ज्योति पंकेरुहांचें; ॥
आपत्काळीं शैलही आदळो का, धाकेना जें गाजवी धैर्य-डंका. ॥ ८ ॥

उप०—आली जरी कष्टदशा अपार, न टाकिती धैर्य तथापि थोर;
केला जरी पोत बळेंचि खालें, ज्वाला तरी ते वरतीं उफाळे! ॥९॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसंततिलक—जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच,
जें दे पतीस सुख फार कलत्रें तेंच, ॥
जो एकरूप सुखदुःखपणीं गडी तो;
हा लाभ पूर्व-सुकृताविण काय होतो? ॥ १० ॥

वामनपंडित.

---

३९. वामनपंडित.

सातारा जिल्ह्यांत कोरेगांव–कुमठें एथें नृसिंहपंडित म्हणून एक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण राहात असे. त्याची वृत्ति जोशीपणाची होती. त्याच्या पत्नीचें नांव लक्ष्मीबाई. ह्या लक्ष्मीनृसिंहांच्या पोटीं अजमासें शके १५४० त वामनाचा जन्म झाला. विद्वान् पिता आणि सुशील माता ह्यांच्या शिक्षेंत वामनाचें बाळपण गेलें. बापापाशींच त्यानें संस्कृत विद्येचा अभ्यास करण्यास आरंभ केला असावा. पुढें तो शिकण्याकरितां काशीस गेला, त्यावेळीं त्याचें वय सुमारें १८ वर्षांचें होतें. जाते वेळीं घराची व्यवस्था लावून, व आपली स्त्री गिराबाई इजला बरोबर घेऊन तो गेला, ह्यावरून त्यावेळीं त्याचीं मातापितरें निवर्तलेलीं असावीं. काशींत बारा वर्षें राहून अध्ययन पुरें केल्यावर मोठमोठ्या विद्वानांशीं वाद करीत करीत तो आपल्या गांवीं परत आला.

वामन मूळचा द्वैतवादी माध्वसांप्रदायी वैष्णव होता. पुढें तो महापंडित बनला, तेव्हां त्याच्याठायीं विद्येचा मोठा गर्व उत्पन्न झाला. त्यामुळें 'विद्या विवादाय' असें होऊन तो ठिकठिकाणच्या पंडितांचा पराभव करीत व विजयपत्रें घेत चालला. द्वैतमताचाही तो अत्यंत अभिमानी होता. एकदां प्रवासांत नदीच्या कांठीं भात शिजत ठेवून तो ध्यानस्थ बसला असतां, जाळ अधिक होऊन भात करपूं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण वामन कट्टा वैष्णव असल्यामुळें प्रत्यक्ष पत्नीलाही त्याच्या भातास शिवतां येईना! त्यावेळीं पतीचें ध्यान व भाताचें करपणें पाहून ती हसली. हसण्याचें कारण वामनानें विचारिलें, तेव्हां तिनें खरें होतें तें सांगितलें. तेव्हां द्वैतमताविषयीं त्याच्या मनांत उदासीनता उत्पन्न होऊन, आरंभीं तुकाराम व शेवटीं रामदास ह्यांच्या उपदेशानें त्यानें अद्वैताचा अवलंब केला, व त्यांच्या सांगीवरून तो मराठींत कविता करूं लागला.

वामन उत्तम प्रकारचा संस्कृतज्ञ होता, व त्यानें संस्कृतांत कविताही लिहिली. परंतु मराठींत कविता लिहिण्याचा त्याचा हेतु, संस्कृत ग्रंथांतील भावार्थ साधारण लोकांस साध्य करून देऊन त्यांच्यामध्यें ईश्वरभक्तीची लालसा उत्पन्न करणें हाच असल्यामुळें, त्याच्या मराठी कृतींत संस्कृताचें मिश्रण फारसें आढळत नाहीं. वेदांतांतील गहन विषय चांगले समजतील अशा प्रकारें त्यानें ते मराठी भाषेंतच प्रतिपादिले आहेत. ह्यावरून त्याची योग्यता कळून येते. त्याच्या कवनांत कोठें कोठें ग्राम्य शब्द, व्याकरणास सोडून केलेले प्रयोग इत्यादि दोष दिसून येतात; पण एकंदरीनें पाहातां त्याची कविता अर्थास सरळ, कानास गोड व मनास रंजविणारी अशी आहे. त्यानें निरनिराळ्या वृत्तांत काव्यें रचिलीं आहेत. त्यास यमकें फार आवडत असें दिसतें. त्याच्या यमकांवरूनच रामदासानें त्यास 'यमक्या' वामन असें विनोदानें म्हणावें! हुबेहूब वर्णन करण्याची वामनाची हातोटी कांहीं विलक्षण आहे. वर लिहिलेले गुण पुढील पद्यांत दिसून येतील :—

ऊसळे सळसळां जळ डोहीं, ज्यावरी खग शके न उडोंही ! ॥
अंतरिक्ष-गत पक्षि जळोनी लक्ष लक्ष पडताति गळोनी. ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अही तोही पाहे अवसर डसायास हरिला,
परंतु श्रीकृष्णें भ्रमण करितां गर्व हरिला. ॥
शरीरीं फांसोळ्या बहु खुळखुळ्या होउनि ढिल्या,
गती तत्प्राणाच्या सकळहि गळ्यामाजि चढल्या. ॥ १ ॥

वामनास महाराष्ट्रांतील मोठमोठ्या साधूंमध्यें गणण्यास मुळींच हरकत नाहीं; पण त्या मालिकेंत त्याची गणना होत नाहीं. ह्याचें कारण, त्यानें पूर्ववयांत वाद केला, व विद्वत्तेस अनुसरून जी नम्रता असावी, ती त्याच्या आंगीं तेव्हां नव्हती, हें असावें.

वामनानें पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. भागवत, रामायण, भारत, ह्यांतील स्फुट प्रकरणें, हे त्याच्या कवितेचे विषय होत. त्यानें गीतेवरही यथार्थदीपिका नांवाची टीका लिहिली आहे. हल्लीं उपलब्ध असलेल्या टीकांमध्यें, कित्येकांच्या मतें, हीच उत्तम ठरली आहे. भर्तृहरीचीं तीनही शतकें त्यानें मराठींत चांगलीं उतरलीं आहेत. त्यांचा मासला मागील धड्यांत आला आहेच. शके १६०० च्या सुमारास वामनाचें देहावसान झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४०. हारून रशीद.

महंमद पैगंबर ह्यांच्यापश्चात् त्यांच्या गादीवर जे पहिले चार

खलीफा बसले, ते सर्व लोकनियुक्त असून त्यांची राहणीही पैगंबरांच्यासारखी साधी आणि कित्ता घेण्यासारखी होती; म्हणून त्यांना खरे अथवा सद्गुणी खलीफा म्हणतात. त्यांच्यापश्चात् मुआवियानें अन्यायानें, तरवारीच्या जोरावर खलिफाचा अधिकार बळकावून तो आपल्या घराण्यांत वंशपरंपरेनें कसा सुरू केला, हें चौथ्या पुस्तकांत सांगितलें आहे, तें तुम्हांस आठवत असेलच. पहिल्या चार खलिफांनंतर जे खलीफा झाले, ते लोकांनीं निवडलेले नसून राजांप्रमाणें डामडौलानें राहात असत; म्हणून त्यांना मुसलमानांचे धर्मगुरु म्हणणें शोभत नाहीं. मुआवियाच्या घराण्यांतील पुरुषांनीं नव्वद वर्षें दमास्कस एथें राज्य केलें. त्यांना उमय्यवी खलीफा म्हणतात. त्यांच्यानंतर पैगंबरांचे चुलते अब्बास ह्यांचा पणतू महंमद, ह्यानें खलिफाचा अधिकार बळकाविला, आणि तो बगदाद एथें राहूं लागला. त्याच्या घराण्यांतील पुरुषांनीं २९० वर्षें राज्य केलें. त्यांना अब्बासी खलीफा म्हणतात. त्यांच्या अमलांत मुसलमान लोकांमध्यें विद्येचा प्रसार फार झाला. अब्बासी खलिफांमध्यें हारून रशीद हा फार प्रसिद्ध होऊन गेला. तो मोठा वैभवशाली असून विद्वानांचा पुरस्कर्ताही होता. ह्याच्या दरबारांत बर्मकी घराण्यांतील जाफर नांवाचा फार हुशार मुत्सद्दी होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एके दिवशीं एक सौदागर एका तरुण मुलीस घेऊन हारुनाकडे आला. ती मुलगी फार रूपवती आणि नृत्यगायनादि कलांमध्यें निपुण अशी होती. म्हणून हारुनानें तिला विकत घेण्याची इच्छा दर्शविली. सौदागर म्हणाला, "मी ह्या मुलीचे एक लक्ष दिनार घेईन, त्यांत एकही दिनार कमी करणार नाहीं." हारुनाचे मनांत त्या मुलीस विकत घेण्याचें फार होतें, म्हणून मागितलेली रकम सौदागरास देऊन तो त्या मुलीस विकत घेण्यास तयार झाला. जाफर बर्मकीस हें हारुनाचें कृत्य पाहून फार आश्चर्य वाटलें. तो मनांत म्हणाला कीं, हारून जर अशा रितीनें पैसे उधळूं लागला, तर सरकारी खजिना थोडक्याच दिवसांत रिता पडून राज्यावर मोठें संकट ओढवेल, हें कांहीं चांगलें नाहीं. परंतु हारुनास उघडपणें असें सांगण्याचें आणि त्यास अशा कृत्यापासून परावृत्त करण्याचें धैर्य जाफरास होईना, म्हणून त्यानें दुसरी एक युक्ति योजिली. त्यानें सौदागरास द्यावयाचे दिनार खलिफाच्या नजरेस सहज रितीनें पडतील, अशा ठिकाणीं आणून ठेवण्याकरितां खजीनदारास सांगितलें. खजीनदारानें त्याच्या सांगण्याप्रमाणें केलें. लवकरच हारुनाच्या नजरेस ते दिनार पडले, तेव्हां "इतके पुष्कळ दिनार एथें उघड्यावर कशाकरितां आणून ठेविले?" म्हणून त्यानें खजीनदारास विचारिलें. खजीनदारानें उत्तर केलें कीं, "हुजूर, हे दिनार आज विकत घेतलेल्या मुलीबद्दल सौदागरास देण्याकरितां एथें आणून ठेविले आहेत." हें ऐकतांच हारुनाचे डोळे उघडले. तो मनांत म्हणाला कीं, रयतेच्या उपयोगाकरितां सरकारी खजिन्यांत सांचवून ठेविलेल्या पैशांतून एवढी मोठी रकम केवळ एका मुलीकरितां देणें, हें किती मूर्खपणाचें आणि अविचाराचें आहे! त्यानें लागलाच त्या मुलीस सौदागराकडे परत पाठविण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हुकूम दिला, आणि खजीनदारास ते दिनार खजिन्यांत परत नेऊन धर्मादाय खात्यांत जमा करण्यास सांगितलें. पुढें ती सर्व रकम त्यानें अनाथ आणि गरीब स्त्रियांना मदत करण्याकडे खर्च केली.

---

४१. देशपर्यटनापासून लाभ.

केल्यानें देशाटन, पंडित-मैत्री, सभेंत संचार, ॥
शास्त्र-ग्रंथ-विलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार. ॥ १ ॥

वरील पद्यांत आंगीं शाहाणपण येण्यास देशाटन हें एक साधन आहे, असें म्हटलें आहे. कारण, निरनिराळ्या देशांत जाऊन तेथील सुप्रसिद्ध स्थळें, कलाकौशल्यांचीं कामें, लोकांच्या भाषा, रीतरिवाज इत्यादि नीट समजून घेऊन त्यांच्याविषयीं विचार केल्यानें मनुष्याचें ज्ञान वाढतें.

प्रवास करण्याचीं साधनें प्राचीन काळीं फारच थोडीं होतीं. अलीकडे जिकडे तिकडे सडका, आगगाड्या व आगबोटी झाल्यामुळें जगाच्या



एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत देखील थोड्या काळांत सुरक्षितपणें जातां येतें, व खर्चही कमी लागतो. टपालाच्या सोईमुळें व तारा-यंत्राच्या साह्यानें, मनुष्य कोठेंही असला तरी त्यास घरची खबर घेतां येते, व आपला समाचार घरीं कळवितां येतो. ह्याप्रमाणें प्रवास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याच्या सोई वाढल्यामुळें अलीकडे साठसत्तर वर्षांपासून युरोपांतून कित्येक लोक दरवर्षी देशपर्यटन किंवा पृथ्वी-प्रदक्षिणाही करण्यास निघूं लागले आहेत. केवळ पृथ्वीप्रदक्षिणा करणारे लोक फक्त मोठ-मोठ्या शहरी जाऊन, व तेथें पाहाण्याजोगें जेवढें असेल तेवढें एकदां कसें तरी घाईघाईनें नजरेखालीं घालून, पुढें चालते होतात. सूक्ष्म रितीनें अवलोकन करण्यास त्यांस बहुधा वेळच नसतो. अशा लोकांच्या पर्यटनापासून जगास फारसा फायदा होत नाहीं. पण जे लोक कळ-कळीनें खरी व उपयुक्त माहिती मिळविण्याकरितां पर्यटनास निघतात, व आपला अनुभव लिहून ठेवितात, त्यांपासून सर्व जगास मोठा उपयोग होतो. फाहेंग, मार्को पोलो इत्यादि अशा प्रकारचे प्रवासी होत.

नुसत्या पुस्तकावरून होणाऱ्या ज्ञानापेक्षां वस्तु प्रत्यक्ष पाहिल्यानें होणारें ज्ञान अधिक फलप्रद असतें. ताजमहाल, वेरूळचीं लेणीं, रायगड, सिंहगड इत्यादि स्थळें प्रत्यक्ष पाहिलीं, म्हणजे त्यांचे देखावे व तेथें घडलेल्या गोष्टी आपल्या मनावर उत्तम प्रकारें ठसतात; व पुष्कळ दुर्बोध गोष्टींचा तात्काल उलगडा पडतो. काळजीपूर्वक व चौकस बुद्धीनें अशीं ठिकाणें पाहिलीं तर मनुष्याचें मन कितीतरी विकास पावतें.

दुसऱ्या राष्ट्रांच्या रितीभातींची माहिती झाल्यानें आपले दोष व त्यांचे गुण कोणते तें कळून, आपल्या देशांत सुधारणा करतां येते. चीन व हिंदुस्तान हे दोन्ही देश प्राचीन काळीं पुष्कळ सुधारलेले होते, परंतु त्यांचें परराष्ट्रांशीं दळणवळण फारसें नसल्यामुळें पाश्चात्य राष्ट्रें सुधारणेंत त्यांच्या फारच पुढें जाऊन हल्लीं त्यांस तीं शिकवीत आहेत!

निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारची हवा असते. अमुक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोग अमुक प्रकारच्या हवेंत गेल्यानें बरा होतो, व हवापालट झाल्यानें प्रकृति सुधारते, असें अलीकडे वैद्यांस कळून आलें आहे. त्याप्रमाणें प्रकृति सुधारावी म्हणून प्रतिवर्षी पुष्कळ लोक हल्लीं प्रवास करितात.

कोठें काय उत्पन्न होतें, व आपल्याकडील कोणता जिन्नस कोठें खपेल, हें कळणें व्यापारी लोकांस फार जरुरीचें आहे. चित्रकलेच्या शिक्षणाकरितां निरनिराळे देखावे पाहाणें, हा एक अत्यंत जरुरीचा भाग आहे. सारांश, कोणत्याही धंद्यांतील मनुष्य प्रवासास गेला, तर त्याला आपल्या धंद्यास उपयोगीं पडणारी हवी तितकी माहिती मिळवितां येईल.

परकीय गोष्टी म्हणजे तुच्छ, असें न मानितां, ज्याचें त्यास आवडतेंच हें लक्षांत ठेवून, नवीन गोष्टी दिसतील त्यांस न हसतां त्यांतील गुण तेवढे घेत गेलें, म्हणजे देशपर्यटनापासून पुष्कळच लाभ होतो.

---

४२. द्वेष.

ह्या जगांतील कोणताही लहान मोठा प्राणी घ्या, त्याला आपलें बरें व्हावें असें वाटतें. मग त्यांत दुसऱ्याचें वाईट झालें तरी चालेल असें ज्यांस वाटतें, असेही पुष्कळ असतात. विधात्यानें जगाची राहटी चालण्याकरितां लोभ ही एक कळच करून ठेविली आहे. कमानीमुळें घड्याळांतील चक्रांस गति येते, तसा मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या कृत्यांस लोभामुळें आरंभ होतो. घड्याळांत कमानीस कह्यांत ठेवण्याकरितां जशी तिला खेंचून तिजवर एक पट्टी दाबून ठेविलेली असते, तशी लोभास योग्य वळण देण्यास मनुष्यांस विचारशक्ति दिली आहे. ती विचारशक्ति जागृत राहिली नाहीं, तर ही लोभरूपी कमान हातची सुटून मनुष्यांस कोणीकडे नेईल त्याचा नेम नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमुक वस्तु दुसऱ्याजवळ आहे ती आपणांस असावी ही इच्छा उत्पन्न झाली कीं, त्यापासून ती कशी प्राप्त करून घेतां येईल ह्याचा आपणांस ध्यास लागतो; व ती त्यानें आपणांस सुखासमाधानानें दिली नाहीं कीं, तो मनुष्य वाईट किंवा द्वाड अशी आपली कल्पना होते. पाहा! वस्तु त्याची, व ती तो आपणांस देत नाहीं म्हणून तोच द्वाड, असें आपण मानूं लागतों! मग त्याच्या त्या द्वाडपणाबद्दल अगर वाईटपणाबद्दल त्यास शासन करण्यास आपण तयार होतों, व त्याचें नुकसान कोणत्यातरी उपायानें केलेंच पाहिजे, अशी आपणांस इच्छा उत्पन्न होते.. ह्या इच्छेसच द्वेषबुद्धि म्हणतात. ही लोभापासून मुख्यतः उत्पन्न होते. आपल्या वस्तूचा अपहार अन्यायानें कोणी करील तर त्याविषयींही आपल्या मनांत द्वेषबुद्धि उत्पन्न होते.

द्वेषाचे परिणाम मनावर व वर्तनावरही होतात. वाईट बुद्धीचे परिणाम वाईटच असणार. एकदां कोणा मनुष्याविषयीं आपल्या मनामध्यें द्वेषबुद्धि उत्पन्न झाली, म्हणजे आपणांस त्याचें कांहींच चांगलें दिसेनासें होतें, व त्यामुळें त्याचें म्हणून जें असेल, त्यास दोष ठेवण्याची आपणांस खोड लागून जाते. द्वेषाच्या योगानें सर्वांत मोठा दोष जो आपणांत उत्पन्न होतो, तो हा कीं, क्षमा हा गुण आपण अगदीं विसरतों. दुसऱ्याचें कृत्य त्याजकडून अजाणपणामुळें घडलें असेल, हा विचार आपणांस राहात नाहीं. द्वेषानें मन अधिकाधिकच क्षुब्ध होत असतें.

एकाद्याविषयीं आपल्या मनांत एकदां द्वेष उत्पन्न झाला म्हणजे त्याचें अहित कोणत्या रितीनें होईल ह्याविषयीं आपण एकसारखा विचार करूं लागतों. त्याचें नुकसान करितांना इतर कोणाचें थोडेंबहूत नुकसान झालें, तरी आपण त्याची परवा करीत नाहीं. द्वेषाचें पर्यवसान कलहांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें; व हा कलह दोन व्यक्तींतच नसून दोन जनसमूहांत अथवा राष्ट्रांत असला, म्हणजे त्यास युद्ध ही संज्ञा मिळते. व्यक्तिमात्राच्या कलहापासून हानि होते तिजपेक्षां असंख्यपट जास्त हानि युद्धापासून होते. द्वेषामुळें कलह, परपीडन आणि हत्या हीं आपल्याहातून घडतात. ह्याप्रमाणें महापातकांत गणिलेले पुष्कळ दोष घडण्यास लोभ, तज्जन्य द्वेष व त्याचा अनुषंगी क्रोध, हेच कारण होतात.

द्वेष व त्याचे दुष्ट परिणाम ह्यांचीं उदाहरणें पुराणांतरीं व इतिहासांत पुष्कळ आढळतात. दुःखाची गोष्ट ही कीं, ही द्वेषबुद्धि जगांत प्रत्येक समाजांतील बहुतेक व्यक्तींत तरी असतेच. समाजासमाजांतही द्वेष तेव्हांच माजतो. कांहीं समाज व कांहीं राष्ट्रें तर द्वेष केल्यावांचून चालणारच नाहीं, असें प्रतिपादन करितात, आणि स्वार्थसाधन हीच जगांतील इतिकर्तव्यता मानितात !

---

४३. धारिष्टाविषयीं एक गोष्ट.

मुंबई शहराजवळ माटुंगें एथें एक लहानसा बंगला बांधून एक गृहस्थ राहात असे. त्यानें रोकड व जवाहीर ठेवण्याकरितां एक लहानशी खोली आपल्या निजावयाच्या खोलींतच करून ठेविली होती.

एके दिवशीं त्या गृहस्थास कांहीं कामाकरितां आपल्या पत्नीस व तान्ह्या मुलास घरीं ठेवून दूर गांवीं जाणें भाग पडलें. जातांना त्यानें खोलीची किल्ली आपल्या बायकोजवळ दिली, व ती जपून ठेवण्याविषयीं बजाविलें. मालतीबाईजवळ किल्ली दिलेली त्यांच्या सैंपाक्यानें पाहिली, व त्याच्या मनांत लोभानें उचल खाऊन त्यास चोरी करण्यास प्रवृत्त केलें. सायंकाळीं जेवणखाण आटोपल्यावर, सर्व घराचीं कड्याकुलपें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तपासून मालतीबाई आपल्या खोलींत निजावयास गेली. पलंगाजवळ जाते, तों तिला श्वासोच्छ्वासाचा भास झाला; म्हणून तिनें मागें सरून पाहिलें, तों सैंपाकी पलंगाखालीं छपून बसलेला तिला दिसला. त्याच्या हातांत कांहीं हत्यारही असावें असें तिला वाटलें. त्याचा उद्देश तिच्या लक्षांत तेव्हांच आला. दुसरी एकादी बायको असती, तर ती भीतीनें घाबरून दार उघडण्याचा यत्न करती व त्यानें तिला सहज धरिलें असतें आणि कदाचित् ठारही केलें असतें. पण मालतीबाई मोठी धीराची बायको होती.

तिनें जणू काय आपणास कांहींच समजलें नाहीं असें दाखवून मुलास स्वस्थपणें पाळण्यांत निजविलें, व आपण पलंगावर जाऊन निजली. निजतांना जामदारखान्याची किल्ली रेशमाच्या गोफासकट उशीखालीं ठेवून गोफ बाहेर लोंबत ठेविला; अशासाठीं कीं, सैंपाक्याच्या तो दृष्टीस पडून त्यानें तो उचलावा व आपल्या आंगास धक्का लागूं नये. तिची ही युक्ति सफळ झाली.

कांहीं वेळानें बाई निजली असें वाटून, सैंपाक्यानें पलंगाखालून उठून तिजकडे नीट न्याहाळून पाहिलें. मालतीबाईनें सोंग चांगलें आणिलें असल्यामुळें तो फसला; व गोफ बाहेर लोंबत होता तो मोठ्या हर्षानें हळूच घेऊन, त्यांतील किल्लीनें, त्यानें ती खोली उघडिली. आंत जाऊन वजनानें हलके पण किंमतीनें भारी असे जिन्नस तो शोधूं लागला. ह्याप्रमाणें तो गुंतला असतां, त्याची पाठ दाराकडे आहे असें पाहून, मालतीबाईनें हळूच उठून पटकन पलंगावरून उडी मारली, व सैंपाकी काय वाजलें म्हणून मागें पाहातो, तों दार ओढून घेतलें व बाहेरून कडी घातली. सैंपाकी आयताच आंत कोंडून राहिला!

सैंपाक्यानें आंतून पुष्कळ सांगून पाहिलें. तो म्हणाला, "मी एथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चोरी करण्यास मुळींच आलों नाहीं. मी तुमच्या खोलींत कांहीं गडबड झालीसें वाटल्यावरून धावून आलों, तों तुमच्या खोलीचें दार उघडें असून ही खोलीही उघडलेली दिसली. आंत कोण शिरलें तें पाहावें म्हणून मी खोलींत येतों, तों तुम्हीं दार लावून घेतलें! मी अपराधी नाहीं. एथें जिनसा मोकळ्या पडल्या आहेत त्यावरून कोणी तरी चोरी करून गेला आहे. दार उघडा, म्हणजे मी त्याचा तपास लावितों."

मालतीबाई म्हणाली, "तुला इतकी तसदी घेण्याची गरज नाहीं; चोर मला पक्का सांपडला आहे! तूं स्वस्थ ऐस." मग तिनें त्या खोलीस कुलूप घातलें, आणि गड्याला हाक मारून फौजदारास बोलावण्यास पाठविलें. फौजदार आल्यावर सैंपाक्यास त्याच्या स्वाधीन केलें. पुढें चौकशीच्या वेळीं त्यानें आपला अपराध कबूल केला, व यजमानीण बाईनें कांहीं अडथळा केल्यास तिला ठार मारण्याकरितांच तो पाजविलेला सुरा मीं बरोबर आणिला होता, असें सांगितलें. त्यास त्याच्या अधम कृत्याबद्दल योग्य शासन मिळालें.

पाहा! मालतीबाईच्या आंगीं मोठें धारिष्ट असल्यामुळें तिला अशा शिताफीनें चोर धरतां आला. सर्व लोकांनीं तिच्या धारिष्टाची मोठी वाहवा केली.

---

४४. गोपिकाबाईचा पुत्र-शोक.

शार्दूलवि०—शोभे ज्या अभिमन्युचीच उपमा विश्वास माझा गुणी!
मानी माधव! आठवीन न कसें नारायणाही मनीं? ॥
एकामागुन एक नाश मुलगे माझे तिघे पावले!
हा! दैवा, करण्यास नाश पुरता कैसें तुला फावलें? ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते खेळत बाळ राजस यदा ते तीन माझे घरीं,
होत्यें पावत धन्यवाद, विसरूं आतां कसा तो तरी ? ॥
स्वप्नीं येउन भेटती, परि असें जागी पुन्हा जेधवां,
मूर्ती सुंदर त्यांचिया न दिसती डोळ्यांस या तेधवां ! ॥ २ ॥
विश्वासा-सम शूर सुंदर असे राष्ट्रामध्यें कोण या ?
एकोणीस, अहो ! पुरीं न वरुषें होतीं तयाच्या वया; ॥
गेला पानपतीं मरून लढतां तो शत्रुसैन्यासवें,
तेव्हां गाळिति शत्रु मित्र बघतां त्याच्या शवां, आसवें ! ॥ ३ ॥
भावोजींसह जावयास निघतां विश्वास माझा रणा,
तो भेटे न पुन्हा अशी नच मना माझ्या शिवे कल्पना ! ॥
गेला दीर, सुपुत्र, पुण्य सरलें, तों मृत्यु आला धवा !
होणारें न चुकेल, होइल जरी ब्रह्मा तया आडवा ! ॥ ४ ॥
जाळाया पति-शोक-दग्ध उठलें हा देह, तेव्हां सुत
आला माधव घालुनी दृढ-मिठी तो बोलला स्फुंदतः—॥
" माते, शोक करूं नको, तुजविणें मातें नसे आसरा,
आशीर्वाद वदें, पुन्हा गत जयश्री आणितों मी घरा !" ॥ ५ ॥
केलें जर्जर हैदरास लढुनी शौर्यें, निजामासही,
काकांतें दृढ आवरूनि, विजयी पाळी नयानें मही—॥
ऐशा मी कुलदीपका प्रसवलें जो थोर मातें असा,
होता अत्यभिमान, तो, हर हर ! व्यर्थत्व पावे कसा ! ॥ ६ ॥
माझें दैव हताश यास्तव तया झाली क्षयाची व्यथा,
गेला माधव लोक सोडुनि ! किती गाऊं तयाच्या कथा ? ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सौंदर्यें, विनयें, अलौकिक पति-प्रेमें मनो-मोहिनी,
साध्वी जाय रमा[१०] तयासह, जशी चंद्रासवें रोहिणी ! ॥ ७ ॥

शिखरिणी—पुढें माझा नारायण तरुण तो पुत्र तिसरा,
बसे जेव्हां गादीवर, नच गमे तो दिन बरा ! ॥
अहो ! त्याच्या राज्या घडति न पुरे सात महिने,
वरीलें गंगेनें[११] तंव विषम[१२] वैधव्य महिनें ! ॥ ८ ॥

शार्दूलवि०—ज्यातें चिंतुनि भूपती थरथरां सिंहासनीं कांपत,
होते उत्तरचे, प्रताप पतिचा माझ्या असा अद्भुत; ॥
त्याचा पुत्र, कनिष्ठ बंधुहि तसा जो माधवाचा प्रिय,
हा दैवा ! स्वगृहींच त्यास वधिती मारेकरी निर्भय ! ॥ ९ ॥
भाच्याचा वध इच्छिला कुमतिनें कंसें प्रयासें महा,
पुत्रातें वनिं धाडिलें सवतिच्या त्या कैकयीनें पहा, ॥
भावातें विष-मिश्र अन्न कपटें दुर्योधनें चारिलें;
आनंदी[१३] ! पुतण्यास निष्ठुरपणें तैसें तुवां मारिलें ! ॥ १० ॥

हरिणी—नवस करिती पुत्रासाठीं कितीक जगीं स्त्रिया !
सुत मज तिघे झाले, गेले तिघेहि परी लया ! ॥
कितिक गुण ते त्यांचे चित्तीं स्मरून रडूं तरी ?
मरण नच ये ! मी दुर्भागी[१४]या असें भुवनीं खरी !! ॥ ११ ॥

वासुदेव वा० खरे—फुटकळ चुटके.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४९. एक स्वप्न व त्याचा उलगडा.

जयपाळ—सरकारांनीं स्वप्न बोलावें.

राजा—स्वप्न असें पाहिलें कीं, मी वाड्यांतून निघून **गंगा**तीरीं गेलों; आणि तेथें पाहातों तों अमर्याद पूर आला असल्यामुळें, ती **गंगा**बाई दुथड्यांचें उलंघन करून, महावेगानें 'फूं फूं' असा शब्द करीत चालली होती. कोणी म्हणेल ही बया गिरिराज-जनकावर रुसून, तट्ट फुगून, गाऱ्हाणें गातच रत्नाकराकडे जात आहे कीं काय कोण जाणे! इतक्यांत तिची ती शीघ्र गति मंद झाली; तिच्या प्रचंड लाटा कमी झाल्या; तिचें विस्तीर्ण पात्र आकुंचित झालें; आणि तिचें गढूळ उदक स्वच्छ स्फटिकासारखें झालें; सारांश, कोणी म्हणेल सरुया रत्नाकरानें अंजारून गोंजारून, लडिवाळपणानें मांडीवर घेऊन, हिचें सांत्वन केलें. इकडे आसमंताद्भागींच्या प्रदेशांत नानातऱ्हांचीं धान्यें इतकीं विपुल उगवलेलीं दिसलीं कीं, आज पृथ्वीनें आपलें सर्वच वैभव बाहेर काढलें आहे कीं काय असा मला घटकाभर भास झाला. **जय**पाळा, सरासरी दोन अडीच घटकांच्या आंत हा चमत्कार मीं सातदां पाहिला. मग परतावें म्हणून निघालों, तों एकाएकीं, होतें तें उदक आटूं लागलें. आटतां आटतां, पांच सात पुरुष पाणी असावयाच्या ठिकाणीं, नेत्रस्पर्शास टिपूसभर देखील उरलें नाहीं. तिच्यामध्यें विहार करून सुखानें राहाणारे जे मत्स्यादि जीव, त्यांनीं तळमळ तळमळ करून पटापटां प्राण टाकले. चहूं बाजूंच्या धान्यांची राख झाली. जिकडे दृष्टि द्यावी तिकडे वालुकायम दिसूं लागलें. हाही चमत्कार सातदां पाहिला. **जय**पाळा, ह्या स्वप्नाचा जर यथार्थ अर्थ सांगशील, तर तुझ्या योग्यतेस पारावार नाहीं असें करीन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जयपाळ—महाराज, भगवंताची आपणांवर पूर्ण कृपा आहे; कारण कीं, त्यानें दयाळू होऊन पुढें सर्व पृथ्वीवर जें संकट येऊन पडणार, तें ह्या पूर्वसूचक स्वप्नानें आपणांस जाणविलें आहे. ह्या स्वप्नाचा अर्थ असा दिसतो कीं, ह्यापुढें सात वर्षेंपर्यंत यथाकालीं वर्षाव होईल, पृथ्वी यथाकालीं यथायोग्य धान्यानें परिपूर्ण होईल, महर्घता हा शब्दही लोक विसरून जातील; परंतु तीं सात वर्षें लोटल्यानंतर ह्या सर्व सुखाचा एकदम वचपा निघेल. मेघ उदकाचा संचयही करणार नाहींत; धरित्री धान्याचें बोडुकही दाखविणार नाहीं; सर्व प्राणिमात्र जिगजिग करतील; सारांश, जशीं तीं सात वर्षें आनंदाचीं, तशीं हीं दुःखाचीं जातील. हे राजाधिराज, ह्या महा आकांताच्या समयीं सर्व भूतलाचा कनवाळूपणानें समाचार घेण्याचें श्रेय आपणांस देण्याची भगवदिच्छा दिसते. ह्याकरितां ह्या इच्छेनुरूप वर्तण्यास आपण समर्थ होण्याचे यत्न करावे. पहिल्या सप्तकांत सर्व मुलखांतील दाणागोटा विकत घेऊन पुढील सप्तकांत उपयोगीं लावावा. शहरोशहरीं, प्रांतोप्रांतीं, धान्याधीश नेमून तजवीज ठेवावी. महाराज, अशानें आपली कीर्ति युगानुयुगींसुद्धां प्राणिमात्र गातील.

राजा— जयपाळा, होय रे होय ! हाच स्वप्नांतील उलगडा. बाबा, तूं कोण आहेस, आणि हें स्वप्न तूं कसें स्पष्ट केलेंस ? तुजजवळ अशी कोणती मंत्रविद्या आहे ?

जयपाळ—महाराज, हा आपला सेवक मंत्रविद्येंतील एक अक्षरसुद्धां जाणत नाहीं. आपल्या स्वप्नाचा गांवांत पुकारा झाला त्या दिवशीं रात्रीं कोणीं संन्याशानें त्याचा अर्थ मला सांगितला. ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नारायण-मूर्ति अर्थ सांगून तेथल्या तेथेंच अदृश्य झाली, असें मला भासलें. मग काय खरें खोटें असेल तें असो.

विनायक ज० कीर्तने—जयपाळ.

---

४६. रामायण आणि महाभारत.

रामायण आणि महाभारत हे संस्कृत भाषेंतील उत्तम पुरातन ग्रंथ होत. रामायण वाल्मीकीनें व भारत व्यासानें रचिलें. हे ग्रंथ इतके विश्रुत व लोकप्रिय आहेत कीं, त्यांतील कथा अंशतःतरी ज्यास माहीत नाहीं, असा हिंदू सांपडणें विरळाच.

एकदां वाल्मीकीनें सर्वोत्कृष्ट, सर्वगुणसंपन्न असा पुरुष जगांत कोण आहे, म्हणून आपला गुरु जो नारद, त्यास प्रश्न केला. तेव्हां नारदानें त्यास अयोध्येचा राजा दाशरथि राम ह्याची कथा सांगितली. ती ऐकून वाल्मीकीस रामचरित्रावर काव्य रचण्याची स्फूर्ति झाली. तेंच काव्य रामायण होय. अशा प्रकारची ग्रंथरचना पूर्वी कोणीं केली नव्हती, म्हणून रामायणास 'आदिकाव्य' असें नांव पडलें आहे. ह्या काव्याचीं सात काण्डें आहेत. सर्व काण्डें मिळून सुमारें ६५० सर्ग होतात. त्यांची एकंदर श्लोकसंख्या चोवीस हजार आहे. बालकाण्डांत रामाच्या जन्मापासून त्याचा सीतेशीं विवाह होईपर्यंत वृत्तांत असून, अयोध्याकाण्डांत कैकेयीचें वर मागणें व रामास वनवासास पाठविणें, ह्यांविषयीं कथा आहे. पुढें अरण्य, किष्किंधा, सुंदर व युद्ध ह्या काण्डांत रामानें वनवासांत भोगिलेलीं दुःखें व त्यानें केलेले रावणवधादि सर्व पराक्रम वर्णिले आहेत. उत्तरकाण्डांत ह्या पुढलें रामाचें चरित्र लिहिलें आहे.

महाभारतांत हस्तिनापूर एथील भरतराजाचे वंशज कौरव आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांडव ह्यांची कथा आहे. जनमेजय राजानें, आपल्या पूर्वजांच्या इतिहासाविषयीं उत्सुक होऊन, तो निवेदन करण्याविषयीं वैशंपायन ऋषीची प्रार्थना केली. तेव्हां व्यासानें रचिलेलें महाभारत वैशंपायनानें जनमेजयास सांगितलें. रामायणास जशी 'काव्य' तशी महाभारतास 'इतिहास' अशी संज्ञा आहे. ह्या ग्रंथांत सुमारें एक लक्ष श्लोक आहेत. महाभारताचे १८ भाग असून त्यांस 'पर्वे' म्हणतात. पहिल्या म्हणजे आदिपर्वात कौरव व पांडव ह्यांच्या उत्पत्तीची हकिकत देऊन, नंतर सभापर्वात युधिष्ठिरानें द्यूत खेळून आपलें सर्वस्व हारविलें, व भाऊ भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव, आणि पत्नी द्रौपदी ह्यांसह तो वनवासास गेला, हें सांगितलें आहे. वनपर्व व विराटपर्व ह्यांत पांडवांचा वनवास व विराटाच्या गृहीं अज्ञातवास ह्यांचें वर्णन आहे. उद्योग-पर्वात युद्धाची तयारी कशी झाली, ती कथा आहे. पुढें भीष्म, द्रोण, कर्ण व शल्य ह्या चार पर्वात, त्या त्या वीरांकडे कौरवसैन्याचें आधिपत्य असतां घडलेल्या युद्धांच्या कथा दुर्योधनाच्या पतनापर्यंत लिहिल्या आहेत. सौप्तिक पर्वात अश्वत्थाम्यानें पांडवांवर रात्रीं घातलेल्या छाप्याचें वर्णन असून, स्त्रीपर्वात वीरमाता व वीरपत्न्या ह्यांचा शोक आहे. शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं दोन पर्वे महाभारतामध्यें श्रेष्ठ आहेत; कारण त्यांत भीष्मानें राजधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म व नीति हीं उत्तम प्रकारें सांगितलीं आहेत. पुढील पर्वात युद्धानंतरची अश्वमेधादिकांची कथा असून, शेवटीं स्वर्गारोहणपर्वात पांडवांचें निर्याण वर्णिलें आहे.

रामायण व महाभारत हे फार विस्तृत ग्रंथ आहेत. त्यांच्या वाचनानें उत्तम प्रकारची नीति व व्यवहारज्ञान प्राप्त होतें. ह्या दोन्ही ग्रंथांतील कथा सोप्या व मनोरंजक भाषेनें बऱ्याच कवींनीं मराठींत उतरल्या आहेत. त्यांत श्रीधरस्वामीचे रामविजय व पांडवप्रताप हे ग्रंथ मुलांस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुद्धां समजण्याजोगे आहेत. त्यांवरून रामायण व महाभारत ह्यांतील कथांची चांगली माहिती होईल.

---

४७. व्यायाम आणि विश्रांति.

शरिराचें आरोग्य राखण्यासाठीं व्यायाम फारच उपयोगी आहे. आपलें नित्याचें काम करतांना आपणांस थोडाबहूत व्यायाम होतो; पण मुद्दाम नियमित मानानें केलेल्या व्यायामापासून फार फायदे होतात. व्यायाम केल्यानें शरिरांतील सर्व मांसल भाग म्हणजे स्नायु ह्यांची हालचाल होऊन त्यांस बळकटी येते, आंग हलकें होतें, व कोणतेंही काम करण्यास हुशारी वाटते.

आपल्या देशांतील कित्येक गोसावी व बैरागी आपला एक हात एकसारखा वर धरतात; ह्यामुळें तो हळू हळू बारीक होऊन सुकून जातो. त्यांच्या त्या हातांच्या स्नायूंची सर्व हालचाल बंद झाल्यामुळें ते कमकुवत होतात व पुढें त्यांतील रुधिराभिसरण बंद होऊन ते निर्जीव व कठीण होऊन जातात. जो मनुष्य व्यायाम करण्याची हयगय करितो, त्याच्या शरिरांतील स्नायु अशाच प्रकारें हळू हळू निरुपयोगी होतात, व शेवटीं त्याची एकंदर प्रकृति बिघडून जाते.

आतां व्यायामापासून कोणते फायदे होतात तें आपण पाहूं. व्यायामाच्या योगानें श्वासोच्छ्वास जलद होऊन फुप्फुसांतील रुधिराभिसरण जलद होऊं लागतें, आणि रक्त अधिक शुद्ध झाल्यानें शरिरावर तजेला येतो, व उद्योग करण्यास उमेद येते. मेंदूस स्वच्छ रक्त पोहोंचल्यामुळें तो चांगल्या स्थितींत राहातो व विचारशक्ति वाढते. व्यायाम केल्यानें त्वचा उष्ण होऊन तिजमधून जास्त घाम निघतो, व त्या घामाबरोबर रक्तांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशुद्ध व विषारी पदार्थ बाहेर पडतात. व्यायामानें पचनशक्ति वाढते व खाल्लेल्या अन्नाचें शुद्ध रक्त बनून शरीर निरोगी राहातें.

व्यायाम दोन प्रकारचा असतो. धावणें, उड्या मारणें, घोड्यावर बसून भरधाव जाणें, कुस्ती खेळणें, बैठका मारणें, मलखांब करणें वगैरे प्रकार पहिल्या सदराखालीं येतात. फिरायास जाणें, झोके घेणें, गाडींत बसून हिंडणें, हे प्रकार दुसऱ्या सदराखालीं मोडतात. पहिल्या प्रकारचा व्यायाम श्रमाचा व दुसऱ्या प्रकारचा आरामाचा असतो. पहिल्या प्रकारांत स्नायूंस जी मेहनत पडते, तिजपेक्षां दुसऱ्या प्रकारांत फार कमी पडते. घरांत व्यायाम करण्यापेक्षां तो बाहेर मोकळ्या जागेंत केल्यानें जास्त फायदा होतो. कारण बाहेर मोकळ्या जागेंत जी शुद्ध हवा असते ती श्वासोच्छ्वासास मिळते, व आसपासचे चांगले देखावे नजरेस पडून चित्तास आल्हाद होतो.

व्यायामाचें प्रमाण हळू हळू वाढवीत गेलें पाहिजे. एकाएकींच जर अतिशय व्यायाम केला, तर स्नायूंस फाजील श्रम पडून त्यांची शक्ति क्षीण होते; पण व्यायाम हळू हळू वाढविल्यानें त्यांस बळकटी येते.

शरिराचे सर्व व्यापार सुयंत्र चालावे म्हणून व्यायाम करण्याची जशी जरुरी आहे, तशी विश्रांतीचीही जरुरी आहे. कामानें व व्यायामानें शरिराची जी झीज होते, ती भरून येण्यासाठीं शरिरास नियमित काल विश्रांति दिली पाहिजे. विश्रांति घेतल्यानें स्नायूंचा थकवा जातो, मेंदूस जोर येतो, व मज्जातंतूंची कमी झालेली शक्ति पुन्हा येते.

मुलांस व्यायाम फारच उपयोगी आहे. त्यापासून त्यांचे अवयव सुदृढ होतात. म्हणून मुलांस लहानपणापासून व्यायामाची संवय लाविल्यानें त्यांचीं शरिरें मोठीं व बळकट होतात. शरिरें मोठीं झालीं म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचारशक्तीही वाढते. घरांतील वडील मनुष्यांनीं मुलांस नेहमीं मोकळ्या हवेंत फिरण्यास लावावें. इटीदांडू, आट्यापाट्या, खोखो इत्यादि खेळ खेळण्यास मोकळ्या हवेंत जावें लागत असल्यामुळें त्यांपासून मुलांच्या प्रकृतीस फारच फायदा होतो.

मुली व स्त्रिया ह्यांसही व्यायाम आवश्यक आहे. गरीब लोकांच्या बायकांस व मुलींस घरांतील कामें करावीं लागत असल्यामुळें त्यांस बराच व्यायाम होतो; पण श्रीमंत लोकांच्या बायकांस असा व्यायाम मुळींच होत नाहीं. मोकळ्या हवेंत व्यायाम करण्यापासून किती फायदे होतात हें हिंदुस्तानांतील स्त्रियांस अद्याप कळलें नाहीं.

हल्लीं सरकारानें शाळांतून मुलांस कवाईत व तालीम शिकविण्याची योजना केली आहे, ती फारच फायदेशीर आहे.

---

४८. कर्णाची प्रार्थना आणि कृष्णाचें प्रत्युत्तर.

स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे, " वळ तुझें अनंत रहो
स्वस्थ मुहूर्तभरि, रण-श्रद्धा पुरवील, गा, अनंतर हा. ॥ १ ॥
रथचक्र उद्धरूं दे श्रुति-शास्त्रज्ञा, महा-रथा, कुलजा,
साधु न हाणिति अरिला, पाहति अ-धृतायुध व्यथाकुल ज्या. ॥२॥
तूं स्वरथीं, क्षितिवरि मी, तूं सायुध, मी अशस्त्रकवच रणीं;
न वधावें मज जों मी गुंतुनि गेलों असें रथोद्धरणीं. ॥ ३ ॥
भ्यालों न तुज हरीसहि; जो न तुला विमुख, काय कौंतर तो?
कथितों यास्तव कीं जन धर्मैं भवसिंधु, नायकों, तरतों. ॥ ४ ॥
रक्षावा धर्म बुधें, कुशळाचा धर्म हा निधी; राहें
स्थिर, जें करिसि निरायुधमथन करिल धर्महानि, धीरा, हें." ॥५॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कृष्ण म्हणे, " राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें !
नीच व्यसनीं बुडतां निंदिति दैवास, न स्वकर्मातें. ॥ ६ ॥
जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासन, शकुनि एक-मति झालां,
कैसे कपट-द्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ? ॥ ७ ॥
जेव्हां सभेसि नेली पांचाळी, मानिलें मनीं शौर्म !
तेव्हां गेला होता कोठें, राधासुता, तुझा धर्म ? ॥ ८ ॥
फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग,
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां ? वृषाँ, सांग. ॥ ९ ॥
चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले, असें नृपें खोटें
कर्म करवितां, कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? ॥ १० ॥
केले दग्ध जतु-गृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा, सूत-नंदना, तेव्हां ? ॥ ११ ॥
अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां, त्वां वारिलें न तें कर्म;
तेव्हां गेला होता कोठें, राधा-सुता, तुझा धर्म ? ॥ १२ ॥
पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि जो जसा कुचला;
आतांचि बरा सुचला ! काळगृहा सर्व व्हा परांसु चला. ॥ १३ ॥
मागेंचि तुम्ही भजतां धर्माला तरि तुम्हांस वांचविता;
आतां मरा, न वांचे दीप्त-गृहीं जो न तोय सांचविता. ॥ १४ ॥
मागेंचि धर्म करितां, जरि देतां राज्य, धर्म वांचविता ;
न जगे, जो दुर्भिक्ष-व्यसनापूर्वी न धान्य सांचविता. ॥ १५ ॥
आतां रक्षील कसा धर्म ? तुम्हीं वित्त-मेध-मत्तांनीं-
जो लोटिला दहादां, स्वहितहि मानूनि अहित, लत्तांनीं. ॥ १६ ॥
रक्षावा धर्म असा करिशी उपदेश, तरि असे मान्य !
रक्षितसों धर्मातें ; आम्हांला धर्म ठाउका नान्य." ॥ १७ ॥

मोरोपंत—कर्णपर्व.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४९. परोपकार.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारें" असें तुकोबा म्हणतात. ह्यांतील भाव असा कीं, केवळ दुसऱ्यांच्या उपयोगीं पडून आयुष्य घालविणारे साधु हे लोकांचें बरें करण्याकरितांच उत्पन्न होतात. अशा प्रकारें आयुष्य घालविण्यांतच खरें सुख आहे, असें ग्रीस देशांतील सोलन नांवाच्या प्रख्यात ज्ञानी पुरुषानें लिहून ठेविलें आहे. परोपकारापासून इतर जनांस सुख होऊन उपकार-कर्त्यालाही संतोष होतो.

राजा भर्तृहरि मोठा कवि होता. त्यानें मनुष्यांचे चार वर्ग कल्पिले आहेत. पहिला वर्ग स्वार्थबुद्धि न ठेवितां दुसऱ्यांचें सुख साधणाऱ्यांचा. दुसऱ्या वर्गांत, स्वतांचें हित साधून दुसऱ्यांचें करवेल तितकें बरें करणाऱ्यांचा समावेश होतो. जे लोक आपलें हित साधण्याकरितां दुसऱ्यांचें अहित झालें तरी विशेष परवा करीत नाहींत, ते तिसऱ्या वर्गांत येतात. आणि चौथ्या वर्गांतील लोक म्हणजे आपलें नुकसान सोसूनही दुसऱ्यांस अपकार करणारे जे, ते होत. ह्यांस मानव ही संज्ञा शोभते किंवा नाहीं, ह्याचीच शंका आहे. आतां जसे पहिल्या वर्गांतील उत्तम पुरुष विरळा उत्पन्न होतात, तसे चौथ्या वर्गांत घालण्यास योग्य असे मनुष्यरूपी राक्षसही सुदैवानें फारसे आढळत नाहींत. बहुतेक संसारदक्ष लोक दुसऱ्या वर्गांतील असतात; त्यांस आपण चांगले म्हणतों. पण तिसऱ्या वर्गांतील दुष्टबुद्धि व आपलपोटे लोक ह्यांचा भरणा बराच मोठा असतो, ही दुःखाची गोष्ट होय. तुकोबांनीं वर्णिलेले संत हे पहिल्या वर्गांत येतात. त्यांच्यासारखें होण्याचा प्रयत्न आपण सर्वांनीं करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्येक प्राण्यानें स्वतांच्या पराक्रमानें राहावें अशी परमेश्वराची इच्छा दिसून येते खरी; तथापि त्यानेंच सर्व मानवी प्राण्यांस अशा कांहीं बंधनांनीं एकमेकांशीं बांधून ठेविलें आहे कीं, त्यांस परस्परांच्या सुखाची अपेक्षा करावी लागते, व त्यामुळें साहजिक रितीनें परस्परांस योग्य तें साह्य करावेंसें वाटतें. पितापुत्र, भाऊभाऊ, नवराबायको इत्यादि नातीं अशीं लावून दिलीं आहेत कीं, त्यांमुळें त्या माणसांस एकमेकांचें दुःख सहन न होऊन तीं एकमेकांच्या सुखासाठीं झटत असतात. जी गोष्ट एका कुटुंबास लागू, तीच सर्व मानवी कुटुंबांस लागू आहे. सर्व माणसें ईश्वराचीं लेंकरें असल्यामुळें त्यांचें परस्पर बंधुत्वाचें नातें येतें. ह्याकरितां सर्व मनुष्यांनीं, एकमेकांचें उणें न पाहातां, एकमेकांस साह्य करावें, हें अत्यंत उचित आहे.

दुसऱ्यांच्या नेहमीं उपयोगीं पडणाऱ्या मनुष्याची चहा लोकांत किती असते, तें सर्वांस माहीत आहेच. एकाद्या लहान मुलांच्या वर्गांत देखील जो मुलगा इतरांच्या नेहमीं उपयोगीं पडतो तो सर्वांना आवडतो, व त्याच्याकरितां सर्व मुलें थोडीबहूत घस सोसण्यास नेहमीं तयार असतात. तोच एकादा आपलपोट्या मुलगा असला, तर त्याची वर्गांत कोणी फारशी परवा करीत नाहीं, व बहुधा कोणी त्याच्या उपयोगींही पडत नाहीं. अशामुळें त्यास फार अडचणी येतात, व तो नेहमीं त्रासलेला व दुःखी असतो.

ह्या जगामध्यें सर्व मनुष्यांस बुद्धि, शक्ति अथवा संपत्ति सारखीच वांटलेली नसते. कोणी इतके तीव्रबुद्धि असतात कीं, ते आपल्या बुद्धिसामर्थ्यानें अनेक प्रकारचे नवीन शोध लावितात; तर कोणाची बुद्धि इतकी मंद असते कीं, त्यांस साध्या गोष्टीही लवकर समजत नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असाच फरक शरीरशक्ति व संपत्ति ह्यांसंबंधानें दिसून येतो. म्हणून प्रत्येक बुद्धिमान्, सशक्त व संपन्न मनुष्याचें हें कर्तव्य आहे कीं, त्यानें इतरांस आपल्या सामर्थ्याचा उपयोग करून द्यावा, व त्यांचें सुख वाढविण्याचा यत्न करावा. " परोपकारीं पुण्य घडे, परपीडनीं पाप जडे, " अशा अर्थाचे आदेश सर्व धर्मग्रंथांतून आढळतात. ह्यावरून हा सद्गुण सर्व धर्मांनीं अत्यंत अवश्य असा ठरविला आहे, व त्याचा सर्वांनीं अवलंब करणें हें श्रेयस्कर आहे.

---

५०. दुःशासनाच्या वधाचा सूड घेण्याला दुर्योधन निघतो.

धृतराष्ट्र—(दुर्योधनास पोटाशीं धरून) बाळा, धीर धर. मला आणि दुःखानें विव्हल झालेल्या ह्या तुझ्या आईलाही धीर दे.

दुर्योधन—बाबा, आतां तुम्हांला धीर देणें शक्यच नाहीं. आतां (गीति) मारिन यत्पुत्रां मी, त्या कुंतीसह तुम्हीहि शोकांत
राहोनि आज पासुनि मिरवित जा पुत्रशोक लोकांत ! ॥१॥

गांधारी—बाळा, आतां तूं एकटा राहिलेला आहेस तोच आम्हांला पुष्कळ आहेस ! आतां दुसऱ्या कोणाविषयीं कशाला शोक करूं ? तर बाळा, तूं तरी आतां युद्धास जाऊं नको. तुला हात जोडतें, युद्धाचा नाद सोडून दे. माझ्या शब्दाला मान दे !

धृतराष्ट्र—बाळा, ऐक आपल्या आईचें म्हणणें, व ज्याचे आतां सर्व स्नेही व आप्त लयास गेले आहेत, त्या माझेंही ऐक. पाहा,
(शार्दूलवि०) गेले द्रोणहि भीष्म, मीं न गणिले दायाद ज्यांच्या बळें,
पार्थें कर्णसमक्ष तत्सुतवधें सर्वां जनां त्रासिलें ; ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वांना निवटूनि हा रिपु तुला आतां वधूं पाहतो,
वैरा सोडुनि पाळ अंध पितरां टाकूनियां मान तो. ॥१॥

दुर्योधन—बरें, युद्ध सोडून मीं करावें तरी काय ?

गांधारी—जसें तुझा पिता आणि विदुर सांगतील, तसें कर.

संजय—असेंच करावें, महाराज !

दुर्योधन—अजून मला दुसऱ्याचा विचार घेणें राहिलें आहे काय ?

संजय—महाराज, जिवांत जीव आहे तों पर्यंत यश मिळविण्याची इच्छा करणारांनीं शाहाण्या माणसांचा विचार घेतलाच पाहिजे.

दुर्योधन—(रागानें) बरें तर, आपण शाहाणे आतां काय योग्य म्हणून सांगाल, तें मी ऐकतों. बोला !

धृतराष्ट्र—बाळा, संजय योग्य गोष्ट सांगत असतां त्यावर रागावून काय फळ ? तूं जर थोडा भानावर येशील, तर मीच तें सांगतों. ऐक.

दुर्योधन—बरें आहे, आपण सांगावें काय तें !

धृतराष्ट्र—बाळा, फार काय सांगावयाचें आहे ? तूं आतां युधिष्ठिरास पसंत असतील त्या अटींवर त्याच्याशीं समेट करावा.

दुर्योधन—बाबा, आई पुत्रवत्सल म्हणून, संजय असमंजस म्हणून, असें खुशाल सांगोत ! पण तुम्हांलासुद्धां अशी कशी भुरळ पडली ? किंवा पुष्कळ मुलगे मेल्यानें झालेल्या दुःखाचाच हा परिणाम असावा ! बाबा, शंभर भाऊ जिवंत असतां प्रत्यक्ष वासुदेवानें केलेली शिष्टाई ज्यानें नाकारिली, त्याच म्यां दुर्योधनानें, आतां भीष्म, द्रोण, व असंख्य मांडलिक राजे ह्यांचा अंत डोळ्यांनीं समक्ष पाहून, केवळ स्वशरीर संभाळण्याच्या इच्छेनें, अभिमानी पुरुषास लाज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणणारा असा समेट पांडवांशीं करावा काय ? आणखी, अरे राजनीति जाणणाऱ्या संजया,

(साकी) हीनशक्ति रिपु त्याशीं संधी करितिल कैसे राजे ?
निहतबंधु मी, पांडव चारी बंधूंनीं युत साजे ! ॥

धृतराष्ट्र—अरे बाळा, तरी सुद्धां मींच सांगितलें तर युधिष्ठिर हवें तें करील. शिवाय सर्व गोष्टी दैवाप्रमाणें घडतात असें तो म्हणत असतो.

दुर्योधन—बरें, मग ?

धृतराष्ट्र—ऐक सांगतों. युधिष्ठिराचा पण असा आहे कीं, मी एकाही भावाच्या जिवास धक्का बसला असतां प्राण ठेवणार नाहीं; आणि युद्धांत तर पुष्कळदां दुर्धर प्रसंग येतात. ह्याकरितां तुला आवडेल तसा संधि करावयास तो तयार असणारच.

संजय—होय, असेंच आहे.

गांधारी—मुला, पित्याचा हा सुयुक्तिक उपदेश ऐक.

दुर्योधन—बाबा, आई, संजया, तुमच्याच तोंडून न्याय झाला !

(शा० वि०) एका बंधुविनाहि जीवित नसो धर्मप्रतिज्ञा अशी;
मेले शंभर बंधु ! जीवितधनीं आशा धरूं मी कशी ? ॥
मी दुःशासन-शोणिताशन-रिपु-प्राणा नको संहरूं ?
लज्जा मानहि सोडुनी कृपणसा संधीहि त्यांशीं करूं ? ॥ १ ॥

गांधारी—हाय रे बाळा दुःशासना ! दुर्मर्षणा ! विकर्णा ! हाय ! हाय ! ही शंभर वीरांस जन्म देणारी गांधारी शंभर दुःखांसच प्रसवली ! पुत्रांस नव्हे ! (सर्वच रडूं लागतात.)

प० ब० गोडबोले—वेणीसंहार (थोडा फेर करून).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५१. हिंदुस्तानांत चालणारे मुख्य शक.

एकादी विवक्षित ठळक गोष्ट घडल्यापासून कालगणना करितात; त्या कालगणनेस शक, संवत् किंवा सन असें म्हणतात. ही कालगणना त्या गोष्टीनंतर किंवा पूर्वी अमुक वर्षें, अशी करितात. राजा युधिष्ठिराला राज्याभिषेक झाला, तेव्हांपासून युधिष्ठिरशकास आरंभ झाला. त्याप्रमाणेंच येशू ख्रिस्त जन्मला तेव्हांपासून इसवी सन सुरू झाला. कालगणनेची सोय असल्यानें अमुक गोष्ट अमुक काळीं घडली असें निश्चितपणें सांगतां येतें. ही सोय नसेल, तर गतकालीन गोष्टी नक्की केव्हां घडल्या हें समजणार नाहीं, व सर्व घोटाळा होऊन जाईल.

हल्लीं ह्या देशांत मुख्य शक चालू आहेत ते एणेंप्रमाणें :—

१. सर्वांत जुना असा शक विक्रमसंवत् होय. त्यापूर्वी युधिष्ठिरादि शक होऊन गेले, पण ते हल्लीं प्रचलित नाहींत. हा संवत् मूळ मालव देशांतील लोकांचा होता. तेथील राजे हा शक पाळीत होते. पुढें सुमारें पांचशें वर्षांनीं उज्जनीस विक्रमादित्य नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें तेथील लोकांस मोठ्या नांवारूपास आणिलें व अतुल कीर्ति संपादिली; म्हणून त्याचें नांव ह्या शकास मिळालें. विक्रमसंवत् सुरू होऊन आज म्हणजे इ० स० १९०६ च्या डिसेंबर महिन्यांत त्याचें १९६३ वें वर्ष चाललें आहे. तो विशेषतः उत्तर हिंदुस्तानांत चालू आहे. आपल्याकडेही व्यापारी लोक संवतच पाळितात. संवताचा वर्षारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस होतो.

२. विक्रमसंवतानंतर ५६ वर्षांनीं इसवी सन सुरू झाला. ख्रिस्ती धर्माचा संस्थापक जीजस म्हणजे येशू अथवा इसा, ह्याच्या जन्मापासून हा सन मोजितात. सर्व ख्रिस्ती देशांत व ख्रिस्ती लोकांच्या ताब्यांतील देशांत हा सन चालतो. इसवी सनाचें चालू साल १९०६ वें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख्रिस्ती सालाची सुरवात जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस होते.

३. तिसरा शालिवाहन शक. हा ख्रिस्ती सनामागून ७८ वर्षांनीं, म्हणजे संवत् १३५ च्या चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून सुरू झाला. हा मूळचा बौद्ध लोकांचा शक असल्यामुळें तो त्यांच्या शिलालेखांत आढळतो, व म्हणूनच सिलोन, जावा, सुमात्रा, ब्रह्मदेश, सयाम ह्या देशांत तो पुष्कळ काळपर्यंत चालत होता. कनिष्क म्हणून एक बौद्धधर्मी प्रतापी राजा होऊन गेला. त्यानें विद्वान् बौद्धांची परिषद् भरविली होती. त्या गोष्टीनिमित्त किंवा त्या राजाच्या मरणानिमित्त हा शक सुरू झाला असावा. पुढें विक्रमसंवताप्रमाणेंच ह्यासही शालिवाहन नांवाच्या पैठणच्या राजाचें नांव मिळालें. हल्लीं हा शक ह्या देशांत नर्मदेच्या दक्षिणेस चालू आहे. शालिवाहन शकाच्या वर्षाचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो. चालू शकाब्द १८२८ वें आहे.

४. मुसलमान लोक हिजरी सन मानितात. तो महंमद पैगंबरास ज्या दिवशीं मक्केहून मदिनेस पळून जावें लागलें, त्या दिवसापासून मोजितात. ती गोष्ट इ० स० ६२२ ह्या सालीं १५ जुलईच्या सुमारास घडली. मुसलमानांची कालगणना चंद्राच्या गतीवर बसविली असल्यामुळें त्यांची तारीख रात्रीं सुरू होते, व सौराब्दापेक्षां त्यांच्या सालांत सुमारें अकरा दिवस कमी असतात. हल्लीं हिजरी साल १३२४ वें चालू आहे. सालाचा आरंभ मोहरमच्या पहिल्या तारखेस होतो.

५. सुरू सन हाही मुसलमानी सन आहे. ह्याचा आरंभ इ० स० ५९९ मध्यें झाला. ह्याच्या सालाची सुरवात मृगाच्या आरंभापासून होत असल्यामुळें तें सौरमानाचें आहे. त्याचें चालू साल सबां सल्लास मया व अल्लफ् म्हणजे १३०७ हें होय. मराठी दरबारांत कागदोपत्रीं सुरू सन चालत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभीं पारशी लोक हिंदुस्तानांत आले. त्यांच्याबरोबर त्यांचा यझदजर्दी हा सन इकडे आला. खलीफा उमर ह्याच्या वेळीं यझदजर्द हा पारशी लोकांचा राजा होता, त्याच्या नांवानें हा सन चालतो. त्या सालाचा आरंभ सप्टेंबर महिन्यांत होतो. हल्लीं पारशी साल १२७६ आहे. शेहनशाही म्हणून दुसराही एक सन कांहीं पारशी लोक मानितात.

हल्लीं सरकारी कामकाजांत इसवी सन चालत असल्यामुळें बहुतेक सर्व लोक व्यवहारांतही त्याचाच उपयोग करूं लागले आहेत.

---

५२. परमताविषयीं सहिष्णुता.

ईश्वरानें विवेकबुद्धि प्रत्येक मनुष्यास दिली आहे. मग कोणाही मनुष्यास माझीं मतें बरोबर आहेत व दुसऱ्याचीं मतें चुकलेलीं आहेत असें म्हणण्यास अधिकार कसा येईल? जेव्हां प्रत्यक्ष प्रमाणावरून किंवा सप्रयोग सिद्धतेवरून एकादी गोष्ट निर्विवाद ठरवितां येते, तेव्हां तिजविषयीं मतभेद असण्याचा संभव नसतो; परंतु ज्या गोष्टी केवळ अनुमानानें ठरवाव्या लागतात, त्या गोष्टींविषयीं माझेंच मत खरें असा हट्ट धरण्याचा अधिकार कोणासही पोहोंचत नाहीं. धर्माच्या बाबतींत तर बऱ्याच गोष्टी अनुमानावरही अवलंबून न राहातां केवळ श्रद्धामूलक असतात; तेव्हां धर्मसंबंधांत तर असा हट्ट किंवा मताभिमान मुळींच उपयोगी नाहीं. प्रख्यात इंग्रज ग्रंथकार व तत्त्वज्ञानी लाक हा म्हणतो कीं, "पक्ष म्हटले म्हणजे त्यांपैकीं प्रत्येकास आपणच बरोबर आहों व विरुद्ध पक्षाचे सर्व पाखंडी आहेत असें वाटावयाचेंच. पण त्यामुळें ज्यांचे हातांत सत्ता आहे, त्या पक्षाच्या लोकांनीं प्रतिपक्षीयांस छळावें किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठार मारावें, हें केवळ अविचाराचें व अमानुष कृत्य होय. तें कधींही ईश्वरास संमत होणार नाहीं."

हिंदुस्तानांत प्रथमतः जे परधर्मी लोक आले ते मुसलमान होत. त्यांनीं त्यांच्या पैगंबराच्या एका आज्ञेचा कांहीं विपरीत अर्थ केल्यानें ते अतिशयच परमत-द्वेषी बनले. बहुतेक मुसलमान राजांनीं हिंदूंचा व शीक लोकांचा छळ केला. परंतु त्यांपैकीं महापराक्रमी जो अकबर, तो फार विचारी व न्यायी असल्यामुळें, इतर धर्मीयांचा त्यानें बिलकूल छळ केला नाहीं. उलट सर्व धर्मांचें रहस्य तो नीट समजून घेत असे.

एकदां त्यानें शेख फैजी ह्यास धर्मखात्यासंबंधें चौकशी करण्यास फर्माविलें. तेव्हां, ज्या मुसलमान लोकांस धर्मखात्यांतून मदत मिळते, त्यांपैकीं पुष्कळ लोक दुराचरणी आहेत, असें कळून आलें. त्यावरून त्यानें त्या सर्वांस बोलावून त्यांशीं धर्मासंबंधीं संभाषण सुरू केलें. तेव्हां त्यांनीं आपल्या धर्माचा फार गौरव केला, परधर्माची निंदा केली, व मक्केच्या यात्रेचें व तेथील वासाचें महापुण्य वाखाणिलें. अकबरानें, त्यांस न दुखवितां, तावडतोब मक्केस त्यांची रवानगी करून दिली; व त्यांच्या नेमणुका रद्द करून, सदाचारी व खरोखर धर्माचरणांतच काल घालविणारे, अशा लोकांस देणग्या सुरू केल्या. ते हिंदू, मुसलमान, पारशी, अगर ख्रिस्ती कोणत्याही धर्माचे असोत, ते परमेश्वराचे खरे भक्त, म्हणून बादशाह त्यांस उत्तेजन देऊं लागला. तो म्हणे, कोणत्याही धर्माच्या मनुष्यानें बाकीचे धर्म खोटे असें म्हणणें रास्त नाहीं. मौलवी, पंडित, दस्तूर व पाद्री ह्या सर्वांचें म्हणणें तो शांतपणें ऐकून घेई. तो त्यांच्या सभा करी व त्यांचे धर्मविषयक वाद लक्ष लावून ऐके. राग हें सत्यतेचें प्रमाण नव्हे, तर कांहीं तरी कमतरपणा जाणवत असल्याचें चिन्ह आहे; करितां प्रत्येकानें आपलीं मतें केवळ रागानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा आग्रहानें न सांगतां, युक्तिवादानें सिद्ध करावीं, व त्यांत कोणीं चुकी दाखविली तर ती प्रांजलपणें कबूल करावी, अशी त्याची सक्त ताकीद असे.

त्यानें हिंदू वगैरे धर्माच्या लोकांवरील कर बंद केला. सर्व धर्मांतील उत्तम तत्त्वें निवडून त्यांच्या आधारानें त्यानें एक नवीन धर्मपंथ काढिला व त्यास 'दीने-इलाही' म्हणजे ईश्वराचा धर्म असें नांव दिलें. पण त्या धर्मांत न येणारांस तो छळीत नसे. त्यानें रजपूत राजांच्या कन्यांशीं लग्नें केलीं होतीं, पण त्यांच्या धर्माचरणाच्या-आड तो येत नसे. अकबराच्या राज्यांत कोणासही मतभेदामुळें छळ सोसावा लागला नाहीं.

शिवाजी हा मुसलमानी राज्याचा कट्टा शत्रु म्हणून प्रसिद्ध आहे; तथापि तो कुराण, दर्गे, मशिदी, ह्यांस पवित्र मानी, व त्यांस उपद्रव न करतां, दर्गे वगैरेचीं इनामें व वतनें चालू ठेवी व नवींही करून देई.

---

५३. मोरोपंत.

श्रीमन्मयूर कविची, देते संतोष मानवां कविता.
असता जरि भूमीवरि सुरगुरु, तरि तोहि मान वांकविता ! ॥

पुणें जिल्ह्यांत बारामती हा गांव पेशवाईत बाबूजी नाईक जोशी ह्यांजकडे जहागीर होता. त्यांच्या पदरीं रामाजीपंत पराडकर म्हणून एक जामदग्न्यगोत्री कऱ्हाडा ब्राह्मण जकातीच्या कामावर होता. त्याचा पुत्र मोरोपंत कवि. पराडकर हे मूळचे देवगडं तालुक्यांतील सौंदळचे राहाणारे. तेथून ते पन्हाळ्यास राहावयास गेले, व पन्हाळा एथेंच मोरोपंताचा जन्म शके १६५१ त झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोरोपंताचे गुरु प्रसिद्ध पंडित केशव व गणेश पाध्ये गोळवलकर हे होत. पाध्यांजवळ मोरोपंतानें संस्कृताचा अभ्यास केला. त्याची आपल्या गुरूंविषयीं किती पूज्यबुद्धि होती हें त्यानें ठिकठिकाणीं केलेल्या उल्लेखांवरून सहज लक्षांत येतें.

श्रीमदुपाध्यायोत्तम कविवर केशव-गणेश-पादरजा ॥
धरुनि शिरीं हें सद्यश लिहिलें, पीतांति साधु सादर ज्या ॥ १ ॥

भारत, भागवत, रामायण व पंचमहाकाव्यें ह्यांचें अध्ययन त्यानें केलें असलेंच पाहिजे. शिवाय त्यानें व्याकरण, न्याय, अलंकार इत्यादि शास्त्रेंही चांगलीं पाहिलीं होतीं. तसेंच एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन, श्रीधर इत्यादि कवींच्या भक्तिपरायण प्राकृत ग्रंथांचेंही त्यानें चांगलें अध्ययन केलें होतें, असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें.

काव्यरचनेकडे मोरोपंताची प्रवृत्ति कशी झाली, ह्याविषयीं कोठें स्पष्ट उल्लेख नाहीं; पण तो लहानपणींच पाध्ये ह्यांजकडे जेवावयास गेला असतां त्यानें प्रसंगास उद्देशून एक सुरस आर्या करून ती भिंतीवर लिहिली; व त्यावरून गणेश पाध्ये ह्यांनीं त्यास संस्कृत भाषा शिकण्याकरितां आपलेकडे ठेविलें, अशी आख्यायिका आहे. पुढें वडिलांस भेटण्याकरितां तो बारामतीस गेला असतां त्यानें नाइकांच्या घरांतील बायकांस दळतांना म्हणण्याकरितां सीतागीत व रुक्मिणीगीत अशीं गीतें रचून दिलीं; त्यावरून त्याचा गुण यजमानांच्या नजरेस आला, व त्यांनीं त्यास पदरीं ठेवून घेतलें.

बाबूजी नाइकांच्या चिरंजीवांनीं व इतर बऱ्याच कांहीं श्रीमंत लोकांनीं सांगितल्यावरून मोरोपंतानें काव्यरचना केली. पण त्याचीं १०८ रामायणें हीं त्यानें स्वतांच्या इच्छेनेंच रचलीं असावीं, कारण तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निस्सीम रामभक्त होता. हीं रामायणें, मंत्रभागवत, बृहद्दशम, महाभारत, हरिवंश, ब्रह्मोत्तरखंड आणि केकावली हीं मोरोपंताचीं मुख्य मराठी काव्यें होत. मुक्तामाला इत्यादि त्याचे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यानें एकंदर तीन लक्ष ग्रंथ लिहिला असें म्हणतात.

मोरोपंताच्या कवितेंत संस्कृत शब्दांचा भरणा फार, त्यामुळें ती बरीच क्लिष्ट झाली आहे; तथापि तिच्यांत स्थलविशेषीं प्रसाद व माधुर्य हे गुणही बरेच आहेत हें केकावलींतील बरेच श्लोक व

देव तुझा कैवारी, शुद्धें प्रेमें तुझ्याचि वळला गे!
दे धेनु दुग्ध धांवुनि वत्सा, इतरां तदर्थ बळ लागे. ॥ १ ॥

अशा आर्या ह्यांवरून स्पष्ट होतें. तशीच वर्णिलेला भाव अंतःकरणांत हुबेहूब उठविण्याची हातोटी मोरोपंतास चांगली साधली आहे, व त्यांत उपमेचीही पुष्कळ वेळां भर पडते. पाहा :—

तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रा-रथीं, जसा पाटीं
सुचिर-क्षुधित ब्राह्मण हां हां म्हणतांहि वाढिल्या ताटीं. ॥ १ ॥

पंतांच्या कवितेंत संस्कृत शब्द पुष्कळ असून निरनिराळ्या प्रांतांतील मराठी व इतर शब्दही आढळतात. ह्या मिश्रणाविषयीं त्यांनीं स्वतांच म्हटलें आहे :—

संस्कृत-प्राकृत-मिश्रित, यास्तव कोणी म्हणेल हे कंथा ॥

तथापि त्यांची भाषा एकंदरीनें फारच प्रौढ, मनोहर, व शब्दालंकार व अर्थालंकार ह्यांनीं अतिशय शृंगारलेली अशी असून व्याकरणशुद्ध आहे. भाषेवर त्यांचा अधिकार किती होता ह्याची साक्ष त्यांचीं निरनिराळ्या वृत्तांत ग्रथिलेलीं निरोष्ठादि रामायणें देत आहेत. काशी व नाशीक एथील विद्वानांनींही पंतांच्या कवितेचा गौरव केला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्रांत त्यांची कविता सोलापूरचा विख्यात कीर्तनकार आणि कवि जो रामजोशी त्यानें प्रसिद्धीस आणिली.

पंतांचा काल शके १७१७ मध्यें पंढरपूर एथें झाला. तेथेंच त्यांचे वंशज हल्लीं राहातात.

---

५४. चंद्रोदय.

वसंततिलक.—या वेळिं कुंकुमचि चर्चुनि भाळदेशीं,
राहे पतीस निरखूं युवतीच जैशी, ॥
तैशी दिशा सजलि उत्सुक काय पूर्व !
ती तांबडी धरुनि कांति दिसे अपूर्व. ॥ १ ॥
निर्वीर भूमि-तल पाहुन अंधकार
चाले मदांध गज हर्षभरें पुढार; ॥
पूर्वेस त्यास मृगराज मृगांक भेटे;
हें अंधकार-गज-रक्तच लाल वाटे ! ॥ २ ॥
लक्षावधी उगवती गगनांत तारे,
हे भालदार शशि-भूपतिचेच सारे; ॥
बुक्का गुलाल उधळीतच मानपानें
ते आणितात निज-नाथ महोत्सवानें. ॥ ३ ॥
सारून दूर पडदे जलद-स्वरूप,
आला प्रगल्भ नटराज पुढें अमूप. ॥
जों लावितात टक एकच लोक-मात्र,
तों रंग-मंडपिं नभीं शशि रम्य-गात्र ! ॥ ४ ॥
चंद्र-प्रभा गिरि-शिरांवर फांकतात,
ज्यांच्या लपे तम भर्यार्त गुहोदरांत. ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजाच तो मन उदार करून ठेवी,
डोक्यावरी करं जणों अभयास दावी ! ॥ ५ ॥
नाना लतौषधिंस जीवन घालणारे,
एकाच काळिं जन-नेत्र सुखावणारे, ॥
पृथ्वी सुधौं-धवल सर्व करून धौले,
हे शीत शीत-किरणें कर धाडियेले. ॥ ६ ॥
आकाश-भूमि-गिरि-कंदरिं पूर्ण सौंचे,
ओघावरी पडति ओघचि चंद्रिकांचे; ॥
क्षीराब्धिच्या उठति या लहरीच काय !
कीं सर्व चंदन-रसांत बुडून जाय ! ॥ ७ ॥
या चांदण्यांत अमृतांत जणों बुडाल्या,
हर्षांत डोलतिहि नाचति मत्त झाल्या; ॥
वेली कशा स्वतनुंनीं तरु वेढितात !
प्रेमें जनां निज महोत्सव दावितात ! ॥ ८ ॥

वासुदेव वा० खरे—यशवंतराव महाकाव्य.

---

५५. एक मौजेची गोष्ट.

नाशीक एथें वामनराव म्हणून एक डाक्टर राहात असत. त्यांचा भुतांखेतांवर भरवसा नसे. त्यांचें तें म्हणणें ऐकून ऐकून त्यांचा कारभारी, पांडोबा, हाही तसेंच म्हणे, पण त्याची त्याविषयीं खातरी नव्हती.

एके दिवशीं रात्रीं १० वाजण्याचे सुमारास वामनरावांची सैंपाकीण आपल्या धनिणीस म्हणाली, "छे ! दहा वाजले ! माई, तुम्ही मला रोज असा उशीर करतां, आणि मला मग रस्त्यानें भय वाटतें ! "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माई—काशीबाई, भय हो कसलें ? दिवा घ्यावा म्हणजे झालें. लवकर आटोपणें का स्वाधीनचें आहे ?

काशीबाई—काळोखाला का मी भितें ? भलतेंच ! वाटेंत वडाखालीं दगा होतो म्हणतात. परवां तो रामा गवळ्याचा भाऊ जातां जातां तेथें मोठ्यानें ओरडला आणि अगदीं बेशुद्ध होऊन पडला !

इतक्यांत पांडोबा आला व म्हणाला, "वा ! कोठलें तरी कांहीं तरी झुळवून सांगतां वाटतें ? तो लख्या पडला दारू पिऊन, आणि म्हणे त्यास भुतानें पछाडलें !" माईची मुलगी सरूताई जवळच मुलास निजवीत होती, ती म्हणाली, "पांडोबा, तें असेल. पण उगीच भूत नाहीं म्हणूं नका. अगदीं आमच्या घरांतलीच गोष्ट सासूबाई सांगतात. त्यांच्या आजेसासूच्या वेळीं कितीतरी भूतचेष्टा होत असत. मग कसें ?"

पांडोबा म्हणाला, "अहो सरूताई, पहिलीं माणसें भोळीं होतीं. तीं सहज फसत असत. तशा गोष्टी आतां घडणार नाहींत. परवां मीसुद्धां अंधेरांत उभा राहून तोंडांत पेटलेली उदकाडी धरून एकाला भूत दाखविलें. त्यांत काय आहे ? ढोंग सारें !"

डाक्टरांचा गडी तुक्या आंगणांत उभा होता. त्यास पांडोबाची मौज उडवावी असें वाटून तो आंत येऊन म्हणाला, "कां हो पांडोबा, तुम्हीं ऐकलें कीं नाहीं ? आपली शेजारची कुसाताई आज गंगेवर गेली होती, तेथें झपाटली आणि लगेच अवसर भरून मेली. ती खास भूत होणार आणि आमच्या दाराशींच बसणार, बघा ! मग तुमची खातरी होईल !" "चल, मूर्ख कोठला ! मीं सकाळीं तिला पाहिलें, आणि हा शाहाणा म्हणे ती भूत झाली !" असा पांडोबानें त्याचा उपहास केला.

इतक्यांत काशीबाई निघाली, व पांडोबा तिला पोहोंचवायाला गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुक्याही तेथून चालता झाला. बाहेर अंधार किट्ट पडला होता. एक लहानसा मिणमिण जळणारा गोड्या तेलाचा कंदील काशीबाईच्या हातांत होता. रस्त्यांत पाय ठेवतात तोंच कशाचासा धक्का लागून कंदिलाचें दार उघडून तो विझला. तेव्हां पांडोबानें थेट्टेनें म्हटलें, "कुसाताई नाहींना आली!" हे शब्द त्याच्या तोंडांतून निघाले न निघाले तों त्याच्या पायास कोणाचीशी मिठी बसली. मिठीबरोबर एथेंच कुसाताईचें भूत बसेल असें तुक्या म्हणाला होता, त्याची आठवण होऊन पांडोबास धडकी भरली, व "म-म-ला-कु-सा-सा-ता-ईनें ध-धरलें!" असें अडखळत अडखळत तो मोठ्यानें ओरडला.

ती गडबड ऐकून आंतून माईनीं व सरूताईनें दार उघडिलें. उजेड पडल्याबरोबर पांडोबाचे पाय सुटले खरे, पण त्याचें सर्वांग घामानें डबडबलें होतें. मागें पाहाण्याची त्याची छाती होईना! इतक्यांत तुक्या चटकन कोठूनसा येऊन म्हणाला, "आं! आली का बया?" पांडोबा म्हणाले, "कोण कोण? कुसाताई तुला दिसली? तिनेंच मला धरिलें ना?" एवढें होत आहे तों माईचे मुलगे बाबूराव व गजोबा हे खालीं आले, व गलबल काय आहे म्हणून शेजारून कुसाताईही आली! तिला पाहून पांडोबा भीतीनें झटदिशीं तुक्याच्या मागें झाला. तेव्हां तर सर्वत्र हशाच पिकला! मग सर्वांचीं बोलणीं होऊन सरूताई कुसाताईस म्हणते, "काय ग कुसाताई, तूं तर जिवंतपणींच माणसांस धरूं लागलीस? पांडोबांचा भुतांखेतांवर भरवसा नाहीं म्हणून बरें, नाहींतर ते घाबरूनच गेले असते!!" दुसरे दिवशीं तें सर्व कृत्य तुक्याचें असें कळलें!

"वाजे पाऊल आपुलें, म्हणे मागें कोण आलें?" असें रामदासानें म्हटलें आहे, तें खोटें नव्हे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग दुसरा.

इतिहास.

५६. पैगंबर महंमद.

तेराशें वर्षांपूर्वी अरबस्तानांतील लोक मूर्तिपूजक होते. मक्का शहर हें त्यांच्या देवतांचें मुख्य स्थान होतें: तेथील देवळांची व्यवस्था कुरेश कुळांतील दहा प्रमुख अरबांच्या हातीं होती. त्या दहाजणांपैकीं अबदुल मुत्तलीब हा एक होता. त्याच्या अबदुल्ला नांवाच्या एका मुलास इ० स० ५७१ मध्यें एक पुत्र झाला. तोच मुसलमानी धर्माचा संस्थापक पैगंबर महंमद ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. महंमदसाहेब लहान असतांच त्यांचा आजा व आईबाप वारले, व त्यामुळें त्यांचें पालन त्यांचा चुलता अबू तालीब ह्यानें केलें. अबदुल मुत्तलिबाचें घराणें आपल्या औदार्यामुळें फार मोडकळीस आलें होतें, म्हणून महंमदसाहेबांस लहानपणीं दुसऱ्यांचीं गुरें राखावीं लागलीं, आणि वयांत आल्यावर सारवानाचें काम करावें लागलें. ते पंचवीस वर्षांच्या उमरीचे झाले, तेव्हां, त्यांची सचोटी व त्यांचा प्रेमळ आणि शांत स्वभाव पाहून, खदीजा बिबी नांवाच्या एका श्रीमंत बाईनें त्यांच्याशीं लग्न लाविलें. ह्या गोष्टीमुळें महंमदसाहेबांची गृहस्थिति बरीच सुधारली.

लहानपणापासून महंमदसाहेबांच्या मनाचा कल धर्ममार्गाकडे असे. ते मोठे विचारी, चौकस आणि चाणाक्ष होते. म्हणून, ही अद्भुत सृष्टि काष्ठपाषाणांच्या देवांना उत्पन्न करतां येणें शक्य नाहीं, तिचा कर्ता आणि चालक स्वयंभू, सर्वशक्तिमान्, अनादि आणि अनंत असा एकच ईश्वर असला पाहिजे, असें त्यांस लहान वयापासूनच वाटूं लागलें होतें. पुढें ते जसजसे मोठे होत गेले, तसतसें त्यांचें तें मत अधिकच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दृढ झालें, व ते आपल्या चाळिसाव्या वर्षीं आपणांस ईश्वराचा पैगंबर म्हणजे प्रेषित असें म्हणवूं लागले.

चाळीस वर्षांच्या उमरींत पैगंबरांनीं एकेश्वरी मताच्या प्रतिपादनास आरंभ केला, व तीन वर्षांत बरेच लोक त्यांचे अनुयायी झाले. तें पाहून मूर्तिपूजक अरबांस धास्ती पडली, व त्यांनीं पैगंबरांस हातीं घेतलेलें काम सोडून देण्याकरितां लांच देऊं केली; परंतु तिचा त्यांनीं अव्हेर केला. तेव्हां अरबांनीं त्यांचा व त्यांच्या अनुयायांचा छळ करण्यास आरंभ केला. पण पैगंबरांनीं छळ आणि अपमान सोसून आपलें काम जारीनें चालू ठेविलें. त्यांची सहनशीलता पाहून, व त्यांचा निष्काम सदुपदेश ऐकून, एक दोन वर्षांत मक्केंतील कांहीं वजनदार व श्रीमंत अरबही मुसलमान झाले; तेव्हां तर मक्केकर फारच बिथरले. ह्याच सुमारास खदीजा बिबी आणि अबू तालीब हीं दोघेंही मरण पावलीं, त्यामुळें पैगंबरांचें मन फार उद्विग्न झालें. मक्का सोडून ते तैफ एथें गेले. पण त्यांचा उपदेश तेथील लोकांना आवडला नाहीं, म्हणून त्यांनीं त्यांना धोंडमार करून घालवून दिलें; तेव्हां पैगंबरांस पुन्हा मक्केस परत जावें लागलें. त्या वेळेस मदिना एथील कांहीं अरब तेथें यात्रेकरितां आले होते. ते पैगंबरांची प्रासादिक वाणी आणि सदुपदेश ऐकून फार खूश झाले, व त्यांनीं त्यांना आपल्या गांवीं येण्याची विनंती केली.

इकडे मक्केकरांनीं पैगंबरांस ठार मारण्याचा घाट घातला. तें त्यांस कळलें तेव्हां ते तेथून पळून इ० स० ६२२ सालीं मदिनेस गेले. ह्या गोष्टीला 'हिजरा' म्हणजे 'पलायन' असें म्हणतात, व ह्याच वर्षापासून मुसलमानी सन सुरू होतो. मदिनाकरांनीं पैगंबरांचें उत्तमप्रकारें स्वागत केलें, व ते सर्व मुसलमान झाले. हा नवीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्म बुडविण्याकरितां मूर्तिपूजक अरबांनीं मुसलमान अरबांवरोबर लढाई सुरू केल्यामुळें धर्मरक्षणाकरितां निरुपायास्तव पैगंबरांस हातीं शस्त्र धरावें लागलें. दहा वर्षेपर्यंत हें भांडण चालू होतें. शेवटीं मुसलमानी धर्माचा पूर्ण जय होऊन अरबस्तानांत मूर्तिपूजेचा अगदीं लोप झाला व मक्केंतील काबा देवळाला मशिदीचें रूप प्राप्त झालें.

महंमदसाहेब आतां पहिल्यासारखे केवळ धर्मोपदेशकच राहिले नव्हते; सर्व अरबस्तानाचें स्वामित्वही त्यांच्याकडे आलें होतें. तरी त्यांनीं आपला साधेपणा बिलकूल सोडिला नाहीं. अरब लोकांतील बालहत्या, सुरापान, जुगार वगैरे वाईट चाली त्यांनीं मोडून टाकिल्या, व राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेकरितां चांगले नियम घालून दिले. शेवटीं इ० स० ६३२ मध्यें ते मरण पावले. मरणापूर्वी त्यांनीं शेजारच्या राष्ट्रांना मुसलमानी धर्म स्वीकारण्याकरितां आमंत्रण केलें होतें; परंतु त्यांनीं त्यांचा फार उपहास करून त्यांच्या वकिलांस हांकून लाविलें. त्या अपमानाचा सूड मुसलमानांनीं पुढें पूर्णपणें घेतला. पैगंबरांस मरून फार वर्षें झालीं नाहींत, तोंच त्या सर्व राष्ट्रांस जिंकून त्यांनीं आपला धर्म व अमलही पश्चिमेस मिसरदेशापर्यंत व पूर्वेस सिंधुनदापर्यंत स्थापित केला.

---

५७. गिझनीचा सुलतान महमूद व लाहोरचे राजे.

आजपर्यंत आशिया खंडांत जे फार प्रसिद्ध राजे होऊन गेले, त्यांच्यापैकीं गिझनीचा सुलतान महमूद हा एक होय. तो मोठा पराक्रमी आणि महत्वाकांक्षी पुरुष होता. धर्मप्रसाराकरितां व लूट मिळविण्याकरितां त्यानें हिंदुस्तानावर सतरा स्वाऱ्या केल्या, व शेंकडों देवळें पाडून जमीनदोस्त केलीं आणि पूर्वेस कनोजपावेतों व दक्षिणेस सोमनाथापर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा देश लुटून अपार संपत्ति स्वदेशास नेली. त्याची खोड मोडण्याचें सामर्थ्य हिंदू लोकांत नव्हतें; कारण, शूर रजपूत वीरांमध्यें उत्तरेकडील



महमुदाची कबर.

थंड प्रदेशांत राहाणाऱ्या धिप्पाड व काटक पठाण व तुर्क लोकांबरोबर नेटानें शेवटपर्यंत लढण्याची धमक राहिली नव्हती. पंजाबांत लाहोरच्या राजांनीं महमुदास बराच प्रतिबंध केला खरा, परंतु शेवटीं त्यांत त्यांचाच सर्वस्वीं नाश झाला.

इ० स० १००२ मध्यें महमुदानें पहिली स्वारी पंजाबावर केली, तेव्हां लाहोरचा राजा जयपाळ त्यास आडवा आला. दोघांची लढाई पेशावराजवळ झाली. जयपाळ पराभव पावून शत्रूच्या हातीं लागला. पण महमुदानें त्याच्यापासून खंडणी देण्याचें वचन घेऊन त्यास सोडून दिलें. जयपाळ लाहोरास सुरक्षितपणें येऊन पोहोंचला खरा, परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालेल्या पराभवामुळें त्यास इतकें वाईट वाटलें कीं, आपला पुत्र अनंगपाळ ह्याच्या स्वाधीन राज्य करून, त्यानें अग्निकाष्ठें भक्षून प्राण दिला ! बापानें देऊं केलेली खंडणी अनंगपाळ वेळच्यावेळीं देत गेला. दरम्यान इ० स० १००५ सालीं महमुदानें भतियाचे राजावर आणि त्याच्यापुढील सालीं मुलतानच्या मुसलमान अधिपतीवर स्वाऱ्या करून त्यांचा मोड केला.

पुढें कांहीं वर्षांनीं अनंगपाळाच्या मनांत महमुदाच्या वर्चस्वाचें जूं झुगारून द्यावें असें आलें. त्याकरितां त्यानें पंजाबांतील सर्व संस्थानिक व आपल्याशीं मित्रभावानें वागणारे दिल्ली, कलंजर, अजमीर वगैरे ठिकाणचे राजे, ह्यांना एकत्र केलें. हिंदू स्त्रियांनींही ह्या वेळेस आपल्या आंगावरचे डागिने विकून राजाला मदत केली ! जय्यत तयारी केल्यावर १००८ सालीं अनंगपाळ मोठ्या फौजेनिशीं महमुदावर खैबर घाटापर्यंत चालून गेला. एवढ्या मोठ्या फौजेशीं टक्कर देण्याचा प्रसंग महमुदास ह्यापूर्वी कधीं आला नव्हता, म्हणून आपल्या लहानशा फौजेसभोंवतीं खंदक खणून तो आंत मोठ्या हुशारीनें बसला. चाळीस दिवसपर्यंत दोन्ही दळें समोरासमोर तळ देऊन पडलीं होतीं. शेवटीं महमूदच खंदकाबाहेर पडला, परंतु गक्कर जातीच्या अडदांड रानटी लोकांनीं मोठ्या निकरानें हल्ला करून त्याची पिछेहाट केली; व लगट करून ते थेट त्याच्या छावणींत शिरले. महमुदाच्या फौजेचें धैर्य खचून ती पळ काढण्याच्या बेतांत आली. परंतु दैवगति कशी विचित्र पाहा ! अशा ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं अनंगपाळाच्या हत्तीस बाण लागून तो सैरावैरा पळूं लागला ! हिंदू लोकांना वाटलें कीं, आपला धनी पळून जात आहे; म्हणून त्यांनीं समरांगणांतून पाय काढण्यास आरंभ केला. हें महमुदाच्या लक्षांत येतांच, त्यानें निवडक स्वारांनिशीं पळणाऱ्या शत्रूंवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निकराचा हल्ला करून त्यांची पुरी दाणादाण केली. शत्रूंचा पाठलाग करीत करीत तो थेट नागरकोटपर्यंत गेला, व तेथील देवळांतील अपार संपत्ति लुटून स्वदेशास परत गेला.

त्यानंतर १०२२ पर्यंत महमुदानें स्थानेश्वर, मथुरा, कनोज वगैरे प्रसिद्ध स्थळांवर स्वाऱ्या करून अतोनात लूट मिळविली व असंख्य लोकांस गुलाम करून धरून नेलें. ह्यांपैकीं शेवटच्या मोहिमेंत अनंगपाळाचा मुलगा जयपाळ ह्यास सुलतानी फौजेस अडथळा करण्याची दुर्बुद्धि उत्पन्न झाली, व त्यामुळें महमुदानें त्यास जिंकून त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडिलें. ह्याप्रमाणें पंजाब प्रांत पहिल्यानें मुसलमानांच्या ताब्यांत पूर्णपणें आला, व तो महमुदाच्या वंशजांच्या हातांत इ० स० ११८६ पर्यंत राहिला.

---

५८. शहाबुद्दीन घोरी आणि पृथ्वीराज चव्हाण.

पृथ्वीराज चव्हाण.

सुलतान महमुदानंतर सुमारें दीडशें वर्षांपर्यंत हिंदू लोकांना मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून फारसा त्रास झाला नाहीं. इ० स० ११५५ सालीं अफगाणिस्तानांतील घोर प्रांताचा संस्थानिक अलाउद्दीन घोरी ह्यानें महमुदाचें घराणें बुडविलें, व स्वतां अफगाणिस्तानावर तो स्वतंत्र रितीनें राज्य करूं लागला. ह्या अलाउद्दिनाचा पुतण्या, शहाबुद्दीन, मोठा पराक्रमी होता. त्यानें सुलतान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महमुदाप्रमाणें हिंदुस्तानावर अनेक स्वाऱ्या केल्या, व शेवटीं एथें मुसलमानांचा अमल कायम केला.

अल्लाउद्दिनाच्या वेळेस उत्तर हिंदुस्तानांत दिल्ली, अजमीर व कनोज एथें तीन प्रबळ रजपूत राजे राज्य करीत होते. अजमीरचा पृथ्वीराज चव्हाण व कनोजचा जयचंद राठोर हे दिल्लीच्या तुवर वंशीय अनंगपाळराजाचे नातू, म्हणजे मुलीचे मुलगे, होते. अनंगपाळ निपुत्रिक होता, म्हणून त्यानें पृथ्वीराजास आपल्या गादीचा वारस केलें. आजानें आपणास कांहीं दिलें नाहीं, म्हणून जयचंदास फार वैषम्य वाटलें. अनंगपाळाच्या मरणानंतर दिल्ली आणि अजमीर हीं दोन राज्यें एक झालीं. जयचंदास पृथ्वीराजाचा उत्कर्ष सहन न होऊन त्यानें चुरशीनें शहाबुद्दिनास त्याच्यावर स्वारी करण्याचें सुचविलें. इ० स० ११७६ पासून ११८६ पर्यंत शहाबुद्दीन सिंध, मुलतान व पंजाब एथील मुसलमानी राज्यें खालसा करण्यांत गुंतला होता. त्या कामांतून मोकळा होऊन फार दिवस झाले नाहींत, तोंच त्यास जयचंदाकडून पृथ्वीराजास धुळीस मिळविण्याची भर मिळाली. शहाबुद्दीन अशी संधि पाहातच होता. त्यानें लागलीच ११९१ सालीं पृथ्वीराजावर मोहीम केली. दोघांचा सामना स्थानेश्वराजवळ झाला. रजपूत लोक मोठ्या शौर्यानें लढले, व मुसलमानांचा पूर्ण पराभव होऊन शहाबुद्दिनास आपला जीव घेऊन गिझनीस पळून जावें लागलें. ह्या अपजयामुळें त्याला अगदीं चैन पडेनासें झालें, व लागलेला काळिमा दूर करण्याकरितां त्यानें जय्यत तयारी चालविली.

इकडे पृथ्वीराज जयामुळें गर्वानें फुगून गेला. जयचंदाची संयुक्ता नांवाची एक लावण्यवती कन्या होती. तिनें पृथ्वीराजास मनापासून वरिलें होतें. जयचंदानें राजसूय यज्ञास आरंभ केला, त्यांत त्यानें पृथ्वीराजास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्वारपाळाचें काम दिलें. मानी पृथ्वीराजास ही गोष्ट कशी खपणार ? अर्थात् तो यज्ञास आला नाहीं. जयचंदानें त्याचा वेडावांकडा पुतळा तयार करवून दारावर उभा केला. यज्ञ संपतांच संयुक्तेच्या स्वयंवराची तयारी झाली. स्वयंवराकरितां संयुक्ता हातांत माळ घेऊन सभामंडपांत आली. जमलेल्या राजांपैकीं एकही तिच्या मर्जीस उतरला नाहीं. फिरतां फिरतां ती दाराजवळ गेली व तेथें ठेविलेल्या पृथ्वीराजाच्या पुतळ्यास पाहातांच तिनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. पृथ्वीराज वेश बदलून गुप्तपणें तेथें जवळच उभा होता. संयुक्तेस पटकन आपल्या घोड्यावर बसवून तो हां हां म्हणतां तेथून पार पडला. जयचंदानें त्याचा पाठलाग केला, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पृथ्वीराजानें संयुक्तेशीं लग्न लावून तो तिच्याबरोबर ऐषआरामांत निमग्न झाला. राज्यकारभारावरून त्याचें मन उडालें, व त्यामुळें त्याच्या सरदारांस ती त्याची वर्तणूक आवडेनाशी झाली.

संयुक्तेच्या परिहरणामुळें जयचंदाचा द्वेषाग्नि भडकला होताच; त्यानें त्या रागावलेल्या सरदारांना आणखी चिथावून दिलें. सरदारांनीं मूर्खपणानें पृथ्वीराजास पदच्युत करण्याकरितां शहाबुद्दिनाची मदत मागितली. शहाबुद्दीन ११९३ सालीं मोठ्या फौजेनिशीं पृथ्वीराजावर पुन्हा चालून आला. दोघांची गांठ पूर्वीच्या लढाईच्या ठिकाणींच पडली. घोर युद्ध होऊन शेवटीं ह्या खेपेस हिंदूंचा पूर्ण मोड झाला. पृथ्वीराज लढाईत पडला. शहाबुद्दिनानें पृथ्वीराजाचें राज्य घेऊन कुतुबुद्दीन ऐबक नांवाच्या आपल्या एका गुलामास दिल्लीचा सुभेदार नेमिलें. पुढें लौकरच तो स्वदेशीं परत जात असतां त्यास वाटेंत गक्कर लोकांनीं ठार मारिलें. शहाबुद्दिनाच्या पश्चात् कुतुबुद्दिनानें कनोजचें राज्य जिंकून दिल्ली एथें मुसलमानी राज्याची स्थापना केली. ह्याप्रमाणें हिंदू लोकांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गृहकलह मुसलमानांच्या पथ्यावर पडले. "दोघांचें भांडण आणि तिसऱ्याचा लाभ," अशी जी म्हण आहे ती कांहीं खोटी नाहीं.

५९. चितोडचा वेढा.



चितोडच्या किल्ल्याचा देखावा.

मेवाडचा राणा लक्ष्मणसिंग हा वयानें लहान असल्यामुळें सर्व राज्यकारभार त्याचा चुलता भीमसिंग हा पाहात असे. भीमसिंगाची बायको पद्मिनी ही सिंहलद्वीपच्या चव्हाण राजाची कन्या होय. ती रूपानें फारच सुंदर होती; किंबहुना तिच्यासारखी रूपवती स्त्री दुसरी कोणीच नाहीं, असा लौकिक त्या काळीं जिकडे तिकडे पसरला होता.

दिल्लीचा सुलतान, अल्लाउद्दीन खिलजी, ह्यानें मेवाडावर इ० स० १२७५ त स्वारी करून चितोडगडास वेढा घातला, तो मुख्यत्वेंकरून पद्मिनीच्या लोभामुळेंच घातला, असें रजपूत भाट मानितात; कारण, चितोडास वेढा घातल्यावर, लबकरच, पद्मिनीस माझ्या स्वाधीन करा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा अल्लाउद्दिनानें भीमसिंगास निरोप पाठविला. पण तें बोलणें त्या रजपूत राजास कोठून मान्य होणार ? तेव्हां निदान पद्मिनीचें एकवार दर्शन झालें तरी पुरे, मी वेढा उठवून चालता होतों, असा सुलतानाचा पुन्हा निरोप आला. भीमसिंगानें उत्तर पाठविलें, "तिचें प्रत्यक्ष दर्शन तुम्हांस होणें अशक्य आहे, मात्र आरसा पुढें ठेवून त्यांत तिचें रूप तुम्हांस दाखवूं." हें बोलणें अल्लाउद्दिनानें कबूल करून तो चितोडगडावरील राजवाड्यांत गेला, आणि त्यानें पद्मिनीचें रूप आरशांत पाहिलें. नंतर तो परत जावयास निघाला, तेव्हां, शिष्टसांप्रदायाप्रमाणें, आपल्यावर विश्वास ठेवून गडावर आलेल्या सुलतानास पोहोंचविण्यासाठीं, भीमसिंग मोठ्या भरवशानें किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत गेला. पण अल्लाउद्दीन कसला कपटी ! त्यानें भीमसिंगास गोड गोड बोलून किल्ल्याखालीं आणिलें, आणि पूर्वीच दबा धरून बसविलेल्या शिपायांकडून त्यास कैद करविलें !

नंतर, पद्मिनीस स्वाधीन करशील तरच तुझी सुटका होईल, असें अल्लाउद्दिनानें भीमसिंगास कळविलें. ही गोष्ट गडावर हां हां म्हणतां पसरली. तेव्हां सर्वलोक मोठ्या काळजींत पडले, पण खुद्द पद्मिनीनें आपल्या नातलगांस कळविलें कीं, "भीमसिंगाची सुटका व्हावी आणि माझ्या अब्रूचेंही रक्षण व्हावें, अशी युक्ति मीं योजिली आहे. ती तुम्हांला मान्य असल्यास मला साह्य करा." पद्मिनीची युक्ति सर्वांस पसंत पडून त्यांनीं अल्लाउद्दिनास निरोप पाठविला कीं, "तुम्ही किल्ल्याचा वेढा उठवा; पद्मिनीस तुमच्या लष्करांत पाठवितों; मात्र ती एकटी न येतां, तिच्या थोर पदवीला योग्य असा दासी वगैरे लवाजमा तिजबरोबर येईल. कांहीं दासी तिजबरोबर दिल्लीस जातील, व कांहीं तिला पोहोंचवून परत येतील. पडदानशीन स्त्रिया लष्करांत येणार, तेव्हां तिकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणीं जातां कामा नये, असा तुम्हीं बंदोबस्त ठेवावा." हें सर्व बोलणें अल्लाउद्दिनास पसंत पडलें.

नंतर ठरलेल्या दिवशीं बुरख्याच्या सुमारें सातशें पालख्या चितोड-गडावरून अल्लाउद्दिनाच्या गोटाकडे जावयास निघाल्या. प्रत्येक पालखीला सहा सहा भोई होते. पालख्या गोटांत पोहोंचल्यावर त्या भीमसिंगाच्या डेऱ्यानजीक कनाथा लावून उतरल्या. भीमसिंगाची व पद्मिनीची आतां ताटातूट होणार, म्हणून त्यांची शेवटची भेट होऊं द्यावी, अशा हेतूनें अल्लाउद्दिनानें त्यांस अर्ध्या तासाची फुरसत दिली. ठरल्याप्रमाणें कांहीं दासींच्या पालख्या गोटांतून परत गेल्या; त्यांपैकीं एकींत बसून भीमसिंग चितोडगडास निघून गेला.

इकडे, अल्लाउद्दीन, भेटीस उशीर किती, लौकर आटोपा, अशी घाई करूं लागला. तों दरएक पालखींतून दासी म्हणून आलेला हत्यारबंद रजपूत जवान बाहेर पडला! भोई आले होते तेही हत्यारबंद शिपायीच होते. त्यांनींही शस्त्रें उपसलीं! अल्लाउद्दिनाच्या लोकांची व त्या रजपूत जवानांची लढाई जुंपली. भीमसिंग आपल्या हातून निसटला हें पाहून, त्याला पकडण्यासाठीं फौजेची एक तुकडी सुलतानानें ताबडतोब पाठविली; पण तिचा फारसा उपयोग न होतां भीमसिंग गडावर सुरक्षित पोहोंचला. इकडे रजपुतांनीं आपल्या धन्यासाठीं मोठ्या निकरानें लढून पठाणांचा धुव्वा उडविला. अशाप्रकारें पद्मिनी नाहीं व भीमसिंगही आपल्या हातचा गेला, म्हणून हिरमुष्टी होऊन ह्या वेळीं अल्लाउद्दीन दिल्लीस परत गेला.

तथापि, पुढें लौकरच अल्लाउद्दीन पुन्हा परत येऊन त्यानें चितोडास वेढा घातला, व त्यानें तो गड शेवटीं सर केला. पण पद्मिनी मात्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्यास प्राप्त झाली नाहीं; कारण, तिनें व तिच्या सख्यांनीं, गड शत्रूच्या हातीं जाणार हें पाहून, जोहर केलें आणि आपणांस जाळून घेऊन आपलें पातिव्रत्य राखिलें!

---

६०. फिरोजशाह तघलख.

राजे, महाराजे, सुलतान, बादशाह इत्यादिकांच्या कारकीर्दींचीं वर्णनें हिंदुस्तानाच्या इतिहासांत येतात, तीं बहुतेक लढाया, हले, वेढे, लुटी इत्यादि प्राणहानीच्या आणि हालअपेष्टांच्या हकिकतींनीं भरलेलीं अशीं आढळतात. त्यांमध्यें प्रजेचें संरक्षण आणि कल्याण करणें हेंच आपलें कर्तव्य असें समजून त्याप्रमाणें वागणारा एकादाच राजपुरुष उत्पन्न झालेला दिसतो. अशा पुरुषांपैकींच फिरोजशाह तघलख हा होय.



फिरोजशाहाची कबर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महंमद तघलख ह्याच्या कारकीर्दीत प्रजेची दैना उडून गेली होती. 'दे माय धरणी ठाय,' अशी आपल्या प्रजेची दुर्दशा करून हा वेडा आणि दुष्ट सुलतान एकदांचा इ० स० १३५१ त मरण पावला. त्याच्यापश्चात् त्याचा पुतण्या जो फिरोज तो तक्तनशीन झाला. फिरोजनें सुमारें सदतीस वर्षें राज्य केलें, आणि त्या मुदतींत प्रजेच्या कल्याणाच्या त्यानें अनेक गोष्टी केल्या. त्यामुळें त्याची कारकीर्द चिरस्मरणीय झाली आहे.

आपलें राज्य वाढविण्याचा लोभ न धरितां, आहे त्याच मुलखाचा बंदोबस्त उत्तम ठेवून त्याचेंच उत्पन्न वाढवावें, असा फिरोजनें निश्चय केला. राज्य वाढविण्याच्या नादीं पडून मनुष्यहानि होऊं द्यावी, किंवा दिग्विजय करून आपली कारकीर्द गाजवावी, हें त्याला आवडत नसे. दुसऱ्यांच्या राज्यांवर स्वारी करून आपलें सामर्थ्य दाखवावें, त्यापेक्षां आपल्या राज्यांतील प्रजा आबाद राखून तिला सुखांत ठेवावें ह्यांतच भूषण आहे, असा त्याचा समज होता. त्याप्रमाणें आपल्या प्रजेची संपत्ति वाढवून तीस सुख होईल अशा कामीं आपल्या द्रव्याचा उपयोग करावा, असा त्याचा दृढ संकल्प होता. प्रजेची संपत्ति कशी वाढेल ह्याचा विचार करण्यांत व तसे उपाय योजण्यांत तो आपला काळ घालवीत असे. आपली सत्ता प्रजेला उपद्रव देण्यासाठीं नाहीं, व आपली संपत्ति आपल्या ऐषआरामासाठीं किंवा नुसतें वैभव मिरविण्यासाठीं नाहीं, असें तो पक्कें समजे. फिरोजनें सुमारें दीडशें पूल बांधिले; तीस एक तलाव खोदविले; आणि मुबलक पाणी मिळून शेतकऱ्यांची जमीन सुपीक व्हावी, म्हणून मोठमोठाल्या नद्यांचे कालवे तयार करविले. यमुना नदीचा मोठा कालवा त्यानेंच बांधिला. स्वतांच्या ऐषआरामाखातर मोठाल्या इमारती उठवून देण्याच्या नादीं न पडतां,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतकीला उपयोगी, अर्थात् देशांतील संपत्ति वाढविणारीं, कामें करण्यांतच तो आपणास कृतार्थ मानी.

स्वतां फिरोजशाहाला शेतकीचा व बागबगीच्याचा फार नाद असे. दिल्ली शहरासभोंवतीं हजार बाराशें बागा त्यानें उठविल्या होत्या. त्याला नवीं नवीं शहरें वसविण्याचाही फार नाद असे. सुमारें दोनशें नवीं शहरें त्यानें वसविलीं. सतलज नदीच्या कांठचें, त्याचेंच नांव धारण करणारें, फिरोजपूर हें शहर त्यानेंच वसविलें. रोग्यांसाठीं दवाखाने बांधण्याचें पहिल्यानें ह्याच बादशाहाच्या मनांत आलें, व त्याप्रमाणें सुमारें शंभर शहरांत सार्वजनिक दवाखाने त्यानें बांधविले.

अशा प्रकारें प्रजेच्या सुखाखातर त्यानें पाण्यासारखा पैसा खर्चिला. आपल्या प्रजेस न्याय मिळावा, तिजवर अधिकाऱ्यांनीं जुलूम करूं नये, व तिनें सुखासमाधानानें राहावें, म्हणून फिरोज अहर्निश झटत असे. प्रजाजनांची स्थिति स्वतां पाहाण्यासाठीं व त्यांचीं गाऱ्हाणीं समक्ष ऐकण्यासाठीं तो वारंवार आपल्या प्रांतांतून फिरत असे. त्यामुळें त्याच्या कामगारांस लांचलुचपत घेण्याला फारशी सवड मिळत नसे. लोकांवरील बरेच कर त्यानें माफ केले व कांहीं जकातीही उठविल्या.

फिरोजशाह फार पापभीरु होता. आपल्या चुलत्यानें, म्हणजे महंमद तघलखानें, ज्यांचे घातपात केले होते त्यांस बोलावून आणून, त्यांचें सर्व नुकसान त्यानें भरून दिलें. "महंमद बादशाहाच्या जुलमांची व अन्यायांची आम्ही क्षमा करितों," असे लेख पंचांसमक्ष त्यानें त्यांच्याकडून लिहून घेतले व ते सर्व कागद महंमदाच्या कबरेजवळ पुरले ! !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६१. अकबराचा स्वभाव आणि त्याची राज्यपद्धति.

अकबर हा मोठा पराक्रमी आणि शाहाणा बादशाह होता. बापाचें लहानसें राज्य त्यानें पुष्कळ वाढविलें. तो मोठा मेहनती, दूरदर्शी व दयाळू होता. त्याचें बाळपण संकटांत व विपत्तींत गेलें असल्यामुळें त्यास जगाचा अनुभव चांगला आला होता. तो गरिबांशीं सौजन्यानें वागे, दुष्टांचें दमन करी, विद्वानांस आश्रय देई आणि रयतेच्या सुखदुःखाची काळजी वाही. अपकाराचा प्रतिकार उपकारानें करून शत्रूस मित्र बनवून सोडण्यामध्यें तो फार कुशल होता. आपल्या कुटुंबांतील माणसांवर त्याचें फार प्रेम असे, व आपल्या मित्रांबरोबर तो अगदीं मोकळ्या मनानें वागे.

इ० स० १५४२—१६०५.

परंतु अकबराची गणना पृथ्वींतील सर्वोत्तम राजांमध्यें होते, ती मुख्यत्वेंकरून त्याच्या उत्तम राज्यपद्धतीमुळें होते. त्याच्यापूर्वी दिल्लीच्या गादीवर जे मुसलमान राजे झाले, त्यांनीं हिंदू लोकांना तरवारीच्या जोरावर आपल्या ताब्यांत ठेविलें होतें. त्यांच्या वेळेस हिंदूमुसलमानांमध्यें प्रेमभावाचा व एकीचा बहुतेक अभावच होता. हिंदूमुसलमानांमध्यें एकी करून, त्यांच्या राजनिष्ठारूप भक्कम शिलातलावर आपल्या राज्याचा पाया घालण्याची उदात्त कल्पना प्रथमतः अकबरानेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढिली; व ती तडीस नेण्याकरितां तो कायावाचामनेंकरून शेवटपर्यंत झटला. ह्या स्तुत्य प्रयत्नांमध्यें त्यास अबुल फजल व फैजी ह्या विद्वान् आणि उदार बंधुद्वयानें चांगली मदत केली. धर्मभेद मनांत न आणितां त्यानें हिंदू लोकांस मोठमोठीं कामें दिलीं. अफगाणांसारख्या कडव्या लोकांच्या देशावर त्यानें राजा मानसिंग ह्यास सुभेदार नेमिलें, व राजा तोडरमल्ल ह्यास बंगालची सुभेदारी देऊन त्याजकडे सर्व राज्याच्या जमाबंदीचें काम सोंपविलें. रजपूत राजे प्रथम त्याच्याशीं बांकून होते खरे; पण त्यांना जिंकिल्यावर त्यांचा स्नेह संपादून व त्यांच्याशीं सोयरीक करून, त्यानें त्यांना इतके आपलेसे करून घेतले कीं, पुढें ते त्याच्या भव्य राज्यमंदिराचे दृढतर स्तंभ बनले. त्यानें हिंदू लोकांवर जिझिया नांवाची डोईपट्टी होती ती उठविली, त्यांच्या क्षेत्रांमध्यें गोवधाची मनाई केली, व त्यांना राजरोस आपल्या धर्माप्रमाणें चालण्यास मोकळीक दिली. फार तर काय, सूर्योपासना, अग्निपूजा इत्यादि हिंदू धर्मांतील कांहीं गोष्टीही त्यानें स्वतां स्वीकारिल्या; व त्यामुळें मुसलमान लोकांना वाईट वाटलें, तरी त्याची त्यानें कांहीं परवा केली नाहीं. हिंदू लोकांतील बालविवाह, सती जाणें, ह्यांसारख्या वाईट चाली मोडण्याचाही त्यानें प्रयत्न केला. सर्व रयतेवर कराचें ओझें सारखें पडावें, म्हणून तोडरमल्लाच्या मदतीनें त्यानें आपल्या राज्यांतील सर्व जमिनीची मोजणी करून तिची प्रतबंदी केली, व महसुलीचे निरख ठरविले. वसुलाचे मक्ते देण्याचें बंद करून खुद्द शेतकऱ्यांपासून वसूल घेण्याकरितां अमलदार नेमिले, व त्यांनीं लांच खाऊं नये व रयतेवर जुलूम करूं नये म्हणून चांगला बंदोबस्त केला. जागजागीं न्यायाधीश नेमून रयतेस न्याय मिळण्याची पूर्वीपेक्षां चांगली व्यवस्था केली. हातपाय तोडणें, डोळे काढणें ह्यांसारख्या क्रूर शिक्षा बंद केल्या, आणि मरणाची शिक्षा आपल्या मंजुरीशिवाय देण्याची मनाई केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फौजेंतील शिपायांना त्यांच्या कामगिरीबद्दल जमिनी तोडून देण्याची वहिवाट बंद करून, तिच्याऐवजीं त्यांना दरमहा मुशाहिरा देण्याचें ठरविलें, व फौजेस चांगली शिस्त लावून दिली. कारभाराच्या सोईकरितां राज्याचे अठरा सुभे करून त्यांच्यावर सुभेदार नेमिले. सारांश, सर्व हिंदुस्तानाचें एक राष्ट्र बनविण्याकरितां त्यानें अत्यंत परिश्रम केले, व त्यांत त्यास चांगलें यशही आलें.

---

६२. मलिकंबर (इ० स० १५४६—१६२६).

मलिकंबर हा निजामशाहींत म्हणजे अहमदनगरच्या राज्यांत एक प्रसिद्ध वजीर होऊन गेला. हा जातीचा हबशी होता. तो आपल्या आंगच्या गुणांनीं वजिरीच्या पदास चढला. दुसरा मूर्तिझा निजामशाह ह्याच्या कारकीर्दींत त्यानें इ० स० १६०७ पासून १६२६ पर्यंत पूर्ण मुखत्यारीनें राज्याचा कारभार चालविला.

अकबर बादशाहाच्या वेळेपासून मोंगल लोक निजामशाही बुडविण्याच्या यत्नास लागले होते. इ० स० १६०० मध्यें त्यांनीं खुद्द अहमदनगर काबीज केलें; तथापि निजामशाहींतील सरदारांनीं आपल्या राज्याचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं कंबर बांधिली. त्या सर्वांत मलिकंबर प्रमुख होता. अहमदनगर हातचें गेल्यावर त्यांनीं प्रथम परांडें, नंतर जुन्नर व शेवटीं खडकी, हीं शहरें आपल्या राज्याचीं मुख्य ठिकाणें केलीं. खडकी शहर तर मलिकंबरानें नवीनच वसविलें. त्यासच पुढें औरंगाबाद असें औरंगजेबानें आपलें नांव दिलें.

मलिकंबराच्या हातीं पूर्ण अधिकार आल्यापासून त्यानें मोंगलांशीं सुमारें २० वर्षें चांगली टक्कर दिली. लढण्याची दक्षिणेंतील कजाखी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पद्धत त्यास चांगली अवगत होती. समोर उभें राहून न लढतां, लपून छपून हल्ले करीत त्यानें मोंगलांस अनेकदां हटविलें; तथापि त्यांचें सामर्थ्य अफाट असल्यामुळें त्यानें प्रसंगानुसार त्यांच्याशीं तहही केले. सारांश, त्यानें आपल्या धन्यासाठीं आमरण मेहनत करून त्याचें बुडतें राज्य सावरून धरिलें.

मलिकंबर हिंदू लोकांचे गुण चांगले जाणत असे. त्याच्या कारकीर्दीत पुष्कळ ब्राह्मण मुत्सद्दी व मराठे सरदार उदयास आले; आणि त्याकाळीं लढाईची इतकी धामधूम चालली होती, तरी एकंदर रयतेस मोठें सुख झालें.

मलिकंबर शूर शिपायी, उत्तम सेनापति व शाहाणा मुत्सद्दी होता, त्यामुळेंच त्यास मोंगलांना इतके दिवस थोपवून धरतां आलें. त्यानें राज्यकारभार उत्तम प्रकारें चालविला. शेवटीं आपलें राज्य मोठ्या दक्षतेनें बचावून व शत्रुमित्रांच्या आदरास पात्र होऊन, हा थोर पुरुष आपल्या वयाच्या ८० व्या वर्षीं मृत्यु पावला (१६२६). त्यानंतर लवकरच मोंगलांनीं निजामशाही बुडविली.

मलिकंबर शूर शिपायी व कुशल सेनापति तर होताच; तथापि त्याचें नांव त्यानें ठरविलेल्या जमीनमहसुलाच्या उत्तम पद्धतीमुळें दक्षिणेमध्यें विशेष प्रसिद्ध आहे. त्यानें मक्त्याच्या मामलती बंद करून, मुसलमान कामगारांच्या हाताखालीं ब्राह्मण कारकून नेमून, वसुलाचें काम त्यांच्याकडे सोंपविलें. त्याच्यापूर्वी ग्रामसंस्था म्हणजे गांवकीची पद्धत मोडून गेली होती, ती त्यानें पुन्हा सुरू केली; आणि कांहीं वर्षांच्या अनुभवानें प्रत्येक शेताचें सरासरीनें पीक किती येतें तें ठरवून, त्या ऐनजिन्नस उत्पन्नाचे $\frac{2}{5}$ सरकारांत घेण्याची सुरवात केली. ही वहिवाट कांहीं दिवस चालल्यानंतर, इ० स० १६१४ च्या सुमारास ऐनजिन्नसी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साऱ्याऐवजीं त्यानें एकंदर उत्पन्नाचा $\frac{1}{3}$ धारा रोख पैशानें घेण्याचें ठरविलें. ह्यासच 'तनखा' असें म्हणतात. उत्तर हिंदुस्तानामध्यें राजा तोडरमल्लानें कायमचा धारा ठरविला, तसा मलिकंबरानें दक्षिणेंत ठरविला नाहीं; तर सालोसाल पीकपाहणी करून त्या मानानें सरकार देणें कमजास्त घ्यावें, असें ठरविलें. ही पद्धत इतकी सोईची व फायदेशीर होती कीं, तिजमुळें लढायांचा जबर खर्च सोसूनही, सरकारी खजिना नेहमीं भरपूर राहिला, व देशाची आबादी होऊन लोक संपन्न झाले.

६३. जहांगीर बादशाह व सर टामस रो.

सर टामस रो.

इंग्लंडचा राजा पहिला जेम्स ह्यानें इ० स० १६१५ त दिल्लीचा बादशाह जहांगीर ह्याजकडे व्यापारसंबंधें तह करण्याकरितां सर टामस रो नांवाचा एक वकील पाठविला होता. त्यानें त्यावेळच्या देशस्थितीचें आणि बादशाही दरबाराचें वर्णन केलें आहे, तें असें :—

"मी सुरत बंदरीं उतरलों, तेव्हां तेथील मोंगल सुभेदारानें माझें चांगलें स्वागत केलें; परंतु माझ्या सर्व सामानाचा झाडा घेऊन, त्यानें त्यापैकीं कांहीं स्वतांकरितां ठेवून घेतलें. ह्या जिनसा बादशाहास नजर करण्याकरितां आणिल्या आहेत असें मीं सांगितलें, तरी तें त्यानें ऐकिलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जहांगीर बादशाह.

"जहांगीर त्यावेळीं अजमीर एथें होता, म्हणून मी बऱ्हाणपुरावरून तिकडे जावयास निघालों. सुरतेपासून बऱ्हाणपुरापर्यंत रस्ता चांगला होता. त्यावेळीं दक्षिणेंत लढाई चालू होती, म्हणून तो प्रदेश बराच वैराण झाला होता. मला रस्त्यांत कांहीं अडथळा किंवा अपाय झाला नाहीं; तरी डोंगरांमध्यें भिल्ल लोकांनीं मला थोडा त्रास दिला.

"बऱ्हाणपूर एथें शाहजादा पर्वीझ ह्यानें माझा चांगला सत्कार केला, व मला खासगी भेटीकरितां आपल्या वाड्यांत बोलाविलें. परंतु मी गेलों तों शाहजादा दारू पिऊन इतका धुंद झाला होता कीं, त्याची भेट न होतां मला परत जावें लागलें.

"कांहीं गांव ओस पडलेले, तर कांहीं फारच भरभराटींत असलेले मीं पाहिले. अकबरानें घालून दिलेल्या शिस्तींत बराच फरक पडला होता. जमीनवसुलीचे मक्ते देण्याची खराब वहिवाट व क्रूर शिक्षा करण्याचा प्रघात, हीं पुन्हा सुरू झालीं होतीं.

"अजमिरास पोहोंचल्यावर लवकरच बादशाहानें माझी भेट घेतली. दरबाराचा थाटमाट आणि अमीरउमरावांचा विनय व पाहुणचार फारच तारीफ करण्यासारखा होता. मला इतरांप्रमाणें बादशाहापुढें दंडवत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालावें लागलें नाहीं. मीं फक्त तीन ठिकाणीं तीनदां लवून मुजरा केला. बादशाहानें मला आपल्या वजीर मंडळींत बसविलें. जेम्सराजानें पाठविलेला नजराणा मीं पुढें केला, त्याचा जहांगिरानें स्वीकार केला; परंतु तो त्यास फारसा पसंत पडला नाहीं, असें मला मागाहून समजलें.

"बादशाहाच्या घरगुती व दरबारी वागणुकींत फारच अंतर दिसून आलें. खाजगी भेटीच्या वेळीं बादशाह सर्वांशीं मोठ्या सलगीनें वागे, व सर्वांस आपल्याबरोबर यथेच्छ सुरापान करावयास लावी; परंतु दरबारांत तो कोणाशीं फारसें बोलत नसे, आणि दारूचें नांव काढणारास कडक शिक्षा करी. आपल्या वाढदिवशीं तो सोन्यारुप्यानें आपली तुळा करी, व तें सोनेंरुपें गरिबांना वांटी. त्याजवळ नेहमीं अखवारनवीस हजर असत, व तो जें कांहीं बोले व करी, तें सर्व ते लिहून ठेवीत. ती कच्ची हकिकत पाहिजे त्यास एक रुपया दिला असतां पाहाण्यास मिळे.

"दरबारांतील कांहीं उमरावांची वागणूक फार चोख असे, पण एकंदरीनें पाहातां सरकारी नौकर फार लांचखाऊ आणि स्वार्थसाधु होते. मला येऊन दोन वर्षें झालीं तरी तहाचें काम तसेंच भिजत पडलें होतें! शेवटीं खुद्द वजीर आसफखान ह्यास एक मूल्यवान् मोतीं मीं नजर केलें, तेव्हां तहाचें काम सुरळीतपणें चालू झालें. लष्करी लोकांत शिपाईगिरी फार कमी झाली होती; फक्त रजपूत आणि पठाण ह्यांमध्यें तेवढें पाणी दिसून येत होतें.

"कारागिरीच्या कामांत लोक फार कुशल आहेत असें दिसलें. मीं बादशाहास एक रथ नजर केला होता, त्यासारखा, किंबहुना त्याच्यापेक्षांही चांगला, दुसरा रथ कारागिरांनीं लवकरच तयार करून दाखविला. तशीच मीं एक तसबीर बादशाहास दिली होती, तिच्या नकला बादशाही चिताऱ्यांनीं इतक्या हुबेहूब तयार केल्या कीं, अस्सल तसबीर कोणती आणि नकला कोणत्या तें मलासुद्धां ओळखतां येईना!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६४. औरंगजेबाची दक्षिणेंतील मोहीम.

सर्व दक्षिण देश काबीज करण्याच्या इराद्यानें औरंगजेब इ० स० १६८३ मध्यें अफाट सैन्य घेऊन बऱ्हाणपुरास आला. पुढें सुमारें ६ वर्षांत त्यानें विजापूर व गोवळकोंडें एथील मुसलमानी राज्यें बुडवून, मराठ्यांचा राजा संभाजी ह्यास धरून क्रूरपणानें ठार मारिलें. इतकें झाल्यावर आपण कृतकृत्य झालों, असें औरंगजेबास वाटलें. पण तो त्याचा केवळ भ्रम होता.

संभाजीचा वध केल्यानें मराठे लोक भिऊन जाऊन आपणास शरण येतील, असें औरंगजेबास वाटलें होतें; पण त्याचा परिणाम अगदीं उलट झाला. आपल्या राजास हाल करून मारिलें हें पाहून मराठे लोकांस चेव आला, व ते त्याचा सूड घेण्यास तयार झाले. शिवाजीच्या तालमेंत तयार झालेले जे सरदार व मुत्सद्दी संभाजीच्या वेळीं निरुपायानें स्वस्थ बसले होते, त्यांनीं त्यांचा पुढाकार घेऊन, मोंगलांस शरण न जातां, स्वराज्याचें रक्षण करण्याचा निश्चय केला. विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें औरंगजेबानें नाहींशीं केलीं, ह्या कारणानें तेथील लोकही असंतुष्ट झाले होते. त्यांपैकीं पुष्कळ मराठे सरदार व शिलेदार मराठ्यांस येऊन मिळाले. ह्यामुळें सर्व मराठे लोकांची एक जूट होऊन, त्यांनीं स्वदेशसंरक्षणाकरितां सर्वस्वाचा त्याग करून आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीविताचीही तमा न धरितां, विलक्षण पराक्रमाचीं कृत्यें केलीं; व सुमारें अठरा वर्षेपर्यंत औरंगजेबासारख्या बलिष्ठ बादशाहाशीं टक्कर देऊन त्यास 'त्राहि त्राहि' करून सोडिलें व आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें.

बादशाही फौजेंत मोंगल, तुर्क, पठाण वगैरे धिप्पाड शरिराचे दांडगे शिपायी होते; मराठी सैन्यांत लहान बांध्याचे, सडपातळ पण चपळ व चिवट अशा लोकांचा भरणा होता. बादशाही फौजेला राहाण्यास तंबू, राहुट्या असत; मराठ्यांचें लष्कर जमिनीवर उघडेंच पडत असे. मोंगली फौजेला लवाजमा व सामानसुमानाचा पुरवठा भक्कम असावयाचा; मराठे स्वारांची सर्व सामुग्री त्यांच्या घोड्यांवरच राही! मोंगल फौजेचा तळ हालवायाचा म्हणजे चारपांच दिवस तयारीला लागावे. चिलखतें, रूदार आंगरखे वगैरे पोशाक चढवून व घोड्यांस जीनबंदी करून निघण्यास मोंगल शिपायांस पुष्कळ वेळ लागे; मराठ्यांचा पोशाक साधा असल्यामुळें ते तावडतोब घोड्यांवर बसून, भाले घेऊन तयार होत. मोंगल शिपायांची शिधासामुग्री जुळण्याला तासांचे तास लागत; मराठी सैन्याची भूक कांदाभाकर किंवा हुरडा ह्याजवर भागत असे.

अशा प्रकारच्या दोन फौजांची दक्षिणेंत गांठ पडली. मोंगलांच्या धिप्पाड व शूर शिपायांपुढें आणि जंगी तोफखान्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं, हें मराठे जाणून होते; म्हणून तोंडास तोंड देऊन ते फारसे लढले नाहींत; पण बादशाही फौजेच्या आजूबाजूस फिरून व लपून छापे घालून त्यांनीं तिचा खरपूस समाचार घेतला. मोंगल शिपायी शस्त्रास्त्रें घेऊन लढण्यास सिद्ध होत, तों इकडे मराठी लष्कर पार राना-वनाच्या आश्रयास निघून जाई! तें दिसेनासें झाल्यावर मोंगलांनीं स्वस्थ बसूं लागावें तों मराठ्यांचे हल्ले-छापे पुन्हा सुरू! दिल्लीकडून येणारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धान्यादि सामुग्री व खजिना मराठे लुटून फस्त करीत व बादशाहाच्या तळाभोंवतीं घिरट्या घालून, आजूबाजूचा मुलूख जाळपोळ करून उध्वस्त करून टाकीत. अशा प्रकारें मराठ्यांनीं मोंगलांस अगदीं बेजार करून सोडिलें. खुद्द बादशाहानें कट्टी मेहनत करून मराठ्यांचे किल्ले सर करीत पुढें जावें, तों मागें तेच किल्ले त्यांनीं पुन्हा परत घ्यावे!

असा हा झगडा वर्षानुवर्ष चालला असतां बादशाहाची प्रकृति बिघडली, ती सुधारेना. मराठ्यांचा नाइनाट करण्यासाठीं त्यानें जंग जंग पछाडले, पण ते हार न जातां अधिकाधिकच बळावले. शेवटीं निरुपाय होऊन औरंगजेबानें मराठ्यांचा मुलूख सोडून अहमदनगरचा मार्ग धरला; आणि दक्षिणदेश काबीज करण्याचा त्याचा हेतु सिद्धीस न गेल्यामुळें त्याला अत्यंत दुःख होऊन तो अहमदनगर एथें इ० स० १७०७ मध्यें मरण पावला. अशा प्रकारें ह्या २४ वर्षांच्या मोहिमेचा शेवट झाला.

---

६५. कुरुक्षेत्र किंवा पानपतची समरभूमि.

आपल्या देशांत पानपतचें मैदान ही मोठी विख्यात समरभूमि आहे. ह्यासच प्राचीन काळीं कुरुक्षेत्र म्हणत असत. ह्याच मैदानांत स्थानेश्वर, कर्णाल, पानपत, सोनपत, कुंजपुरा वगैरे ठिकाणें आहेत. ह्या रणभूमीवर किती मनुष्यांचे प्राण आजवर खर्ची पडले असतील, त्याची गणती नाहीं. मनुष्यांच्या रक्तानें ही समरभूमि कैक वेळां न्हाली आहे. ह्या रणभूमीवरील युद्धांच्या योगानें ह्या देशांत अनेक राजक्रांतिही घडून आल्या आहेत.

प्राचीन काळीं भारती युद्ध ह्याच कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरतराजाचे वंशज जे कौरवपांडव, त्यांचें एथें अठरा दिवस घनघोर युद्ध चालून शेवटीं पांडव विजयी झाले व त्यांस कौरवांचें राज्य मिळालें.

ह्या भारती युद्धानंतर अर्वाचीन काळांतही अनेक युद्धें ह्या रणभूमीवर झालीं. त्यांपैकीं इ० स० ११९१ व ११९३ ह्या सालीं शहाबुद्दीन व पृथ्वीराज ह्यांमध्यें ज्या लढाया झाल्या, त्यांचें वर्णन मागें दिलें आहे. ११९३ च्या युद्धामुळें हिंदुस्तानांत मुसलमानांची सत्ता स्थापित होऊन हिंदू राजांचें वैभव नष्ट होऊं लागलें.

पुढें सवाचारशें वर्षांनंतर म्हणजे इ० स० १५२६ त ह्याच रणभूमीवर सुलतान बाबर व पठाण वंशांतील शेवटला सुलतान इब्राहिमखान लोदी ह्या उभयतांत युद्ध झालें. ह्या युद्धांत बाबराचें सैन्य काय तें बारा हजार होतें; पण तें नव्या दमाचें असून त्यास बाबरासारखा शूर व युद्धकुशल सेनापति मिळाला होता; म्हणून, लोदी सुलतानाची पुष्कळ फौज होती तरी, बाबरासच जय मिळाला; व त्यानें दिल्लीच्या पठाण सुलतानांचें राज्य घेऊन तेथें मोंगल बादशाहीची स्थापना केली.

इ० स० १५५६ मध्यें अकबर सारा १३ वर्षांच्या वयाचा होता, आणि बापाच्या मृत्युकाळीं तो पंजाबांत सुलतान शिकंदर सूर ह्याशीं लढत होता. दरम्यान त्या सुलतानाचा प्रधान हेमू ह्यानें पूर्वेकडून येऊन, आग्रा व दिल्ली हीं शहरें काबीज करून, हुमायुनाचें राज्य घेतलें. अशा संकटाच्या वेळीं, अकबर व त्याचा पालक बहिरामखान हे हेमूवर चालून आले, व त्यांनीं पानपतच्या मैदानावरच मोठ्या शर्तीनें हेमूस जिंकून नष्टप्राय झालेलें आपलें राज्य पुन्हा मिळविलें.

इ० स० १७६१ सालीं पानपत एथें शेवटचें युद्ध झालें. हें उत्तरेकडील मुसलमान सरदार व दक्षिणेंतील मराठे ह्यांच्यामध्यें झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांची सत्ता दिवसेंदिवस वाढत चालली होती, हें उत्तर हिंदुस्तानांतील मुसलमान सरदारांस सहन झालें नाहीं. त्यांनीं एक जूट करून, कंधारचा दुराणी बादशाह अहमदशाह अबदाली ह्यास मदतीस बोलावून, त्याजकडे आपलें प्रमुखत्व दिलें. त्यांशीं सामना करण्याकरितां पेशव्यांचा चुलतभाऊ सदाशिवराव मोठी फौज घेऊन दक्षिणेंतून निघाला. दोन्ही सैन्यांचे तळ पानपतच्या मैदानावर पडून, दोन्ही फौजा समोरा-समोर आल्या. लढाया मोठ्या निकराच्या झाल्या, पण सरशी कोणाचीच होईना. शेवटची लढाई तारीख ७ जानेवारीच्या सुमारास झाली. तींत प्रथम मराठ्यांनीं विलक्षण पराक्रम केला; परंतु तिसऱ्या प्रहरीं, पेशव्यांचा मुलगा विश्वासराव गोळी लागून गतप्राण झाल्यामुळें लोकांचें धैर्य खचून पळ सुरू झाला. त्यामुळें मराठ्यांस मोठें अपयश आलें व दुराणी यशस्वी झाले.

हें पानपतचें युद्ध म्हणजे हिंदुस्तानचें सार्वभौमत्व मुसलमानांकडे राहावें किंवा हिंदूंकडे जावें, ह्याबद्दलचा झगडा होता. त्यांत मराठ्यांचा पराभव होऊन त्यांचें अपरंपार नुकसान झालें; मुसलमानांस तरी लढाईच्या यशाशिवाय दुसरें कांहीं मिळालें नाहीं. अबदालीच्या सैन्याचा इतका शेणसडा झाला कीं, त्यानें पुन्हा हिंदुस्तानाकडे तोंड केलें नाहीं; आणि दिल्लीच्या बादशाहाची सत्ता संपुष्टांत आली होती, तीही तशीच राहिली. ह्या युद्धानें मराठ्यांच्या सत्तेला मोठा धक्का बसला खरा; तथापि तो त्यांनीं चांगला सहन केला, व दहा वर्षांच्या आंतच पुन्हा त्यांच्याशिवाय दिल्लीस पान हालेनासें झालें.

ह्या तुमुल युद्धानें राज्यक्रांति ताबडतोब घडून आली नाहीं; तरी, मुसलमान व मराठे हे दोघेही कमजोर झाल्यामुळें, पुढें लौकरच इंग्लिशांना प्रबळ होण्यास चांगली संधि सांपडली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग तिसरा.

भूगोल-वर्णन.

६६. सूर्यमाला.



सूर्याभोंवतीं फिरणारा असा पृथ्वी हा एकटाच गोल नाहीं; तर त्या-सभोंवतीं शेंकडों लहान मोठे गोल फिरत आहेत, व त्या सर्वांस त्यापासून प्रकाश व उष्णता प्राप्त होत आहे. सूर्याचे आंगीं एवढें सामर्थ्य आहे कीं, पृथ्वीस मिळतो इतका प्रकाश व उष्णता तो तिच्याएवढ्या दोनशें कोटि गोलांस देऊं शकेल !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण एकाद्या निरभ्र व अंधाऱ्या रात्रीं आकाशाकडे पाहिलें, तर त्यांत चहूंकडे लहान मोठ्या चांदण्या दिसतात. त्यांपैकीं चार पांच चांदण्या खेरीज करून बाकीच्या चांदण्यांचीं एकमेकांपासून अंतरें बदलत नाहींत, असें अनेक रात्रीं आकाशाकडे पाहिल्यानें दिसून येईल. ज्यांचीं अंतरें बदलत नाहींत त्या चांदण्यांस 'तारे' म्हणतात. ज्या चांदण्यांचीं अंतरें बदलतात अथवा ज्या आपल्या जागा पालटतात, त्यांस 'ग्रह' म्हणतात. ग्रह ताऱ्यांप्रमाणें चमकत नाहींत, तर त्यांचें तेज स्थिर असतें. ह्या भेदावरून ग्रह कोणता व तारा कोणता हें जाणतां येतें.

मुख्य ग्रह पृथ्वीसकट आंठ आहेत. त्यांचीं नांवें सूर्यापासून त्यांच्या अंतरांच्या क्रमानें बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरु, शनि, युरेनस व नेपून हीं आहेत. प्राचीन काळच्या लोकांस नुसत्या डोळ्यांनीं पाहातां येण्याजोगे पांच ग्रह, म्हणजे, बुध, शुक्र, मंगळ, गुरु, व शनि, हेच काय ते माहीत होते. युरेनस व नेपून हे ग्रह अर्वाचीन काळीं दुरबिनीच्या साहाय्यानें सांपडले आहेत.

बुध सूर्याच्या अगदीं जवळ असल्यामुळें केव्हां केव्हां सूर्यास्त झाल्यावर अथवा सूर्योदयापूर्वी थोडा वेळ दिसतो. शुक्र हा त्यापेक्षां सूर्यापासून जास्त अंतरावर आहे, म्हणून तो प्रातःकाळीं अथवा सायंकाळीं बराच वेळ दिसतो. सर्व ग्रहांमध्यें शुक्राचें तेज अधिक आहे, म्हणून तो सहज ओळखतां येतो. पृथ्वीस जसा एक चंद्र आहे तसा बुध व शुक्र ह्यांस चंद्र नाहीं. मंगळ लाल रंगाचा दिसतो व त्यास दोन चंद्र आहेत. गुरु हा सर्व ग्रहांपेक्षां मोठा आहे, व शनि त्याच्याखालोखाल आहे. गुरूस चार चंद्र व शनीस आठ चंद्र आहेत. युरेनस व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेपून हे फारच दूरचे ग्रह आहेत. युरेनसास चार व नेपुनास एक चंद्र आहे.

ह्या मुख्य ग्रहांशिवाय सुमारें २०० लहान लहान ग्रह सांपडले आहेत. ते सर्व मंगळ व गुरु ह्यांच्या कक्षांमधल्या अवकाशांत आहेत. ते फार लहान असल्यामुळें दुरबिनीखेरीज दिसत नाहींत.

वर सांगितलेले लहान मोठे सर्व ग्रह सूर्याभोंवतीं फिरतात. त्यांच्या मार्गांस 'कक्षा' म्हणतात. सूर्याभोंवतीं एक प्रदक्षिणा करण्यास त्यांस भिन्न भिन्न काळ लागतात. सर्वांत जवळचा जो बुध, त्यास एका प्रदक्षिणेस केवळ तीन महिने लागतात, पण सर्वांत दूरचा जो नेपून त्यास १६५ वर्षें लागतात !

आपण निरभ्र व अंधाऱ्या रात्रीं दोन घटका आकाशाकडे पाहात बसलों, तर अनेक तारे तुटून खालीं पडतांना दिसतील. ते खरोखरीचे तारे नसून मोठमोठे धातुमय पाषाण असतात. ते मोठे असले, तर खालीं पडतांना त्यांचें बरेंच तेज आकाशांत दिसतें. असले कांहीं पडलेले तारे कलकत्ता शहरांतील पदार्थसंग्रहालयांत ठेविले आहेत. ह्या पडणाऱ्या ताऱ्यांस 'उल्का' म्हणतात. उल्कापाषाणांचे मोठमोठे समुदाय सूर्याभोंवतीं फिरत असतात.

ह्यांशिवाय सूर्याभोंवतीं फिरणारे अथवा पाहुण्यासारखे एकाद्या वेळीं एकाएकीं त्याजवळ येऊन, त्यास वळसा घालून जाणारे, 'धूमकेतु' म्हणजे शेंडेनक्षत्रें आहेत. धूमकेतु म्हणजे धुराचा बावटा. धूमकेतूच्या एका टोंकाला तेजस्वी चांदणी असते, व तिजपासून एक शेंडी अथवा फवारा पसरलेला असतो. धूमकेतु सूर्याजवळ गेला म्हणजे हा फवारा फार वाढून हजारों मैल लांब होतो. कांहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धूमकेतु सूर्यास एकदां वळसा घालून गेले, म्हणजे दूर निघून जातात व पुन्हा परत येत नाहींत. धूमकेतु अकस्मात् दृष्टीस पडतात म्हणून कित्येक लोकांस त्यांचें फार भय वाटतें; पण त्यांस भिण्याचें मुळींच कारण नाहीं.

ह्याप्रमाणें लहान ग्रह, मोठे ग्रह व त्यांचे चंद्र, उल्कापाषाण व धूमकेतु हे सर्व सूर्याभोंवतीं फिरतात. सूर्य हा त्यांचा मध्य आहे, म्हणून हे सर्व मिळून '**सूर्यमाला**' होते.

---

६७. तारे आणि ताऱ्यांचे पुंज.

आज अंधारी रात्र आहे व आकाश अगदीं निरभ्र आहे, म्हणून आपण आकाशांतील ताऱ्यांकडे पाहूं व त्यांसंबंधानें कांहीं माहिती करून घेऊं.

ग्रह व **तारे** ह्यांच्या तेजांत भेद असतो, असें मागील धड्यांत सांगितलें आहे. **ग्रह** हे परप्रकाश असतात, म्हणजे सूर्याच्या प्रकाशामुळें ते तेजस्वी दिसतात; पण **तारे** स्वयंप्रकाश असतात. ते ग्रहांप्रमाणें सूर्याभोंवतीं फिरत नाहींत, तर ते स्वतंत्र सूर्यच आहेत.

आपल्यासभोंवार एक वर्तुळाकार मर्यादा असून ह्या वर्तुळाजवळ आकाश पृथ्वीस मिळालेलें दिसत आहे. ह्या मर्यादेस '**क्षितिज**' म्हणतात. आपल्या डोक्यावर आकाश पोकळ घुमटासारखें आहे, व त्याच्या-आंतील बाजूस लहान मोठे असंख्य तारे चमकत आहेत. हे सर्व तारे क्षितिजाच्या पूर्वेकडील बाजूस निरनिराळ्या बिंदूंपासून वर येत आहेत व सूर्यचंद्रांप्रमाणें हळू हळू पश्चिमेकडे जात आहेत, असें दोन घटका पाहात बसलों तर आपणांस दिसेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण आणखी दोन घटका थांबून उत्तरेकडे पाहूं. आतां काय चमत्कार दिसत आहे पाहा ! कांहीं तारे एका स्थिर ताऱ्याभोंवतीं फिरतातसे दिसतात. आपण जर रात्रभर जागून त्यांकडे पाहूं, तर ते इतर ताऱ्यांप्रमाणें पश्चिमेस क्षितिजाखालीं मुळींच जात नाहींत, तर त्या स्थिर ताऱ्यास वळसा घालून पुन्हा पूर्वेस येतात, असें दिसेल. पृथ्वीचा आंस उत्तर ध्रुवापलीकडे वाढविला अशी कल्पना केल्यास, ह्या स्थिर दिसणाऱ्या ताऱ्याजवळ तो खगोलास मिळेल; म्हणून ह्या ताऱ्यास ध्रुव-तारा म्हणतात. पृथ्वीच्या दक्षिण ध्रुवापलीकडेही खगोलांत एक ध्रुव-तारा आहे; पण आपला देश उत्तर गोलार्धात असल्यामुळें तो तारा आपणांस दिसत नाहीं. ध्रुवांपासून सारख्या अंतरावर असलेली मध्यरेषा अथवा विषुववृत्त ओलांडून दक्षिणेकडे गेल्यास तो दिसूं लागेल.

आकाशांत जे हजारों तारे दिसतात ते ओळखावे कसे, असें कोणीही विचारील. प्राचीन काळच्या लोकांनीं ह्या ताऱ्यांचे पुंज म्हणजे पुंजके कल्पून त्यांस निरनिराळ्या पदार्थांचीं, जनावरांचीं व मनुष्यांचीं नावें दिलीं आहेत. हे पुंजके त्या पदार्थादिकांच्या आकृतींसारखेच नेहमीं दिसतात असें समजूं नये; तर ते पुंजके ओळखण्याची ही केवळ एक युक्ति आहे. हल्लीं असे १०९ पुंज कल्पिले आहेत.

ध्रुव-ताऱ्याजवळील जो पुंज कधींही क्षितिजाखालीं जातांना दिसत नाहीं, त्यास ध्रुवमत्स्य म्हणतात. ह्यालाच युरोपियन लोक लघु-ऋक्ष असें म्हणतात. ह्या पुंजांतच ध्रुव-तारा आहे. जे पुंज बहूत वेळ वर राहून थोडा वेळ क्षितिजाखालीं जातात, त्यांपैकीं सप्त-ऋषि हा मुख्य आहे. ह्यासच युरोपियन लोक बृहत्-ऋक्ष असें म्हणतात. ह्यास अडाणी लोक चोरखाटलें अथवा खाटलेंबाजलें म्हणतात. ह्या खाटल्याच्या चौकटींतील बाहेरच्या दोन ठळक ताऱ्यांतून उत्तरेकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक रेघ काढिली असतां ती ध्रुव-ताऱ्यांतून जाते असें तुमच्या लक्षांत येईल. ध्रुव-तारा कोणता हें शोधून काढण्याची ही सोपी युक्ति आहे.



सप्तर्षि आणि ध्रुव.

ताऱ्यांच्या तेजाच्या मानानें त्यांच्या प्रती लाविल्या आहेत. फारच तेजस्वी व ठळक तारे पहिल्या प्रतींत येतात. पहिल्या प्रतीच्या ताऱ्यांपैकीं अति तेजस्वी तारा लुब्धक म्हणजे व्याध हा होय. हा दक्षिणेकडील बृहल्लुब्धक नांवाच्या पुंजक्यांत आहे.

बहुतेक तारे पांढऱ्या रंगाचे असतात; पण कांहीं तांबडे, पिवळे, हिरवे, पारवे, अशा निरनिराळ्या रंगांचेही आहेत. आकाशांत कोठें कोठें बारीक ताऱ्यांचे झुबके दिसतात. कृत्तिका, रोहिणी व पुष्य हे नुसत्या डोळ्यांस दिसणारे झुबके आहेत. अशा झुबक्यांतील तारे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतके दूर आहेत कीं, फार मोठ्या शक्तीच्या दुरबिनींतून देखील ते फारसे मोठे दिसत नाहींत.

तारे आपणांपासून इतके दूर आहेत कीं, त्यांच्या अंतराची कल्पना ही आपणांस करतां येत नाहीं. अगदीं जवळचा जो तारा, तो सूर्य व पृथ्वी ह्यांमधील अंतराच्या पांचलक्षपटीहून जास्त दूर आहे !

आकाशांत रात्रीं ढगासारखा जो एक प्रकाशाचा पांढरा पट्टा दिसतो, त्यास 'आकाशगंगा' म्हणतात. ह्या आकाशगंगेकडे दुरबिनींतून पाहिले म्हणजे, त्या पट्ट्यांत असंख्य तारे दिसतात. ह्याशिवाय आकाशांत पांढुरक्या ढगांसारखे पुंजके दिसतात. ह्या पुंजक्यांत असंख्य तारे अत्यंत दाटीनें भरले आहेत असें दिसतें, व ते तारे फारच दूर आहेत म्हणून त्यांचा प्रकाश एकत्र होऊन तो धुक्यासारखा दिसतो.

६८. अक्षांश आणि रेखांश.



एके दिवशीं प्रभाकर आपल्या बापास म्हणाला, " बाबा, गुरुजींनीं आमच्या वर्गांतील मुलांस आपापल्या घराचा, एकाद्या बागेचा अथवा बखळीचा नकाशा काढून आणण्यास सांगितलें आहे. त्यावरून मीं आपल्या ह्या बागेचा नकाशा काढिला आहे. पण बागेंतील विहीर ह्या नकाशांत अगदीं बरोबर कोठें दाखवावी तें मला कळत नाहीं. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाप म्हणाला, "चल, मी तुला सांगतों. बागेच्या ह्या दोन कोपऱ्यांपासून विहीर किती अंतरावर आहे हें प्रथम ठरवूं. हीं अंतरें सुमारें २९ व ३५ फूट भरतात. आतां तुझ्या नकाशाच्या प्रमाणा-प्रमाणें ह्या लांब्या घेऊन, नकाशांतील हेच दोन कोपरे मध्य कल्पून दोन वर्तुळें काढ; हीं वर्तुळें नकाशांत ज्या ठिकाणीं छेदितील, ती विहिरीची जागा समजावी."

प्रभाकर—बाबा, काय हो ही मौज आहे! एक लांबी मोजली असती तर एकच वर्तुळ काढितां आलें असतें, पण तेवढ्यानें विहीर अमक्याच ठिकाणीं काढावी हें समजलें नसतें. ह्यामुळें दोन लांब्या मोजाव्या लागल्या. बाबा, गांवें वगैरे नकाशावर काढितांनाही दोन दोन लांब्या मोजाव्या लागत असतील, नाहीं बरें?

बाप—हो; त्या लांब्या कोणत्या तें तुला सांगतों. ह्या नारिंगाच्या ध्रुवांवर व त्याच्या विषुववृत्तावर टाचण्या रोवूं. तसेंच एक ध्रुव व विषुववृत्त ह्यांच्यामध्यें कोठेंतरी ही चूक रोवूं. आतां ही चूक कोठें आहे हें ठरवूं. प्रथम ह्या चुकेंतून जाणारी व विषुववृत्ताशीं समांतर अशी टाचण्यांची एक ओळ तयार करूं. ही ओळ विषुववृत्तापासून किती अंतरावर आहे तें आपणांस सहज मोजतां येईल.

प्रभाकर—पण एवढ्यानें आपलें काम होईल का?

बाप—नाहीं; म्हणून आतां दोन्ही ध्रुवांतून जाणारी टाचण्यांची एक ओळ करूं. ह्या ओळीपासूनही आपली चूक किती अंतरावर आहे तें ठरवितां येईल. हीं दोन अंतरें कळलीं, म्हणजे आपलें काम झालें.

प्रभाकर—शाळेंतील नकाशावर ज्या उभ्या आडव्या रेघा काढिलेल्या असतात, त्यांचा उपयोग काय असावा तें आतां माझ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्षांत आलें. पण बाबा, ह्या एवढ्या मोठ्या पृथ्वीवर ह्या रेषा कशा काढितां येतात ?

बाप—अरे, पृथ्वीवर रेषा काढण्याची जरुरी नाहीं. विषुववृत्तापासून ध्रुवापर्यंत जें अंतर आहे तें चतुर्थांश वर्तुळ आहे. ह्या अंतराचे ९० भाग कल्पून प्रत्येक भागास 'अंश' म्हणतात. आपलें हें कोल्हापूर विषुववृत्तापासून किती अंतरावर आहे हें ठरविण्याकरितां, उत्तरेकडील ध्रुव-तारा क्षितिजाचे वर किती अंश आहे हें दुरबिनीच्या साह्यानें मोजावें, म्हणजे ती उंची विषुववृत्तापासून कोल्हापुराचें अंतर दाखवील. ह्या अंतरास 'अक्षांश' म्हणतात. ह्याच अक्षांशावर पुष्कळ गांवें आहेत हें नकाशावरून तुला दिसेल; म्हणून ह्या शहराचें ठिकाण बरोबर समजण्याकरितां आणखी एक अंतर कळलें पाहिजे.

भूगोलविद्या जाणणारे लोक, पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवबिंदूंतून जाणारें व विषुववृत्तास छेदणारें असें एक वर्तुळ कल्पितात. हें वर्तुळ मुंबईतून जातें असें मानूं. कोल्हापूर हें ह्या वर्तुळाच्या पूर्वेस आहे, हें आपणांस नकाशावरून दिसतें.

पृथ्वी २४ तासांत आपल्या आंसाभोंवतीं एकदां पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते; त्यामुळें मुंबईच्या पूर्वेकडील प्रदेशावर सूर्य उगवल्यानंतर तो मुंबईवर उगवतो. विषुववृत्ताचे ३६० भाग अथवा अंश मानिले, म्हणजे प्रत्येक तासांत १५ अंशांवर सूर्यप्रकाश पडतो, हें त्रैराशिकानें ठरवितां येतें. आतां कोल्हापूर व मुंबई ह्या ठिकाणीं सूर्योदय केव्हां होतो हें दोन बिनचूक घड्याळांवरून अथवा तारायंत्राच्या मदतीनें ठरविलें, म्हणजे त्या वेळांतील अंतरावरून कोल्हापूर मुंबईपासून किती अंतरावर आहे, हें पुन्हा त्रैराशिकानें काढितां येईल. ह्या अंतरास 'रेखांश' म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्याप्रमाणें अक्षांश आणि रेखांश ह्यांवरून पृथ्वीवरील कोणतेंही ठिकाण नकाशावर अमुक ठिकाणीं आहे हें निश्चित होतें.

---

६९. वारे.

एकादी आगटी पेटविली म्हणजे तिचा धूर नीट वर जात नाहीं, तर वाऱ्याच्या झुळुकेनें त्याचा रोंख तिरपा होतो, हें सर्वांनीं पाहिलें आहे. तसेंच एकाद्या गांवास आग लागली म्हणजे वारा सुटतो व तो मोठ्या सुसाट्यानें आगीकडे वाहतो. हा वारा कसा उत्पन्न होतो बरें ? त्याचें कारण अग्नीची उष्णता होय. उष्णतेनें हवा विरळ व हलकी होते, आणि ती हलकी होऊन वर जाऊं लागली, म्हणजे आजूबाजूची थंड हवा तिच्या जागीं येऊं लागते. असें झालें म्हणजे वारा वाहूं लागतो. सूर्याच्या उष्णतेनेंही अशाच प्रकारें वारा उत्पन्न होतो.

वारा उत्पन्न होण्याचें दुसरें कारण हवेमधील पाण्याची वाफ होय. कोरड्या हवेपेक्षां वाफ हलकी असते. कांहींएक भाग कोरड्या हवेचें वजन शंभर मानिलें, तर तितक्याच वाफेचें वजन बासष्ट भरतें. ह्यामुळें हवेंत वाफ जितकी जास्त मिसळेल, तितकी ती हवा हलकी होईल. हें मिश्रण तापलें, म्हणजे त्यास फार जोर येऊन वाऱ्याचे प्रवाह सुरू होतात.

उन्हाळ्यांत सूर्यकिरणांनीं जमीन तापते तितकें हौदांतील पाणी तापत नाहीं, हें सर्वांस ठाऊक आहे. जमिनीवर व समुद्रावर सूर्यकिरण पडले म्हणजे असेंच होतें. त्यामुळें जमिनीवरील हवा समुद्रावरील हवेपेक्षां जास्त तापून ती वर जाऊं लागते, व वारा सुटतो.

वारे तीन प्रकारचे असतात. कांहीं वारे वर्षभर सतत एकाच दिशेनें वाहत असतात. कांहीं वारे पांचसहा महिने एका दिशेनें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांचसहा महिने उलट दिशेनें वाहतात; आणि कांहीं फार अनियमित प्रकारें वाहतात.

सतत वाहणारे वारे विषुववृत्ताच्या प्रत्येक बाजूस सुमारें ३० व्या अंशापर्यंत वाहतात. विषुववृत्ताजवळील प्रदेशांत सूर्यकिरण नेहमीं लंबरूपानें पडतात; त्यामुळें तेथील हवा फार तापून वर जाते, व उत्तर आणि दक्षिण प्रदेशांकडून विषुववृत्ताकडे वाऱ्यांचे प्रवाह सुरू होतात. हे वारे व्यापाराच्या गलबतांस फार उपयोगीं पडतात, म्हणून त्यांस 'व्यापारोपयोगी वारे' म्हणतात.



मान्सून वारे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अरबस्तान, हिंदुस्तान व चीन ह्या देशांत नियमित काळ वाहणारे वारे वाहतात. ह्या वाऱ्यांस अरब लोकांनीं 'मोसम' हें नांव दिलें. ह्या शब्दाचा अर्थ ऋतु असा आहे. मोसम या शब्दाचें इंग्रजींत 'मान्सून' असें स्वरूप झालें आहे. सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस जाऊन उन्हाळ्यास आरंभ झाला म्हणजे सगळें हिंदुस्तान व त्यावरील हवा तापूं लागते. मे व जून महिन्यांत ही तापलेली हवा वर जाऊन तिच्या जागीं दक्षिणेकडच्या समुद्रावरील वाफेनें भरलेली हवा येते. हा क्रम पांच-सहा महिने चालू असतो. हे वारे नैर्ऋत्येकडून वाहतात. ह्या वाऱ्यांतील वाफ थंड होऊन तिचें पाणी झालें, म्हणजे पर्जन्य पडावयास लागतो.

हिंवाळ्यांत ह्या वाऱ्यांच्या दिशा बदलतात. सूर्य दक्षिणेकडे जाऊं लागला, म्हणजे दक्षिणेकडील प्रदेश जास्त तापतात, व तेथील हवा वर जाऊन तिच्या जागीं हिंदुस्तान, ब्रह्मदेश वगैरे उत्तरेकडील देशांतून हवा जाते. हे वारे ईशान्य दिशेकडून पांचसहा महिने वाहतात, व ते कोरडे व थंड असतात.

समुद्रकिनाऱ्यांवर आणखी दोन प्रकारचे नियमित वारे वाहतात. जमीन व पाणी हीं सूर्यकिरणांनीं कमजास्त तापतात हें वर सांगितलें आहे. त्यामुळें दिवसां तीनचार वाजतां समुद्रावरून जमिनीकडे वारा वाहण्यास आरंभ होतो, तो रात्रीं नऊदहा वाजेपर्यंत वाहतो. जमीन व समुद्र ह्यांची उष्णता सारखी झाली म्हणजे तो बंद होतो. ह्यास 'खारा वारा' म्हणतात. नंतर पहाटेस चारपांच वाजतां उलट दिशेनें, म्हणजे जमिनीकडून समुद्राकडे, सकाळचे नऊदहा वाजेपर्यंत वारा वाहतो; ह्यास 'मतलई' म्हणतात.

वर सांगितलेल्या वाऱ्यांशिवाय ह्या पृथ्वीवर अनेक प्रकारचे वारे एकाएकीं उत्पन्न होतात. कमजास्त जोराची झुळूक, झपाट्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वारा, वावटळ, तुफान, चक्रवात व झंझावात असे त्यांचे कांहीं प्रकार आहेत. अशा वाऱ्यांस अनियमित वारे म्हणतात.

---

७०. जमिनीचें झिजणें व धुपणें.

तुम्हीं सुतारास रंधा करितांना पाहिलें असेल. रंधा पुढेंमागें होत असतां लाकडाचा थोडा थोडा कीस निघून तें पातळ व गुळगुळीत होत जातें. पृथ्वीवर जी जमीन आहे तिजवरही कांहीं रंधे अक्षयीं चालले आहेत, व त्यामुळें जमीन झिजून जात आहे, हें ऐकून तुम्हांस नवल वाटेल.

ते रंधे कोणते म्हणाल तर हवा व पाणी हे होत. हवा व पाणी जरी आपणांस अगदीं सामान्य पदार्थ वाटतात, तरी त्यांच्या आंगच्या सामर्थ्यानें मोठमोठे खडक झिजतात, टेकड्या सखल होतात व माळजमिनी फुटून त्यांचे दरेखोरे बनतात. हीं कार्यें कशीं होतात, ह्याविषयीं आपण विचार करूं.

हवेंत जी वाफ असते, तिचा कांहीं अंश खडकांत शिरतो; त्यामुळें खडक ओलसर होतात. उन्हाळ्यांत ते खडक तापले म्हणजे त्यांत भेगा पडून ते फुटतात. असा क्रम कांहीं वर्षें चालला म्हणजे कठीण खडक ठिसूळ होतात, व ठिसूळ झालेल्या खडकांचा भुगा होतो. हा भुगा वाऱ्यानें उडून गेला अथवा पावसाच्या पाण्यानें धुपून गेला, म्हणजे उघड्या पडलेल्या खडकांची झीज पुन्हा चालू होते. महाराष्ट्रांत बहुतेक ठिकाणीं खणल्यास मुरूम लागतो. हा मुरूम ठिसूळ झालेला खडकच होय.

हवेंत एक प्रकारचा वायु आहे, त्यास कारबानिक आसिड ग्यास म्हणतात. तो वायु, पावसाचें पाणी वरून पडत असतां, त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शोषिला जातो; आणि तें पाणी चुनखडीवरून व संगमरवरी दगडांवरून वाहूं लागलें, म्हणजे ते खडक झपाट्यानें झिजूं लागतात.

पृथ्वीच्या पृष्ठभागावर पावसाचें जें पाणी पडतें, त्यानें सर्व प्रकारचे खडक व जमिनी अक्षयी झिजत असतात. मऊ खडक लवकर, व



घट्ट खडक हळू हळू झिजतात. मोठमोठे डोंगर झिजून त्यांचे सुळके होतात. असे अनेक सुळके सह्याद्रीच्या रांगेंत आहेत. सिंधप्रांतांत वालुकामय अरण्यांतील वाळू वाऱ्याच्या जोरानें उडून खडकांवर आपटते, त्यामुळेंही खडक हळू हळू झिजतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खडक झिजून जी माती होते, ती पावसाच्या पाण्यानें धुपून मैदानांत व लवणांत सांचते. अशानें लागवडीच्या जमिनी तयार होतात. खडकाच्या स्वरूपाप्रमाणें ह्या जमिनींचें स्वरूप असतें. रेताड दगडापासून रेताड जमीन, चुनखडीच्या दगडापासून पांढरी जमीन व लोह-मिश्रित दगडापासून तांबडी जमीन होते. मुंबई इलाख्यांतील डोंगराळ प्रदेशांत व इतर प्रदेशांतही तांबडी माती अनेक ठिकाणीं दृष्टीस पडते. वनस्पति आणि प्राणी ह्यांचे अवशेष कुजून, बारीक होऊन, कोळशाच्या रूपानें कोणत्याही रंगाच्या मातींत मिसळले, म्हणजे तीस काळा रंग येतो.



जमिनीवर पाऊस पडूं लागला म्हणजे धुरळा, माती व खडे पाण्याबरोबर वाहूं लागतात. पाऊस फार जोराचा पडला, म्हणजे लहान मोठे धोंडेही पाण्याच्या लोटाबरोबर वाहूं लागतात. ते नदीच्या पात्रांत गेले म्हणजे ते प्रवाहामुळें घासून घासून त्यांचे गुळगुळीत गोटे होतात, व त्यांचा भुगा होऊन रेती बनते. नदीच्या पात्रांत जे खडक असतात तेही ह्या धोंड्यांनीं झिजतात व त्यांमध्यें खळगे व कुंडें होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नदीच्या आंगीं जमीन खोदण्याची शक्ति फारच मोठी असते. नदीचें पाणी टेकड्यांवरून खालीं आदळत येत असतां त्याच्या बरोबर गोटे व खडकाचे तुकडे वाहत येतात. अशा दगडांनीं नदीचें पात्र घासलें जाऊन खोल होतें व त्यांत खिंडी पडतात. नदींतील खडक कोठें मऊ व भुसभुशीत असल्यास तो फारच झिजतो व खोल जातो. नद्यांचे धबधबे बहुधा ह्या प्रकारें होतात. गेरसप्पा एथील शरावती नदीचा, गोकाक एथील घटप्रभा नदीचा, आणि महाबळेश्वराच्या डोंगरांतील वेण्या नदीचा, हे आपल्या इकडे प्रख्यात धबधबे आहेत.

समुद्राच्या लाटांनींही जमीन फार झिजते. लाटांबरोबर धोंडेही किनाऱ्यांवर आदळतात, त्यामुळें किनाऱ्यांवरील मोठमोठ्या खडकांचा भुगा होतो. प्रतिदिवशीं हजारों खंडी माती, रेती व खडे झिजून व धुपून समुद्राच्या तळीं जातात.

सारांश, ह्या पृथ्वीवर उष्णता, प्रकाश, वायु, वाफ व पर्जन्य ह्यांच्या योगानें अक्षयीं फेरफार होत आहेत. जमिनीची झीज समुद्रांत जाते व ती समुद्राच्या तळीं बसून थरांवर थर जमले म्हणजे मोठे खडक होतात. हे खडक पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेच्या जोरानें वर येऊन नवी जमीन तयार होते.

---

७१. हिंदुस्तान देशाचें स्थान व त्याची भूतलरचना ह्यांचा तेथील हवामान व लोकस्थिति ह्यांवर परिणाम.

हिंदुस्तान देश विषुववृत्ताच्या उत्तरेस कांहीं अंतरावर आहे. त्याचा वरील भाग आशिया खंडास जोडलेला आहे व खालचा भाग द्वीपकल्प आहे. त्याच्या उत्तरेस सर्व पृथ्वींत अतिशय उंच असा हिमालय पर्वत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे, आणि दक्षिणेस दक्षिण-ध्रुवापर्यंत पसरलेला अफाट महासागर आहे. हिंदुस्तान विषुववृत्ताजवळ असल्यामुळें तो एक फार उष्ण देश आहे.

हिंदुस्तानांत पर्वतांच्या अनेक रांगा आहेत. खंबायतच्या आखातापासून तर थेट बंगाल प्रांतापर्यंत तुटक तुटक अशी एक पर्वतांची रांग पसरलेली आहे. ह्या रांगेस पश्चिमेकडे सातपुडा व पूर्वेकडे छोटा नागपूरचे डोंगर म्हणतात. मध्य हिंदुस्तानांत नर्मदेच्या उत्तरेस विंध्यपर्वताची ओळ आहे. दुसरी एक रांग नर्मदा नदीच्या मुखापासून निघून पश्चिम किनाऱ्यानें कन्याकुमारीपर्यंत गेली आहे. हीस सह्याद्रि अथवा पश्चिम घाट म्हणतात. पूर्व किनाऱ्यावरही कांहीं रांगा आहेत, त्यांस पूर्व घाट म्हणतात. अफगाणिस्तानाच्या सीमेवर सुलैमान पर्वतांची ओळ आहे. ह्यांशिवाय ह्या देशांत चढउताराचे मोठमोठे उंच प्रदेश आहेत.

हिंदुस्तानांत उष्णतामान जास्त असण्याचें एक कारण वर सांगितलेंच आहे. दुसरें कारण हिमालय पर्वत होय. हा पर्वत फार उंच असल्यामुळें उत्तरेकडील फार थंड व रुक्ष वारे दक्षिणेकडे वाहण्यास प्रतिबंध होतो; व ह्यामुळें ह्या देशाचें अशा वाऱ्यांपासून उत्तम रक्षण होतें. पण असा प्रतिबंध दक्षिणेकडील उष्ण व दमसर वाऱ्यांस मुळींच होत नाहीं.

भूगोलावरील हिंदुस्तानाचें स्थान व त्याची भूतलरचना ह्यांचा त्यांतील हवामानाशीं निकट संबंध आहे. समुद्रावरील वाफेनें भरलेला वारा ज्या दिशेनें वाहतो, त्या दिशेला पर्वतांच्या ओळी आड आलेल्या असल्या म्हणजे त्या प्रदेशांत पुष्कळ पर्जन्य पडतो. त्या पर्वतांच्या पलीकडे वारा गेला म्हणजे तो बराच रुक्ष होतो, व त्यामुळें पुढें पाऊसही थोडा पडतो. चेरापुंजी नामक ओसाड प्रदेशांत अतिशय पाऊस पडतो; पण सिंध व बिकानेर एथील रखरखीत मैदानांत पाहिलें असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केव्हां केव्हां अवघ्या वर्षांत पावसाचा नांवाला एक थेंबसुद्धां पडत नाहीं! बहुतेक ठिकाणीं डोंगराजवळ पर्जन्यवृष्टि अधिक होते.

विषुववृत्तापासून जों जों उत्तरेकडे जावें, अथवा समुद्राच्या सपाटी-पासून जों जों डोंगरावर जावें, तों तों हवेचें उष्णतामान कमी कमी होतें. समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशांत थंडी व उष्णता ह्यांचें मध्यम मान असतें; पण समुद्रापासून जों जों दूर जावें, तों तों हिंवाळ्यांतील थंडी व उन्हाळ्यांतील उष्णता ह्या दोहींचें मान फार वाढतें.

हिंदुस्तानाची भूतलरचना व हवामान ह्यांचा परिणाम लोकस्थितीवर कसा घडला आहे हें पाहूं. बंगाल प्रांत फार सुपीक, उष्ण व दमट आहे, व त्यांत मोठे डोंगर मुळींच नाहींत; ह्यामुळें त्यांतील लोक कमजोर व भित्रे झाले आहेत. मध्य हिंदुस्तान व पंजाब हे प्रांत तितके सुपीक नाहींत, पण त्या प्रांतांत मोठमोठे डोंगर असून थंडी व उष्णता ह्यांचा अमल कडाक्याचा असतो; ह्यामुळें त्या प्रांतांतील लोक उंच, बळकट व शूर आहेत. पश्चिम घाटमाथ्यावर फार पाऊस पडतो, म्हणून तिकडील जमिनी बरड झाल्या आहेत; ह्यामुळें त्या प्रदेशांत राहाणारे मावळे शरिरानें जरी लहान तरी मोठे काटक, मेहनती, धीट व काटकसरी बनले आहेत.

निरनिराळ्या भागांतील निरनिराळ्या हवामानाप्रमाणें लोकांच्या खाण्यापिण्यांत व राहणींतही अंतर दिसून येतें. उत्तर हिंदुस्तानांत हिंवाळ्यांत फार थंडी असते; म्हणून तिकडील लोक त्या ऋतूंत रूचे जाड कपडे घालतात. त्या प्रांतांतील बहुतेक घरें धाब्याचीं असतात व तिकडील लोक गहूं फार खातात. आपल्या इलाख्यांत सोलापूर, विजापूर वगैरे जिल्ह्यांत पाऊस कमी व ऊन फार; म्हणून त्या प्रदेशांतील बहुतेक घरें धाब्याचीं असतात, व त्या जिल्ह्यांत जोंधळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फार खातात. पुणें, नाशीक वगैरे जिल्ह्यांत सह्याद्रीच्या बाजूस पाऊस बराच असतो, म्हणून तेथें कौलारू घरें असतात, व त्या जिल्ह्यांतील लोक बाजरी खातात. कोंकण, कर्नाटक, मद्रास वगैरे प्रांतांतील लोक शरिरानें उंच व धिप्पाड नसतात; कारण त्यांतील लोक भात, तांदुळाच्या भाकरी, सार, अंबील इत्यादि कमी कसदार पदार्थच फार खातात.

---

७२. हिंदुस्तानांतील दळणवळणाचे मार्ग.

हिंदुस्तानांत दळणवळणाचे मुख्य मार्ग तीन प्रकारचे आहेत. (१) मोठ्या सडका, म्हणजे एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाण्यासाठीं खडी घालून केलेल्या पक्क्या सडका, (२) आगगाडीचे लोखंडी रस्ते, आणि (३) किनाऱ्यांवरील बंदरांबंदरांनीं जहाजें व आगबोटी जाण्याचे मार्ग. ह्या तीन प्रकारांशिवाय कच्च्या सडका व उघाडीच्या दिवसांत उपयोगीं पडणाऱ्या वाटा देशांत चहूंकडे दृष्टीस पडतात. कित्येक नद्यांतून लहान आगबोटी व तारवें चालतात, व सरकारानें शेतकीचे कामाकरितां जे मोठमोठे कालवे काढिले आहेत, त्यांपैकीं कांहीं कालव्यांतून माल व उतारू होड्यांतून नेतां आणतां येतात.

हिंदुस्तानांत इंग्लिश लोकांची सत्ता जसजशी वाढत गेली, तसतशीं मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, आग्रा, अलहाबाद, कराची इत्यादि शहरें निरनिराळ्या इलाख्यांतील व प्रांतांतील मुख्य शहरें झालीं. ह्यामुळें एका शहराहून दुसऱ्या शहरास जाण्यासाठीं सरकारास चांगल्या पक्क्या सडका बांधाव्या लागल्या. ह्या सडकांस 'ट्रंक-रोड' म्हणजे मुख्य सडका असें म्हणतात.

अशी एक मोठी सडक मुंबईहून निघून, नाशीक, धुळें व इंदूर ह्या शहरांवरून आग्र्यास गेली आहे. दुसरी कलकत्त्याहून निघून,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बनारस, लखनौ, बरेली व लाहोर ह्या शहरांवरून पेशावरास गेली आहे. तिसरी मद्रासेहून निघून मच्छलीपट्टण, विजगापट्टण, गंजम व कटक ह्या शहरांवरून कलकत्त्यास गेली आहे. चौथी पुण्याहून निघून सातारा, कोल्हापूर, बेळगांव, धारवाड व बंगलोर ह्या शहरांवरून मद्रासेस गेली आहे. ह्यांशिवाय ह्या मुख्य सडकांस जोडणाऱ्या इतर अनेक सडका आहेत.

इ० स० १८५३ सालीं ह्या देशांत लोखंडी रस्ता बांधला, व मुंबईहून ठाण्यापर्यंत प्रथम आगगाडी सुरू झाली. त्यावेळीं लार्ड डलहौसी हे गव्हर्नर जनरल होते, त्यांच्या हातून लोखंडी सडक बांधण्याचें काम सुरू करण्याचा समारंभ झाला. हल्लीं ह्या देशांत वीसबावीस हजार मैल लांब आगगाडीचा रस्ता तयार होऊन सुरू झाला आहे. ह्यामुळें आतां हिंदुस्तानांतील बहुतेक मोठ्या शहरीं आगगाडीनें जातां येतें व माल पाठवितां येतो.

मुंबईहून पेशावर १५८३ मैल, कलकत्ता (नागपूर मार्गानें) १२२१ मैल, दिल्ली ९८२ मैल आणि मद्रास ७९४ मैल आहे. ह्या शहरीं आगगाडीनें जाण्यास अनुक्रमें ६२, ४५, ३२ व ३३ तास लागतात. सडकेनें प्रवास करण्यापेक्षां आगगाडीनें प्रवास करणें जास्त सुखाचें असून, स्वस्तही पडतें. आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाचा दर प्रत्येक मैलास बहुतकरून केवळ २½ पै आहे. आगगाडीनें माल पाठविण्यासही खर्च कमी लागतो; ह्यामुळें मीठ, कापड, धान्य व इतर जिन्नस स्वस्त दरानें विकतां येतात.

हिंदुस्तान द्वीपकल्पाच्या पश्चिम व पूर्व किनाऱ्यांवर अनेक लहानमोठीं बंदरें आहेत. त्यांमध्यें कराची, मुंबई, गोवें, कारवार,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंगळूर, नागापट्टण, मद्रास, मच्छलीपट्टण, कोकोनाड, कलकत्ता व रंगून हीं मोठीं बंदरें आहेत. कराची व रंगून ह्यांच्यामध्यें जलमार्गानें २८७८ मैल अंतर आहे. ह्या दोन बंदरांच्या दरम्यान लहानमोठ्या आगबोटी व जहाजें नेहमीं चालतात, आणि तीं लाखों रुपयांचा माल व पुष्कळ उतारू नेतात व आणतात.

सिंधु, मेघना, गंगा, ब्रह्मपुत्र, हुगळी, घोघरा, नर्मदा व तापी ह्या नद्यांपैकीं कांहीं नद्यांतून पुष्कळ मैल व कांहींतून थोडे मैलपर्यंत जहाजें चालतात. गंगा नदींतून अलहाबादेपर्यंत, व ब्रह्मपुत्र नदांतून समुद्रापासून ८०० मैलपर्यंत आंत, आगबोटी चालतात. नर्मदा व तापी ह्या नद्यांतून त्यांच्या मुखांपासून आंत दहा पंधरा कोसांपलीकडे तारवें चालत नाहींत.

ह्या देशांत सरकारानें बांधिलेले कालवे जरी मुख्यत्वेंकरून शेतकीच्या कामाकरितां आहेत, तरी त्यांपैकीं जे कालवे खोल व मोठे आहेत त्यांतून होड्या व मचवे चालतात. कोचीन, त्रावणकोर व मलबार किनारा ह्यांजवळ गोड्या पाण्याचीं कांहीं अरुंद व लांबट सरोवरें आहेत. त्या सरोवरांत बरेच मैलपर्यंत नावा चालतात.

---

७३. हिंदुस्तानाच्या किनाऱ्यानें सफर.
(कराचीपासून कोलंबोपर्यंत.)

मित्रवर्य राजमान्य राजश्री गोविंदराव काळे, मुक्काम अहमदाबाद; मित्राचे सेवेसी, काशिनाथ रामचंद्र साठे, मुक्काम कोलंबो, ह्याचा साष्टांग नमस्कार. विनंती विशेष. अहमदाबादेहून आपला निरोप घेऊन निघालों तो कराचीस गेलों, व तेथून निघून काल सायंकाळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एथें सुखरूप पोहोंचलों. आपणांस तेथें समक्ष कबूल केल्याप्रमाणें आतांपर्यंतच्या जलप्रवासाची हकिकत थोडक्यांत कळवीत आहें.



कराचीचा देखावा.

व्यापाराच्या दृष्टीनें पाहातां हिंदुस्तानाच्या किनाऱ्यावरील बंदरांपैकीं कराची हें तिसऱ्या प्रतीचें बंदर आहे. त्या बंदरांत पूर्वी मोठीं जहाजें येण्यास अडचण पडत असे; पण अलीकडे, चांगले धक्के बांधून बंदर खोल केल्यापासून, मोठमोठ्या आगबोटी बंदरांत सहज येतात. कराचीस पाऊस फारच थोडा पडतो; त्यामुळें शहराच्या आसपासचा प्रदेश रुक्ष भासतो. कराचीस काथ्याचीं तरटें चांगलीं तयार होतात. त्या बंदराहून लोंकर, कापूस, गहूं, चामडें व किरकोळ धान्यें परदेशीं रवाना होतात; आणि युरोप व अमेरिका खंडांतील सर्व तऱ्हेचा माल तेथें येतो.

कराचीहून आम्ही मांडवीस आलों. कच्छ संस्थानांतील मांडवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक प्रसिद्ध बंदर आहे. त्या शहरीं पितळेचीं व चांदीचीं भांडीं चांगलीं होतात. तीं 'कच्छी' भांडीं ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. मांडवीहून भांडीं, कापूस, सोरा व मीठ हे पदार्थ रवाना होतात.

पुढें आम्ही पोरबंदरास आलों. तें काठेवाडांतील एक बंदर आहे. त्या बंदराचा मुंबईशीं बराच व्यापार आहे. तेथील दगडांच्या खाणी फार प्रसिद्ध आहेत. पोरबंदराहून तेल, गूळ, घोडे, लोंकर व इमारतीचे दगड मुंबईस रवाना होतात, व मुंबईहून विलायती माल तेथें जातो.

पोरबंदर सोडल्यावर आम्ही मुंबईस आलों. मुंबईचा आयात व निर्यात व्यापार फारच मोठा आहे; म्हणून त्या बंदरास पहिल्या प्रतीचें बंदर म्हणतात. जगांतील बहुतेक देशांशीं ह्या बंदरांतून व्यापार चालतो. एथील एकंदर व्यापार दरसाल सरासरीनें शंभर कोटि रुपयांचा असतो. मुंबई बंदरांत जो माल येतो व जो तेथून रवाना होतो, त्याचें वर्णन करण्यास एक स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल!

मुंबईच्या दक्षिणेस रेवदंडा, बाणकोट वगैरे जीं लहान बंदरें आहेत, तीं सोडून आम्ही रत्नागिरीस आलों. तो किनारा खडकाळ व जागोजागीं नद्यांनीं व खाड्यांनीं फुटलेला असा आहे. रत्नागिरीचा काठेवाड, कच्छ व कराची ह्या ठिकाणांशीं जलमार्गानें व्यापार चालतो. नारळ, मीठ व सुकी मासळी हे तेथील निर्यात व्यापाराचे पदार्थ आहेत.

पुढें आम्ही गोव्यास गेलों. तें बंदर चांगलें व व्यापारास सोईचें असें आहे. तें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत आहे. त्या बंदराचा आयात व्यापार निर्यात व्यापारापेक्षां जास्त आहे. तो प्रदेश डोंगराळ आहे व तेथील जमीन म्हणण्यासारखी सुपीक नाहीं. गोव्याहून नारळ, सुपारी, आंबे, दालचिनी, सुकी मासळी व काथ्या हा माल निर्यात होतो; आणि तांदूळ, कपडा, साखर व मद्यें हा माल आयात होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोवें सोडल्यावर कारवार व मंगळूर हीं बंदरें लागतात. त्या प्रदेशांत चहूंकडे जंगलच जंगल असल्यामुळें तो प्रदेश रमणीय दिसतो. मंगळुरास सुरेख कौलें करण्याचे कारखाने आहेत. त्या दोन्ही बंदरांतून इमारती लाकूड, काफी, मसाल्याचे पदार्थ व सुपारी हा माल बाहेर जातो.

पुढें कोचीन बंदर लागलें. त्या बंदरास धक्का नसल्यामुळें नाकरेल बंदरावर आगबोट थांबते; आणि पडाव व मचवे ह्यांतून माल व उतारू न्यावे लागतात. तेथील किनाऱ्यावर भाताचीं दाट शेतें व नारळींचीं विस्तीर्ण बनें दिसतात. त्या प्रदेशांत बहुतेक व्यापार जलमार्गानें चालतो. तेथें पाऊस फार पडतो व तेथील हवा उष्ण व ओलसर आहे. कोचिनाहून खोबरें, काथ्या, इमारती लाकूड व मसाल्याचे पदार्थ निर्यात होतात. कापड व साखर हे तेथें मुख्य आयात माल होत.



कोलंबोचा देखावा.

कोचिनाहून निघाल्यावर हिंदुस्तानाचा किनारा सोडून आम्ही लंकेकडे म्हणजे सिलोन बेटाकडे वळलों, व लवकरच कोलंबो एथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखल झालों. पुढची हकिकत रंगून शहरीं पोहोंचल्यावर कळवीन. कळावें. लोभ असावा, हे विनंती.

---

७४. हिंदुस्तानाच्या किनाऱ्यानें सफर.
(कोलंबोपासून रंगूनपर्यंत.)

साष्टांग नमस्कार. विनंती विशेष. रंगून शहरीं येऊन मला आठ दिवस झाले. ह्या शहरांत विलायती जिनसांचें दुकान घालण्याची व्यवस्था करावयाची होती, ती करून आतां थोड्या दिवसांनीं एथून निघण्याचा माझा विचार आहे.

कोलंबो एथून पाठविलेलें पत्र आपणांस मिळालें असेलच. कोलंबो हें मोठें बंदर आहे. त्या बंदरांत सर्व देशांच्या आगबोटी व्यापाराकरितां अथवा कोळसा घेण्याकरितां येतात. आगबोट बंदराजवळ आली, म्हणजे किनाऱ्यावर नारळींचीं बनें दिसूं लागतात, व एकंदर देखावा फार रमणीय दिसतो. तेथील निर्यात माल काफी, सिंकोना, चहा, शिसें, नारळ व सुपारी हा आहे; व आयात माल कापड, तांदूळ, दगडी कोळसा, साखर वगैरे होय. तेथील हवापाणी मला फारच पसंत वाटलें. पावसाळ्यांत तेथें अतिशय पाऊस पडतो.

नंतर सिलोन बेटास वळसा घालून आम्ही हिंदुस्तानाच्या पूर्व किनाऱ्यावरील नागापट्टणास पोहोंचलों. तिकडील प्रदेश बहुतेक सपाट आहे, व त्यांत लहानमोठ्या कालव्यांचें जाळें पसरलेलें आहे. जमीनही फार सुपीक आहे. पुढें जात असतां पांदेचरी ह्या फ्रेंच बंदरावर आमची आगबोट कांहीं वेळ उभी राहिली. त्या बंदरांत व्यापारास फारशी तेजी नाहीं. त्या शहरांत कापडाच्या कांहीं गिरण्या आहेत आणि कमावलेलीं कातडीं तयार करण्याचे कारखाने आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर आम्ही मद्रासेस गेलों. तें फार वाईट बंदर आहे. किनारा उथळ, खडकाळ व वालुकामय असल्यामुळें लहान होड्यांतून माल नेऊन आगबोटीवर चढवावा लागतो. तें फार त्रासाचें काम आहे. वाऱ्याच्या व लाटांच्या झपाट्यापासून जहाजांचा बचाव व्हावा, म्हणून सरकारानें लाखों रुपये खर्च करून तें बंदर कांहींसें नीट केलें आहे. त्या बंदराहून सर्व प्रकारचा माल जातो व येतो.

मद्रासेहून आम्ही मच्छलीपट्टणास आलों. त्या बंदराचा पूर्व किनाऱ्यावरील इतर बंदरांशीं बराच व्यापार आहे. तेथून तांदूळ व इतर धान्यें परगांवीं जातात. तो प्रदेश अगदीं सपाट आहे.

पुढें आम्हांस विजगापट्टण लागलें. तें शहर मोठें आहे, पण बंदर एका लहानशा खाडींत आहे. तेथील आयात माल कापूस, सोरा, पोतीं व सागवान हा आहे; व निर्यात माल शिंगें, चामडीं, साखर, रुप्याचीं भांडीं व हस्तिदंती जिनसा हा आहे. तेथें जिकडे तिकडे डोंगर दृष्टीस पडतात.

त्यापुढें गंजम प्रांतांतील गोपाळपूर व गंजम हीं बंदरें लागतात. तो प्रदेश बराच खडकाळ आहे व पश्चिम हिंदुस्तानाच्या किनाऱ्याप्रमाणें तिकडे जागोजागीं खाड्या आहेत. तेथून जवळच चिल्का सरोवर आहे. त्याच्या पाण्यापासून चांगलें मीठ उत्पन्न करितात. त्या प्रांतांतून तंबाखू, साखर व मीठ हा माल निर्यात होतो.

नंतर आम्ही थेट कलकत्त्यास गेलों. हें शहर हुगळी नदीच्या कांठीं आहे. मुंबईच्या मानानें हें दुसऱ्या प्रतीचें बंदर आहे. हुगळी नदींत जागोजागीं वाळूच्या भात्या असल्यामुळें नदींतून आगबोटी हाकारणें फार अवघड आहे. तेथील हवा उष्ण व फार ओलसर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तेथें पाऊस फार पडतो व वरचेवर तुफानें होतात. त्या बंदरांतून ताग, नीळ, चहा, अफू, सिंकोना व इतर माल निर्यात होतो; व परदेशचा सर्व प्रकारचा माल तेथें आयात होतो.

पुढें ब्रह्मदेशाच्या पश्चिम किनाऱ्यावरील चितागांग व अकियब ह्या बंदरीं आम्ही दोन दोन दिवस राहिलों. तेथील हवामान बंगाल्यांतील हवामानासारखें आहे; तिकडे झाडी मात्र फार जास्त आहे. त्या प्रदेशांत तांदूळ फार पिकतो. तेथून इमारती लाकूड, कापूस, चामडें वगैरे बाहेर जातें; व कच्चें रेशीम, सुपारी, खोबरें, साखर वगैरे माल तेथें येतो.

शेवटीं आम्ही ह्या रंगून शहरीं पोहोंचलों. हें शहर ब्रह्मदेशाचें



रंगून एथील एका देवळाचें महाद्वार.

मुख्य बंदर असून, रंगून नदीवर वसलें आहे. ह्या नदीच्या मुखापासून २१ मैल आंत गेल्यावर हें शहर लागतें. ह्या बंदरांतून उत्कृष्ट प्रकारचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इमारती लाकूड, खनिज तेल, डिंक, चामडें इत्यादि माल परदेशीं रवाना होतो. कळावें. लोभ असावा, हे विनंती.

काशिनाथ साठे.

---

७५. हिंदुस्तानाची राज्यव्यवस्था.

ब्रिटिश सरकाराच्या अमलाखालीं हिंदुस्तानाचे जे भाग आहेत, त्यांचे राज्यकारभाराच्या सोयीसाठीं तेरा प्रांत केले आहेत. ह्या प्रांतांशिवाय सरकाराच्या आश्रयाखालीं हिंदू व मुसलमान राजांच्या ताब्यांतील लहान मोठीं सुमारें आठशें संस्थानें आहेत. ब्रिटिश सरकाराच्या प्रत्यक्ष अमलाखालीं जो एकंदर मुलूख आहे, त्यास 'ब्रिटिश हिंदुस्तान' म्हणतात. ब्रिटिश हिंदुस्तानाचें क्षेत्रफळ एकंदर लहानमोठ्या सर्व संस्थानांच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट आहे.

ब्रिटिश हिंदुस्तानाचे आज मितीस जे तेरा प्रांत आहेत त्यांचीं नांवें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेतः—मुंबई, मद्रास, बंगाल, पूर्व बंगाल व आसाम, संयुक्तप्रांत, पंजाब, वायव्य सीमेवरील प्रांत, मध्यप्रांत व वऱ्हाड, अजमीर, ब्रह्मदेश, कुर्ग, बलुचिस्तान व आंदमान बेटें. संस्थानांपैकीं हैदराबाद, बडोदें व म्हैसूर हीं सर्वांत मोठीं आहेत. कांहीं संस्थानें इतकीं लहान आहेत कीं, त्यांची सत्ता थोड्याशा गांवांवर मात्र आहे.

हिंदुस्तानाची राज्यव्यवस्था पाहाण्यासाठीं जें अधिकारि-मंडल आहे, त्यास **हिंदुस्तान-सरकार** म्हणतात. ह्या मंडळांत व्हाइसराय, म्हणजे बादशाहाचा प्रतिनिधि, हा मुख्य अधिकारी असतो. ह्यास **गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल** असेंही म्हणतात. व्हाइसराय ह्याची नेमणूक बादशाहाकडून होते व ती पांच वर्षांपुरती असते. त्यास मदत करण्याकरितां एक **कौन्सिल** म्हणजे मंत्रि-मंडल असतें. ह्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कौन्सिलांत सहा सभासद असतात; शिवाय हिंदुस्तानाचा सेनापति हाही कौन्सिलांत असतो. त्याचेकडे लष्करीखात्याची व्यवस्था सोंपविलेली असते. कायदेकानू करण्याच्या वेळीं ह्या कौन्सिलांत आणखी साठ सभासद सामील करण्यांत येतात.

व्हाइसराय ह्याच्या कौन्सिलांत सर्व कायद्यांमध्यें वाकब असा एक कौन्सिलर असतो; तो कायदेकानू करणाऱ्या खात्यासंबंधीं कामें पाहातो. दुसरा एक कौन्सिलर उत्तम प्रतीचा फडनीस असतो; त्याच्याकडे जमा-खर्चासंबंधीं कामें सोंपविलेलीं असतात. ह्यांशिवाय देशांतील बंदोबस्त ठेवण्याचें खातें, सरकारी उत्पन्न वसूल करण्याचें खातें, लोकोपयोगी कामांचें खातें, शिक्षण खातें, शेतकीचें खातें, व्यापार आणि उद्योग धंदा यांचें खातें ह्या खात्यांतील कामें चार कौन्सिलर पाहातात. परकीय देशाच्या अथवा हिंदुस्तानांतील संस्थानिकांच्या संबंधानें उत्पन्न होणारीं कामें, ह्यांवर बहुधा व्हाइसराय स्वतां नजर ठेवितो. प्रत्येक खात्याचीं कामें करवून घेण्याकरितां त्यावर एक एक सेक्रेटरी म्हणजे चिटणीस असतो; तो त्या खात्यावरील कौन्सिलरास जबाबदार असतो.

हिंदुस्तानाचे जे निरनिराळे प्रांत आहेत त्यांपैकीं प्रत्येकावर एक एक मुख्य अधिकारी असतो. मुंबई व मद्रास ह्यांवरील मुख्य अधिकाऱ्यांस गव्हर्नर म्हणतात. बंगाल, पूर्व बंगाल व आसाम, संयुक्तप्रांत, पंजाब, वायव्य सीमेवरील प्रांत व ब्रह्मदेश ह्यांवरील मुख्य अधिकाऱ्यांस लेफ्टेनंट-गव्हर्नर म्हणतात. मध्यप्रांत व बऱ्हाड, बलुचिस्तान व आंदमान बेटें ह्या तीन प्रांतांवर चीफ-कमिशनर आणि कुर्ग व अजमीर ह्या लहान प्रांतांवर कमिशनर असतात.

गव्हर्नर हे आपापल्या प्रांतांचा अधिकार कौन्सिलांच्या मदतीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालवितात. लेफ्टेनंट-गव्हर्नर ह्यांस कायदेकानू करणारें कौन्सिल असतें, पण राज्यकारभारांत मदत करण्यासाठीं कौन्सिल नसतें; आपापल्या प्रांतांचा कारभार त्यांस स्वतां पाहावा लागतो. मात्र बंगाल एथील लेफ्टेनंट-गव्हर्नर यांस राज्यकारभारांत मदत करण्यासाठीं नुकतेंच कौन्सिल देण्यांत आलें आहे. चीफ-कमिशनर व कमिशनर हे अधिकारी कायदे अमलांत आणितात व वरिष्ठ सरकारचे हुकूम बजावण्याचें काम करितात; पण त्यांस आपल्या प्रांतांकरितां कायदे करण्याची सत्ता नसते.

हिंदुस्तानाची राज्यव्यवस्था हिंदुस्तान-सरकाराच्या हातीं आहे खरी, तरी त्या सरकारावर बादशाहाच्या एका प्रधानाचा दाब असतो. हिंदुस्तानाच्या उत्पन्नाचा खर्च करणें, एकादें युद्ध सुरू करण्याचा हुकूम देणें, व्हाइसराय, गव्हर्नर, हायकोर्टाचे जज्ज वगैरे मोठमोठ्या कामगारांच्या नेमणुका करण्यांत बादशाहास सल्ला देणें व हिंदुस्तानांत केलेल्या कायद्यांस त्याची मंजुरी मिळविणें इत्यादि कामें त्या प्रधानाकडे असतात. त्यास हिंदुस्तानाचा स्टेट-सेक्रेटरी म्हणतात. त्याच्या मदतीस एक कौन्सिल नेमून दिलें असतें. स्टेट-सेक्रेटरी ह्याची कचेरी लंडन शहरांत असते, तीस इंडिया-आफीस म्हणतात.

वर दिलेल्या माहितीवरून हिंदुस्तानाचा राज्यकारभार कसा चालतो ह्याविषयीं सामान्य कल्पना होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग चौथा.

सृष्टिज्ञान आणि पदार्थवर्णन.

७६. हवा, वायु आणि वाफ.

हवा ही आपणांसभोंवतीं आहे; जरी ती दिसत नाहीं व तिचा वासही येत नाहीं, तरी ती आपणांस भासमान होते. हवा जेव्हां चलन पावते तेव्हां तिला आपण वारा म्हणतों; वाऱ्यानें झाडांचीं पानें हालूं लागतात, व वारा आपणांलाही भासतो. उन्हाळ्याच्या दिवसांत संध्याकाळीं व रात्रीं वाऱ्याकरितां आपण फार आतुर झालेले असतों. शिडांचीं जहाजें वाऱ्यानेंच चालतात.

पृथ्वीसभोंवतीं जिकडे तिकडे हवा आहे. ज्या जागा अगर भांडीं रिकामीं आहेत असें आपणांस वाटतें, तीं रिकामीं नसून त्यांत हवा असते, हें मी आतां तुम्हांस दाखवितों.

आपण काचेची एक रिकामी पंचपात्री घेऊं, व ती पालथी करून पाण्यांत दाबूं. पाहा, पाणी आंत शिरत नाहीं. कां बरें? पंचपात्रींत कांहीं तरी पदार्थ असला पाहिजे. कारण दोन पदार्थ एकाच वेळीं एकच जागा व्यापूं शकत नाहींत. आंत जो पदार्थ आहे तो बाहेर पडल्याशिवाय पाण्याला आंत जाण्याला वाव नाहीं. आतां ही पंचपात्री जरा वाकडी करूं. पाहा, पाण्यावर बुडबुडे येऊं लागले व पंचपात्रींत पाणी शिरूं लागलें. हे जे बुडबुडे आले ते पंचपात्रींतील हवा बाहेर पडल्यामुळें आले, व पाण्याला भांड्यांत शिरण्याला वाव सांपडली.

ह्या प्रयोगावरून पंचपात्री रिकामी नसून, तींत हवा हा पदार्थ होता, हें तुम्हांस कळलें. आतां इतर पदार्थांप्रमाणें हवेलाही वजन आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा नाहीं हें पाहूं. एका बाटलीचें वजन करूं; नंतर वाताकर्षक यंत्रानें तींतली हवा काढून तिचें पुन्हा वजन करूं. पाहा, हें दुसरें वजन थोडें कमी भरलें, ह्यावरून हवेला वजन आहे हें सिद्ध होतें. तेरा घन फूट हवेचें वजन अजमासें एक पौंड भरतें. पृथ्वीभोंवतीं हवेचें जें आवरण आहे तें कित्येक मैल उंचीचें आहे, व त्याच्या तळाशीं आपण आहों. हिशोबाअंतीं असें समजलें आहे कीं, प्रत्येक माणसावर हवेचा सुमारें १६ टन भार आहे. केवढा तरी भार हा! असें असून आपण एवढ्या भाराखालीं चिरडून कसे जात नाहीं? ह्याचें कारण असें आहे कीं, हवेचा दाब आपल्या आंगांवर वरून, खालून, आंतून, बाहेरून, असा सर्व बाजूंनीं सारखा आहे, म्हणून आपणांस कांहीं इजा होत नाहीं.

हवा हा कोणत्या प्रकारचा पदार्थ आहे व हवा कशाची बनली आहे, हें आतां पाहूं. द्रवरूप पदार्थांप्रमाणें ज्या भांड्यांत हवा असेल त्या भांड्याचा आकार ती घेते; पण ती द्रवरूप नाहीं. घन पदार्थ भांड्याच्या आधाराशिवाय राहूं शकतो, तशी हवाही राहूं शकते; पण ती घनही नाहीं. घन आणि द्रवरूप स्थितींशिवाय पदार्थांस आणखी एक स्थिति आहे. तिला 'वायुरूप स्थिति' म्हणतात. वायुरूपी पदार्थांना, घन पदार्थांप्रमाणें, स्वतांचा आकार नसतो. बरें, द्रवरूप पदार्थ भांड्याबाहेर सांडला तर त्याच्या पसरण्याला मर्यादा आहे, तशी वायुरूपी पदार्थाच्या पसरण्याला मर्यादा नाहीं.

हवा हा एक वायुरूप पदार्थ असून, ती निरनिराळ्या वायूंच्या मिश्रणानें बनली आहे. तींत 'नैट्रोजन' व 'आक्सिजन' हे मुख्य वायु आहेत. त्यांतील आक्सिजन हा आपल्या जीवनाला अत्यंत आवश्यक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे; म्हणून त्याला प्राणरक्षक वायु म्हणतात. कोणतीही ज्वलन-क्रिया चालण्यास त्याची फार जरुरी आहे. हवेंत नैट्रोजन नसेल, तर ज्वलन-क्रिया फारच झपाट्यानें चालून पदार्थ तेव्हांच जळून खाक होतील; म्हणून ही क्रिया मंद चालण्यास नैट्रोजन आवश्यक आहे. तसेंच वनस्पतींना व प्राण्यांना नैट्रोजन वायूची फार आवश्यकता आहे हें तुम्हांस पुढें कळेल.

बहुतेक वायु आपणांस दिसत नाहींत. कित्येकांचा वास मात्र आपणांस येतो. कांहीं वायु पेटविले म्हणजे ते दगडी कोळशाच्या धुराप्रमाणें पेट घेतात. कांहीं वायु विषारी आहेत, पण कांहींपासून आपणांस कोणताही अपाय होत नाहीं. पाण्याच्या वाफेची थोडी माहिती तुम्हांस झाली आहे. वाफही वायुच आहे. ती दिसत नाहीं, तिला वास येत नाहीं, व तिजपासून कांहीं अपाय होत नाहीं. एकाद्या भांड्यांत जर पाणी कढावयास लागलें, व त्याकडे जर आपण पाहात राहिलों, तर पाण्याच्या पृष्ठभागापासून ४।५ बोटांवर वाफेचा ढग झालेला दिसतो. चार पांच बोटेंपर्यंत मात्र आपणांस कांहीं दिसत नाहीं. त्या जागेंत खरी वाफ असते. पाणी तापून त्यास कढ आला म्हणजे त्याचें रूपांतर होऊन वाफ होते. हेंच पाण्याचें वायुरूप होय. वाफ हवेंत मिसळून थोडी थंड झाली म्हणजे, ती पांढऱ्या धुरासारखी दिसूं लागते. वाफेच्या शक्तीचा किती उपयोग करून घेतां येतो हें पाहाणें झाल्यास, आगगाड्या, आगबोटी, गिरण्या, ह्यांचीं यंत्रें कशानें चालतात तें ध्यानांत आणावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७७. प्रतिध्वनि.

एके दिवशीं अहमद कांहीं कामासाठीं रानांत गेला असतां, एका झाडावरील पांखरांस उठविण्याकरितां "हा हा!" म्हणून मोठ्यानें ओरडला; त्याबरोबर 'हा हा' असा आवाज परत आला.

रानांत कोणी तरी मुलगा लपला असून तो आपली थट्टा करीत आहे, असें वाटून, "तूं कोण आहेस?" म्हणून त्यानें विचारिलें; त्याबरोबर 'तूं कोण आहेस?' म्हणून रानांतून आवाज आला.

तेव्हां अहमद रागावला व मोठ्यानें ओरडून म्हणाला, "मूर्खा, तूं कोण आहेस, बोल." त्याबरोबर, 'मूर्खा, तूं कोण आहेस, बोल' हे शब्द त्याच्या कानीं परत आले. तेव्हां तो तर फारच संतापला, व कोण कोठून बोलत आहे, हें पाहाण्याकरितां रानांत बराच हिंडला; पण त्यास कोणी सांपडलें नाहीं. नंतर तो घरीं गेला, व त्यानें आपल्या बापास सांगितलें कीं, "कोणी मुलगा आज दुपारीं टेकडीजवळील रानांत लपून मला शिव्या देत होता." तेव्हां बापास हसूं आलें आणि तो म्हणाला, "अहमद, तुला दुसऱ्या कोणीं शिव्या दिल्या नाहींत. तूंच आपणाला शिव्या दिल्यास!" अहमदाचा बाप चांगला शिकलेला होता आणि त्यास त्या रानाची चांगली माहिती होती.

अहमद—मीं आपल्या कानांनीं शिव्या दिलेल्या ऐकिल्या, आणि तुम्ही असें कसें म्हणतां?

बाप—तूं ऐकिल्यास खऱ्या; पण तूंच शिव्या दिल्यास आणि त्यांचा प्रतिध्वनि तुला ऐकूं आला.

अहमद—प्रतिध्वनि म्हणजे?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाप—प्रति म्हणजे परत आणि ध्वनि म्हणजे आवाज. आवाज परत होणें ह्याला प्रतिध्वनि म्हणतात. आतां ध्वनि कसा उत्पन्न होतो हें प्रथम पाहूं. आपण बोलतों त्याचा हवेवर आघात होऊन हवेंत लाटा उत्पन्न होतात, व त्या आपल्या कानांवर येऊन आदळल्या, म्हणजे आपणांस ऐकूं येतें.

अहमद—हें कांहीं मला समजलें नाहीं.

बाप—बरें, तें पातेलें आण, आणि त्यांत थोडें पाणी ओत. ह्या पातेल्याच्या कांठावर मी काठीनें हळूच फटका मारितों. पाहा, आवाज उत्पन्न झाला. पातेलें हदरत आहे असें प्रत्यक्ष दिसतें. फटक्याच्या जोरानें पातेलें कांपूं लागले व त्याच्या कांपण्यानें पाण्यांत कशा लाटा उत्पन्न झाल्या आहेत, पाहा. ह्या लाटा पातेल्याच्या कडे-पर्यंत जाऊन पोहोंचल्या, व त्यांना पातेल्याच्या बाजूंचा अडथळा झाला म्हणून त्या कशा परतल्या, पाहा! पातेल्यांतील पाण्यांत जशा लाटा उत्पन्न झाल्या, तशा लाटा सभोंवतालच्या हवेंतही उत्पन्न झाल्या. पण हवाच जर आपणांस दिसत नाहीं तर तिच्या लाटा तरी आपणांस कशा दिसतील? तथापि हवेंत लाटा उत्पन्न झाल्या ह्यांत संशय नाहीं. त्या लाटा, आपल्या कानांत एक पडदा आहे, त्यावर येऊन आदळल्या; त्यामुळें आपणांस पातेल्याच्या नादाचा बोध झाला. ह्याप्रमाणेंच कोणताही आवाज अगर शब्द आपणांस ऐकूं येतो.

अहमद—आवाज कसा उत्पन्न होतो व तो आपणांस कसा ऐकूं येतो, हें मला समजलें. पण माझ्या बोलण्याचाच प्रतिध्वनि मीं ऐकिला असें तुम्ही म्हणतां, तें कसें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाप—पाण्यांत लाटा उत्पन्न होऊन त्या पसरत असतां त्यांना पातेल्याच्या बाजूंचा अडथळा झाल्याबरोबर त्या पुन्हा कशा परतल्या, हें तूं नुकतेंच पाहिलेंस. तसेंच, चेंडू जमिनीवर आपटला म्हणजे त्याच्या गतीचा अवरोध झाल्यामुळें तो मागें परतून हुशी घेतो, हेंही तुला माहीत आहे. त्याप्रमाणेंच हवेवर आघात होऊन तिच्या लाटा आपल्या कानांवर येऊन एकदां ध्वनीचा बोध होतो; पण लाटा आणखी पसरत असतांना त्यांस जर भिंतीचा अगर दुसऱ्या कशाचा प्रतिबंध झाला, तर त्या परततात व पुन्हा आपल्या कानांवर येऊन आदळतात. अशा रीतीनें तो ध्वनि आपणांस पुन्हा ऐकूं येतो; त्याला '**प्रतिध्वनि,**' 'प्रतिशब्द' किंवा 'पडसाद' म्हणतात.

अहमद—आतां समजलों. मी जेथें बोलत होतों तेथून जवळच एक टेकडी होती. माझ्या बोलण्यामुळें उत्पन्न झालेल्या लाटा टेकडीपर्यंत जाऊन तिचा प्रतिबंध झाल्यामुळें त्या परतल्या, आणि माझ्या कानांवर येऊन आदळल्या; म्हणून माझे शब्द मला पुन्हा ऐकूं आले असावे.

बाप—बरोबर. प्रतिध्वनि म्हणजे काय व तो कसा उत्पन्न होतो हें तुला समजलें. **विजापुरास गोलघुमट** नांवाची एक फार उंच व मोठी मशीद आहे. तिच्या आंतील सज्जांवर उभें राहून "अल्ला" असा एकदां उच्चार केला कीं, 'अल्ला, अल्ला' असा दहापंधरा वेळां प्रतिध्वनि ऐकूं येतो!

---

७८. दगडी कोळसा व त्याचा धूर.

श्रीपतराव हा अगदीं जुन्या चालीचा गृहस्थ होता. तो आगगाडीपासून दूर एका खेड्यांत राहात असे. तो घर सोडून फारसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोठें गेलाही नव्हता. त्याच्या मनांत पुष्कळ दिवस मुंबई शहर पाहावें असें होतें; म्हणून एकदां तो त्याचा मित्र रंगराव ह्याजबरोबर मुंबईस जाण्याकरितां निघाला. ते दोघे स्टेशनावर येऊन पोहोंचले व आगगाडींत बसले. आगगाडी चालू झाली. तेव्हां ती गाडी कशी चालते, हें श्रीपतरावास समजून घेण्याची इच्छा झाली. तेव्हां रंगरावांनीं सांगितलें कीं, वाफेच्या शक्तीनें गाडी चालते; आणि आगगाडींत दगडी कोळशाच्या विस्तवानें पाण्याची वाफ करितात.

मुंबईस पोहोंचल्यावर ते सुताच्या व रेशमाच्या गिरण्या आणि गोदींतील आगबोटी पाहावयास गेले. आगगाड्या, आगबोटी, गिरण्या वगैरे सर्व चालण्याला दगडी कोळशाचा उपयोग करितात, हें ऐकून श्रीपतरावाला आश्चर्य वाटलें. संध्याकाळ झाली व रात्र पडत चालली, म्हणून ते परतले. तों वाटेनें धुराच्या दिव्यांचा जिकडे तिकडे चकचकाट झाला होता. तेव्हां श्रीपतराव म्हणाला, "ह्या दिव्यांचा इतका हा उजेड कसा पडतो?" रंगरावांनीं सांगितलें, "हे दगडी कोळशाच्या धुराचे दिवे आहेत." तेव्हां श्रीपतरावास अतिशय आश्चर्य वाटलें. पुढें चालतां चालतां एका दुकानाकडे श्रीपतरावाचें लक्ष गेलें. त्या दुकानांत निरनिराळ्या रंगांचे पुंजके लहान लहान तबकांतून ठेविले होते. त्यांवर धुराच्या दिव्याचा प्रकाश पडल्यामुळें ते चमकत होते. श्रीपतरावानें आपल्या मित्रास विचारिलें, "काय हो, इतके हे निरनिराळे रंग कशापासून काढले असतील बरें?" तेव्हां रंगराव म्हणाले, "हे रंग दगडी कोळशाच्या डामरापासून करितात व कापड रंगविण्यांत ह्यांचा उपयोग फार होतो." तेव्हां श्रीपतराव म्हणाला, "आहे तरी काय? जिकडे तिकडे दगडी कोळसा! उद्यां खाण्याचे पदार्थ सुद्धां दगडी कोळशापासून करतील!" तेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रंगराव हसले आणि म्हणाले, "होय, हल्लींसुद्धां ह्यापासून साखर करितात व ती आपल्या साखरेच्या शंभरपट गोड असते." तेव्हां श्रीपतराव म्हणाला, "धन्य बुवा त्या दगडी कोळशाची!"

असें बोलत ते बिऱ्हाडीं पोहोंचले, व जेवणखाण आटोपल्यावर निजावयास गेले. पण श्रीपतरावास झोप कोठली? त्यास एकसारखा दगडी कोळसा दिसत होता! त्यानें मनांत अनेक तर्क चालविले. हा कोणत्या दगडाचा कोळसा करीत असतील? हा दगड आहे कीं एवढीं मोठमोठीं यंत्रें चालविणारा कोणी राक्षस आहे? असा विचार करतां करतां बऱ्याच वेळानें त्यास झोप लागली. पण ती गाढ कोठून लागणार? त्याला एक स्वप्न पडलें. त्यांत त्यानें एक अवाढव्य काळा पुतळा आपणापुढें उभा राहून बोलत आहे असें पाहिलें!

पुतळा म्हणाला, "मी दगडी कोळसा आहें. तूं अगदीं आजकालचा आहेस, पण मी त्रेतायुगांतला आहें! मी जसा आतां दिसतों तसा पूर्वीं काळा नव्हतों. हजारों वर्षांपूर्वीं मी मोठा वृक्ष होतों. जीं झाडें हल्लीं लहान झुडपें दिसतात, त्यांची वाढ त्या काळीं केवढ्या प्रचंड वृक्षाएवढी होत असे, त्याची तुला कल्पनाही होणें नाहीं. लहान झाडेंझुडपेंही अगणित होतीं. पण एकदां असा प्रसंग आला कीं, पूर येऊन सर्व पृथ्वी जलमय होते कीं काय असें झालें. पाण्याबरोबर वाळू व माती वाहून येऊन झाडेंझुडपें त्यांच्यांत बुडून गेलीं. माझ्यासारखे प्रचंड वृक्षसुद्धां मातीमध्यें गाडले गेले. आम्हां सर्वांवर इतकी वाळू व माती पडली कीं, कित्येक फूट खोल आम्ही जमिनींत पुरले गेलों. किती वर्षें तरी आम्हांस हवा नाहीं, पाणी नाहीं, सूर्यप्रकाश नाहीं; म्हणून आमची ही दशा झाली व आम्ही काळे ठिक्कर पडलों. आम्ही जवळील मातीसहीत, वरील भारानें चेपले गेलों व दगडासारखे घट्ट बनलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा प्रकारें आम्हांस दगडी कोळशाचें रूप प्राप्त झालें आहे. दगडी कोळसा चांगला जळतो असें जेव्हां लोकांस कळलें, तेव्हां आम्हांस खाणींतून खणून काढून अनेक कामांत, मुख्यत्वेंकरून यंत्रें चालविण्यांत, ते आमचा उपयोग करूं लागले. आसामांत व मध्यप्रांतांत शृंगारणी



दगडी कोळशाची खाण.

व वरोरा एथें आमच्या खाणी आहेत. त्या बघण्याकरितां तूं मुद्दाम जा, म्हणजे आमचें पूर्णस्वरूप तुझ्या लक्षांत येईल.

"चोहोंकडून बंद असून एका आंगास नळी असलेल्या भांड्यांत जर आम्हां दगडी कोळशांस तापविलें, तर आमचा धूर होऊन तो नळीवाटे बाहेर पडतो. त्याला बत्ती लाविली कीं तो पेट्ट लागतो व उजेड देतो. अशाच तऱ्हेचा मोठ्या प्रमाणावर एथें एक धुराचा कारखाना आहे. तो पाहाण्याकरितां तूं उद्यां जा, म्हणजे कोळशापासून धूर कसा निघतो, व डामर कसें पडतें, तें तुला चांगलें दिसेल. ह्या डामरापासूनच निरनिराळे रंग तयार करितात."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीपतराव जागा झाला व त्यानें तें स्वप्न रंगरावांस सांगितलें. नंतर दुसरे दिवशीं ते दोघे धुराचा कारखाना पाहाण्याकरितां गेले.

७९. कारंजें.

धोंडिबा पांढरे हा सातारा एथील म्युनिसिपालिटींत नौकर होता. पाण्याच्या नळांची देखरेख करण्याचें काम त्याच्याकडे होतें. एके दिवशीं तो आपल्या दोघां मुलांस घेऊन एका बागेंत फिरावयास गेला. आंत शिरल्याबरोबर पुढल्या आंगालाच एक मोठें कारंजें होतें, तेथें मुलगे मजा पाहात राहिले. कांहीं वेळानें शिवानें बापास पुसलें, "बाबा, कारंज्याला पाणी कोठून येतें आणि तें इतकें उंच कसें उडतें?"



धोंडिबानें त्यास जवळच पाण्याचा खजिना होता तो दाखविला. तसेंच, खजिन्याच्या तळापासून एक नळी काढून, ती कारंज्याखालीं आणून, तिचें तोंड वर करून तिला एक किल्ली लाविली होती, तेही सर्व दाखविलें. किल्ली उलटी फिरविली तेव्हां पाणी उडावयाचें बंद झालें, व पुन्हा सुलटी फिरविल्याबरोबर तें पूर्वीप्रमाणें वर उडूं लागलें.

शिवानें विचारिलें, "आपल्या घरीं तोटी आहे तिची किल्ली फिरविली म्हणजे पाणी पडतें, पण कारंजें उडत नाहीं; ह्या कारंज्याचे फवारे किती उंच उडत आहेत! हें असें कसें होतें?" धोंडिबा म्हणाला, "आज सांज झाली. उद्यां मी तुम्हांस आपल्या घरींच कारंजें करून दाखवीन. आतां परत चला."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतर ते घरीं गेल्यावर त्यांचें जेवणखाण झालें? पण जिवा व शिवा ह्यांस उजाडेल केव्हां, व घरचें कारंजें आपण पाहूं केव्हां, असें झालें. दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर ते बापास म्हणाले, "बाबा, आम्हांस कारंजें दाखवितां ना?"

धोंडिबानें 'होय' म्हणून काचेची एक मोठी नळी काढून, ती एका मद्यार्काच्या दिव्यावर धरली, व ती दोन ठिकाणीं वांकवून, तिला पाटीच्या चौकटीच्या तीन बाजूंचा आकार आणिला. एक बाजू बरीच लांब ठेविली, ब दुसऱ्या बाजूचें टोंक दिव्यावर धरून अगदीं निमुळतें केलें व त्याला सुई शिरेल इतकें बारीक भोक ठेविलें.

नंतर धोंडिबानें नळीच्या लांब बाजूच्या तोंडांत नसराळें धरून थोडें पाणी ओतल्याबरोबर तें दोन्ही भागांत सारखें झालें. आणखी पाणी घातलें तरी दोन्ही भागांत त्याची उंची सारखीच! तेव्हां त्यानें मुलांस म्हटलें, "पाहा, पाणी कसें समपातळींत राहातें!" मुलांच्याही लक्षांत ती गोष्ट तेव्हांच आली. आणखी पाणी घातल्यावर तें आखूड बाजूच्या बारीक छिद्रावाटे बाहेर पडूं लागलें. तेव्हां शिवा म्हणाला, "पाणी बाहेर आलें खरें, पण कारंजें कोठें उडालें?"

"बरें, आतां कारंजें उडवितों हं," असें म्हणून धोंडिबानें जिवास त्या बारीक भोकावर बोट ठेवण्यास सांगितलें, व सर्व नळी पाण्यानें भरून ती तोटीखालीं ठेवून तोटीचें पाणी नसराळ्यांत पडूं लागेल असें केलें. मग त्यानें जिवास बोट काढण्यास सांगितलें. जिवानें बोट काढिल्याबरोबर कारंजें उंच उडूं लागलें. तेव्हां मुलांना मोठी मौज वाटली, व "असें कां होतें?" म्हणून त्यांनीं बापास विचारिलें.

धोंडिबा म्हणाला, "समपातळींत राहाणें हा पाण्याचा धर्म आहे. पण नळीचा एक भाग दुसऱ्या भागापेक्षां उंच आहे. तेव्हां ह्या भागाइतकें उंच चढण्यास पाण्याला दुसऱ्या भागांत अवकाश नाहीं, म्हणून पाणी बाहेर उडून तितक्या उंचीला जाण्याचा प्रयत्न करितें. ह्या उडणाऱ्या पाण्याचा जो फवारा, त्यास आपण कारंजें म्हणतों."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८०. पारा व उष्णता-मापक यंत्र.



सेंटिग्रेड. फारेनहीट.

मास्तर—मुलांनो, एकादा पदार्थ तापविला म्हणजे तो उष्णतेनें प्रसरण पावतो, हें तुम्हांस मागेंच कळलें आहे. आतां पदार्थांतील उष्णता कशी मापितात, हें मी तुम्हांस आज समजून सांगणार आहें. ह्या कुपींत पारा आहे. पारा ही एक धातु असून तिजमध्यें कांहीं विशेष धर्म आहेत. पारा फार जड म्हणजे पाण्याच्या तेरापट जड असतो. हा घन नसल्यामुळें जागच्या जागीं स्थिर न राहातां पातळ पदार्थाप्रमाणें वाहतो; व एका भांड्यांतून दुसऱ्या भांड्यांत ओततां येतो. मेजावर जर थोडा पारा सांडला, तर पाण्याच्या थेंबाप्रमाणें त्याच्या गोळ्या होतात, व आपण त्या चिमटींत धरावयास लागलों, तर निसटतात. रुप्याप्रमाणें पारा पांढरा असून चकचकीत असतो. आतां हें पाहा एक यंत्र आहे. ह्यांत काय आहे सांगा पाहूं?

काळू—हा पारा दिसत आहे. हा ह्या नळींत कां बरें घातला आहे?

मास्तर—त्याचें कारण लवकरच तुम्हांस कळेल. ही पाहा एक काचेची कुपी आहे, व ती रंगीत पाण्यानें भरली आहे. हिला हा भोक असलेला बूच बसवितों, व त्यांतून एक काचेची नळी घालतों. आतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही कुपी तापविली म्हणजे काय होतें, पाहा. जसजसें पाणी तापावयास लागतें, तसतसें तें नळींत चढतें व कुपी थंड होऊं दिली कीं तें खालीं उतरतें. असें होण्याचें कारण काय बरें असावें?

सदाशिव—उष्णतेनें पाण्याचा आकार वाढतो, म्हणून तें नळींत चढतें; व उष्णता काढून घेतली, कीं तें थंड होउन त्याचा आकार कमी होतो, म्हणून तें खालीं उतरतें.

मास्तर—बरोबर आहे. पाणी, पारा व इतर सर्व पदार्थ उष्णतेनें प्रसरण पावतात व थंडीनें आकुंचित होतात. उष्णता मापण्यास पारा हें पाण्यापेक्षां चांगलें साधन आहे; कारण, पाण्याप्रमाणें पाऱ्याची उष्णतेनें लवकर वाफ होत नाहीं; व तो पाण्यासारखा थंडीनें लवकर थिजतही नाहीं. शिवाय पारा हा पाण्यापेक्षां लवकर तापतो व लवकर निवतो. आतां माझ्या हातांत जें हें यंत्र आहे, त्याजकडे चांगलें लक्ष लावून बघा. हें कशाचें बरें केलें आहे?

हसन—ही दोन्ही तोंडांनीं बंद असलेली काचेची नळी आहे. हिच्या खालच्या आंगास फुगीर गोल आकार केलेला आहे, त्यांत पारा आहे. ही नळी एका लाकडी पट्टीवर बसविलेली आहे. पट्टीवर आडव्या रेघा आणि आंकडे आहेत. पण नळीच्या आंत पारा कसा बरें घातला असेल?

मास्तर—तेंच मी आतां सांगतों. नळीचें वरलें तोंड उघडें असतांना जरूर तितका पारा भरतात. मग नळी तापविली म्हणजे उष्णतेनें आंतला पारा पसरून आंतली सर्व हवा निघून जाते, व ती सगळी नळी पाऱ्यानें व त्याच्या वाफेनें भरते. मग तें तोंड बुजवितात. नंतर जेव्हां उष्णता कमी होते तेव्हां पारा खालीं उतरतो. मग ती नळी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पट्टीवर बसवून बर्फांत ठेवितात, म्हणजे पारा उतरत उतरत अगदीं खालीं जेथें स्थिर होतो, त्या ठिकाणीं पट्टीवर खूण करितात. तिला 'थिजण्याचा बिंदु' असें म्हणतात; कारण, उष्णतामान इतकें कमी झालें कीं, पाणी थिजूं लागतें. आतां कढत्या पाण्यांत हें यंत्र घातलें, तर पारा चढत चढत बराच वर जातो व मग स्थिर होतो. ह्या ठिकाणीं फळीवर खूण करून तिला 'कढण्याचा बिंदु' म्हणतात. ह्या दोन खुणाच्या मधील अंतराचे सारखे विभाग पाडितात, त्यांवरून आपणांस पदार्थांचें कमजास्त उष्णतामान कळतें. ह्या यंत्रास **उष्णता-मापक यंत्र** म्हणतात. ह्या यंत्रांत अगदीं खालची जी खूण आहे, तेथें शून्याचा आंकडा आहे व अगदीं वरल्या खुणेच्या ठिकाणीं १०० चा आंकडा आहे. म्हणजे ह्या यंत्रांत एकंदर शून्यापासून १०० पर्यंत खुणा केलेल्या आहेत; ह्या खुणांस **अंश** म्हणतात. ह्या संख्येवरून ह्याला '**सेंटिग्रेड**' म्हणजे '**शतांश**' उष्णता-मापक यंत्र म्हणतात.

दुसरें एक **उष्णता-मापक** यंत्र आहे. हें आपल्याकडे विशेष प्रचारांत आहे. त्यांत थिजण्याच्या बिंदूच्या ठिकाणीं ३२ चा आंकडा असतो व कढण्याच्या बिंदूच्या ठिकाणीं २१२ चा आंकडा असतो. म्हणजे ह्यांत तेवढ्याच अंतराचे १८० विभाग पाडलेले असतात. ह्या यंत्रानें थिजण्याच्या बिंदूच्या खालचेही अंश मोजतां येतात. हें यंत्र **फारेनहीट** नांवाच्या साहेबानें बनविलें म्हणून त्यास '**फा**रेनहीट' **उष्णता-मापक** यंत्र म्हणतात.

मुलांनो, हें यंत्र आपण शाळेच्या पडवींत टांगून ठेवूं. तुम्ही रोज दुपारीं दोन वाजतां पारा कोणत्या अंशावर आहे हें पाहून टिपून ठेवीत जा, म्हणजे हवेचें उष्णतामान कमजास्त कसें होत असतें हें तुम्हांस चांगलें कळेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८१. हवेचा दाब व पाण्याचा बंब.

ह्या पुस्तकांतील "हवा, वायु आणि वाफ" ह्या धड्यावरून हवेचा आपल्यावर सर्व बाजूंनीं दाब आहे हें तुम्हांस समजलें. आतां मी तुम्हांस एक प्रयोग करून दाखवितों; तो तुम्हीं पाहिला, म्हणजे हवेच्या ह्या दाबाविषयीं तुमची चांगली समजूत होईल. हा एक काचेचा पेला मी पाण्यानें भरतों; व त्याच्या तोंडावर एक कागद बसवितों. आतां हा माझा उजवा तळहात ह्या कागदावर ठेवून हा पेला मी झटकन उपडा करतों, व तळहात हळूच काढून घेतों; तरी पाहा, ह्या पेल्यांतील पाणी खालीं पडत नाहीं! असें कां बरें होतें? ह्या कागदानें पेल्यांतील पाण्याचा भार कसा सहन केला, हें तुम्हांस सांगतां येईल काय? ह्याचें कारण असें आहे कीं, ह्या कागदावर खालच्या बाजूनें हवेचा दाब आहे, म्हणून पाण्याला बाहेर पडावयाला अवसर नाहीं. आतां चाळणीप्रमाणें भोकें पाडलेलें असें हें टोपण आपण घेऊं. ह्या टोपणांत पाणी घातलें तर तें त्यांतून गळून जाईल. पण आतां पाण्यानें भरलेल्या ह्या शिशाच्या तोंडावर हें टोपण बसवून हा शिसा मी उलटा धरतों. पाहा, आतां टोपणांतून पाणी गळत नाहीं. ह्याचेंही कारण हेंच कीं, खालून हवेचा दाब आहे, तो पाण्यास तोलून धरतो.

आतां हें टोपण काढून घेऊन मी शिसा टेबलावर नीट उभा ठेवितों. दोन्ही तोंडें मोकळीं असलेली ही काचेची नळी आहे. हिचें एक टोंक शिशांतील पाण्यांत घालून दुसऱ्या टोंकावाटे मी ह्या नळींतील हवा तोंडानें वर ओढून घेतों. पाहा, नळींत पाणी चढूं लागून तें माझ्या तोंडांतही आलें. असें कां झालें तें सांगतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिशांतील पाण्यावर हवेचा दाब आहे. आतां मीं जेव्हां हवा वर ओढून घेतली, तेव्हां नळीखालच्या पाण्यावरील हवा नाहींशी होऊन त्याच्यावर तिचा दाब होता तो नाहींसा झाला. नळीभोंवतालच्या पाण्यावर हवेचा दाब पहिल्याप्रमाणें कायम आहेच, त्यामुळें नळींत हवेचा दाब नाहींसा झाल्यानें, तींत पाणी वर चढलें. रंग उडविण्याच्या पिचकाऱ्या तुम्हां सर्वांच्या पाहाण्यांत आहेतच. पिचकारी पोकळ असते. रंगाच्या पाण्यांत पिचकारीचें टोंक बुडवून दट्ट्या वर ओढूं लागलों म्हणजे तिच्यांत पोकळी होऊन, टोंकाखालच्या पाण्यावरील हवेचा दाब नाहींसा झाल्यानें, तें पिचकारीच्या भोकांतून वर जाऊं लागतें. रंगाच्या पिचकारीच्या तत्त्वावरच पाण्याच्या बंबाची रचना केलेली असते. मात्र दोहोंत हा फरक आहे कीं, पिचकारींत पाणी आल्यावर दट्ट्या खालीं दाबला, म्हणजे पिचकारींतील पाणी पिचकारीच्या खालच्या भोकावाटे बाहेर पडतें; पण पाण्याच्या बंबांत असें होत नाहीं. पाण्याच्या बंबाची रचना अशी केलेली असते कीं, तिच्या योगानें पाण्यास बंबाच्या अगदीं वरच्या तोंडापर्यंत चढतां येऊन तोटीवाटे बाहेर पडतां येतें. ती रचना अशीः—

बंबाच्या बुडाशीं पाण्यांत पोहोंचण्याइतकी लांब एक नळी असते. ही नळी ज्या ठिकाणीं बंबाच्या बुडाशीं सांधलेली असते, त्या ठिकाणीं आंतल्या बाजूस वर उघडणारी एक झडप असते. तशीच एक झडप बंबाच्या दट्ट्यालाही असते. पाण्याबरोबर नळींत केरकचरा जाऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नये म्हणून तिच्या खालच्या तोंडाशीं एक गोलाकार चाळण बसविलेली



असते. दट्ट्या वर ओढला म्हणजे हवा वर ओढली जाऊन बंबाच्या बुडाशीं असलेली झडप पाण्याच्या दाबानें उघडते, आणि त्या दारानें पाणी वर चढतें. पुन्हा दट्ट्या दाबला म्हणजे दाबानें ती झडप बंद होते. त्यामुळें पाणी परत खालीं जात नाहीं; इतकेंच नाहीं, तर आंतील पाण्याच्या व हवेच्या दाबानें दट्ट्यांतील झडप जोरानें उघडते आणि त्या वाटेनें पाणी दट्ट्याच्यावर चढतें. नंतर दट्ट्या पुन्हा वर ओढला म्हणजे त्याच्यावर चढलेल्या पाण्याच्या दाबानें दट्ट्यांतील झडप बंद होते, आणि वर चढलेलें पाणी तोटींतून जोरानें बाहेर पडतें.

---

८२. हवेचा दाब व वायुभार-मापक यंत्र.

मुलांनो, भूपृष्ठावर हवेचा दाब आहे ही गोष्ट तुम्हांस माहीत आहे; आणि हवेच्या दाबानें बंबांत पाणी कसें चढतें, तेंही तुम्हांस कळलें आहे.

हवेचा दाब मापण्याचें एक यंत्र आहे, त्यास **वायुभार-मापक यंत्र** म्हणतात. ह्या यंत्राच्या रचनेची मूळ कथा फार मौजेची आहे. इटाली देशांतील एका शेतकऱ्यानें मागें एकदां ४५ फूट खोलीची विहीर खणिली; आणि तिच्यांतील पाणी बंबानें वर चढविण्याचा तो यत्न करूं लागला. परंतु पाणी ३२ फुटांहून अधिक उंच चढेना. तेव्हां बंबानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाणी ३२ फुटांपेक्षां जास्त कां चढत नाहीं, म्हणून त्यानें कित्येक पंडितांस विचारिलें; पण कोणासही त्यांचें चांगलेंसें उत्तर देतां येईना. शेवटीं, पाणी मुळीं वर चढतेंच कां, .ह्या गोष्टीचा विचार एक शास्त्रज्ञ करूं लागला. तेव्हां हवेस वजन असावें असें त्याच्या ध्यानांत आलें. मग त्याला पुढें असें सुचलें कीं, बंबांतील हवा बाहेर पडल्यामुळें बंबांतील पाण्यावर हवेचा दाब मुळींच राहात नाहीं; व भोंवतालच्या पाण्यावर हवेचा दाब असतो, त्यामुळें बंबांतलें पाणी वर चढत असावें. भोंवतालच्या पाण्यावर हवेचा दाब ज्या मानाचा असेल त्या मानानें पाणी उंच चढेल, व पाणी फक्त ३२ फूट वर चढतें, ह्यावरून हवेच्या दाबांत तितक्याच उंचीपर्यंत पाणी चढविण्याची शक्ति असावी, असा त्यानें तर्क बांधिला.

हा तर्क जर खरा असेल, तर पाण्याहून पातळ व हलके पदार्थ ३२ फुटांपेक्षां जास्त चढले पाहिजेत, आणि पाण्याहून जड असणारे पदार्थ अर्थात् कमी चढले पाहिजेत; पारा हा पाण्याच्या १३ पट जड आहे, त्या अर्थीं तो पाण्याच्या १३ व्या हिश्शाइतका उंच चढेल, असें त्यानें अनुमान केलें. हें अनुमान सिद्ध करण्याकरितां त्या शास्त्रज्ञानें ४० इंच लांबीची एक काचेची नळी घेतली व तिचें एक तोंड बंद करून त्यानें ती पाऱ्यानें भरली, आणि तिच्या तोंडावर बोट ठेवून ती उलटी केली. नंतर, पाऱ्यानें भरलेल्या एका पेल्यांत नळीचें तोंड बुडवून, त्यानें आपलें बोट काढून घेतलें; तेव्हां नळींतील पारा थोडासा खालीं उतरून स्थिर झाला. नळींत राहिलेल्या पाऱ्याची उंची त्यानें मोजिली, ती सुमारें २॥ फूट भरली. म्हणजे नळींतल्या पाऱ्याची उंची, हवेच्या दाबामुळें वर चढलेल्या पाण्याची उंची जी ३२ फूट,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिच्या १३ व्या हिश्शाएवढी भरली. हें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां आपण केलेलें अनुमान बरोबर ठरलें म्हणून त्याला अत्यानंद झाला.



वायुभार-मापक यंत्रांत वरच्यासारखी पाऱ्यानें भरलेली एक नळी पाऱ्यानेंच भरलेल्या एका पेल्यांत उपडी ठेविलेली असते. नळी व पेला हीं दोन्ही एका लाकडाच्या पट्टींत बसविलेलीं असतात, आणि नळींतील पाऱ्याची उंची बरोबर दाखविण्याकरितां त्या पट्टीवर इंचांच्या खुणा केलेल्या असतात.

वायुभार-मापक यंत्र बरोबर घेऊन जर आपण एकाद्या पर्वतावर चढूं लागलों, तर आपणांस असें आढळून येईल कीं, जसजसे आपण वर चढतों, तसतशी हवा विरळ व हलकी झाल्यामुळें यंत्रांतील पारा खालीं उतरतो. समुद्राच्या सपाटीपाशीं पाऱ्याची उंची ३० इंच असते. समुद्राच्या सपाटीपासून दर ९०० फूट उंचीवर पारा एकेक इंच खालीं उतरतो. ह्यावरून आपणांस पर्वतांची उंची मोजतां येते.

ह्या यंत्राच्या साह्यानें पाऊस केव्हां पडेल व तुफान केव्हां होईल, हेंही आपणांस अजमासानें सांगतां येतें. जेव्हां हवेमध्यें पाण्याची वाफ पुष्कळ होते, तेव्हां पाऊस पडण्याचा संभव असतो. वाफ हवेपेक्षां हलकी आहे, म्हणून हवेमध्यें वाफ पुष्कळ झाल्यानें तिचें वजन कमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें, व त्यामुळें यंत्रांतील पारा उतरतो. पारा उतरला म्हणजे पाऊस पडणार असें समजावें. आतां जास्त उष्णतेनें हवा विरळ व हलकी होते, तेव्हांही ह्या यंत्रांतील पारा खालीं उतरूं लागतो. पारा असा एकाएकीं खालीं उतरला म्हणजे बहुधा तुफान होणार असें तो सुचवितो; कारण, उष्ण हवा वर गेली म्हणजे तिच्या जागीं थंड हवा झपाट्यानें येणार, हें खास. वायुभार-मापक यंत्रांत वेळोवेळीं होणारे फरक नोंदून ठेवण्याची तजवीज सिमला एथें सरकारानें केली आहे; आणि तुफान होण्याचें चिन्ह दिसल्यास, त्याबद्दल बंदरोंबंदरीं खलाशी लोकांस सरकाराकडून ताबडतोब सूचना देण्यांत येते.

---

८३. सपुष्प वनस्पतींचे दोन वर्ग.

वनस्पतींचे मुख्य दोन वर्ग म्हटले म्हणजे ज्यांना फुलें येतात तो एक, जसें आंबा, केळ; व ज्यांना फुलें येत नाहींत तो एक, जसें नेचें, शेवाळ. फुलें येणाऱ्या झाडांचे पुन्हा दोन वर्ग होतात. एक द्विदळ व दुसरा एकदळ. ज्यांच्या बियांत दोन दळें म्हणजे डाळिंब्या असतात तो एक वर्ग, व ज्यांच्या बियांत अशीं दोन दळें नसतात, अर्थात् एकच दळ असतें, तो दुसरा.

हे जे सपुष्प झाडांचे दोन वर्ग, त्यांमध्यें बियांच्या दळांसंबंधानेंच फरक आहे असें नाहीं. तर एकाचें प्रत्येक इंद्रिय दुसऱ्याच्या त्याच प्रत्येक इंद्रियापासून भिन्न आहे, असें सूक्ष्म अवलोकन केलें म्हणजे कळून येईल.

हीं पाहा मीं दोन जातींचीं दोन झाडें आणिलीं आहेत; ह्यांच्यांतील भेद त्यांच्या मुळांपासून आपण पाहूं या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें द्विदळ झाड; ह्याचें मूळ पाहा कसें लांब जाऊन मग त्याला तंतु फुटले आहेत. पण ह्या एकदळ झाडाचें मूळ लांब न जातां त्याला किती तरी तंतु फुटून तें तंतुमय झालें आहे; म्हणजे ह्यांत तंतुच तंतु दिसतात. नारळीचें झाड ह्या दुसऱ्या वर्गांत येतें. तें पुष्कळ उंच वाढतें, पण त्याचें मूळ कधीं फार खोल जात नाहीं. तेंच आंब्याचें झाड पहिल्या वर्गातलें आहे, त्याचीं मुळें किती तरी खोल गेलेलीं असतात.



द्विदळ झाड. एकदळ झाड.

आतां आपण खोडाकडे वळूं. द्विदळ झाडाच्या खोडाला फांद्या फुटलेल्या असतात. पण एकदळ झाडाला फांद्या मुळींच नसतात. ह्या दोन वर्गांतील झाडें ओळखण्याची ही मोठी खूण आहे; ज्यांना फांद्या फुटतात तीं द्विदळ झाडें, व ज्यांना फांद्या फुटत नाहींत तीं एकदळ झाडें होत. एकदळ झाडाचें खोड सरळच सरळ सोटासारखें असतें, म्हणजे त्या झाडाचा खालचा भाग वरच्या भागापेक्षां फारसा जाडा नसतो. पण द्विदळ झाडांच्या खोडांचा खालचा भाग वरल्या भागाच्या किती पटींनीं तरी जाड असतो. शिवाय द्विदळ झाडाला साल असते, पण एकदळ झाडाला ती मुळींच नसते. दुसरें असें आहे कीं, ह्या दोहोंचीं खोडें आडवीं कापिलीं, तर द्विदळाच्या खोडाचा गाभा भरींव व कठीण असतो, व एकदळांत तो पोकळ किंवा भुसभुशीत असतो, असें दिसून येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां आपण दोहोंचींही पानें पाहूं. द्विदळाचें पान उजेडाकडे धरा म्हणजे त्यांत शिरांचें जाळें कसें झालें आहे तें तुम्हांस दिसेल, पण तेंच एकदळाचें धरल्यास त्यांत तशा प्रकारचें जाळें दिसत नाहीं; म्हणजे द्विदळ झाडाच्या पानांत शिरा व उपशिरा ह्यांची गुंतागुंत असते, पण एकदळ झाडाच्या पानांतील शिरा सरळ असतात. एकदळाचें पान फाडलें तर तें सरळ फाटतें; तसें द्विदळाचें पान सरळ फाटत नाहीं. खेरीज, द्विदळ झाडांत पान पिकलें म्हणजे तें देठासकट एकदम गळून पडतें; तसें एकदळाचें पडत नाहीं, तर तें अगोदर कितीएक दिवस लोंबत राहातें व मग गळून पडतें. गवतें एकदळ वनस्पति आहेत; त्यांच्या पाती वाळून व कुजूनही जातात, तरी त्या लवकर गळून पडत नाहींत.

आतां आपण फुलें घेऊं. फुलांत दोन आच्छादनें म्हणजे एक पुष्प-कोश व दुसरें पुष्प-मुकुट हीं असतात. हीं दोन्ही आच्छादनें द्विदळांच्या फुलांत बहुतकरून असतात. पण एकदळाच्या फुलांत एकच असतें. हें पाहा गुलछबूचें फूल. हें एकदळ झाडाचें आहे. ह्याला पुष्प-कोश मुळींच नाहीं. म्हणजे ह्यांत पुष्प-मुकुट एवढेंच काय तें आच्छादन आहे. आतां ह्या फुलाला पाकळ्या किती आहेत पाहा. सहा आहेत. पुं-केसर किती आहेत? तेही सहा आहेत. एकदळ झाडामध्यें पाकळ्या व पुं-केसर हीं तीन तीन किंवा तिहींची कोणती तरी पट अशीं असतात, त्याचें हें एक उदाहरण आहे. द्विदळांत पाकळ्या, पुं-केसर वगैरे भाग बहुधा पांच किंवा पांचांची कोणती तरी पट असे असतात. पण मोहरीच्या फुलांत पाकळ्या चारच असतात व पुं-केसर सहा असतात; तुळशीच्यांत पुं-केसर चारच असतात; मोगऱ्याच्यांत दोनच असतात व सीताफळीच्यांत पाकळ्या तीनच असतात; असे कांहीं कांहीं अपवाद आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां आपण बियांचा विचार करूं. हा वाटाणा फोडिला म्हणजे ह्यांत दोन दळें निघतात; पण नारळ अगर सुपारी फोडिली तर त्यापासून दोन शकलें अगर दळें निघत नाहींत. द्विदळांत बीजांकुर दोन दळांच्या मध्यें असतो, पण एकदळांत तो एका आंगाला असतो.

सपुष्प वनस्पतींचे दोन वर्ग एकमेकांपासून ओळखण्याचीं हीं मुख्य लक्षणें आहेत. बागेंतील अगर शेतांतील कोणतीं झाडें कोणत्या वर्गांत येतात तें आतां तुम्ही स्वतां पाहा.

---

८४. सपुष्प वनस्पतींची पुनरुत्पत्ति.



१. कळा (अग्र).
२. पाकळी.
३. पराग-कोश.
४. स्त्री-केसर.
५. पुं-केसर.
६. बीज-कोश.
७. बीजांड.

पुष्प-कोश, पुष्प-मुकुट, पुं-केसर, स्त्री-केसर, हे फुलाचे चार भाग होत. त्यांपैकीं पुं-केसर व स्त्री-केसर हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

पुं-केसराचे दोन भाग असतात, एक तंतु व दुसरा त्यास चिकटलेला पराग-कोश. तंतूला चिकटलेलें जें पराग-कोशाचें आंग, तें त्या कोशाची पाठ, व दुसरें आंग तें पोट होय. पोटाला एक खांचणी असते. तिच्या योगानें त्याचे दोन भाग होतात. प्रत्येक भागांत खांचणीला समांतर अशी एक शिवणीसारखी रेषा असते. पराग-कोश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पक्व झाला, म्हणजे ह्या दोन्ही शिवणी उकलतात व आंतून पराग बाहेर पडतात.

स्त्री-केसरांचे तीन भाग असतात; बीज-कोश, नलिका व कळा. पराग-कोश फुटण्याचे वेळीं कळा चिकट होतो, व त्यावर पराग पडतात. पण कांहीं फुलांत नुसते पुं-केसर असतात किंवा स्त्री-केसरच असतात; आणि कांहींत दोन्ही केसर असून ते एकाच वेळीं परिपक्व होत नाहींत, किंवा विजोडाप्रमाणें स्त्री-केसर उंच व पुं-केसर नीच असल्यामुळें पराग कळ्यावर पडूं शकत नाहींत. अशा फुलांत स्त्री-केसराला पराग प्राप्त करून देण्याचें काम फुल-पांखरें किंवा वारा करितो. फुलांच्या चकचकीत रंगानें व त्यांच्या सुगंधानें पांखरें मोहित होऊन त्यांकडे धाव घेतात, व त्यांतील मध चाटण्याच्या लालसेनें त्यांच्या तळाकडे वळतात; तेव्हां त्यांच्या आंगाला पुष्कळ परागकण लागतात. पुढें तीं फुल-पांखरें मध खाण्याकरितां त्याच जातीच्या दुसऱ्या फुलावर जातात, तेव्हां ते कण त्या फुलांतील स्त्री-केसराच्या कळ्याला चिकटतात. तसेंच, परागकण वाऱ्यानें वाहून येऊनही कळ्यावर पडतात. ह्याप्रमाणें फुल-पांखरांकडून व वाऱ्याकडून स्त्री-केसराला परागकण पोहोंचविण्याचें काम होतें.

वर सांगितलेल्या कोणत्याही प्रकारानें परागकण स्त्री-केसराच्या कळ्यावर जाऊन पडले, म्हणजे त्यांची तेथें वाढ होते. परागकण ही दुहेरी पडद्याची पेशी आहे. बाहेरील पडदा छिद्रमय असतो. ह्या छिद्रांतून आंतील पडदा बारीक तंतूच्या रूपानें निघून, नलिकेंतून खालीं उतरून बीज-कोशांत जातो. बीज़-कोशांतील बीजांडाला बारीक रंध्र असतें, त्यावाटे तो मग बीजांडांत प्रवेश करतो. नंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बीजांडें वाढून त्यांच्या बिया होतात व बीज-कोश वाढून त्यांचीं फळें होतात. फळांतील बिया लाविल्या म्हणजे त्यांपासून पुन्हा झाडें होतात.

बियांशिवाय अन्य प्रकारांनींही झाडांची पुनरुत्पत्ति होते. उसाची कांडीं व केळीचे कोंब, शेवग्याचे व वडाचे डांबे, मोगऱ्याचीं व गुलाबाचीं लागवणें व हळदीचे व बटाट्याचे तुकडे लावून झाडें तयार करतां येतात. वडाच्या पारंब्या जमिनींत जाऊन त्यांपासूनही दुसरे वड होतात. पर्ण-बीजांच्या नुसत्या पानांपासूनसुद्धां त्यांचीं झाडें उत्पन्न होतात.

---

८५. अपुष्प वनस्पति व त्यांची पुनरुत्पत्ति.

नेचे, शेवाळ, वगैरे.



नेचे—रानांत अथवा खडकांवर ओलसर जागीं उगवलेलीं नेचांचीं झाडें पुष्कळांनीं पाहिलीं असतील. बागांत व बंगल्यांच्या पडव्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व सज्जांवर ताऱ्याच्या कुंड्या टांगून त्यांतही शोभेकरितां नेचे लावितात. नेचांस इंग्रजींत 'फर्न' असें नांव आहे.

नेचे सावलींत दमट जागेंत वाढतात. ह्या झाडांच्या पुष्कळ जाती आहेत. तीं थंड देशांत फार उंच होत नाहींत, पण उष्ण प्रदेशांत ह्याच्या कांहीं जातींचीं झाडें दहादहा फूटसुद्धां वाढतात. कांहीं नेचांचीं पानें अगदीं लहान असतात, व कांहींचीं मोठीं असतात. कांहींस एकेरी पानें असतात, व कांहींस जोडपानें असतात. द्विदळ झाडांतील पानांत जसें शिरांचें जाळें असतें, तसें ह्यांच्या पानांत नसतें; व एकदळ पानांतील शिरा जशा सरळ असतात, तशाही ह्यांतील शिरा नसतात. ह्यांतील शिरांची रचना दुबेळक्यांनीं झालेली असते. ह्या झाडांस फुलें येत नाहींत. त्यांच्या पानांच्याखालच्या आंगास कडेला लहान लहान काळसर कोश असतात. त्यांत बुक्यासारखी भुकटी असते. कोशांची वाढ पुरी झाली म्हणजे ते फुटून त्यांतील भुकटी जमिनीवर पडते. सपुष्प वनस्पतींचीं फळें फुटून त्यांचें बीं खालीं पडलें, कीं तें रुजून त्यापासून पूर्वीच्यासारखें झाड उत्पन्न होतें; पण नेचांची भुकटी खालीं पडल्यावर तिजपासून एकदम झाड उत्पन्न न होतां प्रथमतः एक वाटोळा पापुद्रा जमिनीवर येतो. त्यावर दोन अवयव असतात. खालीं जो अवयव असतो त्याला पुं-केसर म्हणावें व वरल्या आंगाला जो असतो त्याला स्त्री-केसर म्हणावें. पुं-केसरांतून एक तंतु निघून स्त्री-केसरांत शिरतो व मग तेथून कोंब फुटून त्याचें झाड होतें.

शेवाळ—ही वनस्पति ओलसर जागीं होते. जेथें पाणी झिरपत असतें अशा जागीं ही फार होते. पावसाळ्यांत पडक्या भिंतींवर, विटांवर, कौलांवर, तसेंच झाडांच्या खोडांवर शेवाळ पुष्कळ उगवते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिच्या वाढीचा असा चमत्कार आहे कीं, वरचा भाग वाढत असतो व खालचा मरून जात असतो.

शेवाळीला पानें असतात, पण तीं फारच लहान असतात, व तीं बहुतेक शेंड्यावरच असतात. ह्या पानांच्याआंतल्या आंगास पुं-केसराची पेशी असते, व तिच्याजवळच स्त्री-केसराची पेशी असते. कधीं कधीं ह्या दोन्ही पेशी एकाच झाडावर नसून निरनिराळ्या झाडांवर असतात. पुं-केसराची पेशी फुटून त्यांतून तंतुमय भाग निघून तो स्त्री-केसरांत जातो. मग त्यापासून एक बारीक लांब देठ निघतो; त्याच्या शेवटीं एक टोपीसारखा भाग असतो; तो फुटला म्हणजे त्यांतील भुकटी खालीं पडते. हेंच त्या वनस्पतीचें बीं म्हटलें तरी चालेल. पण त्यापासून एकदम शेवाळ उगवत नाहीं; तर त्यांतून अगोदर एक तंतुमय पदार्थ बाहेर पडतो, त्याला डोळे येतात, व त्या डोळ्यांतून शेवाळीचीं झाडें निघतात. एणेंप्रमाणें नेचे व शेवाळ ह्या दोहोंमध्यें झाडांची पुनरुत्पत्ति होण्याला दोन स्थित्यंतरें व्हावीं लागतात व तीं दोहोंमध्यें निराळ्या प्रकारांनीं होतात.

ह्याच्या खालच्या दर्ज्याच्या अपुष्प वनस्पतींच्या पुष्कळ जाती आहेत. त्यांना पानें येत नाहींत.

नदींत व समुद्रांत होणारीं लव्हाळे वगैरे झाडें, खडकावर उगवणारें दगडफूल, उकिरड्यावर दृष्टीस पडणारीं अळंबीं, ह्या सर्व अपुष्प वनस्पति होत.

पदार्थांवर येणारा बुरसा, पिकांवरील तांबडा, काजळ्या वगैरे रोग, मनुष्याच्या व इतर प्राण्याच्या रक्तांत **ब्याक्टीरिया** म्हणून कित्येक रोगांचे सूक्ष्म जंतु होतात ते, वगैरे सर्व अळंब्यांच्या वर्गांतील वनस्पति होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८६. नारळ व बाभूळ.



नारळ—कोंकणांत दर्याकिनाऱ्यास नारळी फार होतात. देशावर कोठें कोठें हीं झाडें दृष्टीस पडतात, पण विरळा. ह्या झाडाचा सरळ सोटचा सोट पन्नाससाठ हात वाढतो, व त्याला फांद्या येत नाहींत. शेंड्याला पंधरा वीस सावळ्यांचा म्हणजे पानांचा झुपका असतो. पोय आल्यापासून नारळ पक्व होण्यास एक वर्ष लागतें. प्रत्येक पोयीला पांचपासून पन्नास नारळांचा घड येतो, त्याला पेंद म्हणतात. जमीन उत्तम असली, तर प्रत्येक झाडापासून दरसाल चारशें-पांचशें देखील नारळ मिळतात. चांगल्या जोमदार नारळीस पन्नास साठ वर्षेंपर्यंत फळें येतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नारळीचें झाड अत्यंत उपयोगी आहे. त्याच्या प्रत्येक भागाचा कांहींना कांहीं तरी उपयोग आहेच. गरीब लोक ह्या झाडाच्या सोटांचे खांब, तुळया, वासे, ओमण वगैरे करितात. सावळ्यांच्या पाती विणून त्यांचे झांप करितात, व त्यांनीं घरें शाकारितात. पातींच्या हिरांच्या केरसुण्या चांगल्या होतात. पोयीच्याबाहेरून जी पिसुरडी निघते, ती तेलाशिवाय मशालीसारखी जळते.

नारळाच्या काथ्याच्या दोऱ्या वळतात, त्यांस सुंभ म्हणतात. सुंभाचीं दावीं, शिकीं, जाळीं, चांगलीं होतात. गलबतावरील दोरखंडें सुंभाचींच करितात. जमिनीवर पसरण्याकरितां तरटें व टेकण्याकरितां क्वचित् लोड व तक्ये हे काथ्याचे करितात.

नारळाच्या करटीचें गुडगुडी ओढण्याचें बेलें करितात, आणि तिचे पेले व दुसरीं पात्रें करून त्यांवर सुंदर नक्शी काढितात. गरीब लोक तिखट, मीठ वगैरे मसाल्याचे जिन्नस ठेवण्यास करट्यांचा वाट्यांप्रमाणें उपयोग करितात. त्यांच्या घरच्या ह्या पेले बशाच होत! करटीचीं बटणेंही चांगलीं होतात. तिचें तेल निघतें तें औषधी आहे; व तिचा कोळसा करून, तो कुटून, त्याचें दांतवणही चांगलें होतें.

नारळाचें खोबरें भाजीपाला वगैरे पदार्थांत घातलें म्हणजे पदार्थ स्वादिष्ट व खमंग होतात. खोबऱ्याची बरफी फार चांगली होते. खोबऱ्याचें तेल काढितात, तें दिव्यांत जाळण्यास आणि केसांस व आंगास लावण्यास उपयोगीं पडतें. अलीकडे खोबरेलाचा साबण व मेणबत्या करितात.

नारळीपासून माडी काढितात व ती पितात, अगर तिजपासून दारू व गूळ करितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारांश, नारळीसारखें सर्वोपयोगी दुसरें कोणतेंही झाड नाहीं. हें झाड आपल्या ह्या भूलोकचा कल्पवृक्षच आहे.

बाभूळ—बाभळीचें झाड नारळीसारखें सुंदर नसतें व तितकें उपयोगीही नाहीं. तें अगदीं निराळ्या वर्गांतलें झाड आहे. नारळी-इतकें तें उंच वाढत नाहीं. त्याला पुष्कळ फांद्या असतात व त्यांवर कांटे असतात. बाभळीला जोडपानें असतात. ह्या झाडाला पिवळीं फुलें येतात, व त्याला शेंगा बाजतात. उष्ण व कोरड्या हवेंत हीं झाडें होतात; म्हणून सिंध, कच्छ व महाराष्ट्राचा देशावरील भाग एथें हीं झाडें पुष्कळ आहेत. ह्या झाडाचें लाकूड कणखर व गांठाळ असतें, व तें सरपणाच्या फार उपयोगीं पडतें. नांगर वगैरे शेतांचीं औतें व घराचे खांब, बहालें, कड्या वगैरे सामान बाभळीचें होतें. ह्या झाडांतून एक चिकट पदार्थ म्हणजे डिंक निघतो, तो कागद चिकटविण्याच्या कामीं येतो; आणि तो औषधी व पौष्टिक आहे, म्हणून त्याचे लाडू करून खातात. बाभळीची साल कातडीं कमाविण्याच्या व रंगविण्याच्या कामीं येते. ती औषधीही आहे. बाभळीच्या काड्यांचें दांतवण करितात. बाभळीच्या शेंगा व कोंवळे कोंब शेरडांना फार आवडतात. बाभळीच्या कांट्यांचें कुंपण मजबूद होतें.

एक कवि बाभळीस उद्देशून म्हणतो:—

शार्दूल०—कांट्यांनीं भरलें शरीर अवघें, छाया नसे दाट ही,
नाहीं वास फुलांस भूक न निवे ज्याच्या फळें अल्पही,
नाहीं एकहि पांथ येत जवळी तूझ्या, असो गोष्ट ही;
अन्यांचीं न फळें मिळोत म्हणुनी होशी तयांतें वही ! ॥ १ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८७. साग आणि वड.



सागाचा वृक्ष.

सागाचीं पानें, फुलें व फळें.

साग—हिंदुस्तान व ब्रह्मदेश ह्या देशांशिवाय दुसऱ्या कोठें साग फ़ारसा होत नाहीं. ह्या देशांततरी ज्या ठिकाणीं पाऊस पुष्कळ पडतो, त्या ठिकाणीं त्याची उत्पत्ति फार होते. **कोंकण, घाटमाथा, मलबार, पेगू, मुलमेन** वगैरे प्रांतांत साग चांगला होतो.

सागाचें झाड चांगलें वाढलें म्हणजे त्याची उंची शें सवाशें फूट असते, व त्याच्या खोडाची वेढ वीस वीस फूट देखील असते. हिंवाळ्यांत त्याचीं पानें गळून पडतात, व उन्हाळ्याच्या अखेर त्याला पालवी फुटते. त्याचीं पानें हात, दीड हात, व कधीं कधीं तर दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातसुद्धां लांब आणि दीड दोन विती रुंद असतात. कोंकणांत भाताच्या कणग्यांच्याआंतल्या आंगास व गवती छपरांच्याखालीं हीं पानें लावितात. ह्या पानांपासून रंग तयार होतो. त्यानें पूर्वी सूत रंगवीत असत.

ह्या झाडाच्या सालीजवळील लाकडाचा रंग पांढरवट असतो; पण गाभ्याकडील लाकडाचा रंग सोनेरी पिवळा असतो. तो रंग लाकूड रापलें म्हणजे पिंगट होतो, व त्यांत काळसर पट्टे दिसतात.

सागाच्या लाकडासारखें दुसरें कोणतेंही लाकूड इमारतीच्या कामीं चांगलें नाहीं. ह्याचें कारण, हें लाकूड, त्यांतही विशेषेंकरून मलबार किनाऱ्यावरील व ब्रह्मदेशांतील, फार मोठें असून निकोप असतें, त्याच्या मोठमोठ्या व रुंद फळ्या पाडतां येतात, व त्यांवर सफाईचें काम चांगलें होतें. शिवाय हें लाकूड अत्यंत टिकाऊ आहे. तुंगभद्रेच्या कांठीं विजयनगर एथें भव्य व प्रेक्षणीय देवळें आहेत, तीं बांधून आज निदान पांचशें वर्षें तरी झालीं असावीं; त्यांतील एका देवळाचें कांहीं काम सागवानी आहे, पण त्याला अजून अगदीं भंग नाहीं. ह्या लाकडांत एक प्रकारचें तेल असतें, त्यामुळें त्याच्या आंगीं हा इतका टिकाऊपणा येतो. हें तेल औषधी आहे, व त्याचें रोगणही करितात.

सागवानाला वाळवी किंवा दुसरी कीड फारशी लागत नाहीं. हें लाकूड पाण्यांत कुजत नाहीं, म्हणून त्याचे मचवे, महागिऱ्या व मोठालीं जहाजें बांधितात.

ह्या सर्व गुणांवरून सागाला 'वनाचा राजा' असें म्हणतात. जंगल खात्याच्या उत्पन्नाची मोठी बाब म्हटली म्हणजे सागाचीं रानें होत.

वड—वडाचें लाकूड कणखर अगर टिकाऊ नसतें, म्हणून सागाच्या लाकडासारखें तें इमारतीच्या कामाला उपयोगीं पडत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचीं पानेंही सागाच्या पानांपेक्षां बरींच लहान असतात. पण ह्या झाडाचा विस्तार फार मोठा असतो. हें झाड इतकें मोठें वाढतें, तरी तें ज्या बीपासून होतें ती बी मोहरीएवढी बारीक असते. ह्या झाडाचीं फळें पक्षी खातात, व त्यांतील बिया कोठें तरी पडून त्यांना अंकुर फुटतात. पण आपण बी लाविली तर ती उगवत नाहीं. आपणांस हें झाड पाहिजे असेल, तर त्याची फांदी तोडून जमिनींत पुरावी, म्हणजे ती जगून तिचें झाड होतें.

हिंदू लोक वड, पिंपळ, उंबर, हीं झाडें तुळशीप्रमाणें पूज्य मानितात, व तीं देवळांजवळ लावून त्यांभोंवतीं पार बांधितात. ह्या झाडांच्या आंगींही तुळशीप्रमाणें हवा शुद्ध करण्याचा विशेष गुण असावा असें दिसतें. होमासाठीं ह्या झाडांच्या डाहळ्यांच्या समिधा करितात.

हिंदुस्तानांत वड सर्वत्र होतो. रस्त्याच्या बाजूनें बहुधा वडाचीं झाडें फार लाविताततः कारण, त्याला फारसें पाणी घालावें लागत नाहीं व त्याची छायाही बरीच दाट असते. वडाच्या खांद्यांना पारंब्या फुटून त्या जमिनींत जाऊन त्यांचीं नवीं झाडें होतात. ह्याप्रमाणें एका वृक्षापासून त्याच्यासभोंवार एकमेकांस लागून असे कितीतरी वृक्ष तयार होतात. गुजराथेंत नर्मदेच्या कांठीं कबीर नांवाचा प्राचीन वटवृक्ष होता. त्याला पारंब्या फुटून त्यांपासून तीनचारशें मोठमोठाले वृक्ष झाले, व त्यांना पुन्हा पारंब्या फुटून त्यांपासून तीनचार हजार झाडें झालीं आहेत; व त्यांच्या हजारों शाखा पसरून ऐसपैस इतकी छाया झाली आहे कीं, तींत दहापांच हजार माणसें सहज बसूं शकतील!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक कवि वटवृक्षास उद्देशून म्हणतोः—

शा० वि०—शाखा दूरवरी वटा पसरुनी दिग्मंडळा व्यापिशी,
पक्षी आश्रय देउनी जवळ तूं लक्षावधी पाळिशी, ॥
गेलें मस्तक मेघ भेदुनि तुझें वृष्टी न पोंचे वरी,
तूतें शंभर थोर सांवरिति हें बुंधेहि खांबांपरी ! ॥ १ ॥

---

८८. शाळेंतील बाग व तिचा उपयोग.

लहान मुलें फार चौकस असतात, व तीं नेहमीं हें काय, तें काय, ह्याचा काय उपयोग, तें कसें केलें आहे, असे अनेक प्रश्न विचारतात. अशा प्रश्नांचीं सयुक्तिक उत्तरें देण्याचा वडील माणसांनीं प्रयत्न करावा. 'उगीच काय कटकट लाविली आहे,' असें म्हणून त्यांना झिटकारूं नये. झिटकारल्यानें मुलांची जिज्ञासा खुंटते, व जिज्ञासा खुंटली कीं पुढें ज्ञानवृद्धि होणें थांबतें. ह्याकरितां त्यांच्या प्रश्नाचें समर्पक उत्तर देण्याचा प्रयत्न करावा. शिवाय त्यांना आपल्याबरोबर फिरावयास नेऊन, दगड, माती, झाडें, झुडपें इत्यादि पदार्थ कोणत्या प्रकारचे आहेत व कोणत्या उपयोगाचे आहेत हें समजून सांगून त्यांची अवलोकन-शक्ति व शोधक-बुद्धि नेहमीं जागृत राहील असें करावें. अनेक कारणांनीं हें काम पुष्कळ अंशीं शिक्षकांवर पडतें, व तें नीट बजावितां यावें म्हणून शाळांत पदार्थ-संग्रह केलेला असून कोठें कोठें त्यांच्या आवारांत बागाही तयार केलेल्या असतात.

शाळेच्या बागेंत नानाप्रकारचीं झाडें लावावीं. कांहीं वृक्ष, कांहीं झुडपें व कांहीं वेल असावे. त्यांत निरनिराळ्या आकारांचीं व प्रकारांचीं पानें, फुलें व फळें येणाऱ्या अशा पुष्कळ जाती येतील असें करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं झाडांचीं मुळें खोल व लांबवर वाढतात, तर कांहींचीं तंतुमय असतात. कांहीं झाडांचीं खोडें बळकट असतात, पण कांहींचीं इतकीं कमजोर असतात कीं, त्यांना उभें राहाण्यास कशाचा तरी आधार लागतो. कांहीं झाडांचीं पानें संयुक्त असतात, पण कांहींचीं साधीं असून अखंड किंवा विच्छिन्न असतात; कांहीं पानांना देठ असतात; कांहींना उपपर्णें असतात; असे पानांत पुष्कळ प्रकार आहेत. हें सर्व बागेपासून समजतें. तसेंच फुलांचे चार भाग कोणते, कोणत्या फुलांत ते सर्व असतात, कोणत्यांत ते सर्व नसतात, फुलांचे निरनिराळे प्रकार कोणते; फळांचे भाग कोणते, कोणतीं फळें आपोआप फुटतात; बियांत काय काय असतें, बीं रुजतें कसें; ह्या सर्व गोष्टी शाळेंत बाग असली म्हणजे मुलांना कळून येतात.

नेहमीं पाहाण्यांत येणारीं झाडें कोणत्या कुळांत अगर वर्गांत येतात, ह्याचीही माहिती बागेपासून होते. जसें; जाई, मोगरा, कुंद, पारिजातक, ह्यांचें एक कूळ; तुळस, सबजा, पाच, मरवा, ह्यांचें वेगळें कूळ; भुईचांफा, सोनटका, हळद, आलें मिळून एक कूळ; जास्वंद, भेंडी, कापूस, ह्यांचें एक वेगळें कूळ; नारिंग, लिंबू, पपनस वगैरेचें कूळ निराळेंच; बटाटा, वांगें, मिरची, ह्यांचें एक कूळ; अशीं झाडांचीं अनेक कुळें आहेत, व तीं झाडांच्या फुलांवरून मुलांस ओळखतां येतील.

दुसरें असें कीं, मुलांनीं बागेमध्यें बीं पेरून व झाडांच्या फांद्या लावून, तीं कशीं वाढतात तें लक्षपूर्वक पाहात जावें; म्हणजे झाडें केव्हां लावावीं, तीं कशीं वाढतात, पुंड्या वाढीला किती दिवस लागतात, फळें किती दिवसांनीं येतात, पाणी किती लागतें, माती कसली पाहिजे वगैरे माहितीही शाळेंतील बागेपासून मुलांना सहज करून घेतां येते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसेंच, बागेंत पानांवर सुरवंट वगैरे किडे पडले, तर त्यांस धरून, ते कसे वाढतात, ते आपल्या आंगावरील कांत कशी टाकीत असतात, कोश करून कित्येक दिवस निद्रावस्थेंत कसे राहातात, व मग कोशांतून पतंगाच्या रूपानें बाहेर कसे पडतात, हेंही पाहाण्यास मुलांस सांपडतें.

ह्याप्रमाणें बागेपासून मुलांची अवलोकन-शक्ति व ज्ञान वाढून त्यांस करमणूक होते. शिवाय, बागेनें शाळागृहास शोभा येते ती निराळी.

---

८९. रेशमाचा किडा.



मास्तर—एका प्रकारच्या किड्यापासून रेशीम उत्पन्न होतें हें तुम्हांस माहीत झालें आहे. पण तिसऱ्या पुस्तकांत मुंग्या व फुल-पांखरूं ह्यांबद्दल कांहीं माहिती दिली आहे, ती तुम्हांस आठवते काय?

गणपत—होय; फुल-पांखरांस पंख असतात पण मुंग्यांना नसतात; पांखरूं सुंदर दिसतें, तशी मुंगी दिसत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सदाशिव—कीटकांचीं रूपांतरें होतात, हेंही आम्हांस माहीत आहे.

मास्तर—होय. पण तशीं बेडकांचींही रूपांतरें होतात तें तुम्हांस आठवत नाहीं काय?

सदाशिव—होय, आठवतें. पण, मास्तर, प्राण्यांचीं अशीं रूपांतरें कां होतात?

मास्तर—हा चांगला प्रश्न केलास. ह्याचें उत्तर असें आहे कीं, त्या प्राण्यांना त्यांच्या हयातींत निरनिराळ्या वेळीं निरनिराळीं कामें करावीं लागतात. जसें काम बदलतें, तसें तें काम करण्यास लायक होण्याकरितां त्यांचें रूपही बदलतें. त्यांचें रूप जर बदलणार नाहीं, तर ते प्राणी तत्काळ मरून जातील. असो. रेशमाच्या किड्यांचींही अशींच रूपांतरें होतात. तीं कसकशीं होतात तें आज पाहूं या.

ह्या किड्यांचीं अंडीं मोहरीएवढीं असून त्यांचा रंग पिवळा असतो. अंडीं फुटून सुरवंट बाहेर पडतात, तेव्हां त्यांचा रंग काळसर असतो, व ते फारच लहान असतात. पण ज्या पानांवर त्यांचीं अंडीं घातलेलीं असतात तीं पानें प्रथम खाऊन, व मग दुसरींही पानें खाऊन, ते भराभर वाढूं लागतात. सुरवंट वाढत असतांना आपल्या आंगावरील कांत चारपांच वेळां टाकितात. अशा प्रकारें त्यांची पूर्ण वाढ झाली, म्हणजे ते तोंडांतून धागे काढूं लागतात. त्यांच्या तोंडांतील छिद्रांतून एक पिवळसर चिकट पदार्थ निघतो, तो हवेनें घट्ट होऊन त्याचा धागा बनतो. ह्या धाग्याचा कोश करून ते आपणांस प्रथम कोंडून घेतात. नंतर कोशाच्या आंत आणखी धागा काढून आपणांभोंवतीं तो गुंडाळून गुंडाळून ते त्या मऊ बिछान्यावर झोपीं जातात. पुढें सुमारें तीन आठवड्यांनीं ते जागे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन पतंगाच्या रूपानें कोशांतून बाहेर पडतात. बाहेर पडले म्हणजे ते नाचूं बागडूं लागतात; जणू काय आपण एकदांचे तुरुंगांतून सुटलों म्हणून त्यांना आनंदच होतो! ह्या स्थितींत त्यांना पंख असतात, व पंखांना नाजूक पर असतात. कांहीं वेळानें त्यांच्यांतील माद्या अंडीं घालतात. एक एक मादी चारचारशें अंडीं घालते! अंडीं घातल्यावर नर व माद्या सर्व मरून जातात. असा ह्या किड्यांचा जीवन-वृत्तांत आहे. त्यांचीं चार स्थित्यंतरें होतात :— १ अंडीं, २ सुरवंट, ३ कोशावस्था व ४ पतंग अथवा फुल-पांखरूं. ह्या चारही स्थिति वरील चित्रांत दाखविल्या आहेत. खेरीज, उजव्या आंगास कोशावस्थेंत हा किडा असतां कोशाचा उभा काप दाखविला आहे.

कांहीं देशांत रेशमाचे किडे पाळण्याकरितां निरनिराळ्या खोल्याच केलेल्या असतात. त्या खोल्यांत कापड पसरून ठेवितात व त्यावर पतंग अंडीं घालतात. अंड्यांतून सुरवंट बाहेर निघाले म्हणजे त्यांना तुतीचीं पानें खावयाला घालतात.

ह्या किड्यांचा कोशांतील तंतुमय बिछाना म्हणून जो वर सांगितला, तोच आपलें रेशीम होय. कोशांतून बाहेर पडतांना पतंग तंतु तोडून बाहेर पडतात, त्यामुळें रेशीम निरुपयोगी होतें. ह्याकरितां पतंग बाहेर पडण्यापूर्वीच कोश आधणाच्या पाण्यांत टाकावा लागतो. असें केल्यानें कोशांतील किडे मरतात, आणि त्यांतील चिकट पदार्थ व मळ धुपून जाऊन स्वच्छ व सबंध रेशीम हातीं लागतें. नंतर तें रेशीम राहाटावर घेऊन त्याच्या लडी करितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. कोंबडीचें अंडें.



१. पांढरा बलक.
२. पिवळा बील.
३. पोकळ जागा.
४. कवची.
५. कवचीच्या आंतला पापुद्रा.
६. आंतला जीव (गर्भ).
७. तोलक.

किडे, मासे, बेडूक, साप, पक्षी, हे प्राणी अंडीं घालितात हें तुम्हांस तिसऱ्या व चौथ्या पुस्तकांवरून कळलें आहे. पक्ष्यांचीं अंडीं मोठीं असतात; त्यांत शहामृगाचें तर फारच मोठें, म्हणजे कोंबडीच्या अंड्याच्या वीस पंचवीस पट, असतें. पक्ष्यांच्या अंड्यांचा आकार अगदीं वाटोळा नसून जरा लांबोडा असतो. कितीएकांच्या अंड्यांवर निरनिराळ्या रंगांच्या छटा असतात.

कोंबडीच्या अंड्याचा रंग पांढरा असून त्यांत जराशी लालीची झाक मारते. त्याचें एक शेवट दुसऱ्यापेक्षां जरा रुंद असतें. अंड्याचें कवच हळूच फोडिलें व त्याचे तुकडे उजेडाकडे धरिले, तर त्यांत लहान लहान पारदर्शक ठिपके दिसतात. हीं बारीक बारीक रंध्रें असतात, व त्यांतून आंतील जिवाला हवा मिळत असते. अंड्याला वरून जर रोगण लाविलें, तर आंतील जिवाला हवा न मिळाल्यामुळें तो आंतल्याआंत मरून जाईल.

कवचीच्याआंतल्या आंगास एक पापुद्रा असतो. हा रुंद टोंकाकडल्या आंगास कातरीनें हळूच फाडिला, म्हणजे त्याच्याखालीं एक लहान पोकळ जागा दिसते. तींत हवा असते. दुसऱ्या ठिकाणीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशी हवेसाठीं पोकळी नसते. ह्या पापुद्याच्या आंत पांढरा बलक असतो. तों पातळ असतो. तो फार पौष्टिक असतो म्हणून अशक्त माणसास शक्ति येण्याकरितां देतात. अंडें जर शिजविलें तर हा बलक घट्ट, लवचीक व अपारदर्शक होतो. बलकाच्यामधोमध पिवळा बील असतो. त्याच्या दोन्ही बाजूंस दोन तोलक निघून ते बलकांत गेलेले असतात. त्यामुळें अंडें कसेंही फिरविलें तरी बील तोलून धरला जाऊन आंतील जिवाला धक्का पोहोंचत नाहीं.

बिलावर एक पातळ पापुद्रा असतो. त्याला टांचणीनें टोचलें कीं आंतून पिवळा चीक बाहेर येतो. बिलाच्या वरल्या आंगास, पण पापुद्याच्या आंत, एक लहानसा ठिपका दिसतो. तोच अंड्यांतील जीव किंवा गर्भ होय. बील व बलक हें जें त्याचें खाद्य, तें खाऊन तो वाढतो, व वाढ पूर्ण झाली म्हणजे कवच फोडून बाहेर पडतो.

कोंबडीनें दहा पंधरा अंडीं घातल्यावर ती त्यांवर रोज बसून त्यांस उबवीत असते. तेणेंकरून आंतील गर्भाची वाढ होऊं लागते. अंडें उबवूं लागल्यानंतर दोन दिवसांनीं त्याचें डोकें व धड हीं दिसूं लागतात. चार दिवसांनीं मानेच्या खालच्या आंगास एक तांबडा ठिपका दिसतो. हें त्याचें हृदय होय. ह्याचे जलद जलद ठोके पडलेले दिसतात. ह्या गर्भासभोंवती एक तंतुमय जाळें असतें. त्या रक्तवाहिन्या होत. बिलांतून रस एका नळीवाटे हृदयांत येतो, व तेथून मग रक्तवाहिन्यांतून सर्व शरिराला पोहोंचतो. पांचसहा दिवसांनीं डोकें खूपच मोठें होतें व पाय फुटलेले दिसूं लागतात. पुढें हळू हळू इतर अवयवही फुटूं लागतात. जसजसा जीव वाढूं लागतो तसतसे बलक व बील हे कमी होऊं लागतात. एकवीस दिवसांनीं ते अगदीं नाहींतसे होऊन पिलाची वाढ पूर्ण होते व तें हालचाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याला समर्थ होतें. मग तें अस्वस्थ होऊन आपल्या चोंचीनें हवेच्या पोकळीच्या पापुद्याला भोक पाडतें व तेथील हवा शोषून घेऊन हुशार होतें, व नंतर कवची फोडून बाहेर येतें.

---

२१. मनुष्याचे भाऊबंद.



सपुच्छ वानर. हीनपुच्छ वानर—गोरीला.

मनुष्याचें रूप इतर बहुतेक सर्व प्राण्यांच्या रूपाहून भिन्न आहे. पण माणसाच्या व वानराच्या रूपांत बरेंच साम्य आहे. पृथ्वीवरील उष्ण प्रदेशांत वानर सर्वत्र सांपडतात. वानरांचे मुख्य दोन प्रकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. एकाला लांब शेपूट असतें, व दुसऱ्याला आखूड असतें अगर मुळींच नसतें.

हिंदुस्तानांत पहिल्या प्रकारचे म्हणजे सपुच्छ वानर फार आहेत. ते बहुतकरून झाडांवर राहातात. ते फार चपळ असतात. झाडांवर झपाझप चढणें अगर मोठमोठ्या उड्या घेणें, हें त्यांस सहज करतां येतें. ते वीस पंचवीस फूट अंतरावरसुद्धां उडी मारतात. ह्या झाडावरून त्या झाडावर, झाडांवरून घरांच्या छपरांवर, छपरांवरून जमिनीवर, पुन्हा झाडांवर, अशा भराभर ते उड्या घेतात. चढण्याला व उड्या मारण्याला, त्यांच्या लांब शेपटांचा त्यांना फार चांगला उपयोग होतो. हे वानर अत्यंत उपद्रवी असून बागांची व शेतांची फार नासाडी करितात. ते चारी पायांवर चालतात. माणसाप्रमाणें ह्यांना बसतां येतें, पण कांहीं आधाराशिवाय उभ्यानें चालतां येत नाहीं. त्यांच्या पायांचे पंजे आपल्या हातांच्या पंजांसारखे असतात, म्हणून त्यांच्या योगानें झाडांच्या डाहळ्या त्यांस चांगल्या धरतां येतात.

ब्रह्मदेश, सयाम, मलाया, जावा आणि आफ्रिका एथें दुसऱ्या प्रकारचे म्हणजे हीनपुच्छ वानर आहेत. ते फार मोठे असतात व त्यांना माणसाप्रमाणें बरेंच ताठ उभें राहून चालतां येतें. त्यांच्या मागच्या तंगड्या कांहींशा माणसाच्या पायांप्रमाणें असतात, व पुढल्या हातांप्रमाणें असतात. ते सर्वकाळ झाडांवर राहात नाहींत. ह्या जातीपैकीं आफ्रिकेच्या रानांत राहाणारा गोरीला जातीचा पुच्छहीन वानर हा प्रसिद्ध आहे. तो आडव्या बांध्याचा असून त्याचें डोकें मोठें व अवजड असतें, व हात फार लांब असतात. तो मनुष्यापेक्षां जरा ठेंगणा असतो, पण फार बळकट असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचीं हाडें मोठीं व जाड असतात. तो सदा दुर्मुखलेला दिसतो, पण त्यावर कोणीं हल्ला केला तर त्याची मुद्रा पालटून ती फार उग्र होते, व मग त्यापासून धोका होण्याचा संभव असतो. झाडपाला व फळें हें मुख्यत्वें त्याचें अन्न होय; तरी तो मांस खात नाहीं असें नाहीं. मलाया बेटांत ओरांग-ऊटांग नांवाचे मोठे पुच्छहीन वानर आहेत. ते झाडांवर डाहळ्यांचीं घरें करून त्यांत निजतात. ओरांग-ऊटांग ह्या शब्दाचा अर्थ 'रान-माणूस' असा आहे. हीनपुच्छ वानरांना मनुष्याचा सहवास आवडत नाहीं; म्हणून ते निबिड अरण्यांत आपापल्या कुटुंबांसह अलिप्त असे राहातात. तथापि त्यांस धरून माणसाळविलें तर ते माणसाळतात, व माणसाप्रमाणें खातात पितात व अशा प्रकारचे इतर व्यवहारही करितात.

वानर हे मनुष्याचे भाऊबंद आहेत असें आपण म्हणतों, ह्याचें कारण शरीररचना व आकार ह्यांत मनुष्याशीं त्यांचें जितकें सादृश्य आहे, तितकें इतर कोणत्याही प्राण्याशीं नाहीं. गोरीला किंवा ओरांग-ऊटांग ह्याचें हाडपेर जरी मनुष्याच्यापेक्षां मोठें व ओबड-धोबड असतें, व त्याला जरी माणसासारखें अगदीं ताठ उभें राहातां येत नाहीं, तरी, एकंदरींत, त्याचा सांगाडा माणसाच्या अस्थिपंजरा-सारखा दिसतो. तसेच त्याचे दांत, स्नायु व इतर अवयवही अगदीं माणसाच्या अवयवांसारखे असतात. पण वानराच्या मेंदूपेक्षां मनुष्याचा मेंदू मोठा व पूर्ण दशेस आलेला असतो, म्हणून त्याजवरही मनुष्याचें वर्चस्व आहे.

मनुष्याशीं वानराचें इतकें सादृश्य आहे ह्या गोष्टीवरून, मनुष्य व दोन्ही प्रकारचे वानर ह्यांचे पूर्वज पुष्कळ युगांपूर्वी एक असावे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व त्यांपासून हे भिन्न भिन्न वंश निघाले असावे, असें अनुमान आहे. थोड्या वर्षांमागें जावा बेटांत हाडांचा एक सांपळा सांपडला. त्याची रचना अर्धी माणसासारखी व अर्धी पशूसारखी होती. हा विलक्षण प्राणि, मनुष्य व त्याचे फार पुरातन काळचे पूर्वज, ह्यांच्या मधल्या सांखळीचा एक दुवा असावा, असा तर्क आहे.

---

९२. मानवी प्राण्याची उन्नति.

मानवी प्राणी पृथ्वीवर प्रथम केव्हां उत्पन्न झाला, हें कांहीं बरोबर समजत नाहीं. तथापि तो उत्पन्न होऊन हजारों वर्षें झालीं असलीं पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. अगदीं पूर्वीच्या माणसांत व मोठाल्या पुच्छहीन वानरांत फारसा फरक नव्हता. त्या पुरातन काळीं कित्येक प्राण्यांपेक्षां मानवी प्राणी फार निर्बल होता. प्रथम प्रथम घर नाहीं, वस्त्र नाहीं, शस्त्र नाहीं, औत नाहीं, अशी त्याची स्थिति होती. म्हणून माणसें त्या काळीं जगलीं हेंच आश्चर्य ! पण त्या जुन्या काळांतही मनुष्याचा मेंदू इतर प्राण्यांच्या मेंदूपेक्षां मोठा असून त्यास बोलतां येत होतें व सरळ उभें राहून चालतां येत होतें. हळू हळू दगड व काठ्या ह्यांचा शस्त्रें व हत्यारें म्हणून उपयोग करण्याची कल्पना त्याला सुचून अरण्यांत किंवा समुद्रकिनाऱ्यावर तीं त्याला जशीं सांपडत तशींच तो वापरूं लागला. अर्थात् प्रथम प्रथम तीं अगदीं ओबड-धोबड व वांकडीतिकडीं असत. त्यांचा उपयोग करून तो वनपशूंच्या हल्ल्यांपासून आपला बचाव करी, झाडांचीं फळें पाडी, फळांचीं कवचें फोडी, व खाण्याकरितां लहान लहान प्राणीही मारी. पुढें दगड एकमेकांवर आपटून व घासून त्यांना विशिष्ट आकार आणण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व धार देण्यास तो शिकला; व तसेंच काठ्या चिरून त्यांच्या भेगांत ते पक्के बसवून त्यांना तो मुठी करूं लागला. नंतर लवकरच





आदिकालीन मनुष्याचीं पाषाणांचीं शस्त्रें व औतें.

मारलेल्या प्राण्यांचीं कातडीं उबेसाठीं तो पांघरूं लागला. पुढें ओली माती वळवून, तिला निरनिराळे आकार देऊन व उन्हांत वाळवून तिचीं भांडीं होतात, असें त्याला आढळून येऊन तो मातीचे थाळे व मडकीं करूं लागला.

ह्यापुढें मनुष्यानें लाविलेला मोठा शोध म्हटला म्हणजे विस्तव पाडणें हा होय. लाकडावर लाकूड घासून किंवा दगडावर दगड झाडून, तो विस्तव पाडूं लागला. एकदां विस्तव तयार झाला म्हणजे तो बहुतकरून त्यास कधींही विझूं देत नसे. विस्तवानें हिंस्र पशूंना भिवविणें, थंडीपासून आपला बचाव करणें, व आपलें अन्न शिजविणें ह्या गोष्टी त्यास समजूं लागल्या. पूर्वीचीं तीं ओबडधोबड हत्यारें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाकून देऊन तो हळू हळू चांगलीं हत्यारें वापरूं लागला. तो जनावरांचीं चित्रेंही काढण्यास शिकला असावा; कारण, उकरून काढलेल्या जुन्या प्राण्यांच्या हाडांवर चित्रें काढलेलीं कधीं कधीं आढळतात. पुढें पुढें घरेंही त्याला बांधतां येऊं लागलीं. अगदीं पूर्वीचे लोक बहुतकरून गुहांत राहात असत; पण पुढें ते लाकडाचीं व मातीचीं झोपडीं बांधूं लागले. केव्हां केव्हां ते कोणताही उपद्रव होऊं नये म्हणून आपलीं घरें तलावांत उंच माचा करून त्यावर उभारीत. पुढें प्राण्यांची शिकार व मासे ह्यांवरच उपजीविका न करतां, जमीन उकरून पिकें तयार करून त्यांवरही ते आपला निर्वाह करूं लागले. नंतर जमीन नांगरण्याला नांगर तयार करून, बैल, बकरा, कुत्रा, वगैरे जनावरें माणसाळून तीं आपल्या उपयोगीं पडतील असें ते करूं लागले.

धातु उपयोगी आहेत हा मनुष्यांचा पुढला मोठा शोध होय. तांबें मऊ असतें, व त्यावर काम करावयास सोपें जातें, म्हणून दगडाच्या ऐवजीं त्याचा उपयोग ते प्रथम करूं लागले. पण पुढें तांब्याला जरा कठीणपणा आणण्याकरितां त्यांत कथील मिसळून त्या मिश्रणाचीं हत्यारें त्यांनीं बनविलीं. त्यानंतर लोखंडाचा उपयोगही त्यांस कळूं लागला.

माणसें जशीं घरांत राहूं लागलीं व जमीन कसूं लागलीं, तसें त्यांचें भटकणें कमी होऊन हळू हळू कुटुंबव्यवस्था सुरू झाली. कुटुंबेंकुटुंबें मिळून एकेक जथा झाला, व असे जथे मिळून राष्ट्रें बनलीं. वहिवाटींना कायमचें रूप येऊन कायदेकानू होऊं लागले. खुळ्या समजुती मोडून धर्माची स्थापना झाली. शिल्प, गायन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रकला, खोदींव काम, हीं हळू हळू प्रगल्भ दशेला येऊं लागलीं अक्षरयोजना होऊन तिच्या साह्यानें पूर्वी प्राप्त झालेला अनुभव आणि ज्ञान ह्यांस कायमचें रूप देतां येऊं लागलें, व छापण्याची कला निघाल्यापासून तर मनुष्याचा उत्कर्ष अधिकाधिक होऊं लागला. ह्याप्रमाणें सर्व प्रकारें इतर प्राण्यांपेक्षां मनुष्याची उन्नति झाली.

---

९३. मेंदू व मज्जातंतु.



१. मोठ्या मेंदूच्या उजव्या गोलार्धावरील सुरकुतलेला भाग.
२. मानेचे मणके.
३. धाकटा मेंदू.
४. लंबमज्जा.
५. मणक्यांचे कांटे.
६. पृष्ठवंश-रज्जु व मज्जातंतु.

मेंदू हा सर्व शरिरांतील अत्यंत महत्त्वाचा व नाजूक असा भाग आहे, म्हणून त्याच्याभोंवतीं डोकीच्या बळकट कवचीचें वेष्टन आहे. मेंदूवर एक जाड पापुद्रा असतो, तो करड्या रंगाचा असतो; परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंतील मेंदूचा रंग पांढरा असतो. हातरुमाल चुरमडला म्हणजे त्याला जशा सुरकुत्या पडतात, तशा सुरकुत्या अगर खांचण्या मेंदूला असतात.

मेंदूचे 'मोठा मेंदू' व 'धाकटा मेंदू' असे दोन भाग असतात. मोठा मेंदू हा धाकट्या मेंदूच्या आठपटीनें मोठा असतो, व तो वरल्या आंगाला असतो. एका भेगेनें उजवा व डावा असे त्याचे बरोबर दोन भाग झालेले दिसतात. ह्या मेंदूचें वजन, आकार व खांचण्या, ह्यांवर प्राण्यांची बुद्धिमत्ता अवलंबून असते. सशाचा मेंदू त्याच्या शरिराच्या मानानें लहान असून त्याला खांचण्या अगदीं नसतात असें म्हटलें तरी चालेल. माकडाचा मेंदू कांहींसा मोठा असतो व त्याला खांचण्याही बऱ्याच असतात. मनुष्याचा मेंदू सर्वांत मोठा असून त्याला खांचण्याही पुष्कळ असतात, आणि त्या मानानें त्याची बुद्धिमत्ताही सर्वांत उत्तम प्रकारची असते. बुद्धिमान् मनुष्याचा मेंदू फारच मोठा असतो, किंवा त्याला खांचण्यातरी अतिशय असतात. मेंदू मोठा व खांचण्याही अतिशय असल्या, म्हणजे तो मनुष्य अत्यंत बुद्धिमान् असतो. 'मोठा मेंदू' हा बुद्धि, इंद्रियज्ञान, निश्चयशक्ति आणि उद्वेग ह्यांचें आदिस्थान आहे. त्याला धक्का लागला किंवा तो रोगग्रस्त झाला, म्हणजे हे व्यापार मंद पडतात.

मोठ्या मेंदूच्या मागल्या आंगाच्या खालीं 'धाकटा मेंदू' असतो. स्नायूंचें चलनवलन व्यवस्थित चालविण्याचें काम ह्या मेंदूकडे आहे; हें काम नीट चाललें असलें, म्हणजे आपणांस चालणें, धावणें, वगैरे क्रिया करतां येतात. हा धाकटा मेंदू जर दुखावला अगर रोगग्रस्त झाला, तर प्राण्याला आपला तोल सावरून धरतां येत नाहीं, व त्याला चालतां, धावतां किंवा उडतांही येत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेंदूला धक्का लागल्यानें अगर रोग झाल्यानें प्राणी मरतोच असें नाहीं, पण जगला तरी तो ज्ञानशून्य आणि क्रियाशून्य होतो.

मेंदूच्या खालच्या आंगांतून मज्जा-तंतूंच्या बारा जोड्या निघतात. त्यांपैकीं कांहींनीं पाहाणें, ऐकणें, चव घेणें व वास घेणें ह्या क्रिया होतात; कांहींनीं तोंड, डोळे, जीभ, मान, ह्यांतील स्नायूंना चलन मिळतें; व कांहींचा फुप्फुसें, हृदय, कोठा व यकृत् ह्यांशीं संबंध असतो.

मेंदूच्या खालून पृष्ठवंश-रज्जु निघते. मेंदूशीं तिचा संबंध एक इंच लांबीच्या एका भागानें झालेला असतो. ह्यास लंबमज्जा म्हणतात. हा भाग फार महत्त्वाचा आहे. श्वासोच्छ्वास करतांना व अन्न वगैरे गिळतांना स्नायूंचें चलनवलन ह्या भागामुळें होतें, म्हणून ह्या भागाला जरा धक्का लागला कीं, श्वासोच्छ्वास-क्रिया थांबून प्राणी तत्काळ मरतो.

पृष्ठवंश-रज्जु ही मानेच्या व पृष्ठवंशाच्या (म्हणजे पाठीच्या कण्याच्या) मणक्यांतून खालीं उतरून माकडहाडापर्यंत गेलेली असते. हिची लांबी सुमारें १८ इंच आहे, व ही करंगळीइतकी जाड आहे. ह्या पृष्ठवंश-रज्जूपासून मोठे मज्जातंतु निघून, त्यांना फाटे फुटून, ते शरिरांतील अवयवांना व त्यांना चलन देणाऱ्या इच्छाधीन व इच्छानधीन स्नायूंपर्यंत गेलेले असतात. फाटे फुटलेल्या तारायंत्राप्रमाणें हे तंतु सर्व शरीरभर पसरले आहेत, व त्यांचें कामही तारायंत्राप्रमाणेंच चालतें. त्यांच्यामार्फत शरिरांत कोणत्याही जागीं होणाऱ्या आघाताचें ज्ञान मेंदूस होतें; व त्यांच्याच मार्फत मेंदूकडून अवयवांच्या स्नायूंना इष्ट क्रिया करण्यास हुकूम होतो. जर कोठें पृष्ठवंश-रज्जु कापली अगर दुखावली, तर तिच्या खालच्या भागांतून ज्या अवयवांना तंतु गेलेले असतात, त्यांतील इच्छाधीन क्रिया नष्ट होतात, व त्यांना कांहीं झालें तरी मेंदूस तें कळत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९४. यकृत्, प्लीहा आणि मूत्रपिंड.

शरिराच्या ज्या भागास आपण पोट म्हणतों, त्यांत पचनास अथवा रक्त उत्पन्न करण्यास साहाय्यकारी अशीं अनेक इंद्रियें आहेत. ह्या इंद्रियांपैकीं बहुतेक इंद्रियें, ज्या द्रव्यांच्या योगानें अन्नाचें रक्त बनतें, अशीं द्रव्यें उत्पन्न करितात. अशा इंद्रियांस पिंड म्हणतात. 'यकृत्' हा शरिरांतील सर्वांत मोठा पिंड आहे. हा उजवेकडील फांसळ्यांच्या खालीं धाकट्या आंतड्याच्या जवळ आहे. यकृत् हें दोन असमान गड्ड्यांचें बनलें आहे. त्यांपैकीं लहान गड्डा मोठ्याच्या डाव्या बाजूस आहे. मोठ्या मनुष्याच्या यकृताचें वजन सुमारें ३½ पौंड भरतें. यकृत् पिवळट तपकिरी रंगाचें असतें. त्याचा वरचा भाग सपाट व गुळगुळीत आणि खालचा भाग खडबडीत व लहान लहान गड्ड्यांनीं बनलेला आहे. ह्याच्या खालच्या भागास अनेक शिरा येऊन मिळाल्या आहेत.



यकृत्, प्लीहा आणि मूत्रपिंड दाखविणारा पोटाचा भाग.

यकृत् हा मोठा चमत्कारिक पिंड आहे व त्याचा व्यापार अत्यंत मनोवेधक आहे. हा मांससदृश अशा सूक्ष्म पिंडांनीं बनलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकाद्या मोठ्या कारखान्यांत ज्याप्रमाणें यंत्रांच्या निरनिराळ्या खोल्या असतात, त्याप्रमाणें यकृतांतील हे सूक्ष्म पिंड आहेत. हे सूक्ष्म पिंड पचनक्रियेस साहाय्यकारी अशीं द्रव्यें उत्पन्न करितात.

बाहेरील द्रव्यें यकृतांत येण्यास व यकृतांतील द्रव्यें बाहेर पडण्यास दोन दोन द्वारें आहेत. द्रव्यें आंत येण्यासाठीं जीं दोन द्वारें आहेत त्यांपैकीं एका द्वारानें पक्वाशयाकडील अशुद्ध म्हणजे मातबर रक्त येतें. यकृतांतील मूलपिंडांच्या योगानें ह्या रक्ताचें हळू हळू रूपांतर होऊन 'पित्त' नांवाचा रस तयार होतो. हा रस यकृतांत सतत उत्पन्न होतो. अशा प्रकारें सतत काम करण्यानें यकृताची जी झीज होते, ती हृदयांतून येणाऱ्या शुद्ध रक्तानें भरून येते. हें रक्त दुसऱ्या द्वारानें यकृतांत येतें.

यकृतांतील द्रव्यें बाहेर पडण्यास जे दोन नळ आहेत, त्यांपैकीं एका नळानें यकृतांत उत्पन्न झालेलें पित्त जाऊन, एका पिशवींत सांचतें. ह्या पिशवीस 'पित्ताशय' म्हणतात. दुसऱ्या नळानें यकृतांत शिल्लक राहिलेलीं निरुपयोगी द्रव्यें बाहेर पडतात.

पक्वाशयांत तयार झालेला अन्नरस आंतड्यांत जाऊं लागल्या बरोबर पित्ताशयास सूचना होते. सूचना होतांच त्यांतून त्वरेनें पित्त निघून तें अन्नरसाशीं मिश्रित होतें व त्यांतील स्निग्ध पदार्थ विरघळवून पचनास मदत करितें.

पित्त उत्पन्न करण्याच्या कार्याशिवाय यकृत् दुसरें एक कार्य करितें. तें हें कीं, पचनेंद्रियांतून यकृतांत गेलेल्या अन्नरसांत शर्करादि जे पदार्थ असतात त्यांचा यकृतांत सांठा करणें, व पुढें रक्तास त्यांची जशी जरुरी पडते, तसे ते पदार्थ रक्तास पोहोंचविणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यकृतांत अतिशय पित्त उत्पन्न होऊं लागलें म्हणजे त्यास थकवा येतो; व पित्त फार उत्पन्न झाल्यानें शरिरांत पित्ताचीं अनेक लक्षणें दिसूं लागतात. मद्यप्राशनानें यकृतांतील सूक्ष्म रक्तवाहिन्यांस फार इजा होऊन त्यांचा व्यापार नीट चालेनासा होतो. अशामुळें ह्या व्यसनापासून यकृताचे भयंकर रोग उत्पन्न होतात.

प्लीहा :—प्लीहा ही आकारानें तळहाताएवढी असून चापट व मृदु आहे. ही पक्काशयाच्या डावे आंगास आहे. शरिरांत रक्त उत्पन्न करण्याच्या कामीं प्लीहेचा उपयोग होतो, एवढीच काय ती ह्या पिंडाच्या कार्यासंबंधानें आजपर्यंत माहिती झाली आहे. प्लीहेंत रक्त तयार झाल्यावर तें यकृतांत जातें. प्लीहेचें वजन सुमारें पावशेर असतें. ही घट्ट व ठिसूळ असून जांभळ्या रंगाची आहे. शीतज्वरादि रोगांमध्यें ही मोठी होते. मोठी झालेली प्लीहा अपघातानें फुटली म्हणजे तात्काळ मृत्यु येतो.

मूत्रपिंड :—मूत्रपिंड हीं दोन इंद्रियें घेवड्याच्या दाण्याच्या आकारासारखीं आहेत. प्रत्येक मूत्रपिंडाची लांबी ४ इंच व रुंदी २ इंच आहे. मूत्रपिंड मुख्यत्वेंकरून सूक्ष्म पिंड व नळ्या ह्यांनीं घटित झालेले असतात. मूत्रपिंड पोटाच्या मागील भागांस असून, शेवटच्या फांसळीच्या खालीं व कमरेच्या कण्याच्या दोन आंगांस बसविलेले आहेत. त्यांच्या अंतर्वक्र बाजू कण्याकडे असतात.

इंद्रियांतून रक्त वाहात असतां, रक्तांतील द्रवरूप मळ निराळा करण्याचें कार्य ह्यांकडून होतें. ह्या मळास मूत्र म्हणतात. मूत्र हें दोन मूत्रवाहिन्यांच्या द्वारें मूत्राशयांत जातें व त्यांतून योग्य वेळीं शरिराच्या बाहेर पडतें. मूत्रवाहिन्या सुमारें एक फूट लांब असून पोटाच्या दोहों बाजूंस बसविलेल्या आहेत. व्यायामानंतर पाठीवर वारा लागला असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्रपिंडांस थंडीची बाधा होण्याची भीति असते. थंडीच्या बाधेनें मूत्रपिंडांस भयंकर विकार जडतात, व त्यांच्या योगानें कधीं कधीं मृत्युही येतो. ह्याकरितां त्या पिंडांस थंडीची बाधा होऊं नये म्हणून जपणें जरूर आहे.

---

९६. रंगारी-काम.

शिक्षक—तुम्ही खालच्या वर्गांत होतां, तेव्हां मीं तुम्हांला साळ्याच्या घरीं नेऊन मागावर कापड कसें विणतात, तें समजून दिलें होतें; व त्यावेळीं, आपल्या गांवांत आणखी जें जें कारागिरीचें काम तयार होतें, तें तें स्वतां तुम्ही जाऊन पाहा, म्हणून सांगितलें होतें. त्याप्रमाणें तुम्ही कधीं कोठें गेलां होतां काय?

भानू—होय. गणूला आपला फेटा रंगाऱ्याकडून रंगवून घ्यावयाचा होता, म्हणून त्याजबरोबर आम्हीही रंग कसा देतात, हें बघण्याकरितां गेलों होतों.

शिक्षक—शांताराम, तूं सांग पाहूं रंगाऱ्यानें काय काय कृति केली ती.

शांताराम—रंगाऱ्यानें एका कपड्यावर कांहीं वाळत टाकिलें होतें. तें काय आहे म्हणून विचारल्यावरून त्यानें आम्हांला कुसुंब्याच्या फुलांची पूड पोत्यांतून काढून दाखविली, आणि तो म्हणाला, "आम्ही ही पूड पाण्यांत कालवितों, मग एका घडवंचीला फडक्याची झोळी बांधून तींत घालितों, व झोळींत वरचेवर पाणी घालीत राहातों, म्हणजे कुसुंब्यांतली मळ झोळीखालीं ठेविलेल्या पातेल्यांत पडते. मग झोळींत राहिलेला कुसुंबा खूब जोरानें दाबून त्यांतलें सर्व पाणी काढितों व मग असा हा वाळत घालतों."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गणू—माझ्या फेट्याला आमच्यादेखत तांबडा रंग दे पाहूं, म्हणून मीं सांगितल्यावरून त्यानें त्या वाळत घातलेल्या कुसुंब्यांत थोडा पापडखार व थोडें मीठ मिसळून तें सर्व कुंडींत चांगलें कुटलें. मग तें मिश्रण झोळींत टाकून त्यावर तो पाणी घालूं लागला. तेव्हां खालच्या पातेल्यांत तांबडा रंग उतरला. पातेल्यांत बराचसा लिंबाचा रस पिळल्याबरोबर रंग खालीं बसला, व वर तांबूस पाणी राहिलें. तें त्यानें दुसऱ्या भांड्यांत ओतून त्यांत माझा फेटा भिजत घातला. पातेल्यांत खालीं जो रंग राहिला होता, त्याला 'जेठा' म्हणतात म्हणून त्यानें सांगितलें. त्यांतला थोडासा जेठा घेऊन, त्यांत त्यानें थोडा लिंबाचा रस, हळदीची पूड व पाणी घातलें, व मग त्यांत फेटा बराच वेळ भिजत ठेविला; अमळशानें फेटा काढून पाहिला तों त्यावर रंग चढला होता.

शिक्षक—झाली, संपली का सर्व कृति ?

काळू—नाहीं. आणखी थोडा जेठा घेऊन, त्यांत कणकेची खळ घालून व लिंबू पिळून, त्यांत त्यानें पुन्हा फेटा बुचकळून ठेविला; व मग कांहीं वेळानें तो काढून दाखविला तों त्यावर रंग चांगला खुलला होता.

शिक्षक—कणकेची खळ कां घालतात ह्याचें कारण तुम्हांला त्यानें सांगितलें काय? नसेल सांगितलें. खळीनें रंग बरेच दिवस टिकतो. बरें, दुसरे रंग कसे देतात तें त्यास तुम्हीं विचारिलें काय ?

कासम—होय; तो म्हणाला, प्याजी, गुलाबी, कुसुंबी, अताशी, मोतिया, हे रंग जेठा कमजास्त घालून तयार करतां येतात.

शिक्षक—गणूच्या फेट्यास रंग दिला तो पक्का म्हणून त्यानें सांगितलें काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाळू—नाहीं. तो म्हणाला, "आपण पक्क्या रंगाचें काम करीत नाहीं. तुम्हांस पक्क्या रंगाचें काम पाहावयाचें असल्यास पेठेंत दुसरा एक रंगारी आहे त्याकडे जा." त्याप्रमाणें तेथें आम्ही दुसरे दिवशीं गेलों. त्या रंगाऱ्यानें एक रुमाल दोणींत भिजत ठेविला होता. हें कसलें पाणी व त्यांत रुमाल भिजत कां ठेविला आहे, म्हणून विचारिल्यावरून त्यानें सांगितलें, "हें तुरटीचें पाणी आहे. कपडा अतिशय स्वच्छ करून तुरटीचे पाण्यांत एक रात्र भिजत ठेविल्याशिवाय त्यावर पक्का रंग चढत नाहीं." मग त्यानें तो रुमाल काढून पिळून वाळविला; व मग एका चुलीवर पाणी तापत होतें त्यांत रंग टाकून रुमाल घालून ठेविला. मग किती वेळ तरी तें पाणी उकळत होतें. नंतर त्यांतून रुमाल काढला तों त्यावर रंग चढलेला होता.

शिक्षक—तो रंग कशाचा म्हणून त्यास तुम्हीं विचारूं नये काय ?

भानू—हो, आम्हीं विचारिलें. तो म्हणाला, " हा पुडीचा रंग आहे. पूर्वी आम्ही देशी वनस्पतींपासून रंग तयार करीत असूं व ते रंग फार पक्के व चांगले असत. पण पुडीचे रंग स्वस्त मिळतात व तयार करण्याची दगदगही पडत नाहीं, म्हणून अलीकडे आम्ही हेच रंग वापरतों. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९६. कुंभार-काम.



कृष्णराव—भानू, आज आपण फिरत फिरत कुंभारवाड्याकडे आलों.

भानू—बरें झालें. मला आपल्या गांवांत चालणारीं कारागिरीचीं कामें पाहावयाचींच आहेत. परवां आम्ही रंगारी-काम पाहावयास गेलों होतों. आज कुंभार-काम कसें करितात तें मला कुंभारवाड्यांत नेऊन समजून सांगतां काय?

कृष्णराव—बरें तर, चला जाऊं. तो पाहा तिकडे एक कुंभार माती तुडवितो आहे. ती माती कोठून आणतात व त्यांत काय मिसळतात हें तुला ठाऊक नसेल. कुंभार-कामाला माती चांगली लागते, म्हणून कुंभार ती तलावांतली किंवा नदीच्या अगर ओढ्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांठची आणतात. मग त्यांत बारीक वाळू अगर राख आणि घोड्याची लीद चांगली चाळून मिसळतात व त्यांत पाणी घालून मळतात.

भानू—कुंभाराच्या शेजारीं एक चाक पडलें आहे. अहो! हें चाक अगदीं चमत्कारिक दिसतें! आपल्या गाडीच्या चाकाप्रमाणें ह्याला मध्यें आंस जाण्याला भोक दिसत नाहीं. हें एका खुंट्यावर आडवें ठेवलें आहे. हें असेंच आडवें फिरावयाचें वाटतें? काय हो बाबा, ह्याची धाव लाकडाची नसून मातीचीच केलेली दिसते?

कृष्णराव—होय. ही धाव मातीचीच केलेली आहे, व तिला बळकटी यावी म्हणून तींत बकऱ्याचे केस घातले आहेत. हे पाहा कुंभारानें मातीचे गोळे करून ठेविले आहेत. त्यांतला एक गोळा त्यानें चाकाच्या मध्यभागीं थोडीशी माती लावून त्यावर ठेविला, व चाक फिरवून त्यास गति दिली. आतां गोळा दाबून त्याला तो वरवंट्याचा आकार कसा आणीत आहे पाहा.

भानू—बाबा, तो गोळा फुगत चालला व पोकळही झाला वाटतें. आतां तर त्याला अगदीं मडक्यासारखा आकार आला. काय मौज हो ही! कुंभार आपले हात वरचेवर ओले कां बरें करतो?

कृष्णराव—हात ओले असले म्हणजे हाताला माती चिकटत नाहीं. माती नरम होऊन ती हवी तशी वळवतां येते. शिवाय भांड्यावर पाण्याचा हात फिरविला म्हणजे भांडें सफाईदार होतें. पाहा! त्या मडक्याच्या बुडाशीं तार घालून त्यानें तें मडकें कापून घेतलें. आतां दुसरा गोळा तो चाकाच्या मध्यावर ठेवील. व त्याचें दुसरें मडकें करील. ह्याप्रमाणें तो आज किती तरी मडकीं तयार करील! बरें, आतां आपण पलीकडल्या कुंभाराकडे जाऊं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भानू—अहो ! हा कुंभार मडकें ठोकीत बसला आहे. ठोकिल्यानें मडकें फुटून नाहीं का जाणार ?

कृष्णराव—अरे ! तें अजून कच्चें आहे. चाकावरून मडकीं काढिल्यावर तीं कांहीं दिवस सुकत ठेवितात, व मग चोपण्यानें तीं अशीं हळू हळू ठोकून कणखर करितात.

भानू—हीं भाजावीं नाहीं का लागत ?

कृष्णराव—लागतात तर. तो पाहा मडकीं भाजावयाचा अवा आहे. त्यांत शंभर शंभर मडकीं व दुसरीं भांडीं रांगेनें ठेवून मग लाकडाचा कीस, करडईचा भुसा अगर भाताचा तूस घालून, त्यावर राख पसरून सर्व बुजवून टाकितात. त्या आंगाला दोन भोकें आहेत, त्यांतून लाकडें घालून अवा पेटवितात. तो दुपारपासून संध्याकाळ-पर्यंत पेटत राहातो, व रात्रीं निवतो. मग दुसरे दिवशीं सकाळीं त्यांतून भांडीं बाहेर काढितात. हीं बघ, एथें रांजण, घागरी, कुंड्या, सुरया, कुजे, तवे, परळ, पणत्या, अशीं तऱ्हेतऱ्हेचीं भांडीं पडलीं आहेत. हीं सर्व अशींच तयार केलीं आहेत. आपल्या प्रांतापेक्षां सिंधप्रांतीं व उत्तर हिंदुस्तानांत कुंभार-काम चांगलें होतें. तिकडे भांड्यांवर उत्तम जिल्हई करितात व नकशी काढितात.

---

९७. तरफ.

कांहीं मुलगे शाळेंतील बागेंत काम करीत होते. वाटेंत एक बराच मोठा दगड पडला होता. करिमाच्या मनांत तो वाटेवरून दूर करावा असें आलें; पण त्याला तो जरासुद्धां हालेना. हें मास्तरांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिलें. तेव्हां त्यांनीं एक पहार आणून तिचें एक टोंक दगडाखालीं घातलें, व दगडाच्या जरा अलीकडे पहारेखालीं एका लहानशा दगडाचा टेकू दिला, व पहारेचें दुसरें टोंक करिमास दाबावयास सांगितलें. त्यानें तें दाबल्याबरोबर दगड वर उचलला. तेव्हां करिमास मौज वाटली.

गोविंदा—काय हो मास्तर, हें एक यंत्रच झालें, नाहीं काय ?

मास्तर—होय; ज्या साधनानें काम करणें सोपें जातें त्यास यंत्र म्हणतात. ह्या ठिकाणीं पहार हें अगदीं साधें यंत्र आहे. अशा यंत्रास तरफ म्हणतात. तरफेला टेकू लागतो, व टेकूनें तरफेचे दोन भाग होतात. त्यांना भुजा म्हणतात. शक्ति ज्या भागाला लावितात, त्या भागाला शक्ति-भुजा म्हणतात, व वजनाकडील भागाला वजन-भुजा म्हणतात. थोडी शक्ति लावून मोठें वजन उचलतां येण्याला शक्ति-भुजा ही वजन-भुजेपेक्षां लांब असली पाहिजे. हाच टेकू जर करिमाच्या बाजूला सारला, तर त्यानें कितीही जोर करून पहार दाबिली, तरी दगड हालावयाचा नाहीं. मग तुम्ही दोघे तिघे जेव्हां ती पहार दाबाल तेव्हां तो दगड उचलेल. थोडी शक्ति लावून पुष्कळ वजन उचलतां येतें, ही यंत्रापासून आपणांस मोठी सोय आहे.

पुरुषोत्तम—तराजूची दांडी हीसुद्धां तरफच होईल, नाहीं ?

मास्तर—होय. तींत दोरी अगर आंकडा अडकवितात ती कडी हा टेकू, दांडीच्या दोन बाजू त्या भुजा, एका पारड्यांतील वजनें हें वजन, व दुसऱ्या पारड्यांत घातलेला पदार्थ ही शक्ति समजावी.

कोंडू—दीड-दांडीमध्यें दोन्ही भुजा समान नसतात, म्हणून थोड्याशा पदार्थानें मोठें वजन तोललें जातें. त्यांत नफा होतो, पण तो बाण्याला होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मग मास्तरांनीं करिमास पुन्हा पहार दाबण्यास सांगून, त्यांनीं दुसरी पहार अगदीं दगडाखालीं घालून, पहिली काढून घेण्यास सांगितलें. मग त्यांनीं आपली पहार वर करून दगड पलीकडे लोटला. तेव्हां करीम म्हणाला, "मास्तर, आतां तुम्हीं टेकू नाहीं दिला?"

मास्तर—पहारेचें एक टोंक मीं जमिनीवर टेकलें होतें ना? तेंच एथें टेकू झालें, व त्या टोंकापासून दगडाच्या मध्यापर्यंत जें अंतर तीं वजन-भुजा, व टेकूपासून शक्ति लाविली तेथपर्यंत म्हणजे सगळी पहार अथवा तरफ ही शक्ति-भुजा झाली. आगगाडीच्या स्टेशनावर हमाल ओझें वाहून नेतात ती एकचाकी गाडी तुम्हीं पाहिली असेल, ती ह्या प्रकारची तरफच आहे. तींत चाक हा टेकू, गाडीची सर्व लांबी ही शक्ति-भुजा, व चाकापासून सामान मध्यें असतें तेथपर्यंत वजन-भुजा. त्या गाडीवर कितीतरी ओझें घालून एकटा मनुष्य ती ओढीत असतो! करिमानें जेव्हां दगड उचलला, तेव्हां टेकू मध्यें होता, व एका आंगाला दगडाचें वजन होतें आणि दुसऱ्या आंगाला त्यानें शक्ति लाविली होती; ह्याला तरफेचा पहिला प्रकार म्हणतात. पण मीं पहारेनें दगड उचलून टाकिला, त्यांत टेकू शेवटीं, वजन मध्यें, व शक्ति दुसऱ्या शेवटाला लाविली; हा तरफेचा दुसरा प्रकार होय. एकचाकी गाडी हें तरफेच्या दुसऱ्या प्रकाराचेंच उदाहरण आहे. तुमच्या हातावर ठेविलेलें पुस्तक तुम्हीं वर उचलिलें



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे, तुमचा हात हें तिसऱ्या प्रकाराच्या तरफेचें उदारहण होतें. त्यांत पुस्तक हें वजन, तुमचा हात ही तरफ, व कोपर हा टेकू होतो. ह्यांत वजन तरफेच्या एका शेवटास, टेकू दुसऱ्या शेवटास, आणि शक्ति म्हणजे हाताच्या स्नायूंची शक्ति, मध्यें असते.

---

१८. कप्पी आणि चाक व कणा.

पुरुषोत्तम—दादा, काल मास्तरांनीं आम्हांला तरफ म्हणजे काय तें सांगितलें व तरफेचे सर्व प्रकारही सांगितले.

दादा—सर्व प्रकार सांगितले ? बरें, पाणी काढण्याची कप्पी ही कोणत्या प्रकारची तरफ सांग पाहूं ?

पुरुषोत्तम—ही तरफ कशी ? ह्यांत टेकू, व भुजा कोठें आहेत ?



दादा—कोठें आहेत ! सांगतों, ऐक. अगोदर ही पाहा, दोन विती लाकडी पट्टी आहे. हिच्यामधोमध भोक आहे. ही ह्या खिळ्यांत अडकवितों; व हिच्या एका टोंकास दोरी बांधून एक वजन अडकवितों, व दुसऱ्या बाजूस दोरी बांधून ती मी ओढितों. पाहा, वजन वर उचललें. ही तरफ आहे कीं नाहीं ?

पुरुषोत्तम—होय, ही तरफ आहे. खिळा हा टेकू व दोन्ही बाजू ह्या भुजा. पण ह्यांत फार झालें तर वजन एक वीतभर वर चढेल, परंतु कप्पीनें तर साठसत्तर फूट खोलीवरील पाणी काढितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादा—बरें, हें यंत्र पाहा. ह्यांत तीन तरफा बसविल्या आहेत, व त्या तरफांच्या टोंकांना खोबणी पाडिल्या आहेत.



हें यंत्र ह्या खिळ्यांत अडकवितों व खोबणींवरून दोरी घेऊन तिच्या एका शेवटास वजन अडकवितों; व दुसरें शेवट हातांत धरून ओढूं लागतों. बघ, ह्या तरफा फिरूं लागल्या व वजन वर चढूं लागलें.

पुरुषोत्तम—ह्यांत वजन पुष्कळ वर चढतें खरें. अशा अनेक तरफा जोडल्यानें वजन हवें तेवढें वर चढवितां येईल.



दादा—बरें, टोंकांस खोबणी न पाडतां त्यांवरून गाडीच्या चाकावर जशी धाव असते तशी खोबण पाडलेली लाकडी धाव घातली व आऱ्यांच्या मध्यें जी पोकळ जागा आहे ती लाकडाच्या पट्ट्या मारून भरून काढिली, तर तें कशासारखें दिसेल?



पुरुषोत्तम—अगदीं पाणी ओढण्याच्या कप्पीसारखें दिसेल. हं! आतां मी समजलों. कप्पी अगर चाक तरफेचाच एक प्रकार आहे; त्यांत अनेक तरफा असतात एवढेंच काय तें विशेष.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादा—कप्पीनें पाणी काढण्याचें सोपें पडतें, कारण पाणी शेंदून



वर काढण्याच्याऐवजीं चाकावरून दोरी खालीं ओढून आपण पाणी काढितों. त्यामुळें शेंदण्यापेक्षां हें हलकें जातें. वाकी ह्या एकेरी कप्पीनें पाणी काढण्यांत शक्ति व वजन हीं दोन्ही समान लागतात. ह्या पाहा एथें दोन कप्प्या आहेत. ह्यांपैकीं एक तुळईस बसविलेली आहे व दुसरी फिरती आहे. ह्यांच्या साह्यानें आपणांस एक शेर वजनाची शक्ति लावून दोन शेर वजन उचलतां येतें. ह्याप्रमाणें शक्ति लावण्याची दिशा वदलून अगर कमी शक्ति लावून कप्पीनें ओझें वर चढविणें सोपें पडतें.

ह्या पाहा दुसऱ्या दोन कप्प्या एकमेकींस जुळवून एका आंसाभोंवतीं



फिरतील असें केलें आहे. ह्यांत एक कप्पी दुसरीपेक्षां मोठी आहे. ह्यांचा आंस दोन मेढींवर ठेविला आहे. दोन्ही कप्प्यांवरून एकीच्या उलट दुसरी अशा दोन दोऱ्या गुंडाळल्या आहेत. थोरल्या कप्पीला 'चाक'च म्हणतात व धाकटीला 'कणा' म्हणतात. चाकावरील दोरी ओढून तें चाक फिरूं लागलें म्हणजे कणाही फिरतो व त्यावरील दोरी गुंडाळत जाते. ह्या दोरीच्या शेवटीं जर वजन लाविलें तर चाक फिरविलें म्हणजे वजन वर चढेल. ह्याप्रमाणें चाकाला थोडी शक्ति लावून कण्यावरून मोठें ओझें उचलतां येतें. आपला पाणी ओढण्याचा राहाट ह्याच तत्त्वावर केलेला आहे. राहाटाच्या ज्या आडव्या दांड्यांवर दोर गुंडाळतो त्या दांड्या कणा होत, व राहाटाच्या पावक्यांनीं होणारें वर्तुळ तें चाक होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांचव्या पुस्तकांतील कवितांमधील कठीण शब्दावर टिपा.

७. देवाविषयीं.

१ न आठवीशी. २ भोगणें आल्यास. ३ संकट. ४ देह. ५ पीडा. ६ स्त्री. ७ हे नीचा, मूर्खा. ८ कुतरीं व डुकरें. ९ पापवासना. १० शाहाणा. ११ सांगते. १२ वुर्दशेतें. पावो. १३ भगवंताचा. १४ विघ्न. १५ दुसऱ्या. १६ पाड, पर्वा. १७ निवेस पात्र. १८ बेडूक. १९ संचय, सांठा.

१२. विद्याप्रशंसा.

१ कल्पवृक्षाप्रमाणें—हा वृक्ष इच्छिलेली वस्तु देतो. २ विद्येच्या शक्तीप्रमाणें. ३ विद्येनें. ४ पाहा. ५ पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं. ६ एकमेकांचा द्वेषभाव टाकून. ७ अग्नि आणि पाणी ह्यांच्या योगानें वाफेचें यंत्र चालतें हें ह्या आर्याधींत सांगितलें आहे. ८ मनुष्याला. ९ अग्नि आणि पाणी ह्यांच्या योगानें कापड विणण्याचीं यंत्रें-गिरण्या चालतात हें एथें दर्शविलें आहे. १० आगगाड्या. ११ आगबोटी. १२ तीं तीं कामें. १३ डोंगर. १४ निरोप नेणारी (तारायंत्र). १५ चित्रें काढणारा—सूर्याच्या प्रकाशानें म्हणजे फोटोग्राफीनें चित्रें काढतात, म्हणून त्यास चित्रकार असें म्हटलें आहे. १६ मंजूळ गाण्यानें—एकप्रकारचें वाद्य आहे तें हवेंत टांगून ठेविलें असतां वाऱ्यानें सुस्वर वाजतें म्हणून वायूस गायक असें म्हटलें आहे. १७ विद्या हीच कोणी देवी तिला. १८ एकनिष्ठेनें. १९ बोल, सांग.

१९. अभिमन्यूचा पराक्रम.

१ चक्राकार सैन्याची रचना. २ अर्जुन. ३ अभिमन्यु. ४ कमळासारखे ज्याचे डोळे आहेत असा. ५ अभिमन्यु. ६ सूर्य. ७ वसुदेवाची कन्या सुभद्रा तिचा पुत्र अभिमन्यु. ८ एकदम. ९ नक्षत्रें. १० गरुड. ११ सर्प. १२ मेघमंडळ. १३ कर्ण.

२४. जीवित-महिमा.

१ "जग हें खोटें आहे, जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं," असें म्हणणाऱ्या व त्यामुळें कांहीं उद्योग न करणाऱ्या लोकांना उद्देशून हा लहानसा फटका रचिला आहे. २ ज्यांत सार म्हणजे खरेपणा नाहीं असें. ३ भ्रांति, भुरळ. ४ जन्मास येण्याचा उद्देश. ५ संसाराची झटापट.

३०. कर्ण व शल्य यांचें संभाषण.

१ नाजूक भागांस. २ बेडूक. ३ मद्य पिण्यानें. ४ आईच्या मांडीवर असलेला. ५ सिंह. ६ जवळ असणाऱ्या लोकांच्या कानांना. ७ हत्तीच्या गंडस्थळांतील मोत्यांचा घास खाणारा. ८ सिंह. ९ फोडिलें, वळविलें. १० मद्य प्यालेल्या मनुष्यासारखा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३४. विपन्नावस्थेस पावलेल्या चारुदत्ताचे उद्गार.

१ दाट काळोखांत. २ मेल्यासारखा. ३ निर्धन. ४ गंडस्थल. ५ वैभव गेल्याचें दुःख. ६ ज्याचें द्रव्य नाहींसें झालें त्यास. ७ बायको. ८ ज्यांशीं तो बोलतो ते. ९ सद्वर्तनरूपी चंद्राची.

३८. नीतिशतकांतील वेंचे.

१ समजावूं. २ तहानेलेल्याची. ३ उन्हाच्या तापानें रखरखीत प्रदेशावर पाण्याचा भास होतो तें. ४ अरण्य. ५ कमळाच्या देठांतील धाग्यानें. ६ हिरा. ७ सदाचरणी. ८ जावो. ९ लक्ष्मी, द्रव्य, संपत्ति. १० ऐश्वर्य आलें असतां. ११ क्षमा. १२ प्रीति, आवड. १३ विद्येचा नाद. १४ मरण, नाश. १५ विद्या आहे अभिधा म्हणजे नांव ज्याला तें. १६ भांडतात. १७ वेडे. १८ हत्तीला. १९ जातीचें. २० कमळाचें. २१ स्त्री, बायको.

४४. गोपिका बाईचा पुत्र-शोक.

१ देखणे. २ प्रेतास. ३ सदाशिवरावभाऊसह. ४ पतीला. ५ पतीच्या मरणामुळें झालेल्या शोकानें अंतर्यामीं जळलेली (विव्हल झालेली). ६ रघुनाथरावास. ७ न्यायानें. ८ मोठा अभिमान. ९ निष्ठुर. १० माधवरावाची स्त्री रमाबाई. ११ नारायणरावाची स्त्री गंगाबाई हिनें. १२ दुःखद. १३ रघुनाथरावाची बायको. १४ अभागी.

४८. कर्णाची प्रार्थना आणि कृष्णाचें प्रत्युत्तर.

१ आपला वध करण्याला तयार झालेल्या अर्जुनाला. २ थांब. ३ युद्धाची भक्ति (आवड). ४ लागलेंच. ५ वर काढूं. ६ वेद आणि शास्त्रें जाणणाऱ्या. ७ उत्तम कुळांत जन्मलेल्या. ८ हातांत शस्त्र न घेतलेला. ९ दुःखानें विव्हल. १० मित्रा. ११ श्रेष्ठ वीरा. १२ कल्याणाचा ठेवा. १३ सुख. १४ कर्णा. १५ लाखेच्या घरांत. १६ गतप्राण. १७ स्वीकार केला असता. १८ संपत्ति-रूप मद्यानें माजलेल्यांनीं. १९ युधिष्ठिराला.

५४. चंद्रोदय.

१ फासून. २ कपाळास. ३ जेथें कोणी शत्रु नाहीं असा. ४ सिंह. ५ आपला राजा, चंद्र. ६ मोठा, प्रौढ. ७ सुंदर आहेत अवयव ज्याचे असा. ८ भीतीनें पीडित. ९ गुहांच्या अंतर्भागीं. १० किरण, (पक्षीं) हात. ११ चुन्याप्रमाणें (पक्षीं अमृतानें) पांढरी. १२ ग्रस्त झालेले. १३ चंद्रानें. १४ खरोखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar